लोकलेखा समिती

(२०१०-२०११)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-२००६ च्या
महसूली जमा अहवालामधील
वित्त विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.२.२.३ व २.३),
महसूल व वन (महसूल) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.३.२.१),
गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.३.६),
गृहनिर्माण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.४.२.१२),
महसूल व वन (महसूल) आणि उद्योग, ऊर्जा व कामगार (उद्योग)
विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.६.२.९ व ६.२.१५),
जलसंपदा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग,पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग,
उद्योग विभाग, ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण)
विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ६.३),
गृह (परिवहन) विभागाशी संबंधीत (परिच्छेद क्र. ६.४) यावरील

सातवा अहवाल

(हा अहवाल विधानसभा / विधानपरिषद सभागृहास
दिनांक डिसेंबर, २०११ रोजी सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर.
२०११

लोकलेखा समिती

२०१०-२०११

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-२००६ च्या
महसूली जमा अहवालामधील
वित्त विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.२.२.३ व २.३),
महसूल व वन (महसूल) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.३.२.१),
गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.३.६),
गृहनिर्माण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.४.२.१२),
महसूल व वन (महसूल) आणि उद्योग, ऊर्जा व कामगार (उद्योग)
विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.६.२.९ व ६.२.१५),
जलसंपदा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग,पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग,
उद्योग विभाग, ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण)
विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ६.३),
गृह (परिवहन) विभागाशी संबंधीत (परिच्छेद क्र. ६.४) यावरील

सातवा अहवाल

लोकलेखा समिती

२०१०-२०११

समिती प्रमुख

१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

२) श्री.कालिदास कोळंबकर - वि.स.स.
३) श्री.निलेश देशमुख-पारवेकर - वि.स.स.
४) डॉ.नामदेव उसेंडी - वि.स.स.
५) श्री.अमित देशमुख - वि.स.स.
६) श्री.रामप्रसाद कदम-बोर्डीकर - वि.स.स.
७) श्री. रवि राणा - वि.स.स.
८) श्रीमती मिनाक्षी पाटील - वि.स.स
९) श्री.ए.टी.पवार - वि.स.स.
१०) श्री.नवाब मलिक - वि.स.स.
११) श्री.विलास लांडे - वि.स.स.
१२) श्री.शिवेंद्रसिंह भोसले - वि.स.स.
१३) श्री.संजय सावकारे - वि.स.स.
*(१४) श्री.सुधीर मुनगंटीवार - वि.स.स.,(दि.२० ऑक्टोबर, २०१० रोजी पर्यंत)
(१४ अ) प्रा. राम शिंदे- वि.स.स. (दि.२० ऑक्टोबर,२०१० रोजी पासून)
१५) श्री.गिरीष महाजन - वि.स.स.
१६) श्री.नानाभाऊ पटोले - वि.स.स.
१७) श्री.सुर्यकांत दळवी - वि.स.स.
१८) श्री.आर.एम.वाणी - वि.स.स.
१९) श्री.एकनाथ शिंदे - वि.स.स.
२०) श्री.बाळा नांदगावकर - वि.स.स.
२१) श्री. सुरेशदादा देशमुख - वि.प.स.
२२) श्री.भाई जगताप - वि.प.स.
**(२३) श्री. राजेंद्र जैन - वि.प.स.
२४) श्री. विनोद तावडे - वि.प.स.
२५) डॉ. दिपक सावंत - वि.प.स.

सदरहू समिती दिनांक) २४/२/२०१० रोजी विधानसभा व दिनांक २/३/२०१० रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
२) श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
३) श्री. सु. सा. गायकवाड, वित्तीय सल्लागार
४) श्री. ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव
५) श्री. रामनाथ रा. काठे, अवर सचिव (समिती)
६) श्री. सोमनाथ न. सानप, कक्ष अधिकारी

*** श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स यांनी दिनांक २० ऑक्टोबर, २०१० रोजी समिती सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर प्रा. राम शिंदे, वि.स.स. यांची मा. अध्यक्ष ,महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक २० ऑक्टोबर, २०१० रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

****श्री.राजेंद्र जैन,वि.प.स.यांची दिनांक ५ डिसेंबर,२०१० रोजी विधानपरिषद सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे सदरची जागा रिक्त आहे.**

(पाच)
प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरुन भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-२००६ यावर्षाच्या महसूली जमा अहवालामधील वित्त विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.२.२.३ व २.३), महसूल व वन (महसूल) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.३.२.१), गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.३.६) गृहनिर्माण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.४.२.१२), महसूल व वन (महसूल) विभाग आणि उद्योग, ऊर्जा व कामगार (उद्योग) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र.६.२.९ व ६.२.१५), जलसंपदा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, उद्योग विभाग, ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ६.३), गृह (परिवहन) विभागाशी संबंधीत (परिच्छेद क्र. ६.४) यावर विचार करुन लोकलेखा समितीचा सातवा अहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक २९ व ३० जुन, २०१०, दिनांक ११, १८ व ३१ ऑगस्ट, २०१० दिनांक ७, ८, २८ व २९ सप्टेंबर, २०१० व दिनांक ५ जानेवारी, २०११ रोजी अप्पर मुख्य सचिव, गृह विभाग, महसूल विभाग, प्रधान सचिव, वित्त विभाग, प्रधान सचिव, उद्योग विभाग, प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता, व प्रधान सचिव, गृह तसेच सचिव, उद्योग विभाग, सचिव, गृह (परिवहन) विभाग, सचिव, गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभाग, सचिव, जलसंपदा विभाग, सचिव, जलसंधारण विभाग, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांची साक्ष विधान भवन, मुंबई येथे घेतली.

प्रधान महालेखाकार, महाराष्ट्र-१, मुंबई तसेच महालेखाकार, महाराष्ट्र-२, नागपूर हे समितीच्या निमंत्रणावरुन बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांची देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. बैठकीच्या कामकाजाच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेली आश्वासित माहिती व परिपत्रके परिशिष्ट "अ" मध्ये देण्यात आलेली आहेत. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट "ब" मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने दिनांक डिसेंबर, २०११ रोजी झालेल्या बैठकीत हा अहवाल विचारात घेतला व त्यास काही फेरफारासंह मान्यता दिली.

विधान भवन,
नागपूर.
दिनांक : डिसेंबर, २०११

गिरीश बापट,
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती

(सहा)

अनुक्रमणिका

अ.क्र.	विभाग व तपशील	पृष्ठ क्रमांक
(१)	(२)	(३)
	सन २००५-२००६ च्या महसूली जमा रकमांचा अहवालामधील परिच्छेद	
	वित्त विभाग	
(१)	(अ) घोषणापत्रावरील विक्रीस चुकीची मान्यता (परिच्छेद क्र.२.२.३)	
	(ब) मार्गस्थ विक्रीस चुकीची मान्यता (परिच्छेद क्र. २.३)	
	महसूल व वन (महसूल) विभाग	
(२)	अभिहस्तांतरण विलेखाचे चुकीचे वर्गीकरण (परिच्छेद क्र. ३.२.१)	
	गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभाग	
(३)	ताडीच्या हप्त्यांची वसूली न करणे (परिच्छेद क्र. ३.६)	
	गृहनिर्माण विभाग	
(४)	एकत्रीकृत खर्चाचा शासनाच्या हिस्स्यांचा महसूल वसूल झाला नाही. (परिच्छेद क्र ४.२.१२)	
	महसूल व वन (महसूल) विभाग / उद्योग विभाग	
(५)	(अ) संनियंत्रण आणि अंतर्गत नियंत्रणाचा अभास. (परिच्छेद क्र. ६.२.९)	
	(ब) स्वामित्वधनाची वसुली न करणे (परिच्छेद क्र. ६.२.१५)	
	जलसंपदा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, उद्योग विभाग,ग्रामविकास व जलसंधारण विभाग	
(६)	हमी शुल्क प्रदान न करणे (परिच्छेद क्र. ६.३)	
	गृह (परिवहन) विभाग	
(७)	पोलीसांच्या मूल्यांची वसूली न करणे.	

(परिच्दे क्र. ६.४)

वित्त विभाग

अधिनियमात आवश्यक सुधारणा करणे.

१.१ (अ) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या महसुली जमा अहवालामधील परिच्छेद क्र. **२.२.३ "घोषणापत्रावरील विक्रीस चुकीची मान्यता"** या संदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय व्यक्त केले.

१.२ व्यापा-याचे नाव : मे.जाधवजी ॲण्ड कं.
आक्षेप :-

आंतरराज्यीय खरेदीदार व्यापा-याने क नमुन्यावर रु.२०.८४ लाख खरेदी ऐवजी रु.१२.६४ लाख खरेदी दाखविलेली आहे.

विचारणा क्रमांक १ :- सदर व्यवहाराबाबत विभागाने उलट-तपासणी केली आहे काय? असल्यास त्याबाबतची प्राप्त माहिती स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद करावी.

१.३ ज्ञापन :

दोष निवारण कृती : आंतरराज्यीय खरेदीदार मे.हिंदुस्थान इंक ॲण्ड रेझिन्स लि.,दमण यांनी रु.२०,८३,९४४/- इतक्या रकमेचा क नमुना क्र.०२५१७५९,दि.२.५.२००३ दिलेला आहे.

विचारणा क्र. १ चे उत्तर:- सदर प्रकरणामध्ये विक्रीकर अधिकारी, दमण येथे उलट तपासणीसाठी पत्र पाठविले असून अद्याप माहिती प्राप्त झालेली नाही.

१.४ यापा-याचे नाव : मे.एशियन ऑईल कं.
आक्षेप :-

व्यापा-यांच्या आंतरराज्यीय विक्रीवर खरेदीदाराने क नमुना सादर केल्याने सवलतीच्या दराने के.वि.अ. आकारणी करण्यात आली. परंतु उलट तपासणीत (X Verification) असे आढळून आले कि, खरेदीदार मे.सिल्वन केमिकल्स प्रा लि.यांच्या पुस्तकात मात्र ही विक्री क नमुन्यात दर्शविलेल्या विक्रीपेक्षा रु. ३२.८३ लाख इतक्या रकमेने कमी दर्शविलेली आहे.

त्यामुळे रु.५.०२ लाख रकमेचे न्युन निर्धारण झाले.

विचारणा क्रमांक १ :- सदर व्यवहाराबाबत विभागाने उलट-तपासणी केली आहे काय? असल्यास, त्याबाबतची प्राप्त माहिती स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये नमूद करावी.

१.५ ज्ञापन :

दोष निवारण कृती :- 'क' नमुन्यावर आंतरराज्यीय खरेदी करणारे व्यापारी मे.सिल्वन केमिकल प्रा.लि., दमण यांनी दिलेल्या किंमतीचा रु.३३.६३ 'क' नमुना बरोबर असून त्याची त्यांच्या नोंदवहीतील खरेदीची प्रत दिलेली आहे. विक्रीकर अधिकारी दमन यांना पडताळणी ज्ञाप पाठविला आहे. अहवाल प्रतिक्षाधिन आहे.

१.६ व्यापा-याचे नाव : मे.डेल्टा लेन्स प्रा.लि.

आक्षेप :-

व्यापा-यांच्या आंतरराज्यीय विक्रीवर खरेदीदाराने क नमुना सादर केल्याने सवलतीच्या दराने के.वि.का.अन्वये आकारणी करण्यात आली. परंतु महालेखापालांच्या उलट तपासणीत (X Verification) असे आढळून आले कि, खरेदीदार मे.ऑप्टिक, न्यू.दिल्ली यांच्या पुस्तकात मात्र ही विक्री क नमुन्यात दर्शविलेल्या विक्रीपेक्षा रु. ०.५४ लाख इतक्या रकमेने कमी दर्शविलेली आहे.

त्यामुळे रु.०.०५ लाख रकमेचे न्यून निर्धारण झाले.

विचारणा क्रमांक १ :- विभागाने सदर व्यवहाराची उलट-तपासणी केली आहे काय? त्याबाबत माहिती प्राप्त झाली असल्यास स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद करावी.

१.७ ज्ञापन :

दोष निवारण कृती :- क नमुन्यावर आंतरराज्य विक्री रु.६.३९ लाख इतकी दाखविलेली असून प्रत्यक्ष आंतरराज्य विक्री ही रु.५.५२ लाख इतकी होती. आंतरराज्य विक्रीतील फरक हा माल परत केल्यामुळे (Goods Return) झालेला आहे. त्याबाबत पुरावा म्हणून Credit Note दिल्याची यादी देण्यात आलेली आहे. त्यामुळे आंतरराज्यीय विक्री व क नमुना यात फरक रहात नाही. विक्रीकर आयुक्त, न्यु दिल्ली यांना उलट तपासणीसाठी पत्र पाठविले असून अहवाल प्रतिक्षाधीन आहे.

१.८ व्यापा-याचे नाव : मे.अरुपुकोटाय श्रीजय विलास लि.

आक्षेपः-

व्यापा-यांच्या आंतरराज्यीय विक्रीवर खरेदीदाराने क नमुना सादर केल्याने सवलतीच्या दराने के.वि.का.अन्वये आकारणी करण्यात आली. परंतु महालेखापालांच्या उलट तपासणीत (X Verification) असे आढळून आले की, खरेदीदार मे.महाशक्ती सिल्क इंडस्ट्रीज प्रा.लि. यांच्या पुस्तकात मात्र ही विक्री क नमुन्यात दर्शविलेल्या विक्रीपेक्षा रु. ४३.९४ लाख इतक्या रकमेने कमी दर्शविलेली आहे.

त्यामुळे रु.३.५२ लाख रकमेचे न्यून निर्धारण झाले.

विचारणा क्रमांक १ :- विभागाने सदर व्यवहाराची उलट-तपासणी केली आहे काय? त्याबाबत माहिती प्राप्त झाली असल्यास स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद करावी.

१.९ ज्ञापन :

दोष निवारण कृती :- 'क' नमुन्यावर मे.महाशक्ती सिल्क इंड.प्रा.लि. या व्यापा-यास केलेली आंतरराज्य विक्रीची रक्कम रु.६७.४५ लाख ही बरोबर असून ती खाते नोंदवही प्रमाणे तपासलेली आहे. खरेदीदार व्यापा-याने आंतरराज्यीय खरेदी रु.२३.५१ लाख इतकी दाखविलेली असून ती वर्ष २००३-०४ या वर्षाची असून २००२-०३ ची नाही. त्यामुळे महसूल हानी होत नाही.

विचारणेस उत्तरः- सदर प्रकरणामध्ये दमण येथे उलट-तपासणीसाठी पत्र पाठविले असून अद्यापपर्यन्त माहिती प्राप्त झाली नाही.

१.१० व्यापा-याचे नाव : मे.प्रिमियर लुब्रीकंटस् लि.

आक्षेपः-

व्यापा-यांच्या आंतरराज्यीय विक्रीवर खरेदीदाराने क नमुना सादर केल्याने सवलतीच्या दराने के.वि.का.अन्वये आकारणी करण्यात आली. परंतु महालेखापालांनी केलेल्या उलट तपासणीत (X Verification) असे आढळून आले कि, खरेदीदार मे.हिंदुस्थान इंक ॲण्ड रेझिन्स लि.,दमण यांच्या पुस्तकात मात्र ही विक्री क नमुन्यात दर्शविलेल्या विक्रीपेक्षा रु.६४.७१ लाख इतक्या रकमेने कमी दर्शविलेली आहे.

त्यामुळे रु. ९.९० लाख रकमेचे न्यून निर्धारण झाले.

विचारणा क्रमांक १ :- विभागाने सदर व्यवहाराची उलट-तपासणी केली आहे काय? त्याबाबत माहिती प्राप्त झाली असल्यास स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद करावी.

१.११ ज्ञापन :

दोष निवारण कृती :- खरेदीदार व्यापारी मे.हिंदुस्थान इंक ॲण्ड रेझिंग लि.,दमण यांनी क नमुन्यात दर्शविलेली खरेदीची रक्कम रु.६९.१६ लाख क नमुन्याला जोडलेल्या यादीनुसार बरोबर आहे.

विचारणेस उत्तरः- उलट तपासणीसाठी विक्रीकर अधिकारी, दमण विभाग यांना स्मरणपत्र पाठविले असून अहवाल प्रलंबित आहे.

१.१२ व्यापा-याचे नाव : मे.समीर डाय केम.

आक्षेप :-

व्यापा-यांच्या आंतरराज्यीय विक्रीवर खरेदीदाराने क नमुना सादर केल्याने सवलतीच्या दराने के.वि. का.अन्वये आकारणी करण्यात आली. परंतु महालेखापालांनी केलेल्या उलट तपासणीत (X Verification) असे आढळून आले की, खरेदीदार मे.हिंदुस्थान इंक ॲण्ड रेझिन्स लि.,दमण यांच्या पुस्तकात मात्र ही विक्री क नमुन्यात दर्शविलेल्या विक्रीपेक्षा रु.३०.८० लाख इतक्या रकमेने कमी दर्शविलेली आहे.

त्यामुळे रु.३.०८ लाख रकमेचे न्यून निर्धारण झाले.

विचारणा क्रमांक १ :- विभागाने सदर व्यवहाराची उलट-तपासणी केली आहे काय? त्याबाबत माहिती प्राप्त झाली असल्यास स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद करावी.

१.१३ ज्ञापन :

दोष निवारण कृती :- खरेदीदार व्यापारी मे.हिंदुस्थान इंक ॲण्ड रेझिंग लि.,दमण, यांनी रु.३१.२४ लाख एवढी आंतरराज्यीय केलेली खरेदी ही बरोबर आहे. ती खाते नोंदवहीप्रमाणे तपासली असता जोडपत्र व 'क' नमुने बरोबर असल्याचे आढळले.

विचारणेस उत्तरः- उलट तपासणीसाठी विक्रीकर आयुक्त, दमण यांना दि.२२.३.२००७ रोजी पत्र पाठविले असून अहवाल प्रलंबित आहे.

१.१४ व्यापा-याचे नाव : मे.जयकेम लिमिटेड.

आक्षेपः-

व्यापा-यांच्या आंतरराज्यीय विक्रीवर खरेदीदाराने क नमुना सादर केल्याने सवलतीच्या दराने के.वि.अ. आकारणी करण्यात आली. परंतु उलट तपासणीत (X Verification) असे आढळून आले कि, खरेदीदार मे.प्रिमियर पॉलीमर्स.,सिल्वासा यांच्या पुस्तकात मात्र ही विक्री क नमुन्यात दर्शविलेल्या विक्रीपेक्षा रु. १७.८१ लाख इतक्या रकमेने कमी दर्शविलेली आहे.

त्यामुळे रु.१.७८ लाख रकमेचे न्यून निर्धारण झाले.

१.१५ ज्ञापन :

दोष निवारण कृती :- खरेदीदार व्यापारी मे.प्रिमियर पॉलीमर्स, दादरा नगर हवेली यांनी क नमुना क्र.DNH/C/००६८४२८ वर केलेली आंतरराज्यीय खरेदी ही बरोबर असल्याचे कळविले आहे.याबाबत विक्री करणा-या व्यापा-याने मे.प्रिमियर पॉलीमर्स, दादरा नगर हवेली यांचे पत्र सादर केलेले आहे. पुढील कायर्वाही प्रलंबित आहे.

१.१६ व्यापा-याचे नाव : मे.महाराष्ट्र ऑरगन मेटॅलिक कॅटॅलिस्ट.

आक्षेपः-

व्यापा-यांच्या आंतरराज्यीय विक्रीवर खरेदीदाराने 'क' नमुना सादर केल्याने सवलतीच्या दराने के.वि.अ. आकारणी करण्यात आली. परंतु उलट तपासणी (X Verification) असे आढळून आले की, खरेदीदार मे.आरटेक सरफिन, दमण यांच्या पुस्तकात मात्र ही विक्री क नमुन्यात दर्शविलेल्या विक्रीपेक्षा रु. २८.४४ लाख इतक्या रकमेने कमी दर्शविलेली आहे.

त्यामुळे रु.२.८४ लाख रकमेचे न्यून निर्धारण झाले.

विचारणा क्रमांक १ :- अहवालाबाबतची माहिती स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद करावी.

विचारणा क्रमांक २ :- मे.आर. टेक सरफाईन केमिकल लि. यांनी निर्धारणा अधिकारी, दमण यांना सादर केलेल्या नमुना क क्रमांक २२६७७५ रु.१.३१ लाखासाठी दिल्याचे नमूद केले आहे.

१.१७ ज्ञापन :

दोष निवारण कृती :-

सदर मुद्दयाबाबत पडताळणी करता निर्धारणा अधिका-याने मे.महाराष्ट्र ऑरगन मेटॅलिक कॅटॅलिस्ट यांच्या आंतरराज्यीय विक्री मे.आर.टेक सरफाईन केमिकल्स् लि. यांच्या पुस्तकाची पुर्नतपासणी केली असता रु.२९,७४,५००/- चा माल विकलेला आहे व त्याबाबत त्यांना 'क' नमुना क्र.२२६७७५ प्राप्त झालेला आहे. तसेच मे.आर.के.सरफाईन केमिकल्स् लि. यांच्याकडून रु.२९,७४,५००/- मिळाल्याबाबतचे व व्यवहाराकरीता "क" नमुना क्र. २२६७७५ दिलेला आहे. याबाबतचे पत्र सादर केलेले आहे. सदर प्रकरणात कोणतीही तफावत येत नाही.

विचारणेस उत्तरः-या कार्यालयाचे दि.७.८.०८ च्या पत्रान्वये निर्धारणा अधिकारी यांना नमुना 'क' वरील व्यवहाराची पडताळणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अहवाल प्रतिक्षाधीन आहे.

१.१८ व्यापा-याचे नाव : मे.आरमोर पॉलिमर्स प्रा. लि.

आक्षेपः-

व्यापा-यांच्या आंतरराज्यीय विक्रीवर, खरेदीदाराने "क" नमुना सादर केल्याने, सवलतीच्या दराने के.वि.अ. अन्वये कर आकारणी करण्यात आली. परंतु उलट तपासणीत (X Verification) असे आढळून आले कि, खरेदीदार मे.रोनित फार्मा लिमिटेड, हैद्राबाद यांच्या पुस्तकात मात्र ही विक्री "क" नमुन्यात दर्शविलेल्या विक्रीपेक्षा रु. ६०.८९ लाख इतक्या रकमेने कमी दर्शविलेली आहे.

त्यामुळे रु.६.०९ लाख रकमेचे न्यून निर्धारण झाले.

विचारणा क्रमांक १ :-

संबंधित विभागाकडून अहवाल मागवून त्याबाबतची माहिती स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद करावी.

विचारणा क्रमांक २:- नमुना 'क' क्रमांक ३९६४५२ व बिले पाठविण्यात यावी.

१.१९ ज्ञापन :

दोष निवारण कृती :-

निर्धारणा अधिकाऱ्याने व्यापाऱ्याला पुस्तकांसह पडताळणी करीता बोलाविले असता असे दिसून आले की, व्यापाऱ्याने परप्रांतीय व्यापाऱ्यास नमुना 'क' क्रमांक C/AP ०६९२२७८ व विक्री बील क्रमांक ७८ प्रमाणे दि. २९-५-०० ला रु. ३,७०,९३५/- चा माल विकला होता. तसेच त्याच व्यापाऱ्यास रु. ६४,५९,६४८/- चा माल विकलेला असून त्याकरिता नमुना 'क' क्रमांक CE/EP ०३९६४५२ हा देण्यांत आलेला आहे. रु. ६४,५९,६४८/- चे फक्त एक बिल नसून त्यात खालीलप्रमाणे बिले व रकमा अंतर्भूत आहेत.

अ.क्र.	बिल क्रमांक व दिनांक	रक्कम
१	३३/ ९-५-२०००	रु. ९,३४,९६०/-
२	५०/१९-५-२०००	रु. ९,३४,९६०/-
३	९६/७-६-२०००	रु. ९,३४,९६०/-
४	९७/८-६-२०००	रु. १४,९५,९३६/-
५	१८३/ १९-८-२०००	रु. २१,५८,८३२/-
	एकूण	रु. ६४,५९,६४८/-

सदर सर्व बिलाची नोंद त्यांच्या पुस्तकात आहे व त्यांना मिळालेले 'क' नमुने बरोबर आहेत.

विचारणेस उत्तर:- या कार्यालयाचे दि.४.११.०८चे पत्रान्वये नमुना 'क' क्रमांक ३९६४५२ व बिलांच्या प्रती मागविण्यात आल्या आहेत. अहवाल प्रतिक्षाधीन आहेत.

१.२० व्यापा-याचे नाव : मे. ईगल आयर्न ॲण्ड मेटल इंडस्ट्रीज.

आक्षेप:-

व्यापा-यांच्या आंतरराज्यीय विक्रीवर, खरेदीदाराने 'क' नमुना सादर केल्याने, सवलतीच्या दराने के.वि.अ. आकारणी करण्यात आली. परंतु उलट तपासणीमध्ये (X Verification) असे आढळून आले कि, खरेदीदार मे.हिंदुस्थान इंक ॲण्ड रेझिन्स लिमिटेड, दमण यांच्या पुस्तकात मात्र ही विक्री 'क' नमुन्यात दर्शविलेल्या विक्रीपेक्षा रु. २५.३५ लाख इतक्या रकमेने कमी दर्शविलेली आहे.

त्यामुळे रु.३.८८ लाख रकमेचे न्यून निर्धारण झाले.

विचारणा क्रमांक १ :- अहवालाबाबतची माहिती स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद करावी.

विचारणा क्रमांक २ :- मे.हिंदुस्थान इंक ॲण्ड रेझिंग लि.यांना निर्धारणा अधिकारी, दमण यांना सादर केलेल्या नमुना 'क' वापर विवरणपत्रकात नमुना 'क' क्र.०३०१२३१ वर रु.०.१८ लाखासाठी दिल्याचे नमूद केले आहे.

विचारणा क्रमांक ३ :-

अंतिम अहवालाबाबतची माहिती स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद करावी.

१.२१ ज्ञापन :

दोष निवारण कृती :- खरेदीदार व्यापारी मे.हिंदुस्थान इंक ॲण्ड रेझिंग लि.दमण यांनी 'क' नमुना क्र.DD/C/०३०१२३१ वर केलेली आंतरराज्यीय खरेदी ही बरोबर असल्याचे कळविले आहे. याबाबत खरेदीदार व्यापारी मे.हिंदुस्थान इंक ॲण्ड रेझिंग लि. दमण यांचे पत्र सादर केलेले आहे.

विचारणेस उत्तरः-

सह आयुक्त (व्यवसायकर) ठाणे यांनी दि.२.१.०८ रोजी पत्राने मे.हिंदुस्थान इंक ॲण्ड रेझिंग लि. नमुना क क्रमांक DD/C/०३०१२३१ वर खरेदी केलेल्या रु.२५,५३,७७८/- च्या मालाची पूर्ण नोंद लेखा पुस्तकात केली असल्याचे व त्यावरील केंद्रिय विक्रीकर भरल्याचे कळविले आहे.

व्यापाऱ्याने सहाय्यक व्हॅट अधिकारी यांना दि.१४.१२.०५रोजी 'क' नमुना वापर विवरण नव्याने सादर केले आहे.

विचारणेस उत्तर :- अहवाल प्रलंबित आहे.

१.२२ व्यापा-याचे नाव : मे.कोरल कॉस्मेटिक्स लि.

आक्षेपः-

व्यापा-यांच्या आंतरराज्यीय विक्रीवर खरेदीदाराने क नमुना सादर केल्याने सवलतीच्या दराने के.वि.अ. आकारणी करण्यात आली. परंतु महालेखापालांच्या उलट तपासणीत (X Verification) असे आढळून आले की, खरेदीदार मे.कोलगेट पामोलिव्ह इंडिया लि., नवी दिल्ली यांच्या पुस्तकात मात्र ही विक्री क नमुन्यात दर्शविलेल्या विक्रीपेक्षा रु.१९.३३ लाख इतक्या रकमेने कमी दर्शविलेली आहे.

त्यामुळे रु.२.९६ लाख रकमेचे न्यून निर्धारण झाले.

विचारणा क्रमांक १ :- विभागाने सदर व्यवहाराची उलट-तपासणी केली आहे काय? त्याबाबत माहिती प्राप्त झाली असल्यास स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद करावी.

१.२३ ज्ञापन :

दोष निवारण कृती :- मे.कोलगेट पामोलिव्ह इंडिया, नवी दिल्ली यांनी केलेल्या आंतरराज्यीय विक्रीच्या एकूण ८ बिलांसाठी एकच क नमुना (क्र.१२ पी ०६१०११३) दिलेला होता व त्यांची एकूण बेरीज चुकून ८४.८५ लाख ऐवजी ६५.५२ लाख इतकी दर्शविली होती. त्यामुळे खरेदीदाराच्या पुस्तकातील रकमेत व क नमुन्यातील रकमेत तफावत दिसून येत होती. आता ही चूक खरेदीदाराने (मे.कोलगेट पामोलिव्ह) सही करुन दुरुस्त केल्यामुळे क नमुन्यातील रक्कम आता रु.८४.८५ लाख इतकी झाली आहे. त्यामुळे आता दोन्ही रकमातील चुकीने आलेली तफावत दूर करण्यात आली आहे.

विचारणेस उत्तरः- सदर प्रकरणामध्ये निर्धारणा अधिका-याने मा.विक्रीकर आयुक्त, एन. सी.टी.शासन दिल्ली येथे उलट-तपासणीसाठी पत्र पाठविले आहे. माहिती प्राप्त झालेली नाही. अहवाल प्रतिक्षाधिन आहे.

१.२४ व्यापा-याचे नाव : मे.पॅनोरमा इंडस्ट्रीज.

आक्षेपः-

व्यापा-यांच्या आंतरराज्यीय विक्रीवर खरेदीदाराने क नमुना सादर केल्याने सवलतीच्या दराने के.वि.अ. आकारणी करण्यात आली. परंतु महालेखापालांच्या उलट तपासणीत (X Verification) असे आढळून आले की, खरेदीदार मे.हिंदुस्थान इंक ॲण्ड रेसिंग लि.,सिल्वासा यांच्या पुस्तकात मात्र ही विक्री क नमुन्यात दर्शविलेल्या विक्रीपेक्षा रु. ०६.६३ लाख इतक्या रकमेने कमी दर्शविलेली आहे.

त्यामुळे रु.०.६६ लाख रकमेचे न्यून निर्धारण झाले.

विचारणा क्रमांक १ :- विभागाने सदर व्यवहाराची उलट-तपासणी केली आहे काय? त्याबाबत माहिती प्राप्त झाली असल्यास स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद करावी.

१.२५ ज्ञापन :

दोष निवारण कृती :- मे.हिंदुस्थान इंक ॲण्ड रेसिंग, दमण यांनी केलेल्या आंतरराज्यीय खरेदीच्या एकूण २ बिलासाठी एकच क नमुना (क्र.डीएनएच-०१५७९२४) दिलेला होता व त्याची एकूण बेरीज चुकून १३.२७ लाख ऐवजी ६.६३ लाख इतकी दर्शविली होती. त्यामुळे खरेदीदाराच्या पुस्तकातील रकमेत व क नमुन्यातील रकमेत तफावत दिसून येत होती. आता ती चुक खरेदीदाराने (मे.हिंदुस्थान इंक ॲण्ड रेसिंग) खातेपुस्तकातील नोंदींच्या आधारे सुधारली आहे व आता दोन्ही रकमातील चुकीने झालेली तफावत दूर करण्यात आली आहे.

विचारणेस उत्तरः- व्यवहाराचा उलट तपासणीसाठी विक्रीकर आयुक्त, दमण यांना पत्र पाठविले आहे. अहवाल प्रतिक्षाधीन आहे.

१.२६ व्यापा-याचे नाव : मे.क्वालिटी इंडस्ट्रीज.(मे.प्युरीटी इंडस्ट्रीज नाही)

आक्षेपः-

मे.क्वालिटी इंड. यांनी मे.हिंदुस्थान इंकस् ॲण्ड रेझिन्स लि., दमण यांना 'क' घोषणापत्र क्र .डीडी/सी/०२३/६५३७ यावर केलेली आंतरराज्यीय विक्री रु.५०.१८ लाख होती. परंतु मे. हिंदुस्थान इंकस् ॲण्ड रेझिन्स लि., दमण यांनी रु.०.७२ लाख इतका व्यवहार नमूद केला आहे. याप्रमाणे रु.४९.४६ इतका फरक आहे. त्याचा परिणाम म्हणून न्यून निर्धारण रु.४.९५लाख झाले.

विचारणा क्रमांक १ :- विभागाने सदर व्यवहाराची उलट-तपासणी केली आहे काय? त्याबाबत माहिती प्राप्त झाली असल्यास स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद करावी.

१.२७ ज्ञापन :

दोष निवारण कृती :- निर्धारणा प्राधिका-याने मे.क्वालिटी इंडस्ट्रीज यांनी केलेल्या २३ विक्री व्यवहाराची पडताळणी करुन खरेदीदार मे.हिंदुस्थान इंक ॲण्ड रेझिंग लि. ची खरेदी 'क' घोषणापत्र क्र.डीडी/सी/०२३/६५३७ मध्ये समाविष्ट आहे. त्याबाबत प्रस्तुत डिलव्हरी चलन ट्रान्सपोर्ट पावती व खाते वही पडताळण्यात आली आहे.

विचारणेस उत्तरः- सहाय्यक (व्हॅट) अधिकारी, दमण यांनी त्यांचे दि.१५.२.०८ च्या पत्रानुसार मे.हिंदुस्थान इंक ॲण्ड रेझिंग लि. दमण यांनी 'क' घोषणापत्र क्र.डीडी/ सी/०२३/६५३७ वर मान्य केलेल्या आंतरराज्यीय विक्रीची नोंद त्यांच्या लेखा पुस्तकात रु.५०.१८ लाख असल्याचे कळविले आहे. त्यामुळे मान्य केलेला दावा योग्य आहे.

१.२८ व्यापा-याचे नाव : मे.पर्ल इंजि.पॉलिमर्स लि.

आक्षेपः-

व्यापा-यांच्या आंतरराज्यीय विक्रीवर, खरेदीदाराने 'क' नमुना सादर केल्याने, सवलतीच्या दराने के.वि.अ. आकारणी करण्यात आली. परंतु उलट तपासणीमध्ये (X Verification) असे आढळून आले कि, खरेदीदार मे.पद्मिनी टेक्नॉलॉजीस लि.,सिल्वासा यांच्या पुस्तकात मात्र ही विक्री "क" नमुन्यात दर्शविलेल्या विक्रीपेक्षा ११.६५ लाख इतक्या रकमेने कमी दर्शविलेली आहे.

त्यामुळे १.७८ लाख रकमेचे न्यून निर्धारण झाले.

१.२९ ज्ञापन :
दोष निवारण कृती :-

मे.पद्मिनी टेक्नॉलॉजीस यांना नमुना 'क' वर रु.११,९५,२६४/- केलेली विक्री नामंजूर करुन त्यावर १५.३% दराने कर आकारण्यात आला आहे. व्यापारी हा सामुहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत नोंदणीकृत असल्यामुळे व दि.२६.१०.९५ ते २५.१०.०४ पर्यन्त कर सवलत प्राप्त असल्यामुळे आकारण्यात आलेल्या कर रकमेने कर सवलत वाढवण्यात आली आहे.

महालेखापाल यांच्या दि. २४.१०.०७ व १५.४.०८ च्या पत्रानुसार सादर केलेला अहवाल मान्य करुन मुददा बंद केला आहे.

१.३० व्यापा-याचे नाव : मे.स्कॅंडी बिक इंडिया.
आक्षेप:-

व्यापा-यांच्या आंतरराज्यीय विक्रीवर खरेदीदाराने 'क' नमुना सादर केल्याने सवलतीच्या दराने के.वि.अ. आकारणी करण्यात आली. परंतु उलट तपासणीत (X Verification) असे आढळून आले कि, खरेदीदार मे.हैद्राबाद इलेक्ट्रीक सिंडिकेट., हैद्राबाद यांच्या पुस्तकात मात्र ही विक्री क नमुन्यात दर्शविलेल्या विक्रीपेक्षा रु. ३.१२ लाख इतक्या रकमेने कमी दर्शविलेली आहे.

त्यामुळे रु.०.४८ लाख रकमेचे न्यून निर्धारण झाले.

विचारणा क्रमांक १ :- विभागाने सदर व्यवहाराची उलट-तपासणी केली आहे काय? त्याबाबत माहिती प्राप्त झाली असल्यास स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद करावी.

१.३१ ज्ञापन :
दोष निवारण कृती :- खरेदीदार व्यापा-याने आंतरराज्य केलेली खरेदी रु.५१.४० ही बरोबर असून खरेदीदार व्यापा-याने माल परत केल्यामुळे (Goods Return) विक्री व्यवहारात रु.३.१२ लक्ष इतका फरक झाला आहे. तरी महसूलहानी संभवत नाही.

विचारणेस उत्तर:- निर्धारणा अधिकारी, अे-२२ यांनी प्रकरणात उलट तपासणीसाठी विक्रीकर आयुक्त, हैद्राबाद (आंध्र प्रदेश) यांना दि.१०.१.०८ रोजी पत्र पाठविले आहे. अहवाल अपेक्षित आहे.

१.३२ व्यापा-याचे नाव : मे.सी.टी.आर.मॅन्युफॅक्चरींग इंडस्ट्रीज लिमि.
आक्षेप:-

व्यापा-यांच्या आंतरराज्यीय विक्रीवर खरेदीदाराने 'क' नमुना सादर केल्याने सवलतीच्या दराने के.वि.अ. आकारणी करण्यात आली. परंतु उलट तपासणीत (X Verification) असे आढळून आले की, खरेदीदार मे.देवेन रेडियो प्रा.लि., न्यू.दिल्ली यांच्या पुस्तकात मात्र ही विक्री क नमुन्यात दर्शविलेल्या विक्रीपेक्षा रु. ०.४४ लाख इतक्या रकमेने कमी दर्शविलेली आहे.

त्यामुळे रु.०.०६ लाख रकमेचे न्यून निर्धारण झाले.

विचारणा क्रमांक १ :- विभागाने सदर व्यवहाराची उलट-तपासणी केली आहे काय? त्याबाबत माहिती प्राप्त झाली असल्यास स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद करावी.

१.३३ ज्ञापन :

दोष निवारण कृती :- खरेदीदाराकडून 'क' नमुन्यावर रक्कम चुकून राहिलेल्या इनव्हाईस क्रमांक १५६५ ची रक्कम रु.४४,७३९/- तपशीलात समाविष्ट करुन अधिकृत व्यक्तीची स्वाक्षरी व शिक्का घेवून तफावत दूर करुन 'क' नमुना अभिलेखावर ठेवला आहे. महालेखापाल यांच्या दि. २४.१०.०७ व १५.४.०८ च्या पत्रानुसार सादर केलेला अहवाल मान्य करुन मुददा बंद केला आहे.

१.३४ व्यापा-याचे नाव : मे.नेपच्यून इक्विपमेंट प्रा.लि.

आक्षेपः-

व्यापा-याच्या आंतरराज्यीय विक्रीवर खरेदीदाराने 'क' नमुना सादर केल्याने सवलतीच्या दराने कें.वि.का.अन्वये आकारणी करण्यात आली. परंतु उलट तपासणीत असे आढळून आले की, खरेदीदार मे.साकेत मोटर्स यांच्या पुस्तकात मात्र ही विक्री "क" नमुन्यात दर्शविलेल्या विक्रीपेक्षा रु.५.५१ लाख इतक्या रकमेने जास्त दर्शविलेली आहे.

त्यामुळे रु.०.८४ लाख रकमेचे न्यून निर्धारण झाले.

१.३५ ज्ञापन :

दोष निवारण कृती :

विचारणेस उत्तरः- निर्धारणा आदेशाविरुध्द दाखल केलेले अपिल दि.२४.१२.०४ रोजी निकाली निघाले होते. त्यामुळे सदर लेखा आक्षेप विचारात घेवून मुं.वि.का.१९५९च्या कलम ३५(१)(सी) अन्वये पुनर्निधारणा आदेश पारीत केलेला नाही त्यामुळे अहवाल प्रलंबित आहे.

१.३६ व्यापा-याचे नाव : मे.जॉन्सन ॲण्ड जॉन्सन लि.

आक्षेपः-

व्यापा-याच्या आंतरराज्यीय विक्रीवर, खरेदीदाराने 'क' नमुना सादर केल्याने, सवलतीच्या दराने कें.वि.अ. आकारणी करण्यात आली. परंतु उलट तपासणीत असे आढळून आले की, खरेदीदार मे.शबनम सर्जिकल वर्क्स यांच्या पुस्तकात मात्र ही विक्री 'क' नमुन्यात दर्शविलेल्या विक्रीपेक्षा रु.८.८८ लाख इतक्या रकमेने जास्त दर्शविलेली आहे.

त्यामुळे रु.०.८८ लाख रकमेचे न्यून निर्धारण झाले.

विचारणा क्रमांक १ :-

अहवालाबाबतची माहिती स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद करावी.

१.३७ ज्ञापन :

दोष निवारण कृती :

मे.शोभान सर्जिकल वर्क्स, दिल्ली यांनी आंतरराज्यीय खरेदी रु.४२,३६,८६५/- इतकी दाखविली असून मे.जॉन्सन ॲण्ड जॉन्सन यांची पुस्तके पडताळणी केली असता बरोबर आहे. विक्रीकर अधिकारी, वॉर्ड क्र.८५, दिल्ली यांना उलट- तपासणीसाठी रोजी पत्र पाठविले आहे.

विचारणेस उत्तरः- अहवाल प्रतिक्षाधीन आहे.

१.३८ व्यापा-याचे नाव : मे.मल्टी फ्लेक्स लॅमी प्रिंट लि.

आक्षेपः-

'क' नमुन्यावर आंतरराज्य विक्री मंजूर करण्यांत आली होती. त्यामधील दोन 'क'नमुने अवैध असून त्यावर नोंदणी क्रमांक व नोंदणी क्रमांक अंमलात आल्याचा दिनांक नमूद केलेला नाही.

१.३९ज्ञापन :

दोष निवारण कृती : व्यापा-याची कें.वि.अ.१९५६ कलम ९(२) कें.वि.अ. वाचावे. कलम ३५ मुं.वि.का.खाली सुधारित आदेश पारीत करुन कराची वाढीव मागणी रु.२३.९३ लाख करण्यात आली. व्यापाऱ्याने द्वित्तीय अपिल दाखल केलेले असून त्याचा निर्णय दि.१०.७.०७ रोजी झालेला आहे. न्यायाधिकरणाच्या निर्णयानुसार व्यापाऱ्याने रु. ११.७५ लाख कर भरणा केलेला असून आकारण्यात आलेले व्याज व शास्ती याची पूर्ण माफी देण्यात आलेली आहे. त्यामुळे व्यापाऱ्याकडे कोणतीही थकबाकी राहत नाही. महालेखापाल यांच्या दि. २४.१०.०७ व १५.४.०८ च्या पत्रानुसार सादर केलेला अहवाल मान्य करुन मुददा बंद केला आहे.

१.४० व्यापा-याचे नाव : मे. चावला ॲल्युमिनियम इंडस्ट्रीज.

आक्षेपः-

खोटया क नमुन्यावर आंतरराज्य विक्रीस सवलतीच्या दराने कर आकारणी केली. संबंधित क नमुना उलट पडताळणीत त्या राज्याने जारी केला नसल्याचे आढळून आले.

विचारणा क्रमांक १ :-

वसुली अहवाल स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद करावा.

१.४१ ज्ञापन :

दोष निवारण कृती :

व्यापा-याची कें.वि.अ.१९५६ कलम ९(२) के.वि.अ. वाचावे कलम ३५ मुं.वि.का.खाली सुधारीत आदेश पारीत करुन कराची वाढीव मागणी रु.३.३३ लाख काढण्यात आली.

विचारणेस उत्तर :-

पुनर्निर्धारणा आदेशाविरोधात व्यापा-याने विक्रीकर सह आयुक्त (व्हॅट)प्रशासन यांच्याकडे प्रशासकीय सवलतीसाठी अर्ज केलेला होता. त्यानुसार विक्रीकर सह आयुक्त (व्हॅट)प्रशासन यांनी प्रशासकीय सवलत मंजूर करुन वाढीव मागणी समायोजित केली आहे. प्रशासकीय सवलत आदेश क्र.THN-Adm/Ref/Sr.No.११/०७-०८/B-११७२, दिनांक २५.१०.२००७. रोजी केलेला आहे.

१.४२ व्यापा-याचे नाव : मे. प्रिया कॅप्यासिटर

आक्षेपः-

विक्री करण्यात आलेल्या 'क' घोषणापत्रावर नोंदणी दाखला क्रमांक व नोंदणी दाखला अंमलात आल्याचा दिनांक नमूद न केल्यामुळे ते 'क' घोषणापत्र अवैध आहे.

१.४३ ज्ञापन :

दोष निवारण कृती : कलम ५७ खालील सुधारीत कार्यवाही अद्याप प्रलंबित आहे.

१.४४ व्यापा-याचे नाव : मे. सँडविक एशिया लि.

आक्षेपः-

आंतरराज्यीय खरेदीकरीता मे.अनू ओव्हरसीज यांनी २००१-०२ कालावधीकरीता 'क' घोषणापत्र क्र.१२पी ०७४९६४७ हा दिलेला नाही. म्हणून रु.४.३० लाख न्युन निर्धारण झाले.

१.४५ ज्ञापन

दोष निवारण कृती :

२००१-०२ कालावधीत रु.३८,०८,७९९/- करीता नमुना 'क' क्र. १२पी ०७८२६२३ (ॲनेक्चर प्रमाणे ०७४९६४७) दिला नसल्याचे आक्षेप हा दि.१.१.०१ ते ३१.३.०१ या कालावधीच्या केंविका निर्धारणा आदेश दि.३०.८.०४ च्या आधारे काढण्यात आला आहे. सदर कालावधी २०००-०१ या आर्थिक वर्षात येतो. लेखा आक्षेपात निर्धारणा कालावधी हा ०१-०२ या आर्थिक वर्षासाठी ग्राहय धरला असल्यामुळे आक्षेप मान्य नाही. मे.अनू ओव्हरसीज यांनी २०००-०१ या आर्थिक वर्षाच्या कालावधीसाठी नमुना 'क' दिला आहे व वरील निर्धारणा कालावधी २०००-०१ या आथिर्क वर्षात येत असल्यामुळे दिलेला 'क' नमुना योग्य आहे.

महालेखापाल यांच्या दि. २४.१०.०७ व १५.४.०८ च्या पत्रानुसार सादर केलेला अहवाल मान्य करुन मुददा बंद केला आहे.

१.४६ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-०६ या वर्षाच्या महसुली जमा अहवालामधील **परिच्छेद क्रमांक २.३ "मार्गस्थ विक्रीस चुकीची मान्यता"** या संदर्भात महालेखापरिक्षकांनी खालील अभिप्राय व्यक्त केले आहे.

१.४७ व्यापा-याचे नाव : मे. हर्बट सन्स लि.

आक्षेप:-

निर्धारणा आदेशात कलम ६(२) के.वि.का. १९५६ अन्वये, विक्री झालेल्या मालाची धारणा केल्यामुळे मार्गस्थ विक्री होवू शकत नाही. चुकीच्या निर्धारणेमुळे रु.६४.२१/- लाखची हानी झाली आहे.

१.४८ ज्ञापन :

दोष निवारण कृती :

केंद्रिय विक्रीकर कायदा १९५७, कलम ९(२) अन्वये मुंबई विक्रीकर कायदा १९५९, कलम ५७ फेरआदेश दि. ०६.०१.२००६ रोजी काढण्यात येवून रु. १२३.३०/- लाख एवढा वाढीव कराची मागणी करण्यात आली. महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरण यांचेकडे दाखल केलेले अपिल निकाली लागले असून निर्धारणा अधिकाऱ्यानी पारित केलेला प्रथम निर्धारणा आदेश योग्य असल्याचे ठरविले आहे. महालेखापाल यांच्या दि. २४.१०.०७ व १५.४.०८ च्या पत्रानुसार सादर केलेला अहवाल मान्य करुन मुददा बंद केला आहे.

व्यापाऱ्याकडे कोणतीही थकबाकी राहत नाही.

१.४९ व्यापा-याचे नाव : मे. श्रीरंग एजन्सीस

मार्गस्थ विक्रीसाठी चुकीची मान्यता.

आक्षेप :-

निर्धारणा आदेशात कलम ६(२) के.वि.का. १९५६ अन्वये, मार्गस्थ विक्री झालेल्या प्रकरणात व्यापाऱ्याने नमुना E-1-2 व फॉम क नमुना दिलेला नसतानाही चुकीची वजावट देण्यात आली आहे.

१.५० ज्ञापन :

दोष निवारण कृती :

केंद्रिय विक्रीकर कायदा १९५७,कलम ९(२) अन्वये मुंबई विक्रीकर कायदा १९५९, कलम ५७ फेरआदेश दि. २३.१२.२००४ रोजी काढण्यात येवून रु. ८.८८/- लाख एवढा वाढीव कराची मागणी करण्यात आली.

महालेखापाल यांच्या दि. २४.१०.०७ व १५.४.०८ च्या पत्रानुसार सादर केलेला अहवाल मान्य करुन मुद्दा बंद केला आहे. व्यापाऱ्याने पुर्ण कर भरणा करुन रु. ८.८८/- लाखाचे चलन सादर केले आहे.

साक्ष :

१.५१ उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात समितीने दिनांक ११ ऑगस्ट, २०१० रोजी वित्त विभागाची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समिती प्रमुखांनी विचारणा केली की, महालेखापालीन सदर परिच्छेदात नमूद केलेल्या प्रकरणाची सद्य:स्थिती काय आहे तसेच "क" नमुन्यामध्ये खरेदी कमी दाखविलेली आहे. अशी किती प्रकरणे आहेत ? तसेच मे कॉरल कॉस्मॉटिक लि. या कंपनी विरुध्द काय कारवाई केली आहे आहे. अशी समितीने विचारणा केली असता विक्रीकर आयुक्तांनी खुलासा केला की, यात काही

लहान सुधारणांची गरज होती. त्याप्रमाणे "सी" फॉर्ममध्ये सुधारणा करुन घेतली अशी प्रकरणे दिनांक १६ जानेवारी, २००८ रोजी स्वतंत्रपणे विक्रिकर विभाग, दिल्ली येथे पाठविलेले आहे. पण अद्याप त्यांच्याकडून प्रतिसाद मिळत नाही.

१.५२ सन २००८ मध्ये आपण प्रकरणे पाठविली तरी देखील अद्यापही त्यांच्याकडून प्रतिसाद मिळत नाही. यामध्ये वास्तविक आपण देखील अशा प्रकारे वाट न पाहता दूरध्वनीद्वारे करण्याचाही प्रयत्न केला नाही, तशी आपल्याला सुध्दा गरज वाटली नसावी याबाबत विक्रीकर आयुक्तांनी खुलासा केला की, या "सी" फॉर्मच्या संदर्भात आपण संगणकाच्या माध्यमातून अपलोड करता येतील अशी व्यवस्था आता केली असून पुढील आठ महिन्यात हे काम पूर्ण होणार आहे. काही ठिकाणी ही व्यवस्था केलेली नसल्यामुळे ही अडचण निर्माण झाली. आहे सचिवांनी पुढे असेही सांगितले की, उलट छाननी पद्धती संदर्भात महाराष्ट्र आणि केरळ ही दोन राज्य आघाडीवर आहेत पण बाकीचे राज्य मागे आहेत. या संदर्भात केंद्रीय वित्त मंत्र्यांच्या वारंवार बैठका होत असतात. पुढच्या आठवड्यातच त्यांनी एक बैठक बोलावली आहे. त्यावेळी पुन्हा हा मुद्दा प्रकर्षाने मांडण्यात येईल. परंतू जोपर्यंत उलट तपासणी होत नाही तोपर्यंत यामधील पळवाटा दूर होणार नाहीत. याबाबतीत केंद्र शासनाने चांगला निर्णय घेतला असून एक समिती स्थापन करण्यात आलेली आहे. त्या समितीमध्ये शासकीय अधिकारी आणि या क्षेत्रातील तज्ञ असणार आहेत. या समितीने कामकाजाला सुरुवात केली असून पुढच्या आठवड्यात त्यांची बैठक बोलावण्यात आली आहे. त्यामुळे कागदपत्रे व फोनवर व्यवहार होतात त्यापेक्षा आता थेट संगणकाच्या माध्यमातून व्यवहार करता येतील.

दिल्लीचे व्हॅट ऑफिसर श्री.विजय भारद्वाज यांचा अनुपालन अहवाल रिपोर्ट दि. १८-३-२००८ रोजी महाराष्ट्र मुंबई विक्रीकर विभागास प्राप्त झालेला आहे.

१.५३ मे.सी.टी.आर.मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्रिज लि. संदर्भात विक्रीकर अधिकारी वॉर्ड क्र. ७ दिल्ली यांचेकडून उलट तपासणीबाबत माहिती प्राप्त झाली आहे काय ? या समितीने विचारलेल्या प्रश्नाबाबत विक्रीकर आयुक्तांनी खुलासा केला की, या संबंधात दिल्लीचा प्रतिसाद आलेला आहे. दिल्लीकडून अनुपालन अहवाल आलेला आहे.

१.५४ मुं.वि.का. १९५९ कलम ३५ (१) (सी) अन्वये मे.नेपच्यून इक्विपमेंट प्रा.लि.संदर्भात पुनर्निधारणा आदेश पारित करणेबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

या संदर्भात पंधरा लाख रुपयांची विक्री झालेली आहे असे महालेखापाल यांचे आक्षेप होते. मे.नेपच्यून इक्विपमेंट प्रा.लि.ची एक शाखा अहमदाबाद येथे आहे आणि एक शाखा महाराष्ट्रात आहे.

महाराष्ट्रातील शाखेची १०.०१ लाख रुपयाची विक्री झाली होती. आणि अहमदाबाद शाखेची ५.५१ लाख रुपयाची विक्री झाली होती. खरेदीदार मे.साकेत दिल्ली यांनी दोन्हीची गणना करुन एकूण १५ लाख रुपयांचे देयक पाठवून दिले. त्यावेळी महाराष्ट्रातील शाखेने आमची फक्त १०.०१ लाख रुपयाची विक्री झालेली आहे असे सांगितले. यासंदर्भातील सर्व कागदोपत्री पुरावे उपलब्ध आहेत.

१.५५ मे.जॉन्सन ॲण्ड जॉन्सन लि.कंपनीबाबत विक्रीकर अधिकारी वॉर्ड क्र. ८५ दिल्ली यांच्याकडून उलट तपासणीसाठी पाठविलेल्या घोषणापत्रावरील विक्रीस चुकीची मान्यता या विषयावरील पत्राबाबतची माहिती सचिवांनी दिली की, मे. शोभान सर्जिकल वर्क्स, दिल्ली यांनी आंतरराज्यीय खरेदी रु. ४२.३६.८६५/- इतकी दाखविली असून मे.जॉन्सन ॲण्ड जॉन्सन यांची पुस्तके पडताळणी केली असता बरोबर आहे. विक्रीकर अधिकारी वॉर्ड क्र. ८५ दिल्ली यांना उलट तपासणीसाठी पत्र पाठविले आहे.

महाराष्ट्र सदन, दिल्ली येथे असणाऱ्या आयुक्तांनी दिल्लीतील सर्व प्रकरणे मार्गी लावणे हे त्यांचे काम आहे. परंतु त्यांच्याकडे हे प्रकरण दिले नसल्याचे सचिवांनी सांगितले.

विक्रीकर विभागाचे अधिकारी दिल्ली येथे आहेत ते याचा पाठपुरावा करतात.

१.५६ मे.मल्टी फ्लेक्स लूमी प्रिंट लि. यांचे महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरण यांच्याकडे प्रलंबित असलेले अपिलाची सद्य:स्थिती अशी आहे की, व्यापाऱ्याने द्वितीय अपिल दाखल केलेले असून त्याचा निर्णय दि. १० जुलै, २००७ रोजी झालेला आहे. न्यायाधिकरणाच्या निर्णयानुसार ११.७५ लाख रुपये संपूर्ण कर भरणा केलेला आहे.

वसुलीच्या कार्यवाहीमध्ये अपिलात अंशत: रक्कम रु. ११,७५,०००/- भरणा करण्यात येवून अपिल निकालात निघून अपिलात रु. ७,००,०००/- शास्ती व दंडाची सूट देण्यात आली असून बाकी रक्कम रु. ५,१७,९७५/- आहे असे म्हटले आहे. याबाबत अधिक खुलासा करावा असे समितीने सांगितले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, न्यायाधिकरणाने निर्णय दिलेला आहे त्याप्रमाणे रक्कम भरली आहे. महालेखापाल यांच्या दि. २४/१०/२००७ व दि. १५/४/२००८ च्या पत्रानुसार सादर केलेला अहवाल मान्य करुन मुद्दा बंद केला आहे. या प्रकरणात शास्ती व दंडामध्ये न्यायाधिकरणाने सूट दिलेली आहे. ही सूट देण्याचे कारण असे आहे की, बऱ्याचवेळा निर्धारण अधिकारी जास्त कर लावतात. त्यानंतर हा खरा कर नसून निर्धारण अधिकाऱ्याची ही चूक आहे हे न्यायाधिकरणाच्या निदर्शनास आणण्यात येते.

निर्धारण अधिकाऱ्याची चूक कशी झाली ? असे समितीने विचारले असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, our Appellate Authority confirmed it, but the Tribunal did not confirm it. The party might have submitted more documents to the Tribunal.

१.५७ सुधारित आदेशाविरुध्द मे.हर्बटसन्स लि.यांनी महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरणाकडे दाखल केलेले अपिल कशा प्रकारे निकाली काढण्यात आले ? असे समितीने विचारले असता विक्रीकर आयुक्तांनी खुलासा केला की, पहिल्या अधिकाऱ्याने आदेश काढले. त्यानंतर वरच्या अधिकाऱ्याने कराची मागणी वाढविली त्यामुळे ते न्यायाधिकरणाकडे गेले. न्यायाधिकरणाने पहिल्यांदा करण्यात आलेली कराची मागणी बरोबर होती. वरिष्ठ अधिकाऱ्याने वाढीव कराची मागणी केलेली आहे, ती चुकीची आहे असा निर्णय दिल्यामुळे पहिली मागणी मान्य झाली. वरिष्ठ अधिकाऱ्याने कोणत्या कारणामुळे वाढीव मागणी केली याचे स्पष्टीकरण विक्रीकर आयुक्तांनी असे दिले की, प्रवासासंबंधीचे पेपर सुरुवातीला दिले नसतील. न्यायाधिकरणाला कागदपत्रे सादर करण्यासाठी वेळ मिळतो त्यामुळे न्यायाधिकरणाकडे कागदपत्रे सादर करुन काही मुद्दे निकाली काढण्यात येतात. या संदर्भात महालेखापाल यांच्या दि. २४/१०/०७ व दि. १५/०४/०८ च्या पत्रानुसार सादर केलेला अहवाल मान्य करुन मुद्दा बंद केला आहे. याबाबत नागपूर महालेखाकार यांनी असे मत व्यक्त केले की, This case is regrading incorrect allowance of sales in Transit. Sales were effected after taking physical possession of goods. Thus sales were not in transit. यावर विक्रीकर आयुक्तांनी खुलासा केला की, महालेखापालांचा निर्णय मान्य केला होता. त्यानंतर मुल्यानिर्धारण सुधारुन कराचा बोजा टाकण्यात आला आहे. त्यामुळे ते न्यायाधिकरणाकडे गेले. न्यायाधिकरणाने वाढीव मागणी रद्द केलेली आहे.

१.५८ We have some issues regarding this case. It appears that papers were not placed. You can go in appeal because this seems to be a strong case. We will check the record and give report असे प्रधान महालेखाकार मुंबई यांनी सांगितले तसेच We will send you the copy of judgement of Tribunal so that you would konw on what basis the judgement was given असे महालेखाकार नागपूर यांनी सांगितले.

१.५९ न्यायाधिकरणाकडे किती प्रकरणे प्रलंबित आहेत तसेच न्यायाधिकरणाकडे किती जागा रिक्त आहेत ? याचा खुलासा करताना सचिवांनी असे सांगितले की, एकूण ६ न्यायाधिकरण आहेत.

प्रत्येक न्यायाधिकरणामध्ये उच्च न्यायालयाने सुचविलेले न्यायिक सदस्य तसेच विक्रीकर खात्यातील सेवानिवृत्त झालेल्या एका अधिकाऱ्याची शासनाच्या मान्यतेने प्रशासकिय अधिकारी म्हणून नियुक्ती केली जाते. न्यायाधिकरणामध्ये या दोघांचे संयुक्त काम चालते. ग्राहक न्यायालयात सर्व पदाधिकारी असल्याशिवाय निकाल लावला जात नाही. परंतु न्यायाधिकरणात प्रशासकीय अधिकारी नसला आणि न्यायिक सदस्य असला तरी ते निर्णय घेऊ शकतात अशी पध्दत आहे. सध्या सहाही न्यायाधिकरणामध्ये न्यायिक सदस्य आहेत. विक्रीकर खात्यातील सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांची संख्या कमी आहे. याचे कारण असे की, विक्रीकर खात्यातील सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना शासनाची मान्यता मिळण्यासाठी त्यांचा पूर्वोतिहास स्वच्छ असले पाहिजे. त्यांच्या पुर्वोतिहासामध्ये कुठल्याही प्रकारचे आक्षेप असेल तर त्यांच्या नियुक्तीस शासनाची मान्यता मिळत नाही ?

१.६० एकूण ३९७६ प्रकरणे प्रलंबित आहेत न्यायाधिकरणाचे कार्यालय मुंबईत असले तरी विभागीय स्तरावरील प्रकरणे निकाली काढताना विभागीय स्तरावर काही दिवस कॅम्प घेण्यात येतो. न्यायाधिकरणासाठी लागणारा आवश्यक कर्मचारी वर्ग उपलब्ध आहे काय ? ३९७६ केसेसे प्रकरणे प्रलंबित आहेत. हे लक्षात घेता प्रलंबित प्रकरणाची संख्या जास्त आहे. असे आपल्याला वाटत नाही काय ? असे समितीने विचारले असता विभागाने असा खुलासा केला की, ८००० प्रकरणे प्रलंबित होत्या आता प्रलंबित प्रकरणाची संख्या ४००० वर आली आहे. यापूर्वी चार न्यायाधिकरणे होती आता ती सहा झालेली आहेत. त्यामूळे प्रलंबित प्रकरणे जलद गतीने निकाली निघण्यास मदत झाली आहे.

न्यायाधिकरणात प्रलंबित अपिलाबाबत माहित व महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरण, मुंबई येथील रिक्त पदांची माहिती विभागाकडून प्राप्त झाली आहे. (विवरण पत्र - १ व २)

१.६१ महानगरपालिका कर आकारणी करते त्यावेळी काही वाद असतील तर काही लोक न्यायालयात जातात. त्यामुळे आधी ९० टक्के रक्कम भरल्या शिवाय न्यायालयात जाता येणार नाही असा कायदा महानगरपालिकेने केला. कोणालाही न्यायालयात जाण्याचा अधिकार असल्यामुळे वर्षानुवर्षे प्रकरणे प्रलंबित रहात होते. न्यायालयात प्रकरणे प्रलंबित असल्यामुळे कराची रक्कम मोठी व्हायची. विक्री कराच्या संदर्भात अशी काही तरतूद केली तरच प्रलंबित असलेल्या प्रकरणांची संख्या कमी होईल. कराच्या मागणी प्रमाणे जर ५० हजार रुपये भरले असतील आणि न्यायाधिकरणाने ४० हजार रुपये भरण्याचा निर्णय दिला तर १० हजार रुपये त्याला परत द्यावे लागतील किंवा ६० हजार रुपये भरण्याचा निर्णय झाला तर त्याला १० हजार रुपये जास्तीचे भरावे लागतील. अशी पद्धत आपल्याकडे आहे काय ? नसेल तर का नाही ? Can you make a condition in law that prior to

making an appeal before the Tribunal, the concerned party should deposit some amount ? This amount can be kept in separate Account till the case is decided याबाबत विक्रीकर आयुक्तांनी असा खुलासा केला की, आपल्याकडे अशा प्रकारची कायदेशीर तरतूद नाही. परंतु या संदर्भात मुख्य सचिवांना एक पत्र दिलेले आहे. त्यामध्ये ५० टक्के रक्कम घेऊन कार्यवाही करण्यात यावी असे म्हटले आहे. यामध्ये दोन प्रकारची प्रकरणे असतात. काही प्रकरणे एकतर्फी होतात. या प्रकरणी व्यापारी उपस्थित रहात नाहीत त्यामुळे त्या प्रकरणाच्या संदर्भात एकतर्फी निर्णय घेण्यात येतो. एकतर्फी निर्णय घेण्यात येणाऱ्या प्रकरणांचे प्रमाण खूप मोठे आहे. ज्या प्रकरणामध्ये एकतर्फी निकाल लागलेला नाही त्यांच्याकडून ५० टक्के रक्कम भरण्याची कारवाई करता येते. परंतू या संदर्भात आपल्या हातात कायदेशीर काहीच नाही. या संदर्भात कायदेशीर प्रक्रिया करण्याच्या संदर्भात अडचणी अशा आहेत की, मुल्यनिर्धारणाची रक्कम बऱ्याच वेळा फुगविलेली असल्यामुळे ती न्यायालयाच्या निकालावर अवलंबून असते.

१.६२ या संदर्भात कायदा करण्याच्या दृष्टीने मुख्य सचिवांच्या स्तरावर चर्चा झालेली आहे. याबाबतीत पुढील प्रमाणे माहिती दिली आहे. काही लोकांना न्यायालयात जाण्याची हौस असते. ते उठसूट न्यायालयात जात असतात आणि मग दहा-दहा वर्षे न्यायालयात प्रकरणे प्रलंबित राहतात. न्यायाधिकरणाकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांची संख्या फार मोठी आहे. समजा या संपूर्ण प्रकरणांची विक्री कराची रक्कम ५०० कोटी रुपये असेल आणि कायदा करुन ५० टक्के रक्कम आधी भरण्यात आली तर २५० कोटी रुपये जमा होतील त्यामुळे खात्याचा फायदाच होईल. तेव्हा या संदर्भात विचार करण्यात यावा. एकतर्फी काय आहे ? अशी समितीने विचारणा केली असता विक्रीकर दराचा प्रश्न असतो. एकतर्फी म्हणजे एखादा पक्ष खटल्याच्या वेळी उपस्थित होत नसेल तर त्यात १ टक्का, ४ टक्के किंवा १२ टक्क्यांपर्यंत दर असू शकतो. एकतर्फीसाठी १२ टक्के दर आकारला जात आहे. या संदर्भात उक्त कार्यपध्दतीचा अवलंब केल्यास शासनाला ४०० ते ५०० कोटी रुपये मिळू शकतील. समितीला या संदर्भात शासनाकडे रिपोर्ट सादर करण्यासाठी आवश्यक असलेले माहिती विभागाने त्वरीत पाठवावी असे निदेश समितीने संबंधितांना दिले.

१.६३ बऱ्याच कंपन्यांमध्ये कमी प्रमाणात कर आकारणी केली जात असल्याचे दिसून येते. त्यानंतर सुधारित कर भरण्यासंबंधी आदेश काढला जातो. त्यावेळी काही रक्कम भरली जाते व काही रक्कमेची सूट दिली जाते, अशी अनेक प्रकरणे असून या संदर्भात "सी" फॉर्म आवश्यक असतो, तो दुसऱ्या राज्यातून आणावा लागतो. तो त्या क्षणी उपलब्ध होत नाही. ९९ टक्के प्रकरणांमध्ये अपिलात

गेल्यानंतर दीड ते दोन वर्षांनतर "सी" फॉर्म येत असतो. असेही समितीने साक्षीचे वेळी विभागीय सचिवांच्या निदर्शनास आणून दिले.

अभिप्राय व शिफारशी -

१.६४ समितीसमोर आलेल्या उपरोक्त माहितीवरून महालेखापालांनी परिच्छेद क्र. २.२.३.१ व परिच्छेद क्र. २.२.२.३ मध्ये जवळजवळ १६ व्यापाऱ्यांकडील त्यांच्या विविध कंपन्याच्या संदर्भातील कागदपत्रांच्या केलेल्या तपासणीवरून संबंधित व्यापाऱ्याकडून येणे असलेल्या रक्कमेपैकी प्रत्यक्षात न्यूनत्तम रक्कमेची निर्धारण होणे, उलट तपासणी अहवाल प्रतिक्षाधीन असणे अशा स्वरूपाचे अभिप्राय नमूद केले आहे. ही बाब, विचारात घेता संबंधित व्यापाऱ्यांकडून येणे असलेल्या रक्कमेची वसूली विहित कालमर्यादेत करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही विनाविलंब करणे नितांत गरजेचे आहे असे समितीचे स्पष्ट मत असून समिती तशी शिफारस आहे.

१.६५ समितीस प्राप्त झालेल्या माहितीवरुन असे दिसून येते की, न्यायाधिकरणाचे कार्यालय मुंबईत असले तरी विभागीय स्तरावरील प्रकरणे निकाली काढताना विभागीय स्तरावर काही दिवस शिबिर घेण्यात येते. न्यायाधिकरणाकडे एकूण ३९७६ प्रकरणे प्रलंबित आहेत. अपीलात जाण्यापूर्वी करदात्याने विशिष्ट रक्कम भरण्याची तरतूद प्रचलित कायद्यात नसल्यामुळे शासनाचा ४०० ते ५०० कोटी रुपयाचा महसूल बुडाला आहे. ही बाब विचारात घेता **शासनाने संबंधीत कायद्यात आवश्यक ती सुधारणा करण्याच्या दृष्टीने योग्य ती कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे.**

१.६६ ज्यावेळी महानगरपालिका कर आकारणी करते, त्यावेळी काही वाद असतील तर लोक न्यायालयात जातात परिणामी कर आकारणी प्रकरणी न्यायालयात जाण्याचे प्रमाण जास्त होते कोणालाही न्यायालयात जाण्याचा अधिकार असल्यामुळे वर्षानुवर्षे प्रकरणे प्रलंबित रहात होती. न्यायालयात प्रकरणे प्रलंबित राहत असल्यामुळे कराची रक्कम प्राप्त होण्यास विलंब लागतो ही बाब विचारात घेता कर आकारणीच्या संदर्भात संबंधित व्यापाऱ्याला न्यायालयात जायचे असेल तर त्याने प्रथम कराची ९०% रक्कम भरल्याशिवाय न्यायालयात जाता येणार नाही असा कायदा जर महानगरपालिकेने केला. तर व्यापाऱ्यांचे न्यायालयात जाण्याचे प्रमाण कमी होईल विक्री कराच्या संदर्भात अशी काही तरतूद केली तरच प्रलंबित असलेल्या प्रकरणांची संख्या कमी होईल असे समितीला वाटते. त्यादृष्टीने **कराच्या मागणीच्या ५० टक्के प्रमाणात शासनास देय असलेल्या रक्कमेचा भरणा केल्यानंतर विक्रीकर धारकास अपिल करता येईल अशा स्वरुपाची कायद्यात दुरुस्ती करण्याच्या दृष्टीने शासनाने कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे.**

१.६७ विक्री करामध्ये दोन प्रकारची प्रकरणे असतात. काही प्रकरणे एकतर्फी निकालात निघतात. अशा प्रकरणांमध्ये व्यापारी सुनावणीचे वेळी उपस्थित रहात नाहीत त्यामुळे त्या प्रकरणाच्या संदर्भात एकतर्फी निर्णय घेण्यात येतो. एकतर्फी निर्णय घेण्यात येणाऱ्या प्रकरणांचे प्रमाण खूप मोठे आहे. ज्या प्रकरणामध्ये एकतर्फी निकाल लागलेला नाही त्यांच्याकडून ५० टक्के रक्कम घेण्याची कारवाई करता येईल परंतु **या प्रकरणांसंदर्भात विभागाच्या हातात कायदेशीर असे काहीच नाही. त्यामुळे या संदर्भात विक्रिकर अधिनियमात आवश्यक त्या सुधारणा करण्याच्या दृष्टीने लवकरात लवकर कार्यवाही करावी, अशी समितीची शिफारस आहे.**

१.६८ बऱ्याच कंपन्यांमध्ये सुरवातीला कमी प्रमाणात कर आकारणी केली जाते व त्यानंतर मागाहुन सुधारित कर भरण्यासंबंधी आदेश काढला जातो. त्यावेळी व्यापाऱ्यांकडून काही रक्कम भरली जाते व काही रक्कमेची सूट दिली जाते, या संदर्भात "सी" फॉर्म भरणे आवश्यक असतो, तो दुसऱ्या राज्यातून आणावा लागतो. त्यामुळे तो त्या क्षणी तपासणीचे वेळी उपलब्ध होत नाही. **९९ टक्के प्रकरणांमध्ये अपिलात गेल्यानंतर दीड ते दोन वर्षानंतर "सी" फार्म येत असतो. त्यामुळे "सी-फॉर्म तातडीने उपलब्ध होण्याच्या दृष्टीने अथवा पर्याय म्हणून याप्रकरणी कोणती पर्यायी व्यवस्था करता येईल याबाबत विभागाने तपासणी करून आवश्यक ती उपाययोजना करावी अशी समितीची शिफारस आहे.**

महसुल व वन (महसूल) विभाग

मुद्रांक शुल्क अधिनियमात सुधारणा करणेबाबत.

२.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी त्याच्या सन २००५-०६ या वर्षाच्या महसुली जमा रक्कम या अहवालातील **परिच्छेद क्र.३.२.१ मध्ये "अभिहस्तांतरण विलेखाचे चुकीचे वर्गीकरण"** यांसदर्भात खालील अभिप्राय व्यक्त केले आहेत.

अभिहस्तांतरण विलेखाचे चुकीचे वर्गीकरण :-

२.२ अधिनियमाच्या तरतुदीनुसार, अभिहस्तांतरण विलेखामध्ये जंगम संपत्ती किंवा त्यातील हितसंबंधांचे दुसऱ्या व्यक्तिला हस्तांतरण झाले अशा प्रत्येक विलेखांचा समावेश असतो आणि ते अधिनियमाच्या अनुसूची १ च्या अनुच्छेद २५ नुसार आकारणीय असतात. या विलेखांवरील मुद्रांकशुल्क विकास संविदेवरील शुल्कापेक्षा जास्त असते.

नऊ जिल्ह्यांच्या १५ उपनिबंधकांच्या ७४ विलेखांच्या नोव्हेंबर २००५ आणि एप्रिल २००६ या दरम्यान केलेल्या चाचणी तपासणीत असे आढळून आले की, रु. २३०.१३ कोटी एवढे मुल्य असलेल्या मालमत्तेच्या मालकांनी जानेवारी २००१ पासून डिसेंबर २००५ पर्यंत मालमत्तेचे अधिकार/हितसंबंध, मोबदला मिळाल्यावर, विकासक/प्रवर्तक यांना हस्तांतरण केले/ अभिहस्तांकित केले/अभिहस्तांतरित केले. तथापि, उपनिबंधकांनी ते विलेख अभिहस्तांतरण विलेखांऐवजी विकास संविदा म्हणून वर्गीकृत केले. परिणामी रु. १८.४४ कोटीच्या आकारणीयोग्य मुद्रांकशुल्काऐवजी विभागाने रु. २.३१ कोटीचे शुल्क आकारले. याचा परिणाम रु. १६.१३ कोटीचे मुद्रांक शुल्क कमी आकारण्यात आले असल्याचे महालेखापरिक्षकांनी निदर्शनास आणून दिल्यावर, विभागाने नोव्हेंबर २००५ आणि एप्रिल २००६ या दरम्यान आठ प्रकरणांमध्ये लेखापरीक्षा अभिप्राय मान्य केले, सहा प्रकरणे जिल्ह्याच्या मुद्रांक जिल्हाधिकाऱ्यांकडे निर्देशित केली गेली आणि उरलेल्या ६० प्रकरणांमध्ये विभागाने मुद्रांक शुल्क अचूकपणे आकारले गेले असे नमूद करीत लेखापरीक्षा अभिप्राय अमान्य केले.

ही उत्तरे मान्य करण्यासारखी नव्हती, कारण या विलेखांच्या मजकुरावरुन संपत्तीचे हक्क/हितसंबंध पूर्ण मोबदला घेऊन अभिहस्तांतरित केले गेले होते आणि म्हणून विभागाने नमूद केल्याप्रमाणे त्या विकास संविदा नव्हत्या. असेही महालेखापरिक्षकांना आपल्या अभिप्रायात नमूद केले होते.

२.३ ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात महसूल व वन (मदत कार्य) विभागाने सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढील प्रमाणे नमूद केलेले आहे.

अ) सन २००५-२००६ मध्ये महालेखापाल यांनी ९ जिल्ह्यांच्या १५ उपनिबंधकांच्या ७४ विलेखांचे केलेल्या तपासणीच्या दरम्यान दस्तांतील मजकूरावरुन मिळकतीचे हक्क/हितसंबंध पूर्ण मोबदला घेवून अभिहस्तांतरीत केले गेले. त्यामुळे सदर दस्त "विकसन करार" नसल्याचा निष्कर्ष काढला आहे. या विलेखांचे नोंदणी महानिरीक्षक यांनी पुर्नतपासणी केली असता त्यामध्ये ८ दस्त हे विकसनकरार नसून ते अभिहस्तांतरण पत्र असल्याचे नोंदणी महानिरीक्षक यांनी मान्य केले आहे. उर्वरित ६६ दस्त हे विकसन करार असल्याचे नोंदणी महानिरीक्षक यांचे मत असून त्यांनी मुद्रांक विभागाने योग्य मुद्रांक शुल्क आकारल्याचे नमूद करुन लेखा परीक्षा अभिप्राय अमान्य केले होते. परंतु, नोंदणी महानिरीक्षक यांचे सदर अभिप्राय महालेखापाल यांनी मान्य केलेले नाही.

ब) विकसनकरार व अभिहस्तांतरण पत्र यावर आकरण्यात येणाऱ्या मुद्रांक शुल्काचे दर खालीलप्रमाणे आहेत :-

वर्ष	अभिहस्तांतरण पत्र-मुद्रांक शुल्काचा दर	विकसनकरार नामामुद्रांक शुल्काचा दर
१९९० पर्यंत	१० टक्के	संकल्पना अस्तित्वात नव्हती
६.१.१९९७ विकसन करारनामा याकरिता अनुच्छेद ५ (जी.ए.) हा अधिनियमात अंतर्भूत करण्यात आला.	१० टक्के (दि.३०.६.२००४ पर्यंत) ५ टक्के (दि.१.७.२००४ पासून आजतागायत)	१ टक्का विकसन करारनामा या दस्त प्रकारासाठी अनुच्छेद ५ (ग-अ) हा मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ ला दिनांक ६.१.१९९७ रोजी सुधारणा करुन अंतर्भूत करण्यात आला आहे. व तो दिनांक ७.२.१९९० पासून लागू करण्यात आला आहे. त्यावेळी या अनुच्छेदाखाली आकारण्यात येणाऱ्या मुद्रांक शुल्काचा दर १% इतका विहित करण्यात आला होता.
दि.२ मे, २००८	५ टक्के	५ टक्के

अभिहस्तांतरणपत्र/विक्रीकरार व विकसन करार यातील रेषा धुरकट असल्यामुळे वर्गीकरणामध्ये नेहमीच अडचणी येत होत्या. याचा फायदा घेऊन काही वेळा विकासक अभिहस्तांतरणपत्र विकसन करारनामा म्हणून दर्शवून कमी मुद्रांक शुल्क भरत असत व शासनाचे महसूली नुकसान करीत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले. ही बाब व महालेखापाल यांच्या आक्षेपांचा विचार करुन दिनांक

२ मे, २००८ पासून विकसन करारनाम्यासाठीचा मुद्रांक शुल्काचा दर अभिहस्तांतरणपत्रावर आकारण्यात येणाऱ्या मुद्रांक शुल्का इतका करण्यात आला आहे.

क) ७४ प्रकरणांपैकी ८ प्रकरणे मान्य करण्यात आली असून त्यावर वसूलीची कार्यवाही सुरु आहे. महालेखापाल यांच्या तपासणीत नमूद असलेली बहुतांशी प्रकरणे ही सन २००५ च्या पूर्वीची आहेत. मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ मधील कलम ५३ अ नुसार ज्या प्रकरणांत योग्य मुद्रांक शुल्क आकारण्यांत आलेले नाहीत, अशा प्रकरणांची पुन्हा छाननी करण्याचे अधिकार नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांना आहेत, तथापि, अशा प्रकरणांची छाननी करण्यासाठी केवळ ६ वर्षाची कालमर्यादा याच कलमामध्ये विहित करण्यात आली आहे. त्यामुळे महालेखापाल यांच्या आक्षेपात उधृत केलेल्या ६६ प्रकरणांमधील बहुतांशी प्रकरणांमध्ये ६ वर्षाची कालमर्यादा पूर्ण झालेली आहे. सबब, नोंदणी महानिरीक्षक यांनी विकसन करारनामा म्हणून केलेले वर्गीकरण मान्य करण्यात यावे. असे विभागाने आपल्या ज्ञापनात नमूद केले आहे.

साक्ष :

२.४ उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात समितीने दिनांक ५ जानेवारी २०११ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली याबाबत अधिक माहिती देताना विभागाच्या सचिवांनी समितीस सांगितले की, विक्रीकर अधिनियम तसेच मुद्रांक शुल्क असे जे दोन अधिनियम आहेत, त्यानुसार दोन प्रकारच्या दस्तऐवजाच्या कागदपत्राच्या अनुषंगाने हा परिच्छेद आहे. एक म्हणजे अभिहस्तांतरण पत्र आणि दुसरे म्हणजे विकसन करार. शासनाच्या अधिनियमामध्ये या दोन्हीबाबत व्याख्या दिलेली आहे. अभिहस्तांतरण पत्र आणि विकसन करार या दोन्ही मध्ये फरक दर्शविणारी रेषा अगदी बारीक आहे. सुरुवातीला अभिहस्तांतरण पत्रासाठी १० टक्क्यापर्यंत मुद्रांक शुल्क आकारले जात होते आणि विकसन करारसाठी ते १०० रुपये होते. मात्र ही बाब शासनाच्या लक्षात आल्यानंतर विकसन करारावर १ टक्क्याप्रमाणे मुद्रांक शुल्क आकारण्याचे ठरविण्यात आले आणि अभिहस्तांतरण पत्रासाठी हे शुल्क १० टक्क्यावरुन ५ टक्के करण्यात आले. परंतु पुढे असे लक्षात आले की, यातील फरक नगण्य असल्याने, सर्व लोक अभिहस्तांतरण पत्र न करता विकसन करार करीत आहेत. त्यानंतर आता दोन्ही बाबींसाठी ५ टक्के मुद्रांक शुल्क आकारण्यात येते. पूर्वीच्या काळामध्ये मुद्रांक शुल्कात फरक होता, त्यामुळे लोकांकडून अभिहस्तांतरण पत्र न करता विकसन करार करण्यात येत होते. ज्यावेळी सन २००६ मध्ये पहाणी केली, तेव्हा ७४ प्रकरणांत असे दिसून आले की, त्यांनी अभिहस्तांतरण पत्र न करता विकसन करार केले होते. त्याप्रमाणे मुद्रांक शुल्क भरावयास हवे होते, पण काहींनी विकसन करार प्रमाणे मुद्रांक

शुल्क भरलेले असल्याने महालेखाकार यांनी असा मुद्दा काढला की, यामुळे शासनाचे नुकसान झालेले आहे. सुरुवातीला काही प्रकरणांमध्ये मुद्रांक महानिरीक्षक यांनी सांगितले की, विकसन करार हे अभिहस्तांतरण पत्र म्हणून ग्राह्य केले पाहिजे. तसेच आता जी प्रकरणे शिल्लक आहेत, त्याबाबत महालेखाकारांनी सांगितले आहे की, याबाबत परत एकदा शासन निर्णय तपासण्यात यावा आणि जर काही फरक असेल आणि जेथे-जेथे शक्य असेल, तेथे पुन्हा तपासणी करुन शासनाला महसूल कसा मिळेल ते पहाण्यात यावे.

२.५ यावर आता ही बाब लोक मान्य करतील काय ? अशी समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी कायद्याप्रमाणे सहा वर्षाची मुदत आहे. सहा वर्षामध्ये बाब पुन्हा घेता येते असे समितीस सांगितले. यावर आता ही मुदत संपलेली आहे असे समितीने विभागाच्या निर्देशनास आणून दिले असता जेथे-जेथे शक्य आहे, तेथे पुन्हा तपास करु. असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिले.

२.६ अभिहस्तांतरणव व विकसन करार या दोन्हीमध्ये फरक दर्शविणाऱ्या बारीक रेषेमूळे आतापर्यंत किती नुकसान झालेले आहे? अशी समितीने विचारणा केली असता, आतापर्यंत १६.१३ कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे असा विभागीय सचिवांनी खुलासा केला. तसेच विभागीय सचिवांनी माहिती देताना असे ही सांगितले की, यामधील फरक दर्शविणारी रेषा बारीक आहे. खरे म्हणजे लोकांनी अभिहस्तांतरण पत्र करावयास पाहिजे, परंतु लोक विकसन करार करीत होते आणि ही बाब लक्षात आल्यावर मुद्रांक शुल्क समान ५ टक्के करण्यात आले. आता सहा वर्षानी राहिलेली रक्कम घेता येणार नाही आणि ही रक्कम मोठी असल्यामुळे कायद्याचा आधार घेऊन काही लोक न्यायालयात जाऊ शकतात. अशी एकंदर किती प्रकरणे आहेत ? अशी समितीने विचारणा केली असता, अशा प्रकारची एकंदर ६६ प्रकरणे असून यातील बहुतांशी प्रकरणांमध्ये सहा वर्षाची कालमर्यादा पूर्ण झालेली आहे. त्यामुळे आता अभिहस्तांतरण पत्र गृहीत धरावयास पाहिजे असा विभागीय सचिवांनी खुलासा केला.

२.७ अभिहस्तांतरण पत्र आणि विकसन कराराच्या मुद्रांक शुल्क आकारणीमधील फरक यापूर्वीच दूर करावयास हवा होता. परंतु आता यामध्ये फरक केल्यामुळे पुढे याअनुषंगाने अडचणी येणार आहे असे समितीने सचिवांच्या निदर्शनास आणून जर या लोकांना ५ टक्क्याप्रमाणे पैसे भरावे लागले तर ते न्यायालयात जाणार आहेत. त्यामुळे याबाबतीत विचार करीत असताना फरक दर्शविणारी रेषा पाहून, अभ्यास करुन मग काय करावयाचे त्याचा निर्णय घ्यावयास हवा होता. परंतु विभागाच्या चुकीमुळे कोट्यावधी रुपयांचे नुकसान होत आहे. १०-२० हजार रुपये इकडे-तिकडे झाले तर एक वेळा समिती

समजू शकते, पण १६ कोटी रुपये ही फार मोठी रक्कम असून याबाबतीत शासनाचे जे नुकसान झालेले आहे, त्याला कोण जबाबदार आहे? ५ टक्क्याच्या बाबतीत निर्णय घेत असताना यादृष्टीने विचार करण्यात आला नाही काय ? अशी समितीने विचारणा केली असता सचिवांनी असा खुलासा केला की, मुद्रांक शुल्काचा कायदा वेगळा आहे. विक्रिकर कायदा वेगळा आहे. विक्रिकरामध्ये विक्री झाल्यावर कर भरावा लागतो. पूर्वी आताप्रमाणे विकसन करारावर मुद्रांक शुल्क आकारण्याची पध्दत नव्हती, त्यावेळी १०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर साधे करारपत्र करण्यात येत होते. परंतु ही पध्दत चुकीची आहे हे लक्षात आल्यानंतर विकसन करारावर १ टक्का मुद्रांक शुल्क लावावयास पाहिजे असा १९९७ मध्ये निर्णय घेण्यात आला. परंतु नंतर असे लक्षात आले की, याचा देखील गैरवापर होत आहे. मग त्यामध्ये सुधारणा केली. प्रत्येक वेळी ज्या-ज्या गोष्टी निदर्शनास आल्या, त्याप्रमाणे यात बदल केलेला आहे. आता आपण मानीव अभिहस्तांतरण म्हणून समजतो.

२.८ त्यावर समितीने पुढे अशीही विचारणा केली की, संबंधितांनी याबाबतीत निर्णय घेताना सर्वंकश विचार करुन निर्णय घेतल्याचे दिसत नाही. ही बाब कोणत्या वर्षी घडलेली आहे आणि त्यावेळी संबंधित अधिकारी कोण होते? त्यांना समज देण्यात यावी कारण विभागाच्या या कृतीमुळे शासनाचे १६ कोटी रुपयांचे नुकसान झालेले आहे.

२.९ यावर सचिवांनी असा खुलासा केला की, १९९० पूर्वी मुद्रांक शुल्काच्या बाबतीत दर निश्चित करण्यात आले नव्हते. परंतु विभागाने कायदा करताना त्यामध्ये किती त्रुटी ठेवल्या याचा देखील विचार केला पाहिजे. लोक शासनापेक्षा जास्त हुशार आहेत. खरे म्हणजे या गोष्टी करीत असताना त्यामध्ये काही पळवाटा राहिलेल्या आहेत काय ? हे शोधावयास पाहिजे, पण तसे मात्र झालेले नाही असे मत समितीने व्यक्त केले असता यावर या कायद्यामध्ये ज्या पळवाटा आहेत त्या कमी कराव्यात अशी जर समितीने अहवालामध्ये शासनाला शिफारस केली तर विभाग त्यानुसार उक्त अधिनिमयमाची तपासणी करेल असे समितीने सांगितले. या संदर्भात सविस्तर माहिती समितीला पाठविल्यास त्यामाहितीच्या आधारे समिती आपल्या अहवालात शिफारस करेल असे समितीने सूचित केले हाते.

२.१० समितीने अशी विचारणा केली की, त्यावेळी जे अधिकारी होते, त्यांच्याकडे याबाबतीत दूरदृष्टी नव्हती? त्यांनी यामध्ये स्पष्टता आणण्याचा प्रयत्न केलेला नाही? आता बदल करण्याच्या दृष्टीने तयारी दाखवित आहात, तसा प्रयत्न त्यावेळी केला असता तर शासनाचे १६ कोटी रुपये वाचले असते. असे समितीचे स्पष्ट मत आहे.

२.११ या परिच्छेदा संदर्भात विभागाने दिलेल्या अभिप्रायामध्ये शेवटी "नोंदणी महानिरीक्षक यांचे सदर अभिप्राय महालेखापाल यांनी मान्य केलेले नाही." असे म्हटलेले आहे याबाबतीत समितीने महालेखाकारांचे मत विचारले असता महालेखाकार यांनी असे सांगितले की, there is a very thin line of differentiation between the Conveyance Deed and the Development Agreement. Earlier, for the Development Agreement the Stamp Duty rate was fixed at १% and for the Conveyance Deed the Stamp Duty rate was fixed at ५%.As there was a very thin line of differentiation between the Conveyance Deed and the Development Agreement, the people took disadvantage of it. Consequently, Stamp Duty of Rs. १८.४४ crore was leviable as against Rs. २.३१ crore levied by the Department resulting in short levy of Stamp Duty of Rs. १६.१३ crore. But, now the Government has decided to charge Stamp Duty at the rate of ५% for both these instruments यावर समितीने मुद्रांक शुल्क नोंदणी महानिरीक्षक यांना असे सांगितले की, You please give your suggestions regarding removal of loopholes from the Act to this committee so that this committee can recommend those suggestions to the Govt. मुद्रांक शुल्क नोंदणी महानिरीक्षक यांनी समितीची सूचना मान्य केली, परंतु अजूनपर्यंत माहिती प्राप्त झाली नाही. त्या अनुषंगाने नोंदणी महानिरीक्षक यांनी अधिक खुलासा केला की, विकसन करार करताना मुद्रांक शुल्क आकारले जाते आणि त्र्ययस्त पक्षाला विक्री करताना देखील मुद्रांक शुल्क आकारण्यात येते.

अभिप्राय व शिफारशी :-

२.१२ समितीस प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीवरुन असे दिसून येते की, दोन प्रकारच्या दस्तऐवज/कागदपत्रांच्या अनुषंगाने हा परिच्छेद आहे. एक म्हणजे अभिहस्तांतरण पत्र आणि दुसरे म्हणजे विकसन करार. या दोन्ही मध्ये फरक दर्शविणारी रेषा अगदी बारीक आहे. अभिहस्तांतरण पत्रासाठी १० टक्क्यांपर्यंत मुद्रांक शुल्क आकारले जात होते आणि विकसन करारासाठी ते १०० रुपये होते. ही बाब शासनाच्या लक्षात आल्यानंतर विकसन करारावर १ टक्क्याप्रमाणे मुद्रांक शुल्क आकारण्याचे ठरविण्यात आले आणि अभिहस्तांतरण पत्रासाठी हे मुद्रांक शुल्क १० टक्क्यांवरुन ५ टक्के करण्यात आले. यातील फरक नगण्य असल्याने, सर्व लोक अभिहस्तांतरण पत्र न करता विकसन करार करीत होते. त्यानंतर आता दोन्ही बाबींसाठी ५ टक्के मुद्रांक शुल्क आकारण्यात येते. सन २००६ मध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार ७४ प्रकरणांमध्ये असे दिसून आले की, त्यांनी अभिहस्तांतरण पत्र न करता

विकसन करार केले होते. विकसन करार प्रमाणे मुद्रांक शुल्क भरलेले असल्याने शासनाचे नुकसान झालेले आहे. आता जी प्रकरणे शिल्लक आहेत, त्याबाबत पुन्हा एकदा शासन निर्णय तपासण्यात यावा आणि जर काही फरक असेल आणि जेथे-जेथे शक्य असेल, तेथे पुर्न तपासणी करुन शासनाचा महसूल वाढविण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी. अभिहस्तांतरण पत्र आणि विकसन कराराच्या मुद्रांक शुल्क आकारणीमधील फरक यापूर्वीच दूर करणे आवश्यक होते. परंतु याबाबत अभ्यास करुन विभागाने वेळीच योग्य तो निर्णय घेतलेला नाही. असे समितीचे स्पष्ट मत आहे. विभागाच्या या चुकीमुळे शासनाचे अंदाजे १६ कोटी रुपयांचे नुकसान झाले. या गोष्टाला जे जबाबदार आहेत, त्यांच्यावर योग्य ती कारवाई होणे आवश्यक आहे असे समितीला वाटते. पूर्वी मुद्रांक शुल्क आकारण्याची पद्धत नव्हती. १०० रुपयाच्या मुद्रांक दस्त ऐवजावर करारपत्रे करण्यात येत होती ही पद्धत चुकीची आहे हे लक्षात आल्यानंतर विकसन करारावर १ टक्का मुद्रांक शुल्क आकारण्याचा निर्णय सन १९९७ मध्ये घेण्यात आला. परंतु त्याचा देखील गैरवापर होत असल्याचे निदर्शनास आल्यावर त्यामध्ये सुधारणा केली. प्रत्येक वेळी ज्या-ज्या गोष्टी निदर्शनास आल्या, **त्याप्रमाणे मुद्रांक शुल्काबाबत बदल केलेले आहेत असे असले तरी ही बाब कोणत्या वर्षी घडलेली आहे आणि त्यावेळी संबंधित जे अधिकारी होते, त्यांची चौकशी करुन या चौकशीत दोषी आढळून आलेल्या जबाबदार व्यक्तिविरुद्ध योग्य ती कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

२.१३ सन १९९० पूर्वी मुद्रांक शुल्काच्या बाबतीत दर निश्चित करण्यात आले नव्हते. त्यानंतर विभागाने कायदा करताना त्यामध्ये असणाऱ्या त्रुटीचा विचार करुन त्यात आवश्यक ती सुधारणा करणे गरजेचे होते. परंतु कायद्याची अंमलबजावणी करण्यापूर्वी विभागाने त्यादृष्टीने कोणतीही काळजी घेतलेली दिसून येत नाही असे समितीचे मत आहे. या कायद्यामध्ये ज्या पळवाटा आहेत, त्या कमी करण्याची दूरदृष्टी तत्कालीन अधिकाऱ्यांमध्ये नसल्याने त्या कायद्यामध्ये सूस्पष्टता आलेली नसल्यामुळेच त्यामध्ये वारंवार सुधारणा करावी लागत आहेत असे समितीचे स्पष्ट मत आहे. **समितीने मुद्रांक शुल्क नोंदणी महानिरीक्षक यांच्याकडे, विद्यमान मुद्रांक शुल्क अधिनियम अंमलात आणताना कोणत्या त्रुटी निदर्शनास येत आहेत व त्याअनुषंगाने या अधिनियमात काही सुधारणा करणे आवश्यक असल्यास त्याबाबतची माहिती समितीस देण्यात यावी जेणेकरुन समिती आपल्या अहवालात मुद्रांक शुल्क अधिनियमात सुस्पष्टता येण्याचे दृष्टीने सुधारणा करण्यासंबंधी शिफारस करु शकेल असे समितीने सांगून देखील त्यासंदर्भातील माहिती अद्यापपर्यंत समितीला देण्यात आलेली नाही. त्यामुळे समिती यासंदर्भातील अभिप्राय देऊ शकली नाही. संबंधित माहिती समितीला वेळीच प्राप्त करून न दिल्याबद्दल**

समिती तीव्र नापंसती व्यक्त करते. सबब, या प्रकरणी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यात यावी तसेच सबब, उक्त माहिती समितीला ३ महिन्यांत पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभाग

निवडणुकीच्या कालावधीत ताडी विक्री लिलाव व निविदा प्रक्रिया करणे.

३.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या महसुली जमा अहवालामधील **परिच्छेद क्र. ३.६ "ताडीच्या हप्त्यांची वसुली न करणे"** या संदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय व्यक्त केले.

महाराष्ट्र ताडी दुकाने (लिलाव किंवा निविदेद्वारे अनुज्ञप्ती देणे) आदेश, १९६८ च्या तरतुदींन्वये, १ सप्टेंबर पासून पुढील वर्षाच्या ३१ ऑगस्टपर्यंतच्या कालावधीकरिता दुकानांमध्ये ताडीच्या विक्रीची अनुज्ञप्ती सर्वोच्च बोलीदाराला दिली जाते. प्रत्येक यशस्वी बोलीदाराने तात्काळ किंवा त्यापुढील कामाच्या दिवशी बोलीची एक चतुर्थांश रक्कम आणि उर्वरित रक्कम, आदेशात विहीत केलेल्या वेळेत सहा समान हप्त्यात प्रदान केली पाहिजे. याशिवाय, नियमांतील तदतुदींनुसार हप्त्याच्या रकमेचे प्रदान करण्यास विलंब झाल्यास व्याज वसुलीयोग्य आहे.

एप्रिल ते जून २००५ मध्ये तीन कार्यालयांतील अभिलेख्यांच्या चाचणी तपासणीत असे निदर्शनास आले की, २००४-०५ या वर्षाकरीता देय असलेल्या रु. १६.१८ लाख रकमेच्या ताडीच्या हप्त्यांचे १०७ बोलीदारांनी विहीत वेळेत प्रदान केले नाही.

हे निदर्शनास आणून दिल्यानंतर, विभागाने एप्रिल २००५ ते जुलै २००६ मध्ये ९९ बोलीदारांकडून २००४-२००५ या कालावधीकरीता जादा वसूल केलेल्या शुल्कातून समायोजित केलेल्या रु. १.९२ लाख रकमेसह रु. १.९४ लाख व्याजासहीत रु. १५.४९ लाख वसूल केले. उर्वरित रकमेचा अहवाल प्राप्त झाला नाही. (डिसेंबर, २००६)

ही बाब शासनास मे २००६ मध्ये कळविण्यात आली, त्यांचे उत्तर प्राप्त झाले नाही. (डिसेंबर, २००६)

३.२ ज्ञापन :

(१) परिच्छेद क्र. ३.६ मधील एलएआर क्र.१५२८६ जिल्हा, रत्नागिरी यांच्याकडील रु.९,२६,५७८/- एवढ्या थकीत देय रक्कमेची पूर्ण वसुली झालेली असून महालेखापाल यांनी त्यांचे पत्र क्रमांक : अ.प्रा.ले.प/एलएआर-१५२८६/एसई/१५२-५५, दिनांक १२.०४.२००७ नुसार बंद केला आहे.

(२) परिच्छेद क्र. ३.६ मधील एलएआर क्र.१५२६१ परि.क्र.१ जिल्हा सिंधुदूर्ग यांच्याकडील रु. ३,९८,९७०/- एवढ्या थकीत देय रक्कमेची पूर्ण वसुली झालेली असून महालेखापाल यांनी त्यांचे पत्र क्र.अ.प्रा.ले.प./एलएआर-१५२६१/एसई/३२९८-३३०१, दिनांक १६.०३.२००६ नुसार बंद केला आहे.

(३) परिच्छेद क्र.३.६ मधील एलएआर क्र. १५१६९ परि.क्र.२(अ) जिल्हा, अहमदनगर यांच्याकडील रु.५,२५,०२९/- एवढ्या थकीत देय रकमेची पूर्ण वसुली झालेली असून महालेखापाल यांनी त्यांचे पत्र क्र.अ.प्रा.ले.प./एलएआर-१५१६९/एसई/१०६-०७, दिनांक ११.०४.२००७ नुसार बंद केला आहे.

साक्ष :

३.३ उपरोक्त परिच्छेदाच्या संदर्भात समितीने दिनांक २९ जून, २०१० रोजी गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभागाच्या रत्नागिरी व सिंधुदुर्ग येथील विभागीय प्रतिनिधींची व ३१ ऑगस्ट, २०१० रोजी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी विभागीय प्रतिनिधींनी व सचिवांनी समितीस अशी माहिती दिली की, सन २००४-२००५ या वर्षाकरीता देय असलेल्या रुपये १६.१८ लाख रकमेच्या ताडीच्या हप्त्यांचे १०७ बोलीदारांनी विहित वेळेत प्रदान केले नाही, असे महालेखाकारांनी लक्षात आणून दिल्यानंतर विभागाने एप्रिल, २००५ ते जुलै, २००६ मध्ये ९९ बोलीदारांकडून सन २००४-२००५ या कालवधीकरिता जादा वसूल केलेल्या शुल्कातून समायोजित केलेल्या रुपये १.९२ लाख रकमेसह रुपये १.९४ लाख व्याजासहीत रुपये १५.४९ लाख वसूल केले आहेत. उर्वरित रकमेचा अहवाल प्राप्त झाला नाही, असा महालेखापरीक्षक यांचा आक्षेप होता. त्यानंतर या संपूर्ण रकमेची वसुली करण्यात आली असून त्याबाबतचे स्पष्टीकरणही महालेखापरीक्षक यांनी मान्य केले आहे व त्याबाबतचे पत्र या कार्यालयाला प्राप्त झाले आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, वसुलीस विलंब होण्याची कारणे काय आहेत तसेच रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात ताडी विक्रीसाठी किती परवाने दिली जातात ? आंध्र प्रदेश, कर्नाटक या राज्यातील लोकांना परवाने दिलेली आहेत का ? याबाबत विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, लिलाव प्रक्रियेला दोन महिने विलंब झाला होता व त्यामुळे थकबाकी राहिली होती. अतिरिक्त प्राप्त झालेल्या रकमेतून थकबाकी समायोजित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला होता. यासंदर्भात ज्यांना ठेका मिळाला नाही ते लोक न्यायालयात गेले होते. त्यामुळे लिलावाला विलंब झाला होता. रत्नागिरी जिल्ह्यात ३८७ परवाने व सिंधुदुर्ग जिल्ह्यात ९० परवाने दिले जातात. सध्या सिंधुदुर्गमध्ये ९० पैकी ७६ परवाने दिली असून उर्वरित ठिकाणी अपेक्षित किंमत येत नसल्यामुळे देण्यात आलेली नाहीत. महाराष्ट्रातील लोकांनाच परवाने दिलेली आहेत. ज्यांच्याकडे १५० पेक्षा जास्त झाडे असतील त्यांना परवाने देण्यात यावे असा नियम आहे.

३.४ समितीने पुढे अशी विचारणा केली की, ताडीमध्ये पावडर मिश्रीत करुन भेसळ ताडी विकली जाते. याबाबत विभागाने धाडी टाकल्या आहेत काय ? तसेच विभागाकडून दुकानांवर धाडी टाकल्या जातात का ? व परवाना देत असतांना पक्के बांधकाम असलेली जागा संबंधितांकडे असणे

अनिवार्य असते का ? यावर विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, या विभागामध्ये ताडीत काहीही मिश्रीत केले जात नाही, अशा घटना घडलेल्या नाहीत. सिंधीपासून ताडी बनविली जाते. १ सप्टेंबर ते ३१ ऑगस्ट अशा कालावधीसाठी परवाने दिले जाते. यासाठी निविदा मागविल्या जातात. त्यामध्ये जर जास्त किंमत आली नाही तर बोली लावली जाते. साधारणपणे २ लाखापर्यंत बोली जाते. पुणे, सोलापूर या ठिकाणी मोठी बोली लावली जाते. तसेच अधिकाऱ्यांमार्फत अचानक धाडी टाकल्या जातात. परंतु डहाणू, कोकण या भागामध्ये अस्सल ताडी असते. झाडाच्या बनांमध्येच दुकाने आहेत. त्याचप्रमाणे येथील ताडी-माडी पिणारे देखील तज्ञ आहेत. त्यामुळे मिश्रित तर जाऊ द्या पण शिळी ताडी देखील विकली जात नाही.

३.५ ताडी-माडी दुकानासाठी पक्क्या बांधकामाची अट नाही. पत्र्याच्या शेडमध्ये देखील दुकान असते. फक्त देऊळ आणि शाळा याबाबत इतर परवान्याबाबत जे नियम लागू आहेत तेच नियम ताडी-माडी दुकानांसाठी देखील लागू आहेत.

३.६ समितीने अशी विचारणा केली की, उत्पादन शुल्काच्या माध्यमातून किती महसूल या जिल्ह्यातून गोळा होतो? यावर सचिवांनी सांगितले की, रत्नागिरी जिल्ह्याचा वर्षाचा महसूल ११ कोटी ९६ लाख एवढा आहे. या भागात एकच देवकर डिस्टिलरी आहे. त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणावर महसूल प्राप्त होतो. इन्सुली येथे साऊथ कोकण म्हणून एक कारखाना आहे ते स्पिरिट बनवितात. आहे.

३.७ समितीने अशी विचारणा केली की, आपल्या येथील विदेशी दारुचे उत्पादन करणारे कारखाने पूर्णपणे बंद होण्याची कारणे काय आहे ? त्यावर सचिवांनी खुलासा केला की, आपल्या राज्याच्या कर प्रणालीमुळे परिणाम होऊ शकतो. गोवा राज्याने कर लावलेला नाही. इतर काही राज्यांचे कराचे प्रमाण कमी आहे. आपल्याकडे उत्पादन किंमतीच्या १०० टक्के कर आपण घेतो. बिअरवर ३५० टक्के कर आहे. ज्याप्रमाणे द्राक्षापासून दारु तयार केली जाते त्याप्रमाणेच या परिसरातील एका उद्योजकाने जांभळापासून दारु तयार केली. परंतु, ज्याप्रमाणे द्राक्षापासून बनविलेल्या दारुला करामध्ये सवलत देण्यात आलेली आहे तशी सवलत जांभळापासून बनविलेल्या दारुला नसल्यामुळे उत्पादकाला जांभळापासून दारु बनविणे परवडत नाही. सर्व राज्यांसाठी उत्पादन शुल्क रचना सारखी असावी, असा विचार सध्या केंद्र शासनामध्ये सुरु आहे.

३.८ समितीने अशी विचारणा केली की, एल.ए.आर.क्र. १५२६१ मधील परिच्छेद १, परिच्छेद ४ हे महालेखापरीक्षकांनी बंद केले आहेत. परंतु, परिच्छेद २ व परिच्छेद ३ याबाबत "Para is retained for Balance, full and final compliance" असा शेरा मारण्यात आला आहे. याबाबत विभागीय

प्रतिनिधीस खुलासा करण्यास सांगितले असता त्यांनी असे नमूद केले की, एल.ए.आर. क्रमांक १५२६१ सन २००४-२००५ परिच्छेद क्रमांक १, २ व ३ मधील वसूली दिनांक १८-११-२००५ मध्ये करण्यात आलेला आहे. दिनांक १८-११-२००५ मध्ये यासंदर्भातील ताळमेळ महालेखाकार यांच्या कार्यालयाशी करण्यात आलेला आहे.

३.९ समितीने अशी विचारणा केली की, महालेखाकार यांच्या कार्यालयाशी आपण जो ताळमेळ घातला आहे त्यासाठी दोन वर्षाचा कालावधी का लागला आहे. महालेखाकार कार्यालयाने जो आक्षेप नोंदविला होता. त्यासंदर्भात आपण होकारार्थी किंवा नकारार्थी उत्तर सन २००८ मध्ये दिले आहे. यासाठी दोन वर्षाचा कालावधी लागण्याची कारणे काय आहेत ?

३.१० विभागीय प्रतिनिधींनी असे उत्तर दिले की, सदर प्रकरण मुख्य कार्यालयाकडे पाठविण्यात आले होते. त्यांच्याकडून उत्तर येण्यास वेळ झालेला आहे.

३.११ यावर समितीने असे मत व्यक्त केले की, लोकलेखा समितीमध्ये काम करीत असतांना सन्माननीय सदस्यांच्या असे निदर्शनास आले आहे की, वेगवेगळ्या ठिकाणावरुन माहिती समितीला मिळत असते. शासनाच्या विविध विभागाचे लेखा परिक्षण महालेखाकार करतात. या लेखा परिक्षणात जे मुद्दे आक्षेपार्ह आहे त्यावर विधानमंडळास अहवाल सादर झाल्यानंतर सदर अहवाल विभागास पाठविल्यानंतर संबंधित विभागाने त्यासंदर्भातील ज्ञापन तीन महिन्यात समितीस पाठविणे आवश्यक आहे. महालेखाकार यांनी जे आक्षेप नोंदविले असतात त्याबाबत समितीमध्ये चर्चा होते. महालेखाकार कार्यालयाला माहिती वेळेत देणे आवश्यक आहे ती विभागाकडून वेळेत पाठविण्यात येत नाही त्यामुळे आक्षेपांची संख्या जास्त होते. याची कारणे अशी आहेत की, अधिकारी वर्ग असे समजतो की, जेव्हा महालेखाकाराकडून आक्षेपासंबंधी कार्यवाही होवून येईल तेव्हा आपण त्या पदावर नसणार त्यामुळे सर्व गोष्टींची चालढकल केली जात आहे. विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, १३५०० रुपये उशिरा भरण्यात आले कारण सदर प्रकरणे आयुक्त कार्यालयाकडे पाठविण्यात आले होते. बैठकीला आयुक्त उपस्थित न राहिल्याबद्दल समिती खेद व्यक्त केला. महालेखाकार यांनी जे आक्षेप काढले आहेत त्यासंदर्भातील सविस्तर माहिती लोकलेखा समितीसमोर आल्याशिवाय ते प्रकरण पूर्ण होत नाही. त्यामुळे सदर परिच्छेदावर समितीने पुन्हा राज्य उत्पादन शुल्क विभागाचे सचिव यांची दिनांक ३१ ऑगस्ट, २०१० रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी सचिवांनी समितीस असे सांगितले की, थकीत देय रकमेची पूर्ण वसुली झालेली आहे. परंतु वसुलीसाठी विलंब का झाला याबाबतीत थोडक्यात माहिती देताना त्यांनी असे नमूद केले की, १९६८ च्या तरतुदीनुसार १ सप्टेंबर पासून पुढील वर्षाच्या ३१

ऑगस्टपर्यंत दुकानामध्ये ताडीच्या विक्रीची अनुज्ञप्ती सर्वोच्च बोलीदाराला दिली जाते. ऑगस्ट महिन्यामध्ये लिलाव होत असतो.परंतु २००४ मध्ये ऑगस्ट महिन्यामध्ये सार्वत्रिक निवडणुका जाहीर झाल्यामुळे आचारसंहिता लागू करण्यात आली होती. त्यामुळे ऑगस्ट, सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्यांमध्ये लिलाव होऊ शकला नाही. तसेच त्यानंतर विधानसभेच्या निवडणुका झाल्यामुळे ३ नोव्हेंबरला लिलाव झाला आहे. प्रत्येक जिल्ह्यातील लिलावाच्या तारखा वेगवेगळया आहेत. परंतु सर्व ठिकाणी लिलाव झालेला आहे. लिलाव झाल्यानंतर १/४ रक्कम एका हप्त्यामध्ये भरावयाची होती आणि बाकीच्या रकमेसाठी चार ते पाच हप्ते पाडून द्यावयाचे होते. परंतु त्यावेळी निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे १ सप्टेंबर ते ३१ ऑक्टोबर मध्ये लिलाव न झाल्यामुळे वसुलीमध्ये सूट द्यावयास पाहिजे अशी संबंधितांकडून जिल्हा परिषदेकडे मागणी करण्यात आली होती. याबाबत काहीजण न्यायालयात गेले. मग ही बाब शासनाकडे सादर करण्यात आली. याबाबत शासनाने दि.१३ जून २००५ रोजी तोडगा काढून असा आदेश काढला की, संबंधितांना दोन महिन्याच्या वसुलीबाबत सूट दिली पाहिजे. या सर्व विवादामुळे तेव्हा वसुली झाली नाही. पण त्यानंतर वसुली झालेली आहे.

३.१२ समितीने याच संदर्भात पुढे अशी विचारणा केली की, संबंधितांकडून वसुली न झाल्यामुळे शासनाला किती तोटा सहन करावा लागला आहे ? खरे म्हणजे आचारसंहिता जाहीर झाल्यानंतर अर्थसंकल्पात समाविष्ट कामे करता येत नाहीत. मात्र लिलाव करण्यासाठी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देण्यात येऊ नये असे काही बंधन नसते. यावर विभागीय सचिवांनी असे सांगितले की, याठिकाणी लिलाव करणे अधिक निविदा काढणे अशा दोन्ही बाबींचा समावेश आहे. मात्र त्यावेळी आचारसंहिता लागू झाल्यामुळे याबाबत जाहिरात देता आली नाही.

३.१३ यावर समितीने विचारले की, लिलाव करणे, अधिक निविदा काढणे ही कामे नियमित आहे. त्यावेळी सदरहू जाहिरात देण्यात येऊ नये असे कोणी सांगितले होते काय ? निवडणूक आयोगाने अशा प्रकारच्या सूचना दिलेल्या होत्या काय किंवा त्याबाबतीत त्यांच्याकडून पत्र आले होते काय ? यामुळे शासनाचे किती नुकसान झालेले आहे ? याबाबत विभागीय सचिवांनी असे सांगितले की, सन २००४-२००५ मध्ये लिलावाच्या माध्यमातून एकूण रु.१७.६७ कोटी इतका महसूल जमा व्हावयास हवा होता म्हणजे अंदाजे दीड कोटी रुपये आणि महिन्याला तीन कोटी रुपये परंतु १ सप्टेंबर ते ३१ ऑक्टोबरपर्यंत एकही दुकान सुरु झाले नव्हते. कारण लिलाव झाल्याशिवाय आणि निविदा काढल्याशिवाय दुकान सुरु होतच नाही, तोपर्यंत परवानगी देतच नाही.

३.१४ शासनाला या माध्यमातून मोठया प्रमाणात महसूल मिळत असतो. पण आचारसंहिता लागू झाल्यामुळे लिलाव होऊ शकला नाही जे जर खरे असले तरी निवडणुकीच्या काळामध्ये आचारसंहिता लागू होणार आहे याची सर्वांना कल्पना असते. मग तत्पूर्वी निविदेची प्रक्रिया सुरु करावयास हवी होती. आपल्या विभागाचे तेच काम आहे आणि असे असताना सदरहू काम का केले नाही ? तसेच सदरहू लिलावाचे काम थांबविण्यात यावे अशा निवडणूक आयोगाने सूचना दिल्या होत्या काय ? याबाबत विभागाने असा खुलासा केला की, निवडणूक आयोगाच्या "आदर्श आचारसंहिता राजकीय पक्ष व उमेदवार यांच्या मार्गदर्शनासाठी वारंवार विचारले जाणारे प्रश्न" यामध्ये आचारसंहितेच्या काळामध्ये "काय करावे" आणि "काय करु नये" याबाबतीत निवडणूक आयोगाने माहिती दिली असून त्यामध्ये दारुच्या दुकानांचे निविदा याबाबी निवडणुकीच्या कालावधीत टाळाव्यात.

३.१५ समितीने यासंबंधातील निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सुचना काय आहेत याची समितीला माहिती देण्याबाबत सांगितले असता विभागीय सचिवांनी उपरोक्त साक्षीच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार विभागाने मागावून पाठविलेली आश्वासित माहिती खालील प्रमाणे आहे.

३.१६ आदर्श आचारसंहिता राजकीय पक्ष व उमेदवार यांच्या मार्गदर्शनासाठी (वारंवार विचारले जाणारे प्रश्न) भारत निवडणूक आयोग, २००९ निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली या मार्गदर्शक प्रतीमधील प्रश्न क्र. ३८ दारु विक्री, तेंदूची पाने आणि अशी इतर प्रकरणे या बाबींच्या संबंधात असणाऱ्या निविदा, लिलाव, इत्यादी प्रक्रिया करता येऊ शकतील किंवा कसे ? याबाबत उत्तर "नाही", असे दिले आहे अशा प्रकरणांच्या प्रक्रिया निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत स्थगित ठेवाव्यात आणि शासनास, जेथे टाळता न येण्यासारखी आवश्यक परिस्थिती असेल तेथे अंतरिम व्यवस्था करता येईल.

३.१७ राज्याच्या महसुलाचे नुकसान होत असेल तर ते वसूल करण्यासाठी परवानगी देण्यात यावी याकरिता विशेष बाब म्हणून विभागाने निवडणूक आयोगाकडे जाण्याचा त्यांच्या बरोबर पत्रव्यवहार करण्याचा प्रयत्न केलेला आहे काय ? असे समितीने विभागास विचारले असता, सदर माहिती समितीला देण्याचे सचिवांनी आश्वासित केले होते. त्यानुसार विभागीय सचिव यांच्याकडून दिनांक ३ सप्टेंबर, २००४ रोजी जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी प्रधान सचिव व गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभाग यांना पाठविलेले पत्र, दिनांक ८ सप्टेंबर, २००४ रोजी आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य यांनी प्रधान सचिव गृह (राज्य उत्पादन शुल्क) यांना पाठविलेले पत्र तसेच दिनांक ३० ऑगस्ट, २००४ रोजीचे जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, सांगली यांना मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या

कार्यालयाने पाठविलेले पत्र समितीला सादर केली होती. सदर आश्वासित माहितीचा समावेश विवरणपत्र - ३ मध्ये करण्यात आला आहे.

३.१८ समितीने अशी विचारणा केली की, राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या रिक्त पदांबाबत माहिती देण्यात यावी. तसेच संबंधित रिक्त पदे का भरली जात नाहीत अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, सहाव्या वेतन आयोगाच्या भारामुळे 'क' व 'ड' वर्गातील जागा एक वर्ष भरण्यात येऊ नयेत अशा प्रकारचे परिपत्रक वित्त विभागाकडून काढण्यात आले आहे तसेच आमचा विभागामध्ये प्रामुख्याने सब इन्स्पेक्टर आणि कॉन्स्टेबल या दोन संवर्गामध्ये पदे रिक्त होतात. सध्या सब इन्स्पेक्टर या संवर्गामध्ये ५०० पदे आणि कॉन्स्टेबल या संवर्गामध्ये ३५९ पदे रिक्त आहेत आणि त्या संबंधातील संपूर्ण अधिकार जिल्हाधिकारी यांच्याकडे आहेत. त्या नुसार काही जिल्ह्यांमध्ये भरती झालेली आहे. भरतीची प्रक्रिया सुरु असताना जून महिन्यामध्ये यावर बंदी घालण्यात आली. त्यावेळी या विभागाने शासनाला विनंती केली की, या विभागाला याबाबतीत विशेष सूट देण्यात यावी जेणेकरुन भरतीची प्रक्रिया पूर्ण करता येईल. सब इन्स्पेक्टर या संवर्गामध्ये २००० सालापासून भरती झालेली नाही. सदरहू भरती कोणाच्या मार्फत करावयाची याबाबत २००३ सालापासून चर्चा सुरु होती. २००४ मध्ये याबाबत मंत्रिमंडळाने असा निर्णय घेतला की, सदरहू भरती महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत करण्यात यावी. त्यानुसार विभागाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे वेळोवेळी पत्र व्यवहार केलेला आहे. पण त्यांच्याकडून याबाबत कार्यवाही झालेली नाही. नंतर जून २००७ मध्ये मंत्रिमंडळाने असा निर्णय घेतला की, ही भरती महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत न करता विभागानेच त्यांच्या पातळीवर भरती करावी आणि त्यादृष्टीने नवीन सेवाप्रवेश नियम तयार करावेत. त्याप्रमाणे विभागाने सेवाप्रवेश नियम तयार करुन, त्याला सामान्य प्रशासन विभागाची मान्यता मिळावी यासाठी पाठपुरावा करण्यामध्ये बराच कालावधी गेला. कारण विभागाने सामान्य प्रशासन विभागाकडे नियमांच्या बाबतीत जो प्रस्ताव पाठविला होता, त्यामध्ये त्रुटी काढण्यात आल्या. मग त्याबाबत पूर्तता करुन पुन्हा तो प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे मान्यते साठी पाठविण्यात आला.त्यानंतर जुलै २००९ मध्ये सदरहू प्रस्तावास मान्यता देण्यात आली.यासाठी २००७ पासून २००९ पर्यंत दोन वर्षाचा कालावधी लागलेला आहे.

३.१९ यानंतर ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये शासनाकडे अशी विनंती करण्यात आली की, या विभागामध्ये मोठया प्रमाणात भरती करावयाची असल्यामुळे, ज्याप्रमाणे म्हाडा किंवा इतर संस्थांमध्ये बँकींग सर्व्हीस रिक्रुटमेंट बोर्डामार्फत भरती केली जाते, त्यामध्ये पारदर्शकता असते. त्यामुळे या

विभागामध्ये सुध्दा त्यांच्यामार्फत भरती करण्यासाठी परवानगी देण्यात यावी असा शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला होता. त्याला शासनाने डिसेंबर २००९ मध्ये मंजूरी दिली.त्यानंतर बँकींग सर्व्हीस रिक्रुटमेंट बोर्डाबरोबर पत्र व्यवहार करुन याबाबत डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी व मार्च महिन्यांमध्ये पाठपुरावा करण्यात येत होता. त्यानंतर बँकींग सर्व्हीस रिक्रुटमेंट बोर्डाने भरतीची प्रक्रिया करण्याच्या बाबतीत तयारी दर्शविली. मात्र सब इन्स्पेक्टरची भरती करीत असताना त्यामध्ये शारीरिक स्वास्थ योग्य असण्याचा एक भाग आहे. परंतु बँकींग सर्व्हीस रिक्रुटमेंट बोर्डाने असे सांगितले की, शारीरिक स्वास्थच्या संबंधातील तपासणी करण्याच्या दृष्टीने त्यांच्याकडे कोणतीही यंत्रणा उपलब्ध नसल्याने, तसेच त्यांच्याकडे या संबंधातील तज्ज्ञ व्यक्ती नसल्याने, ते यासंबंधातील परीक्षा घेऊ शकणार नाहीत. मात्र याबाबत असा विचार करण्यात आला आहे की, या भरतीसाठी २०० मार्कांची लेखी परीक्षा द्यावी लागते. या परीक्षेमध्ये पास झालेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यात यावी. मात्र त्यामध्ये शारीरिक स्वास्थचे मार्क गृहीत धरावयाचे नाहीत. कारण लेखी परीक्षेमध्ये पास झाल्यानंतर शारीरिक स्वास्थ पात्रता मध्ये कमी-जास्त मार्क मिळाले तर काही प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. या संबंधात आरोप होण्याची शक्यता आहे. त्यामुळे याबाबत केवळ "होय" किंवा "नाही" एवढाच उल्लेख करण्यात यावा. आता शारीरिक स्वास्थ पात्रतेचे गुण विभागाच्या अधिकाऱ्यांनी द्यावेत. However, physical fitness is not a only criteria for merit. Physical fitness marks will not be added to the merit list of the candidates and the merit list will be done only on the basis of written examination and interview. याबाबत शासनाने जुलैमध्ये मंजुरी दिलेली आहे. आता ही कार्यवाही पूर्ण होत आली आहे. परंतु शासनाने जून, २०१० मध्ये नोकरभरती करण्यास बंदी घातली आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाला यातून सूट मिळावी अशी आम्ही शासनाला विनंती केली आहे. ही विनंती मान्य झाल्यास बँकिंग सर्विस रिक्रूटमेंट बोर्डाला भरती प्रक्रिया सुरु करण्यास कळविता येईल.

३.२० यावर समितीने विचारणा केली की, राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत शासनाला प्रतिवर्षी ५५०० कोटी रुपयांचा महसूल प्राप्त होतो. राज्यात मोठया प्रमाणात अवैध धंदे सुरु आहेत. आवश्यक असलेल्या कर्मचाऱ्यांची वेळेवर भरती करण्यात आली असती तर यापेक्षा जास्त महसूल प्राप्त होऊ शकला असता. यामध्ये खूप मोठा त्रुटी आहे. अवैध धंद्यांमुळे राज्याच्या महसुलाची मोठया प्रमाणात हानी होत आहे. एकीकडे शासन म्हणते की, नोकरी भरती बंद करु नये तर दुसऱ्या बाजूला राज्याच्या आर्थिक उत्पन्नाचे नुकसान होत आहे.

३.२१ राज्याला ज्या बाबीपासून महसूल प्राप्त होतो, तो महसूल वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न होणे आवश्यक आहे. राज्यात ताडीचे उत्पादन कोकणात, विशेषत: रायगड जिल्हयात अधिक प्रमाणात होते. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्याच्या उत्पादन शुल्क विभागामध्ये हजार कर्मचाऱ्यांची पदे भरण्यासाठी आवश्यक असलेली प्रक्रिया, नियम, मान्यता मिळविण्याची कार्यवाही या संदर्भात पंचवार्षिक कार्यक्रम होणे योग्य आहे का? याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, या प्रक्रियेमध्ये विलंब झाला आहे. तीन-साडेतीन वर्षापूर्वी लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र पाठवूनही कार्यवाही न झाल्यामुळे विभागामार्फत विलंब झाल्याचे मान्य केले असले तरी पदे भरण्याबाबत उत्पादन शुल्क विभाग गंभीर नाही असे म्हटल्यास ती अतिशयोक्ती होवू नये.

३.२२ विभागीय सचिवांनी सांगितले की, त्रुटींची पूर्तता करावी लागली त्यामुळे सेवाप्रवेश नियम करण्यास वेळ लागला. आता ही भरती प्रक्रिया पूर्ण होईल. शासनाने नोकरभरती बंदी ही उत्पादन शुल्क विभागाबरोबरच परिवहन विभागाला देखील लागू केलेली आहे. आम्ही दोन्ही विभागांच्या वतीने वित्त विभागाला विनंती केली आहे की, नोकरभरतीचा सर्वसाधारण बंदी या दोन्ही विभागाला लागू करु नये.

३.२३ शासनाने आता नोकरभरती बंदीचा धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. परंतू मागील दहा वर्षात उत्पादन शुल्क विभागात नोकरभरती झालेली नाही. कोणत्याही विभागात नैसर्गिक न्याय तत्वानुसार किंवा नियत वयोमानानुसार कर्मचारी निवृत्त होत असतात. ही बाब जरी विचारात घेतली तरी देखील आज राज्यात दारु विक्रीची दुकाने वाढत आहेत, मद्यपींचे प्रमाण वाढत आहे, अवैध धंदे वाढत आहेत. अशा परिस्थितीत कर्मचाऱ्यांची पदे वाढवून मिळाली तर मोठ्या प्रमाणात महसूल वाढू शकतो. त्यामुळे राज्य उत्पादन शुल्क विभागातील नोकरभरती करावयास बंदी असू नये असे समितीने मत व्यक्त केले.

३.२४ यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, राज्य उत्पादन शुल्क विभागातील नोकर भरतीसंबंधीची कार्यवाही २००० सालापासून सुरु आहे. आज सगळे अडथळे दूर झाले आहेत. त्यामुळे राज्य उत्पादन शुल्क विभागाला या बंदीमधून सूट द्यावी अशी आम्ही वित्त विभागाला लेखी विनंती केली आहे. या विभागाला आवश्यक कर्मचारी उपलब्ध झाले तर मोठ्या प्रमाणात महसूल वाढवून देऊ शकतो असे आम्ही लेखी स्वरुपात कळविले आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाला उपनिरीक्षकांची पदे उपलब्ध झाली तर ७५० कोटी रुपयांचा महसूल गोळा होऊ शकेल असेही सचिवांनी समितीला सांगितले.

अभिप्राय व शिफारशी :

३.२५ सन २००४-२००५ या वर्षाकरीता देय असलेल्या रुपये १६.१८ लाख रकमेच्या ताडीच्या हप्त्यांचे १०७ बोलीदारांनी विहित वेळेत प्रदान केले नाही, असे महालेखाकारांनी लक्षात आणून दिल्यानंतर विभागाने एप्रिल, २००५ ते जुलै, २००६ मध्ये ९९ बोलीदारांकडून सन २००४-२००५ या कालावधीकरिता जादा वसूल केलेल्या शुल्कातून समायोजित केलेल्या रुपये १.९२ रकमेसह रुपये १.९४ लाख व्याजासहीत रुपये १५.४९ लाख वसूल केले आहेत. उर्वरित रकमेचा अहवाल प्राप्त झाला नाही. त्यानुसार रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात ताडी विक्रीसाठी परवाने दिली जातात. रत्नागिरी जिल्ह्यात ३८७ परवाने व सिंधुदुर्ग जिल्ह्यात ७६ परवाने देण्यात आले आहेत. ज्यांच्याकडे १५० पेक्षा जास्त झाडे असतील त्यांना परवाना देण्यात यावे असा नियम आहे. ताडी-माडी दुकानासाठी पक्क्या बांधकामाची अट नाही. पत्र्याच्या शेडमध्ये देखील दुकान असते. फक्त देऊळ आणि शाळा याबाबत इतर परवान्याबाबत जे नियम लागू आहेत तेच नियम ताडी-माडी दुकानांसाठी देखील लागू आहेत. १९६८ च्या तरतुदीनुसार १ सप्टेंबर पासून पुढील वर्षाच्या ३१ ऑगस्टपर्यंत दुकानामध्ये ताडीच्या विक्रीची अनुज्ञाप्ती सर्वोच्च बोलीदाराला दिली जाते. ऑगस्ट महिन्यामध्ये लिलाव होत असतो. परंतु २००४ मध्ये ऑगस्ट महिन्यामध्ये सार्वत्रिक निवडणुका जाहीर झाल्यामुळे आचारसंहिता लागू करण्यात आली होती. त्यामुळे ऑगस्ट, सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्यांमध्ये लिलाव होऊ शकला नाही. तसेच त्यानंतर विधानसभेच्या निवडणुका झाल्यामुळे ३ नोव्हेंबरला लिलाव झाला आहे. असे असले तरी महालेखाकार यांच्या कार्यालयाशी विभागाने जो ताळमेळ घातला आहे त्यासाठी दोन वर्षाचा कालावधी लागला आहे. महालेखाकार कार्यालयाला माहिती वेळेत देणे आवश्यक आहे ती विभागाकडून देण्यात येत नाही त्यामुळे आक्षेपाची संख्या देखील वाढत जाते. **सबब, समिती अशी शिफारस करीत आहे की, महालेखाकार यांच्या कार्यालयाशी ताळमेळ घालण्यास ज्या अधिकाऱ्यांनी दोन वर्षाचा विलंब केला आहे व राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या आयुक्तांच्या अखत्यारीत ज्या विभागाच्या अधिकाऱ्यांकडून माहिती प्राप्त झाली नाही त्या संबंधीत अधिकाऱ्यांविरुध्द चौकशी करून दोषी आढळून आलेल्या संबंधीत अधिकाऱ्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी.**

३.२६ सन २००४-२००५ मध्ये लिलावाच्या माध्यमातून एकूण १७.६७ कोटी रुपये इतका महसूल जमा व्हावयास हवा होता म्हणजे अंदाजे दीड कोटी रुपये आणि महिन्याला तीन कोटी रुपये परंतु १ सप्टेंबर ते ३१ ऑक्टोबरपर्यंत एकही दुकान सुरु झाले नव्हते. कारण लिलाव

झाल्याशिवाय व निविदा काढल्याशिवाय ताडी-माडी विक्रीचे दुकान सुरु करता येत नाही. तसेच तोपर्यंत ताडी-माडीची विक्री करण्यास परवानगी देखील दिली जात नाही.

३.२७ वास्तविक पाहता शासनाला ताडी-माडीच्या लिलाव विक्री माध्यमातून मोठ्या प्रमाणात महसूल मिळत असतो. आचारसंहिता लागू झाल्यामुळे लिलाव होऊ शकला नाही निवडणुकीच्या काळामध्ये आचारसंहिता लागू होणार आहे याची सर्वांना कल्पना असते. असे असतानाही आचारसंहिता लागू होण्यापूर्वी निविदेची प्रक्रिया सुरु करावयास हवी होती. विभागाने याकामी कार्यतत्परता न दाखविल्यामुळे शासनाचा महसूल मोठ्या प्रमाणात बुडाला आहे. निवडणूक आयोगाच्या "आदर्श" आचारसंहिता राजकीय पक्ष व उमेदवार यांच्या मार्गदर्शनासाठी वारंवार विचारले जाणारे प्रश्न" यामध्ये आचारसंहितेच्या काळामध्ये "काय करावे" आणि "काय करु नये" याबाबतीत निवडणूक आयोगाने स्पष्ट माहिती दिली असून त्यामध्ये दारुच्या दुकानांच्या निविदा या बाबी निवडणुकीच्या कालावधीत टाळाव्यात. या मार्गदर्शक पुस्तिकेमधील प्रश्न क्र.३८ "दारु विक्री, तेंदूची पाने आणि अशी इतर प्रकरणे या बाबींच्या संबंधात असणाऱ्या निविदा, लिलाव, इत्यादी प्रक्रिया करता येऊ शकतील किंवा कसे ? याबाबत प्राप्त झालेले उत्तर "नाही" असे होते. अशा प्रकरणांच्या प्रक्रिया निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत स्थगित ठेवाव्यात आणि शासनास, जेथे टाळता न येण्यासारखी आवश्यक परिस्थिती असेल तेथे अंतरिम व्यवस्था करता येईल. यावरुन असे दिसून येते की, विभागास अंतरिम व्यवस्था करता आली असती. **राज्याच्या महसूलाचे नुकसान होत असेल तर ते वसूल करण्यासाठी विशेष बाब म्हणून विभागाने निवडणूक आयोगाकडे लिलाव करणे व निविदा काढणे तसेच निविदा अथवा लिलाव वेळीच न करण्यास शासनाचे होणारे अर्थिक नुकसान विचारात घेता निविदा व लिलाव प्रक्रिया करणे किती आवश्यक असल्याची बाब निवडणूक आयोगाला पटवून देण्याचे दृष्टीने शासन स्तरावरून प्रयत्न करणे आवश्यक होते. असे समितीला वाटते. या बाबी नियमित कामासाठी परवानगी मिळविणे आवश्यक होते. याबाबत निवडणूक आयोगास सविस्तर माहिती देवून ताडीचे परवाने रत्नागिरी व सिंधुदूर्ग जिल्ह्यात देण्यासाठी "लिलाव करणे व निविदा काढणे" यासाठी परवानगी न घेतल्यामुळे शासनाचा महसूल बुडाला व अवैध ताडी विक्रीव्यवसायाला वाव मिळाला. त्यामुळे या संपूर्ण प्रक्रियेस जे अधिकारी जबाबदार आहेत त्यांच्या विरुद्ध चौकशी करुन चौकशीत दोषी आढळलेल्या अधिकाऱ्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

३.२८ राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत शासनाला प्रतिवर्षी ५५०० कोटी रुपयांचा महसूल प्राप्त होतो. राज्यात मोठ्या प्रमाणात अवैध धंदे सुरु आहेत. आवश्यक असलेल्या कर्मचाऱ्यांची वेळेवर भरती केली असती तर उक्त रक्कमेपेक्षा जास्त महसूल प्राप्त होऊ शकला असता. मात्र या विभागात उपनिरिक्षकांची ५०० पदे व कॉन्स्टेबल संवर्गातील ३५९ पदे रिक्त असून सन २००० पासून या विभागामध्ये नोकर भरतीच झालेली नाही. त्याचे कारण देताना वित्त विभागाने नोकरभरती करण्यास

बंदी घातल्याने नोकरीभरती केली नाही हा विभागाने केलेला खुलासा समितीला मान्य होण्यासारखा नाही कारण राज्य उत्पादन शुल्क विभाग हा महसून गोळा करणारा शासनाचा एक महत्वाचा विभाग असून या विभागाकडून गोळा होणारा महसूल हा राज्याच्या उत्पादनाचा एक महत्वाचा श्रोत (स्त्रोत) आहे ही बाब विचारात घेता रिक्त असलेली उक्त दोन्ही मिळून जवळजवळ ८५९ पदे भरण्यासाठी "विशेष बाब" म्हणून करून शासनाची विशेष परवानगी घेवून रिक्त पदे तातडीने भरण्याचे दृष्टीने कारवाई करणे नितांत गरजेचे होते. विभागाने या प्रकरणी दाखविलेल्या अनास्थेबद्दल समिती तिव्र नाराजी व्यक्त करते. अवैध धंद्यामुळे राज्याच्या महसुलाची मोठ्या प्रमाणात हानी होत आहे. राज्याला ज्या बाबीपासून महसूल प्राप्त होतो, त्यामध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने प्रयत्न होणे आवश्यक आहे. राज्यात ताडीचे उत्पादन कोकणात, विशेषतः रायगड जिल्ह्यात अधिक प्रमाणात होते. राज्याच्या उत्पादन शुल्क विभागामध्ये ८५९ अधिकारी/कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्यासाठी आवश्यक असलेली प्रक्रिया, नियम, मान्यता मिळविण्याची कार्यवाही विभागाने करून सदर रिक्त पदे त्वरीत भरवीत व त्याबाबत केलेल्या कार्यवाही बाबतची सविस्तर माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.२९ शासनाने आता नोकरभरती बंदीचा धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. परंतु मागील दहा वर्षात उत्पादन शुल्क विभागात नोकरभरती झालेली नाही. नैसर्गिक न्याय तत्वानुसार किंवा नियत वयोमानानुसार कर्मचारी निवृत्त होत आहेत. दारु विक्रीची दुकाने वाढत आहेत, अवैध धंदे वाढत आहेत. अशा परिस्थितीत कर्मचाऱ्यांची पदे वाढवून मिळाली तर मोठ्या प्रमाणात महसूलात वाढ होईल. त्यामुळे राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून शासनास मिळणारा महसूल लक्षात घेता त्यांना खास बाब म्हणून रिक्त पदे तसेच वाढीव पदे भरण्यास शासनाने परवानगी देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.

गृहनिर्माण विभाग

शासकीय जमीनीवर होणारे अतिक्रमण

४.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या महसुली जमा अहवालामधील **परिच्छेद क्र.४.२.१२ "एकत्रितकृत खर्चाचा शासनाच्या हिश्याचा महसूल वसूल झाला नाही"** या संदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय व्यक्त केले.

परिच्छेद क्र.४.२.१२.१

४.२ शासनाच्या ११ जुलै, २००१ च्या आदेशामध्ये अशी तरतूद आहे की, बृहन्मुंबई महानगरपालिकेने गलिच्छ वस्तीतील पात्र रहिवाश्यांकडून जमिनीच्या निवासी वापराकरीता दिनांक १ जानेवारी, २००३ पासून व निवासाशिवाय अन्य वापराकरता दिनांक १ ऑगस्ट, २००३ पासून एकत्रिकृत शुल्क जसे सेवा शुल्क, प्रशासनिक खर्च आणि जमीन भाडे विहित दराने वसूल करावे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने वसूल केलेल्या एकत्रित खर्चाच्या ४० टक्के रक्कम शासनाच्या खात्यात जमा करावयास पाहिजे.

अतिरिक्त जिल्हाधिकारी (अतिक्रमण) पश्चिम उपनगर, मुंबई यांच्या अभिलेख्यांच्या चाचणी तपासणीत असे उघडकीस आले की, १९,९९८ पात्र गलिच्छ वस्ती निवासींना ओळखपत्रे निर्गमित न केल्याने रु.६.८२ कोटी चा एकत्रिकृत खर्च, बृहन्मुंबई महानगरपालिका जानेवारी २००३ आणि जुलै २००५ या दरम्यान वसूल करु शकली नाही. परिणामी, शासनाचा रु.२.७३ कोटीचा हिस्सा खाली दर्शविल्याप्रमाणे वसूल व्हावयाचा राहिला :

अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का), पश्चिम उपनगरे यांच्या कार्यक्षेत्रात ३० जून, २००५ रोजी १९,९९८ झोपडीधारकांनी ओळखपत्राचे पैसे भरले नव्हते. त्यानंतर ३१ जानेवारी, २००८ पर्यंत २४३ अधिक झोपडीधारक पात्र ठरुनही, ५४१ झोपडीधारकांनी नुकसान भरपाईची रक्कम शासनास जमा केलेली आहे. दि.३१.७.२००७ अखेर बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे रु.१७,७०,८८,०२३/- एवढी रक्कम नुकसान भरपाई पोटी जमा केली आहे. त्यापैकी रु.७,०८,३५,२०९/- एवढी रक्कम शासनास येणे आहे. ओळखपत्र घेऊन जाण्यासाठी संबंधित झोपडीधारकांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. वसूली बाबत कार्यवाही चालू आहे.

अ.क्र.	प्रवर्ग	बाकी पात्र गलिच्छ वस्ती निवासींची संख्या	एकत्रीकृत खर्चाचा प्रतिमास दर (रु.)	कालावधी	वसुली योग्य रक्कम	शासनाचा हिस्सा
					(रुपये कोटीत)	
१	निवासी	१९,०९६	१००	१ जानेवारी, २००३ ते ३१ जुलै, २००५ (३१ महिने)	५.९२	२.३७
२	मिश्र	२०७	२००	१ ऑगस्ट, २००२ ते ३१ जुलै, २००५, (३६ महिने)	०.१५	०.०६
३	अनिवासी	६९५	३००	१ ऑगस्ट, २००२ ते ३१ जुलै, २००५, (३६ महिने)	०.७५	०.३०
	एकूण	**१९,९९८**			**६.८२**	**२.७३**

शासनाने सप्टेंबर, २००६ मध्ये वस्तुस्थिती मान्य केली आणि या बाबतीत केलेल्या कार्यवाहीसंबंधी १५ दिवसांच्या आत कळविण्याचे मान्य केले. अद्यापपर्यंत उत्तर मिळालेले नाही (डिसेंबर २००६).

४.३ ज्ञापन :

अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का), पश्चिम उपनगरे यांच्या कार्यक्षेत्रात ३० जून, २००५ रोजी १९,९९८ झोपडीधारकांनी ओळखपत्राचे पैसे भरले नव्हते. त्यानंतर ३१ जानेवारी, २००८ पर्यंत २४३ अधिक झोपडीधारक पात्र ठरुनही, ५४१ झोपडीधारकांनी नुकसान भरपाईची रक्कम शासनास जमा केलेली आहे. दिनांक ३१.३.२००७ अखेर बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे रु.१७,७०,८८,०२३/- एवढी रक्कम नुकसान भरपाई पोटी जमा केली आहे. त्यापैकी रु.७,०८,३५,२०९/- एवढी रक्कम शासनास येणे आहे. ओळखपत्र घेऊन जाण्यासाठी संबंधित झोपडीधारकांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. वसूली बाबत कार्यवाही चालू आहे.

परिच्छेदाबाबत दिलेला खुलासा हा मुद्देनिहाय नाही. पश्चिम उपनगरातील ओळखपत्र वाटपासाठी पात्र १९,९९८ झोपडीधारकांकडून एकत्रित शुल्कापोटी रु.२.७३ कोटी वसूल होणे आवश्यक असताना दिनांक ३.६.२००५ पर्यंत ओळखपत्र वितरीत झाली नाहीत.

एकत्रित शुल्कापोटी महानगरपालिकेकडून पश्चिम उपनगरातील सर्व ओळखपत्रधारकांकडून एकूण रु.१७,७०,८८,०२९/- वसूल होणे आवश्यक असल्याचे दिसून येते.

याबाबत १९,९९८ झोपडीधारकांबाबतची सद्य:स्थिती सांगणे क्रमप्राप्त आहे तसेच शासनाचा हिस्सा जमा करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा तपशील देणे.

गृहनिर्माण विभागाने पुढीलप्रमाणे खुलासा केला :-

४.४ फेब्रुवारी, २०१० अखेर १६,३१७ पात्र झोपडधारक यांना ओळखपत्र वितरीत करण्याचे शिल्लक आहे. परंतु सदर ओळखपत्रधारकांना कळवून सुद्धा झोपडीधारकांनी ओळखपत्रे घेतलेली नाहीत. शासन निर्णय क्र.गवसू.१२२०/प्र.क्र.२०४/झोपसू-१, दिनांक ११.७.२००१ अन्वये झोपडपट्टीवासियांकडून विहित एकत्रित शुल्क वसूल करण्याची जबाबदारी ही बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे सोपविण्यात आलेली आहे. त्यामुळे अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का) पश्चिम उपनगरे यांचेकडून सद्य:स्थितीत निवासी कारणास्तव एकत्रित शुल्क वसूल करण्याचे शिल्लक नाही.

सदर परिच्छेदामध्ये नमूद रक्कम रु.१७,७०,८८,०२३/- ही रक्कम महानगरपालिके कडील दिनांक ३०.३.२००७ पर्यंतच्या पश्चिम उपनगरातील राज्य शासनाच्या जागेवरील वसूल करण्यात आलेल्या शुल्काची रक्कम आहे असे त्यांच्या दैनंदिन प्रगती अहवालानुसार दिसून येते. दिनांक १.४.२००९ च्या महानगरपालिकेकडील विवरणपत्राप्रमाणे रु.१८,४५,२२,००१/- एवढी रक्कम वसूल झालेली दिसते.

प्रस्तुत प्रकरणी शासनस्तरावर निर्णय घेण्याची कार्यवाही सुरु आहे. तरी सद्य:स्थितीत सदर स्पष्टीकरण मान्य करण्यात यावे.

परिच्छेद क्र.४.२.१२.२

४.५ अतिरिक्त जिल्हाधिकारी, पूर्व उपनगरे आणि पश्चिम उपनगरे मुंबई यांच्या अभिलेख्यांच्या चाचणी तपासणीत असे आढळून आले की, १,४१,८४१ ओळखपत्रे गलिच्छ वस्तितील पात्र रहिवाश्यांना निर्गमित केली गेली, ज्यांचेकडून बृहन्मुंबई महानगर पालिकेला ऑगस्ट, २००२ आणि जुलै, २००५ या दरम्यान रु.४४.३५ कोटी एकत्रिकृत खर्च वसूल करावयाचा होता. यापैकी ४० टक्के दराने शासनाचा रु.१७.७४ कोटीचा हिस्सा शासनाच्या खात्यात जमा करावयाचा होता, तो बृहन्मुंबई महानगरपालिकेने जमा केला नाही. याचा परिणाम खालील तपशीलप्रमाणे रु.१७.७४ कोटी वसूल न होण्यात झाला.

अ.क्र.	प्रवर्ग	छायांकित ओळखपत्रे निर्गमित केलेल्या गलिच्छ वस्ती निवासाची संख्या	एकत्रितकृत खर्चाचा प्रतिमास दर (रु.)	कालावधी	वसुली योग्य रक्कम	शासनाचा हिस्सा
					(रुपये कोटीमध्ये)	
१.	**अतिरिक्त जिल्हाधिकारी (अतिक्रमण) पूर्व उपनगरे**					
	निवासी	४५,१८४	१००	१ जानेवारी, २००३ ते ३१ जुलै, २००५ (३१ महिने)	१४.०१	५.६०
	मिश्र	१३	२००	१ ऑगस्ट, २००२ ते ३१ जुलै, २००५ (३६ महिने)	०.०१	०.००४
	अनिवासी	२५८	३००	१ ऑगस्ट, २००२ ते ३१ जुलै, २००५ (३६ महिने)	०.२८	०.११
एकूण		**४५,४५५**			**१४.३०**	**५.७२**
२.	**अतिरिक्त जिल्हाधिकारी (अतिक्रमण) पश्चिम उपनगरे**					
	निवासी	९६,१५५	१००	१ जानेवारी, २००३ ते ३१ जुलै, २००५ (३१ महिने)	२९.८१	११.९२
	मिश्र	३१	२००	१ ऑगस्ट, २००२ ते ३१ जुलै, २००५ (३६ महिने)	०.०२	०.०१
	अनिवासी	२००	३००	१ ऑगस्ट, २००२ ते ३१ जुलै, २००५ (३६ महिने)	०.२२	०.०९
एकूण		**९६,३८६**			**३०.०५**	**१२.०२**
एकूण बेरीज		**१,४१,८४१**			**४४.३५**	**१७.७४**

बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून केलेली वसूली कळविण्याचे शासनाने सप्टेंबर, २००६ मध्ये मान्य केले. उत्तर मिळालेले नाही (डिसेंबर २००६).

<u>ज्ञापन :</u>

४.६ अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का.), पूर्व उपनगरे यांचे कार्यक्षेत्र ३० जून, २००५ पर्यंत एकूण ४५,४५५ गलिच्छवस्ती झोपडीधारकांना ओळखपत्र वाटप झाले. त्यांची एकूण वसूली बृहन्मुंबई

महानगरपालिकेने रु.१४.३० कोटी करावयाची असून, त्यातील शासनाचा हिस्सा रु.५.७२ कोटी होता. दि.३१.३.२००७ पर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिकेने एकत्रित शुल्कापोटी रु.९.३७ कोटी एवढी रक्कम वसूल केली असून, त्यापैकी (४० टक्के) रु.३.७५ कोटी इतकी रक्कम शासनास येणे आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने सदर रक्कम शासनाकडे जमा केलेली नाही. अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का.) पश्चिम उपनगरे यांच्या कार्यक्षेत्रात ३० जून, २००५ पर्यंत एकूण ९६,३८६ गलिच्छवस्ती झोपडीधारकांना ओळखपत्र वाटप झाले. त्याची एकूण वसूली बृहन्मुंबई महानगरपालिकेने एकूण रु.३०.०५ कोटी करावयाची असून, त्यातील शासनाचा हिस्सा रु.१२.०२ कोटी होता. दि.३१.३.०७ पर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिकेने एकत्रित शुल्कापोटी रु.१७,७०,८८,०२३/- एवढी रक्कम वसूल केली असून, त्यापैकी रु.७,०८,३५,२०९/- इतकी रक्कम शासनास येणे आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने सदर रक्कम शासनाकडे जमा केलेली नाही.

४.७ परिच्छेदात नमूद बृहन्मुंबई महानगरपालिकेकडील रु.१७.७४ कोटी वसुली मधील शासनास देय ४० टक्के रकमेच्या वसूली बाबत निश्चित खुलासा करावा. भुई भाड्याची शासनाला देय रक्कम, शासनास जमा करण्याबाबत कोणती उपाययोजना केली तसेच शासन निर्णय, दिनांक ११.७.२००१ मध्ये सूचित केल्यानुसार शासनाचा भुईभाड्याचा हिस्सा नियमित जमा होण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली, याबाबत स्पष्टीकरण द्यावे.

४.८ शासन निर्णय, दिनांक ११.७.२००१ अन्वये महानगरपालिका शासनाच्या जागेवरील झोपडीधारकांकडून वसूल करीत असलेले एकत्रित शुल्कापैकी ४० टक्के रक्कम रु.४०,६३,३९,२००/- भुईभाड्यापोटी शासनाच्या खाती जमा करणेबाबत अप्पर जिल्हाधिकारी (अति/निष्का.), पश्चिम उपनगरे यांनी दिनांक २१/४/२०१० अन्वये महानगरपालिकेला कळविले आहे.

४.९ सरकारी जमिनीवरील गलिच्छ वस्त्यांमधील महानगरपालिका सेवेकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेस देय रक्कम बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून भुईभाड्यापोटी शासनास येणे रक्कम याबाबत मेळ लागत नाही. बृहन्मुंबई महानगरपालिकेने भुईभाड्यापोटीची रक्कम अद्याप शासनास जमा केलेली नाही. त्यामुळे सदर रक्कमे मधील फरक कोणत्या कारणामुळे येतो, याबाबत शोध घेऊन निश्चित निर्णय घेण्याच्या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणी मा.सचिव (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये अपर जिल्हाधिकारी, मुंबई शहर, पूर्व उपनगरे, पश्चिम उपनगरे, मुंबई मंडळ व बृहन्मुंबई महानगरपालिका मधील संबंधित अधिकाऱ्यांनी एकत्रित बैठक

घेऊन, देणे व येणे रकमेमधील फरक कोणत्या कामामुळे येतो याबाबत निश्चित अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सदर बैठकीचे इतिवृत्त खालीलप्रमाणे आहे.

सरकारी जमिनीवरील गलिच्छवस्त्यांमधील महानगरपालिका सेवेकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेस देय रक्कम व बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून भुईभाड्यापोटी शासनास येणे रक्कम याबाबत मेळ लागत नसल्याने व बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून भुईभाड्याची रक्कम वसूल न केल्याबाबत लेखा आक्षेप/परिच्छेद महालेखापालांकडून उपस्थित होत असल्याने, त्याबाबत चर्चा/निर्णय घेण्याकरिता मा.सचिव, गृहनिर्माण यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या दालनात दि.३.६.२०१० रोजी सकाळी ११.०० वा.बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.

१) श्री.मनुकुमार श्रीवास्तव, सचिव (नवि-२), नगरविकास विभाग,

२) श्री.आशिष सिंग, अतिरिक्त आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका,

३) डॉ.सतीश भिडे, मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण मंडळ,

४) श्री.दिलीप शिंदे, उप सचिव, गृहनिर्माण विभाग,

५) श्री.बी.जी.पवार, अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का.) पश्चिम उपनगरे,

६) श्री.अशोक शिनगारे, अपर जिल्हाधिकारी, मुंबई शहर,

७) श्री.जगदाळे, अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का.), पूर्व उपनगरे,

८) श्री.सुहास करवंदे, उपायुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका,

९) श्री.सु.सं.धपाटे, अवर सचिव, गृहनिर्माण विभाग,

१०) श्री.वि.मा.माने, प्रशासकीय अधिकारी, झो.पु.प्रा.

४.१० सदर बैठकीचे इतिवृत्त पुढील प्रमाणे आहे. तिन्ही अप्पर जिल्हाधिकारी व मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांच्या अहवालानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेने झोपडीधारकांकडून वसूल केलेल्या रकमेनुसार, त्यांच्याकडून शासनास येणे रक्कम रु.३०.२५ कोटी इतकी आहे व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अहवालानुसार शासनास देय रक्कम रु.१६.२१ कोटी इतकी असून, बृहन्मुंबई महानगरपालिकेस शासनाकडून येणे रक्कम रु.५२.८४ कोटी इतकी आहे. सदर तफावती बाबत बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली. शासन निर्णय दि.३.५.२००३ नुसार दि.१.१.१९९५ ते दि.३१.१२.२००२ पर्यंतच्या एकत्रित शुल्काची रक्कम माफ करण्यात आली आहे, महानगरपालिकेने सेवा आकारापोटी

केलेली मागणी ही शासकीय जमिनीवरील वसलेल्या झोपडीधारकांच्या संख्येनुसार आहे, परंतु शासकीय जागेवरील अधिकृत फोटोपासधारकांच्या संख्येनुसार सेवा आकाराची रक्कम अनुज्ञेय आहे, बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सर्व ओळखपत्रधारकांची १०० टक्के वसूली होत नाही, इत्यादी बाबीमुळे रकमेमध्ये तफावत होत असल्याची बाब बैठकीत निदर्शनास आणण्यात आली.

२. बृहन्मुंबई महानगरपालिकेने भुईभाड्याची रक्कम शासनास/म्हाडास जमा न केल्यामुळे तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने भुई भाड्याची रक्कम वसूल न केल्याबाबत लेखा आक्षेप/लेखा परिच्छेद महालेखापालाकडून उपस्थित करण्यात आले असून, सदर लेखा आक्षेप/लेखा परिच्छेद अनुपालन करणे शक्य होत नाही असे अप्पर जिल्हाधिकारी यांनी निदर्शनास आणले.

३. झोपडीधारकांकडून एकत्रित शुल्काची वसूली करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेस आवश्यक असलेली माहिती जशी प्रत्येक झोपडपट्टीनिहाय टेबल सर्व्हे प्लॅन, सर्वेक्षणाचे अर्ज इत्यादी माहिती अप्पर जिल्हाधिकारी यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेस तात्काळ द्यावी असे बैठकीत ठरले.

४. प्रस्तुत प्रकरणी निर्णयाप्रत येण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून शासनाकडून येणे असलेली निश्चित रक्कम व बृहन्मुंबई महानगरपालिकेस शासनाकडून देय असलेली निश्चित रक्कम याबाबत ताळमेळ लावण्यासाठी अप्पर जिल्हाधिकारी (अति/निष्का.) मुंबई शहर, पश्चिम उपनगरे, पूर्व उपनगरे तसेच मुंबई गृहनिर्माण मंडळ व क्षेत्रविकास मंडळ व बृहन्मुंबई महानगरपालिका या पाच कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्यांची एकत्रित बैठक घेऊन विभागवार एकत्रित शुल्काची निश्चित रक्कम किती आहे, त्यामध्ये फरक कोणत्या कारणांमुळे येतो, याबाबत आवश्यक त्या योग्य विवरणपत्रामध्ये माहिती प्राप्त करुन, त्यानुसार शासनास व बृहन्मुंबई महानगरपालिकेस देय रक्कम याबाबत माहिती घ्यावी. सदर बैठक अप्पर जिल्हाधिकारी (अति./निष्का.), पश्चिम उपनगरे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करावी व त्यांनी याबाबत सविस्तर व निश्चित अभिप्रायासह आपला अहवाल शासनास १५ दिवसांच्या आत सादर करावा, असे बैठकीत ठरले. त्यानंतर उपस्थितांचे आभार मानून बैठक समाप्त झाली.

प्रस्तुत प्रकरणी शासनस्तरावर निर्णय घेण्याची कार्यवाही सुरु आहे. तरी सद्य:स्थितीत सदर स्पष्टीकरण मान्य करण्यात यावे.

साक्ष :

४.११ विभागाने पुरविलेल्या उपरोक्त लेखी माहितीच्या आधारे अधिक माहितीसाठी दिनांक ३१ ऑगस्ट, २०१० रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीवेळी गृहनिर्माण विभागाच्या सचिवांनी समितीस अशी माहिती दिली की, अतिरिक्त जिल्हाधिकारी, (अतिक्रमण) पश्चिम उपनगर, मुंबई यांच्या

अभिलेख्यांच्या चाचणी तपासणीत असे उघडकीस आले की, १९,९९८ पात्र गलिच्छवस्ती निवासींना ओळखपत्रे निर्गमित न केल्याने रु. ६.८२ कोटी चा एकत्रिकृत खर्च बृहन्मुंबई महानगरपालिका जानेवारी, २००३ आणि जुलै, २००५ या दरम्यान वसूल करु शकली नाही. परिणामी शासनाचा रु.२.७३ कोटीचा हिस्सा खाली दर्शविल्याप्रमाणे वसूल व्हावयाचा राहिला असल्याचा आक्षेप लेखा परीक्षण अहवालामध्ये घेण्यात आला आहे. यासंदर्भात झोपडपट्टी अधिनियम ३-१(३) प्रमाणे संरक्षित झोपडीधारकांची व्याख्या करण्यात आली आहे. "जो कोणीही व्यक्ती ज्याच्याकडे ओळखपत्र आहे", असा संरक्षित झोपडीधारक आहे. अशा संरक्षित झोपडीधारकांना शासनाने ओळखपत्रे देणे अपेक्षित आहे. तसेच शासनाने, त्या संबंधीची नोंदवही ठेवणे अपेक्षित आहे. या अधिनियमानुसार शासनाने दि.११ जुलै, २००१ ला एक शासन निर्णय काढला आणि ५० हजारपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये ही योजना लागू केली. उदाहरणार्थ पश्चिम उपनगर, मुंबईपुरते बोलावयाचे झाले तर याठिकाणी ओळखपत्रे देण्याची योजना लागू झाल्यानंतर ३,९२,३६३ लोकांनी ओळखपत्रे मिळण्यासाठी अर्ज केले. अतिरिक्त जिल्हाधिकारी, पश्चिम उपनगर, मुंबई यांनी त्यापैकी १,१९,१९२ लोकांना ओळखपत्रे देण्यास पात्र ठरविले. त्यापैकी ९७,०३६ लोकांना प्रत्यक्ष ओळखपत्रांचे वाटप झालेले आहे.

४.१२ समितीने यावर संपूर्ण मुंबईची आकडेवारी समितीला देण्यात यावी व कायद्याप्रमाणे गलिच्छ वस्त्या घोषित झाल्या असल्यास खाजगी जागेवरील गलिच्छ वस्त्यांच्या ठिकाणी ओळखपत्रे देण्याची योजना लागू होणार नाही काय ? अशी विचारणा केली असता, सचिवांनी असे सांगितले की, पश्चिम उपनगर, मुंबई येथे जवळ जवळ १९९९८ पात्र गलिच्छवस्ती निवासींना ओळखपत्रे वाटली गेली नाहीत. त्यामुळे त्यापोटी जी रक्कम वसूल व्हावयास पाहिजे होती ती वसूल झालेली नाही. आजच्या स्थितीत १,१९,१९२ लोकांना पात्र ठरविण्यात आले असून त्यापैकी ९७,०३६ लोकांना ओळखपत्रांचे वाटप करण्यात आलेले आहे. उर्वरित १४०४८ ओळखपत्रे तयार ठेवले असले तरी संबंधित लोकांनी ती ओळखपत्रे नेलेली नाहीत याची कारणे शोधली असता, त्यामध्ये तीन-चार गोष्टी निदर्शनास आल्या आहेत. काही ठिकाणी खाजगी अघोषित जागेवरील झोपडपट्टयांचे सर्वेक्षण झालेले आहे आणि चुकीने त्या ठिकाणची ओळखपत्रे तयार करण्यात आलेली आहेत. अशा विवक्षित जागेवरील झोपडपट्टीधारकांना ओळखपत्रे देऊ नये, असा निर्णय झालेला आहे. अधिनियमामध्ये चार प्रवर्गातील झोपड्यांना ओळखपत्रे देण्यात येऊ नयेत असे म्हटले आहे. फुटपाथवरील झोपड्यांना ओळखपत्रे देण्यात येऊ नयेत, २५ पेक्षा कमी झोपड्या आहेत अशा ठिकाणी ओळखपत्रे देण्यात येऊ नयेत, सी.आर.झेड.च्या अंतर्गत असलेल्या झोपडयांना ओळखपत्रे देण्यात येऊ नयेत तसेच ज्या ठिकाणी एस.आर.ए.योजना मंजूर झालेली आहे

अशा ठिकाणी ओळखपत्रे देण्यात येऊ नयेत, अशा स्वरुपाच्या जागेवरील झोपडपट्टयांची काही प्रमाणात ओळखपत्रे अनावधानाने तयार झाल्यामुळे त्या ओळखपत्रांचे वाटप करण्यात आले नाही. यावर समितीने अशी विचारणा केली की, ओळखपत्रे तयार करणाऱ्या अधिकाऱ्यांना यासंबंधीची माहिती नव्हती काय ? त्याबाबत सचिवांनी असे सांगितले की, ओळखपत्रे तयार करताना ही माहिती नव्हती. ही गोष्ट नंतर निदर्शनास आली. त्यामुळे अशा ठिकाणची ओळखपत्रे वाटण्यात आली नाहीत. काही लोकांनी ओळखपत्रे मिळण्यासाठी पैसे भरले पण ओळखपत्रे नेली नाहीत. ज्या ठिकाणी एस.आर.ए.योजना कार्यान्वित झाली अशा ठिकाणच्या लोकांनी ओळखपत्रे नेलेली नाहीत. १४०४८ लोकांनी ओळखपत्रे नेलेली नाहीत त्याची विगतवारी कशी आहे याची पहाणी करावी लागेल. यावर यासंबंधीची विगतवारी अद्याप काढण्यात आलेली नाही काय? महालेखापरीक्षकांचा अहवाल कधीचा आहे ? अशी समितीने विचारणा केली असता, सन २००५-२००६ या वर्षाचा हा अहवाल आहे असे सचिवांनी उत्तर दिले. त्यावर समितीने असे विचारले की, मागील पाच वर्षात वाटप न करण्यात आलेल्या १४०४८ ओळखपत्रांची विगतवारी करण्यास विभागाला वेळ मिळालेला नाही काय ? याबाबत सचिवांनी असे सांगितले की, ओळखपत्रे का वाटली गेली नाहीत याची कारणमिमांसा सविस्तरपणे शोधली गेली नाही. वर्गवारी काढण्यात आलेली नाही हे बरोबर आहे. याबाबतीत लेखापरीक्षण अहवालामध्ये असे म्हटले आहे की, काही ओळखपत्रे वाटली गेली नाहीत त्यामुळे त्या ओळखपत्रांसंबंधीची एकत्रित रक्कम वसूल झाली नाही त्यामुळे राज्य शासनाचा ४० टक्के वाटा राज्य शासनाला मिळालेला नाही. यावर समितीने अशी विचारणा केली की, ओळखपत्रे नजर चुकीने तयार करण्यात आली त्यामुळे ती वितरित करण्यात आली नाहीत. ही ओळखपत्रे वितरित करतांना प्रत्येक ओळखपत्रासाठी किती शुल्क आकारण्यात येते? सचिवांनी उत्तर दिले की, जी निवासी ओळखपत्रासाठी प्रती ओळखपत्र १०० रुपये, मिश्रसाठी २०० रुपये आणि अनिवासीसाठी ३०० रुपये एकत्रित शुल्क आकारण्यात येते.

४.१३ महालेखाकार यांनी विचारणा केली की, The information just now submitted by the Departmental representative is for the current period only. The Audit Para pertains to १st January, २००३ to ३१st July, २००५. The total number of photo-pass holders was not finding out. Why it was not find out? However, due to non-issue of Identity Cards to the slum dwellers an amount of Rs.६.८२ crores could not be realised. There were defaulters. I do not think that after January २००३ the Department has done anything. What happened to the earlier period? That

is our point. यावर सचिवांनी असा खुलासा केला की, अतिरिक्त जिल्हाधिकारी (अतिक्रमण) पश्चिम उपनगर यांच्या अभिलेख्यांचे लेखापरीक्षण झाले, त्यावेळी १९,९९८ वितरित न झालेली ओळखपत्रे होती. त्या ओळखपत्रांपोटी वसूल करावयाची एकत्रित रक्कम आणि त्यानुसार मिळावयाचा शासनाचा वाटा विभागाच्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात दर्शविलेला आहे. १९९९८ वितरित न केलेल्या ओळखपत्रांपैकी, मधल्या काळात पाच हजार ओळखपत्रे वाटली गेली व १४०४८ ओळखपत्रे शिल्लक राहिली आता प्रश्न असा आहे की, जी ओळखपत्रे वाटली गेली नाहीत त्यांच्या पोटी वसूल होणारी एकत्रित रक्कम वसूल झालेली नाही. ही ओळखपत्रे कां वाटली गेली नाहीत, याची कारणे सांगितली आहेत. या ओळखपत्रांसाठी तीन प्रकारचा आकार लावण्यात येतो. ओळखपत्र देण्यासाठी शुल्क आकारण्यात येते. हस्तांतरण झाले असल्यास, त्यासाठी शुल्क लावण्यात येते. प्रत्येक झोपडीमागे दर महिन्याला एकत्रित दर आकारण्यात येतो. तो वसूल करावयाचा आहे. याची विगतवारी, नियमाप्रमाणे सेवाशुल्क ४० टक्के, प्रशासकीय आकार २० टक्के आणि भूईभाडे ४० टक्के अशी आहे.

४.१४ शासनाच्या जागेवर ज्या झोपडपट्टया आहेत त्यांच्याकडून प्रती झोपडी एकत्रित दर १०० रुपये वसूल करण्यात येतो. महानगरपालिकेने वसूल केलेल्या एकत्रिकृत खर्चाच्या ४० टक्के रक्कम शासनाच्या खात्यात जमा करावयास पाहिजे. पण जी ओळखपत्रे वाटली गेली नाहीत त्यांच्यापोटी वसूल होणारी रक्कम वसूल झालेली नाही ती वसूल न झाल्यामुळे शासनाच्या खात्यात एकत्रिकृत खर्चाच्या ४० टक्के रक्कम जमा झालेली नाही. परिणामी शासनाचा वाटा शासनाकडे आलेला नाही. समितीने अशी विचारणा केली की, शासनाने सप्टेंबर, २००६ मध्ये वरील वस्तुस्थिती मान्य केली आणि याबाबतीत केलेल्या कार्यवाहीसंबंधी १५ दिवसांच्या आत कळविण्याचे मान्य करुनही अद्यापपर्यंत उत्तर मिळालेले नाही. यावर सचिवांनी खुलासा केला की, लेखापरीक्षण परिच्छेदामध्ये ही बाब निदर्शनास आणल्यानंतर त्याबाबतीत शासन स्तरावर अनेक बैठका झाल्या. एकूणच या सगळया प्रश्नाच्या बाबतीत महालेखाकारांकडे वेळोवेळी माहिती पाठविली आहे. यावर समितीने पुन्हा विचारणा केली की, आता समितीला जे समजून सांगितले ते महालेखाकारांना नंतरच्या काळात समजून सांगितले होते काय ? याबाबत सचिवानी खुलासा केला की, महालेखाकारांकडे पत्रव्यवहार झालेला आहे. पण महालेखाकारांबरोबर बैठक झालेली नाही. त्यावर समितीने विचारणा केली की, महालेखाकारांनी जे आक्षेप काढलेले असतात ते काही वेळा लेखापरीक्षणाच्यावेळी वेळेवर माहिती न पुरविल्यामुळे काढलेले असतात. पण त्यानंतर खर्चमेळ आणि संकलनासाठी तीन ते सहा महिन्याचा वेळ असतो. त्या कालावधीमध्ये महालेखाकारांबरोबर बैठक घेऊन त्यांना समजून सांगितले तर ते समजून घेतात. १४०४८

ओळखपत्र वाटावयाची नव्हती ती नजरचुकीने तयार करण्यात आली हे समितीला एका मिनिटात समजले. महालेखाकारांना याबाबतीत जास्त समजते असे आमचे मत आहे. महालेखाकारांना ही गोष्ट समजून का सांगितली नाही ?

४.१५ याबाबत सचिवांनी खुलासा केला की, सन २००५-२००६ मध्ये लेखापरीक्षण परिच्छेदात ही गोष्ट निदर्शनास आणल्यानंतर दि.२९/३/२००८ ला या संदर्भातील स्पष्टीकरणात्मक प्रारुप तयार करुन पाठविण्यात आला. त्यानंतर पुन्हा दि.२३/३/२००९ ला माहिती दिली आहे. अशा प्रकारे दोन-तीन वेळा पत्र पाठवून माहिती दिली आहे. महालेखाकारांनी अशी माहिती दिली की, The above information is not received by our Office. The Department reply is not available with A.G. We have received the information only for the current year i.e. २००५-२००६. In this case, ४० per cent amount is supposed to be given to the Government by the B.M.C. Out of an amount of Rs.१७७०८८०२९ an amount of Rs.७,०८,३५,२०९/- is to be given to the Government. The other important point is A.G. Office has collected the total figures. Now, the departmental representative is giving the information about Rs.१४.३० crores and that information has not submitted to A.G. in time. We have also not received the earlier information. Even, it has been given, there is a loss to the Government revenue. We have received the explanatory memorandum for the year २००७-२००८. After that there was no information received by us from the Government.

४.१६ महालेखाकारांचे परिच्छेद, लेखापरीक्षण व लेख्यांचे काम पाहण्याची जबाबदारी संबंधित विभागाचे उप सचिव, अवर सचिव यांची आहेत तसेच गृहनिर्माण विभागामध्ये वित्तीय सल्लागार नाहीत अशी सचिवांनी माहिती दिली असता त्यावर समितीने विचारणा केली की, त्यामुळे महालेखाकारांचे परिच्छेद व लेखापरीक्षण याकडे लक्ष देण्यासाठी गृहनिर्माण विभागाकडे वेळ नाही काय ? ज्या वेळी समितीची बैठक लावली जाते, त्या वेळी केवळ ४ दिवस अगोदर या सर्व गोष्टींकडे पाहिले जाते. इतर वेळी वर्षानुवर्षे या सर्व बाबींकडे कोणीही लक्ष देत नाही. As far as the Government and Accountant General's Office is concerned, it is a constant and continuous process. In this case, I must point out that the departmental representative must be very careful and serious while submitting para-wise explanatory memorandum to the Office of the Accountant General. I do not think that there is a good co-operation or co-ordination between your departments. गृहनिर्माण विभागामध्ये समन्वय असल्याचे समितीला दिसून येत नाही.

गेल्या कित्येक महिन्यांपासून आपण विभागाचे स्पष्टीकरण महालेखाकारांकडे कळविलेले नाही. विभागाकडून या संदर्भात कोणतीही कार्यवाही होत असल्याचे समितीला दिसून येत नाही. ही समिती विधानसभेचे एक लहान स्वरुप आहे. या समितीच्या शिफारशींकडे आपण लक्ष देणार नसाल तर यामुळे शासनाच्या एकूण कार्यप्रणालीवर विपरित परिणाम होण्याची शक्यता आहे, असे समितीला वाटते. Hence, Now, I would request the Accountant General to send one letter to the Commissioner, Mumbai Municipal Corporation and hold a meeting with them to sort out the matter successfully. यास सचिवांनी सहमती दर्शवून परिच्छेद क्र.४.१.१२ च्या संदर्भात मुद्या उपस्थित केला की, सन १९७६ पासून बृहन्मुंबई महानगरपालिका व शासन यांच्यामध्ये लेख्यांच्या संदर्भात बऱ्याच रकमेचा ताळमेळ बसत नाही. जोपर्यंत हा ताळमेळ निश्चित होत नाही, तोपर्यंत निश्चित उत्तर देणे शक्य होणार नाही. या संदर्भात अप्पर जिल्हाधिकारी (अति-निष्का) मुंबई शहर, पुर्व उपनगरे, पश्चिम उपनगरे, बृन्हमुंबई महानगरपालिका व म्हाडा यांच्या समवेत सचिवांनी अनेकदा बैठका घेतलेल्या आहेत. आकडेवारीनुसार, शासनाने व बृन्हमुंबई महानगरपालिका यांना काही रकमेची देवाणघेवाण करावयाची आहे. ही आकडेवारी निश्चित होत नाही, तोपर्यंत ही अडचण कायम राहणार आहे. यावर समितीने असे सूचित केले की, या संदर्भात विभागाने बृन्हमुंबई महानगरपालिका यांना पत्र पाठवावे. या संदर्भात महालेखाकारांनी आपले अभिप्राय नोंदविताना, असे नमूद केले की, I would like to submit that this is a very old issue. This matter was discussed earlier in the meeting of the Public Accounts Committee very long back in १९९४. The same issue was also discussed in the १७th Report of the Public Accounts Committee. It is a matter of encroachement on the Government land. This point was again discussed in the meeting of P.A.C. in the year १९९९. The Government has also issued some insturctions as to how to tackle this problem of illegal encroachements on the Government lands. Unfortunately. I would say; till to-day, the situation has not improved. In my opinion. no encroachments will be there on the Government lands if the provisions of the Maharashtra Land Revenue Code, १९४६ are properly implemented. त्यावर समितीने नमूद केले की, विभागाने याची नोंद घ्यावी व त्या नुसार कार्यवाही करावी. १४ हजार कार्डे अतिरिक्त छापली गेली असतानाही त्या संदर्भात कोणावरही जबाबदारी निश्चित करण्यात आली नाही. या संदर्भात अद्याप संपूर्ण माहिती समितीसमोर ठेवण्यात आली नाही.

४.१७ सात कोटी आठ लाख पस्तीस हजार रुपये बृन्हमुंबई महानगरपालिकाकडून शासनास येणे बाकी आहे व ५१.९९ कोटी रुपये शासनाकडून येणे बाकी आहे. यामध्ये सन १९७६ पासूनच्या आकडेवारीचा समावेश आहे. ज्यावेळी फोटो पास देण्याची प्रक्रिया सुरु झाली, त्यावेळी ७ लाख २८ हजार पेक्षा अधिक अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी २ लाख ५ हजार अर्ज पात्र ठरविण्यात आले व एकूण १ लाख ६४ हजार फोटो पासचे वाटप करण्यात आले. बृन्हमुंबई महानगर पालिकेने दिलेल्या माहितीनुसार, ४०.५३ कोटी रुपये वसूल केले आहेत. एकत्रित खर्चाच्या ४० टक्के रकमेपैकी १६ कोटी २१ लाख रुपये बृन्हमुंबई महानगर पालिकेने शासनास देणे अपेक्षित आहे. समितीने अशी विचारणा केली की, अपर जिल्हाधिकारी, मुंबई शहर, पश्चिम उपनगरे व पूर्व उपनगरे तसेच मुंबई गृहनिर्माण मंडळ व क्षेत्रविकास मंडळ, बृन्हमुंबई महानगर पालिकेने या पाच कार्यालयातील संबंधित अधिकाऱ्यांची एकत्रित बैठक घेण्याचे समितीने गृहनिर्माण विभागाच्या सचिवांना आदेश दिले होते. त्यानुसार विभागाने एकत्रित बैठक घेऊन शुल्काच्या रक्कमेबाबतची माहिती पुढीलप्रमाणे दिली आहे.

४.१८ सदर आश्वासनाच्या अनुषंगाने आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, अपर जिल्हाधिकारी (अति./निष्का), पूर्व व पश्चिम उपनगरे आणि मुंबई शहर व मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांची उप सचिव (गृ.नि.) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २८.१०.२०१० रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीच्या इतिवृत्तातील प्रत पुढीलप्रमाणे आहे. तसेच आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना शासनाच्या भुईभाड्यापोटी ४० टक्के हिस्सा रु.१६.२१ कोटी शासनाकडे त्वरीत जमा करण्याबाबत दिनांक २९.१०.२०१० च्या अ.शा.पत्रान्वये कळविण्यात आले आहे. प्रत सोबत जोडली आहे. (विवरणपत्र - ४)

इतिवृत्त

४.१९ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या दिनांक ३१.३.२००६ च्या महसुली जमा अहवालावरी परिच्छेद क्र.४.२.१२ बाबत तत्कालीन सचिव (गृहनिर्माण) यांची लोकलेखा समितीसमोर झालेल्या साक्षीच्या अनुषंगाने दिनांक २८.१०.२०१० रोजी उप सचिव,गृहनिर्माण (श्री.चन्ने) यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केलेल्या बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते :-

१) श्री.सुहास के.करवंदे, उप आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका

२) श्री.अशोक शिनगारे, अपर जिल्हाधिकारी, मुंबई शहर

३) श्री.अनंत दहिफळे, अपर जिल्हाधिकारी, पूर्व उपनगरे

४) श्री.व्ही.व्ही.भोवरे, उप अभियंता

५) श्री.शिवाजी व्यं.पाटील, निवासी उप जिल्हाधिकारी, पश्चिम उपनगरे

६) श्री.एस.के.चौबे, कार्यकारी अभियंता, मुंबई मंडळ

७) श्री.रमेश सुरवाडे, निवासी उप जिल्हाधिकारी (अति.) पूर्व उपनगरे

८) श्री.सु.सं.धपाटे, अवर सचिव, गृहनिर्माण विभाग

९) श्री.अ.ज.शेट्ये, कक्ष अधिकारी, गृहनिर्माण विभाग

उपरोक्त परिच्छेदासंबंधात श्री.पाटील, निवासी उप जिल्हाधिकारी, पश्चिम उपनगरे यांनी असा मुद्दा मांडला की, सन २००२ पर्यंत १,१३,२४२ फोटोपासधारक होते. तर हा आकडा बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सुमारे १,५८,७४६ असा दर्शविण्यात आलेला आहे. त्यामुळे प्रथमतः नेमके किती फोटोपासधारक आहेत हा आकडा निश्चित करणे आवश्यक आहे. त्यासाठी म्हाडा व महाराष्ट्र शासनाच्या जागेवरील झोपडीधारकांची विगतवारी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून करणे आवश्यक आहे. त्या विगतवारीनुसार फोटोपासधारकांची संख्या निश्चित करणे शक्य होईल.

श्री.पाटील, निवासी जिल्हाधिकारी (पश्चिम उपनगरे) यांनी त्यांच्या अधीनस्त कार्यालयातील झोपडीधारकांची यादी महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांस सुपूर्द केल्याची बाब निदर्शनास आणली. परंतु बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी सदर यादी प्राप्त न झाल्याचे सांगितले. त्या अनुषंगाने उप सचिव (गृहनिर्माण) यांनी असे निदेश दिले की, तिन्ही मुंबई शहर पश्चिम उपनगर पूर्व उपनगर तिन्ही अपर जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या अधिपत्याखालील झोपडीधारकांची यादी बृहन्मुंबई महानगरपालिकेस एक महिन्याच्या आत निश्चितपणे द्यावी. त्यामुळे झोपडीधारकांच्या आकडेवारीमध्ये असलेली तफावत दूर करणे शक्य होईल. तसेच या निश्चित आकडेवारीच्या आधारे बृहन्मुंबई महानगरपालिकेने एकत्रित शुल्काची रक्कम झोपडीधारकांकडून वसूल करावी व ४० टक्के भुईभाड्याची रक्कम शासन/म्हाडाकडे जमिनीच्या मालकीनुसार जमा करावी.

बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे झोपडीधारकांच्या एकत्रित शुल्कापोटी रु.४०.५३ कोटी इतकी रक्कम जमा करण्यात आली असून, त्यापैकी ४० टक्के रक्कम रु.१६.२१ कोटी इतका शासनाचा भाग आहे. बृन्हमुंबई महानगरपालिकेने झोपडीधारकांस पुरविलेल्या सेवेबद्दल शासनाकडून २-३ वर्षापासून सहाय्यक अनुदान देण्याचे बंद करण्यात आले आहे. त्यामुळे शासनाकडून अनुदान स्वरुपात देण्यात येणारी रक्कम प्राप्त न झाल्यामुळे फोटोपासधारकांकडून वसूल झालेली रक्कम त्यात वळती करुन घेण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी विनंती केली. लेखांकनाच्या नियमानुसार

सहाय्यक अनुदान प्राप्त झाले नाही म्हणून एकत्रित शुल्कापोटी जमा झालेली रक्कम वळती करणे योग्य होणार नाही. शासनाकडे जमा करावयाचे रु.१६.२१ कोटी महानगरपालिकेने त्वरीत शासनाकडे प्रथम भरावे व त्यानंतर सहाय्यक अनुदानाची मागणी करावी असे उप सचिव(गृहनिर्माण) यांनी निदेश दिले.

म्हाडाच्या जमिनीवरील एकूण १२९४७ झोपडीधारकांना ओळखपत्र देण्यात आलेली आहे. ओळखपत्र देण्यात आलेल्या झोपडीधारकांकडून वसूल करण्यात आलेली एकत्रित शुल्काची ४० टक्के भुईभाड्याची रक्कम सुमारे रु.३.३० कोटी म्हाडाकडे वर्ग करण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे पाठपुरावा सुरु असल्याचे मुंबई मंडळाच्या अधिकाऱ्यांनी निदर्शनास आणले. त्या अनुषंगानेसुद्धा भुईभाड्याची रक्कम म्हाडाकडे जमा करण्याबाबत महानगरपालिकेने कार्यवाही करावी तसेच म्हाडाच्या अधिकाऱ्यांना पात्र झोपडीधारकांची यादी बृहन्मुंबई महानगरपालिकेस देण्यात यावी असे उप सचिव (श्री.चन्ने) यांनी निदेश दिले.

४.२० तिन्ही अपर जिल्हाधिकारी व मुंबई गृहनिर्माण क्षेत्रविकास मंडळ यांच्या अहवालानुसार बृन्हमुंबई महानगरपालिकेने झोपडीधारकांकडून वसूल केलेल्या रकमेनुसार, त्यांच्याकडून शासनास येणे रक्कम रु. ३०.२५ कोटी आहे. याबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय ? अशी समितीने विचारणा केली असता सचिवांनी असे सांगितले की, विभागाने अनेक बैठका घेतल्या.

४.२१ बृन्हमुंबई महानगरपालिका व शासनाचा सन १९७६ पासूनचा हिशोब बाकी आहे. सन १९७६ ते १९८२ पर्यंत झोपड्यांना सहाय्यक अनुदान देणे अपेक्षित होते. सुरुवातीला हा दर १८ रुपये ठरविण्यात आला होता. मात्र त्यानंतर झोपड्यांची संख्या बदलत गेली. बृन्हमुंबई महानगर पालिकेस असे म्हणणे आहे की, शासनाकडून त्यांना ७३ कोटी रुपये येणे अपेक्षित आहे. त्यापैकी शासनाने २२ कोटी रुपये दिले आहेत. उर्वरित ४८ कोटी रुपयांची रक्कम शासनाने द्यावयाची आहे. अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांना असे दिसून आले की, शासनाने केवळ ४८ कोटी रुपये देणे अपेक्षित होते. तसेच शासनाने सन २००३ मध्ये एक शासन निर्णय काढून १९ कोटी रुपये सोडून दिले आहेत. म्हणजेच आता केवळ ७ कोटी रुपये देणे शिल्लक राहिलेले आहे. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, १९ कोटी रुपये सोडून दिल्यानंतर ७ कोटी रुपये कसे काय शिल्लक राहतात ? याबाबत सचिवांनी खुलासा केला की, एकूण ४८ कोटी रुपयांपैकी शासनाने अगोदरच २२ कोटी रुपये दिलेले आहेत. त्या नंतर १९ कोटी रुपये शासन निर्णय काढून सोडून दिले. त्यामुळे आता केवळ ७ कोटी रुपये शिल्लक राहिले आहेत. शासनाने व बृन्हमुंबई महानगर पालिका यांनी एकत्र येऊन व एक रकमी चुकता करुन या संदर्भात कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे. याकरिता २ महिन्यात शासनाला आदेश देण्याचे मान्य केले

होते. परंतु केलेल्या कार्यवाहीची माहिती समिती आपला अहवाल तयार करेपर्यंत समितीला देण्यात आली नाही.

अभिप्राय व शिफारशी :

४.२२ समितीसमोर आलेल्या उपरोक्त माहितीवरून असे दिसून येते की, अतिरिक्त जिल्हाधिकारी, (अतिक्रमण) पश्चिम उपनगर, मुंबई यांच्या अभिलेख्यांच्या चाचणी तपासणीत असे उघडकीस आले की, १९,९९८ पात्र गलिच्छवस्ती निवासींना ओळखपत्रे निर्गमित न केल्याने रु.६.८२ कोटीचा एकत्रिकृत खर्च बृहन्मुंबई महानगरपालिका जानेवारी, २००३ आणि जुलै, २००५ या दरम्यान वसूल करु शकली नाही. परिणामी शासनाचा रु.२.७३ कोटीचा हिस्सा वसूल व्हावयाचा राहिला असल्याचा आक्षेप लेखा परीक्षण अहवालामध्ये घेण्यात आला आहे. झोपडपट्टी अधिनियम ३-१(३) प्रमाणे संरक्षित झोपडीधारकांची व्याख्या करण्यात आली आहे. "जो कोणीही व्यक्ती ज्याच्याकडे ओळखपत्र आहे", असा संरक्षित झोपडीधारक आहे. या कायद्यानुसार शासनाने दिनांक ११ जुलै, २००१ ला एक शासन निर्णय काढला आणि ५० हजारपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये ही योजना लागू केली.

४.२३ पश्चिम उपनगर, मुंबई येथे जवळ जवळ १९९९८ पात्र गलिच्छवस्ती निवासींना ओळखपत्रे वाटली गेली नाहीत. त्यामुळे त्यापोटी जी रक्कम वसूल व्हावयास पाहिजे होती ती वसूल झालेली नाही. आजच्या स्थितीत १,१९,१९२ लोकांना पात्र ठरविण्यात आले असून त्यापैकी ९७,०३६ लोकांना ओळखपत्रांचे वाटप करण्यात आलेले आहे. उर्वरित १४०४८ ओळखपत्रे तयार ठेवली असली तरी संबंधित लोकांनी ती ओळखपत्रे घेतलेली नाहीत याची कारणे शोधली असता, काही ठिकाणी खाजगी अघोषित जागेवरील झोपडपट्टयांचे सर्वेक्षण केलेले असल्याने आहे आणि चुकीने त्या ठिकाणची ओळखपत्रे तयार करण्यात आलेली आहेत. **अधिनियमात चार प्रवर्गातील झोपड्यांना ओळखपत्रे देण्यात येऊ नयेत असे म्हटले आहे. उदा.फुटपाथवरील झोपड्यांना ओळखपत्रे देण्यात येऊ नयेत, २५ पेक्षा कमी झोपड्या आहेत अशा ठिकाणी ओळखपत्रे देण्यात येऊ नयेत, सी.आर.झेड.च्या अंतर्गत असलेल्या झोपड्यांना ओळखपत्रे देण्यात येऊ नयेत तसेच ज्या ठिकाणी एस.आर.ए.योजना मंजूर झालेली आहे अशा ठिकाणी ओळखपत्रे देण्यात येऊ नयेत,** अशा स्वरुपाच्या जागेवरील झोपडपट्टयांची ओळखपत्रे मात्र अनावधानाने तयार झाली आहेत परंतु त्या ओळखपत्रांचे मात्र वाटप करण्यात आले नाही. **अशाप्रकारे १४ हजार अतिरिक्त ओळखपत्रे छापली गेली असतानाही त्या संदर्भात कोणावरही जबाबदारी निश्चित करण्यात आलेली नाही इतकेच नव्हे तर याबाबतची चौकशी देखील विभागाने अद्याप केलेली त्यामुळे**

याबाबतची संपूर्ण माहिती समितीला प्राप्त होवू नये ही बाब अत्यंत खेदाची आहे. सबब याप्रकरणी संपूर्ण चौकशी करुन जे दोषी आढळून येतील त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात यावी व याप्रकरणी संबंधितांवर केलेल्या कारवाईची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.

४.२४ लेखापरीक्षण अहवालामध्ये असे म्हटले आहे की, काही ओळखपत्रे वाटली गेली नाहीत त्यामुळे त्या ओळखपत्रांसंबंधीची एकत्रित रक्कम वसूल झाली नाही त्यामुळे राज्य शासनाचा ४० टक्के वाटा राज्य शासनाला मिळालेला नाही. ओळखपत्रे वितरित करतांना प्रत्येक ओळखपत्रासाठी शुल्क आकारण्यात येते ती निवासी ओळखपत्रासाठी प्रती ओळखपत्र १०० रुपये, मिश्रसाठी २०० रुपये आणि अनिवासीसाठी ३०० रुपये एकत्रित शुल्क आकारण्यात येते. शासनाने सप्टेंबर, २००६ मध्ये वरील वस्तुस्थिती मान्य केली आणि याबाबतीत केलेल्या कार्यवाहीसंबंधी १५ दिवसांच्या आत कळविण्याचे संबंधितांनी मान्य करुनही त्याबाबतची माहिती समितीचा अहवाल तयार करेपर्यंतही समितीला प्राप्त होवू न शकल्याने या प्रकरणी समितीला आपले अभिप्राय देता आलेले नाही. सबब, याप्रकरणी समितीला माहिती न पाठविल्याप्रकरणी जबाबदारी निश्चित करून संबंधिताविरुध्द कारवाई करावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीला ३ महिन्यात पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

४.२५ लेखापरीक्षण अहवालात नमूद केल्यानुसार गृहनिर्माण विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी महालेखाकार यांच्या समवेत बैठक घेवून कार्यवाही करणे अपेक्षित होते तसे न केल्यामुळे शासनाच्या हिश्याचा महसूल वसूल न झाल्याबाबतचा आक्षेप महालेखाकार यांच्या अहवालात नमूद केला आहे. महालेखाकारांचे परिच्छेद, लेखापरीक्षण व लेख्यांचे काम पाहण्याची जबाबदारी संबंधित विभागाचे उप सचिव, अवर सचिव यांची आहे तसेच गृहनिर्माण विभागामध्ये वित्तीय सल्लागार हे पद निर्माण केलेले नाही. ही बाब गृहनिर्माण विभागाच्या आर्थिक लेखे व्यवस्थितपणे ठेवण्याचे दृष्टीने **निश्चितच चांगली नाही. सध्या प्रत्येक मंत्रालयीन विभागाने आपपल्या विभागात आर्थिक बाबींच्या संदर्भातील कामे करण्यासाठी वित्तीय सल्लागाराचे पद निर्माण केले आहे. त्याच धर्तीवर गृहनिर्माण विभागाच्या अर्थिक बाबींवर लक्ष ठेवून त्यावेळी तपासण्यासाठी आर्थिक सल्लागारचे पद निर्माण करावे अशी समितीची शिफारस आहे.** ज्या वेळी समितीची बैठक लावली जाते, त्या वेळी केवळ ४ दिवस अगोदर या सर्व गोष्टींकडे पाहिले जाते. इतर वेळी वर्षानुर्षे या सर्व बाबींकडे कोणीही लक्ष देत नाही. गृहनिर्माण विभागामध्ये समन्वय असल्याचे समितीला दिसून येत नाही. गेल्या कित्येक महिन्यांपासून विभागाचे स्पष्टीकरण महालेखाकारांकडे पाठविलेले नाही. समितीच्या शिफारशींकडे लक्ष देण्यात येत नसल्यामुळे

शासनाच्या एकूण कार्यप्रणालीवर विपरित परिणाम होण्याची शक्यता आहे, असे समितीला वाटते. समितीने महालेखापाल यांच्या कार्यालयाने आयुक्त बृहन्मुंबई महानगर पालिका यांचेशी बैठक घेवून याप्रकरणी मार्ग काढावा असे सुचविले होते. **याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती अद्याप समितीला प्राप्त झालेली नसल्यामुळे याप्रकरणी समिती तीव्र नापसंती व्यक्त करते. उक्त प्रकरणी गृहनिर्माण विभागाचे जे अधिकारी आहेत त्यांची चौकशी करुन त्यांच्याविरुद्ध योग्य ती कारवाई करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

४.२७ शासनाच्या जमिनीवर होणारे अतिक्रमण यासंदर्भात **लोकलेखा समितीने आठव्या विधानसभेच्या कालावधीतील आपल्या २७ व्या अहवालात सन १९९४ मध्ये शासनाच्या जमिनीवर होणारे अतिक्रमण व त्यासंबंधी करावयाच्या उपाययोजना याबाबत शासनास शिफारस करुनही अद्यापपर्यंत त्यास्थितीमध्ये कोणताही बदल झाला नसून उलटपक्षी त्यामध्ये वाढ झालेली असून शासकीय जमीनीवर होणाऱ्या अतिक्रमणाकडे संबंधित खात्यातील शासकीय अधिकारी सोयीस्करपणे डोळेझाक करतात असे समितीचे स्पष्ट मत आहे. शासकीय जमिनीवर अनधिकृत अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तींना परावृत्त करण्यासाठी प्रतिबंधक उपाययोजना करण्याबाबत लोकलेखा समितीच्या सन १९९४ मधील सत्ताविसाव्या अहवालात सुचविण्यात आलेला आहेत. परंतु अद्यापही यात सुधारणा झालेल्या नाहीत. त्यामुळे शासकीय जमिनीवरील अतिक्रमण रोखण्यासाठी शासनाने कठोर उपाययोजना कराव्यात अशी समितीची पुन्हा आग्रहाची शिफारस आहे.**

४.२८ सन २००२ पर्यंत १,१३,२४२ फोटोपासधारक होते. तर हा आकडा बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सुमारे १,५८,७४६ असा दर्शविण्यात आलेला आहे. त्यामुळे प्रथमत: नेमके किती फोटोपासधारक आहेत हा आकडा निश्चित करणे आवश्यक आहे. म्हाडा व महाराष्ट्र शासनाच्या जागेवरील झोपडीधारकांची विगतवारी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून करणे आवश्यक आहे. त्या विगतवरीनुसार फोटोपासधारकांची संख्या निश्चित करणे शक्य होईल. मुंबई शहर, मुंबई पश्चिम उपनगर व मुंबई पूर्व उपनगर या तिन्ही विभागाच्या अप्पर जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या अधिपत्याखालील झोपडीधारकांची यादी बृहन्मुंबई महानगरपालिकेस एक महिन्यांच्या आत सादर करावी. त्यामुळे झोपडीधारकांच्या आकडेवारीमध्ये असलेली तफावत दूर करणे शक्य होईल. या निश्चित आकडेवारीच्या आधारे बृहन्मुंबई महानगरपालिकेने एकत्रित शुल्काची रक्कम झोपडीधारकांकडून वसूल करावी व ४० टक्के भुईभाड्याची रक्कम शासन/म्हडाकडे जमिनीच्या मालकीनुसार जमा करावी.

४.२९ बृहन्मुंबई महानगरपालिका व शासनाच्या सन १९७६ पासूनचा हिशोब बाकी आहे. सन १९७६ ते १९८२ पर्यंत झोपड्यांना सहाय्यक अनुदान देणे अपेक्षित होते. सुरुवातीला हा दर १८ रूपये ठरविण्यात आला होता. मात्र त्यनंतर झोपड्यांची संख्या वाढत गेली. बृहन्मुंबई महानगर पालिकेस शासनाकडून ७३ कोटी रूपये येणे अपेक्षित आहे. त्यापैकी शासनाने २२ कोटी रूपये दिले आहेत. उर्वरित ४८ कोटी रूपयांची रक्कम शासनाने द्यावयाची आहे. तसेच शासनाने सन २००३ मध्ये एक शासन निर्णय काढून १९ कोटी रूपये सोडून दिले आहेत. आता केवळ ७ कोटी रूपये देणे शिल्लक राहिलेले आहे. शासनाने व बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी एकत्र येऊन एकमेकांना देणे व येणे असलेली रक्कम व एक रक्कमी चुकता करून या संदर्भात कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे. याप्रकरणी २ महिन्यात कार्यवाही करण्याचे आश्वासन देवूनही अद्याप विभागाने यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबत समितीला अवगत केलेले नाही. त्याबद्दल समिती नापसंती व्यक्त करते सबब **समितीला सचिवांनी आश्वासित केल्याप्रमाणे विभागाकडून २ महिन्यात कार्यवाही होणे अपेक्षित होते. तथापि याबाबत अद्यापही दखल घेण्यात आलेली नसल्यामुळे उक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी तसेच याप्रकरणी जे अधिकारी व कर्मचारी जबाबदार आहेत त्यांची चौकशी करण्यात यावी व चौकशीत दोषी आढळून आलेल्या संबंधितांवर योग्य ती कारवाई करण्यात यावी व त्याबाबतची माहिती समितीला पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

महसूल व वन (महसूल) विभाग / उद्योग विभाग

खनिजाचे होत असलेले अवैध उत्खनन व वाहतूक.

५.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या महसुली जमा अहवालामधील परिच्छेद क्र. **६.२.९ "संनियंत्रण आणि अंतर्गत नियंत्रणाचा अभाव"** या संदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय व्यक्त केले.

५.२ शासनाच्या मे २००० मधील निर्देशानुसार संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म उपसंचालक आणि त्यांचे कनिष्ठ जिल्हा खनिकर्म अधिकारी यांना खाणीची मासिक तपासणी करण्याचे प्रमाणक विहित केले होते. याशिवाय, उपसंचालक आणि जिल्हा खनिकर्म अधिकारी यांना खाणींना दरमहा आकस्मिक भेटी देण्याचे प्रमाणक विहित केले होते.

- दिलेल्या निर्देशांनुसार संचालक, भूविज्ञान व खनिकर्म यांनी एका उपसंचालक कार्यालयास व एक जिल्हा खनिकर्म अधिकारी कार्यालयास भेट देणे आवश्यक होते. २०००-०१ ते २००४-०५ या कालावधीतील ६० उपसंचालक कार्यालये आणि ६० जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांच्या कार्यालयांची तपासणी करणे आवश्यक असताना देखील फक्त आठ उपसंचालक कार्यालयांची तपासणी केली गेली, तसेच कोणत्याही जिल्हा खनिकर्म अधिकारी कार्यालयाची तपासणी केली गेली नाही.
- उपसंचालकांनी त्यांच्या अखत्यारितील जिल्हा खनिकर्म अधिकारी कार्यालयांची दरमहा तपासणी करणे आवश्यक आहे. २०००-०१ ते २००४-०५ मधील काळात सहापैकी पाच उपसंचालकांनी करावयाच्या तपासण्या आणि केलेल्या तपासण्यांची स्थिती पुढीलप्रमाणे होती :-

अ.क्र.	उपसंचालकाचे नांव	जिल्हा खनिकर्म अधिकारी संख्या	करावयाच्या तपासण्या	केलेल्या तपासण्या	तपासण्यांच्या घटीची टक्केवारी
१.	औरंगाबाद	८	४८०	निरंक	१००
२.	चंद्रपूर	२	१२०	उ.नाही	--
३.	जळगांव	५	३००	१२	९६
४.	कोल्हापूर	१०	६००	निरंक	१००
५.	नागपूर	९	५४०	उ.नाही	--
उ.नाही - माहीती न सादर केल्याचे दर्शविते.					

तक्त्यावरुन असे दिसून येते की, जेव्हा उपसंचालक, औरंगाबाद आणि कोल्हापूर यांनी तपासणी केली नाही, तेव्हा उपसंचालक, जळगांव यांच्या बाबतीत ९६ टक्के घट झाली होती. उपसंचालक, चंद्रपूर आणि नागपूर यांनी तपासण्या केल्याचे तपशील सादर केले नाहीत.

जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांनी दरमहा खाणींच्या नियमित तपासण्या आणि १० आकस्मिक भेटी देणे आवश्यक होते. प्रमुख खनिजांच्या संदर्भात व्यवहार पहाणाऱ्या पाच जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्याच्या कार्यालयांच्या २०००-०१ ते २००४-०५ या वर्षातील तपासण्यांतील घट पुढील प्रमाणे होती :-

अ.क्र.	उपसंचालकाचे नांव	करावयाच्या तपासण्या	केलेल्या तपासण्या	तपासण्यांच्या घटीची टक्केवारी
१.	भंडारा	१२००	११९	९०
२.	चंद्रपूर	१२००	१९६	८४
३.	नागपूर	१२००	उ.नाही	--
४.	रत्नागिरी	१२००	निरंक	१००
५.	यवतमाळ	१२००	उ.नाही	--
उ.नाही- माहीती न सादर केल्याचे दशविते.				

जिल्हा खनिकर्म अधिकारी, भंडारा, चंद्रपूर आणि रत्नागिरी या कार्यालयांच्या तपासणीतील घटीची टक्केवारी ८४ ते १०० होती. जिल्हा खनिकर्म अधिकारी, नागपूर आणि यवतमाळ यांनी माहिती सादर केली नाही.

हे निदर्शनास आणून दिल्यावर, संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म यांनी ऑक्टोबर २००५ मध्ये मंजूर तांत्रिक पदांपैकी ३७ टक्के जागा रिकाम्या असल्याचे विदीत केले. म्हणून, शासनाने तपासण्यांकरिता ठरवून दिलेल उद्दीष्ट पूर्ण करता आले नाही.

शासनाने (ऑगस्ट २००६) संघटनात्मक संरचनेचा आढावा घेतल्यानंतर तपासण्याचे उद्दीष्ट पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले जातील असे सांगितले.

५.३ खाणींचे परिणामकारक पूर्वेक्षण, अवैध खाणकामावर नियंत्रण आणि महसुलाची गळती रोखण्यासाठी शासनाच्या ३ मे २००० च्या निर्णयाप्रमाणे जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांच्या कार्यालयात संयुक्त संचालक/उपसंचालकाच्या अधिपत्याखाली केंद्रीय भरारी पथक निर्माण करणे जरुरीचे होते. या पथकाने दरमहा एका उपसंचालकांचे, एका जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांचे कार्यालय आणि कमीत कमी १० खाणींचे अभिलेखे तपासणे आणि मासिक तपासणी अहवाल शासनाला सादर करणे गरजेचे होते. तसेच वरिष्ठ भूवैज्ञानिकाच्या अधिपत्याखाली असलेल्या जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांच्या कार्यालयांना आकस्मिक भेटी देण्यासाठी आणि सर्व खाणींबाबत स्वामित्वधन, मृतभाडे, भूपृष्ठ भाडे इत्यादीची आकारणी आणि वसुलीच्या परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी उपसंचालकाच्या कार्यालयात भरारी पथक

निर्माण करणे जरुरीचे होते आणि या भेटींचा मासिक अहवाल संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म, नागपूर यांना सादर करावयाचा होता.

संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म यांनी दिलेल्या माहितीनुसार सन २००३-२००४ पर्यंत भरारी पथक कार्यरत नव्हते. सन २००४-२००५ मध्ये १२ जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांच्या कार्यालयांपैकी नागपूर आणि भंडारा या दोन कार्यालयांची भरारी पथकाने तपासणी केली.

तांत्रिक कर्मचारीवर्गाची कमतरता असल्याने उपसंचालकांच्या कार्यालयात भरारी पथके तयार केली नाहीत. यावरुन राज्यातील खाणीविषयक कामकाजाबाबत पुरेशी दक्षता नसल्याचे दिसून येते.

शासनाने (ऑगस्ट २००६) मध्ये भरारी पथक तयार करण्याविषयी प्रामुख्याने विचार करण्यात आल्याचे सांगितले.

५.४ ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात विभागाने लेखी माहितीद्वारे स्पष्टीकरण ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा केला आहे.

अपुऱ्या मनुष्यबळाअभावी तपासण्या कमी झाल्या तथापि, लेखापरिक्षकांनी नमूद केलेल्या तपासण्यापेक्षा अधिक तपासण्या संचालनालय व त्यांच्या अधिनस्त कार्यालयामार्फत खाणकाम कार्यक्रम योजना, खनिज हाताळी परवाना तपासण्यासाठी सन २००४-०५ व २००५-०६ मध्ये करण्यात आल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे :-

कार्यालय	तपासण्याची संख्या
भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय नागपूर	३१
उपसंचालक चंद्रपूर, नागपूर, जळगाव	६३
उपसंचालक, कोल्हापूर	१५

तपासण्याची संख्या वाढविण्याबाबत संचालकांना सुचित करण्यात आले आहे.

अधिक नियंत्रणाच्या दृष्टीने खालील उपाययोजना करण्यात येत आहे.

(१) संचालनालयाच्या सुधारित आकृत्तीबंधास ७/४/२००७ रोजी मान्यता देण्यात आली आहे.

(२) क व ड वर्गातील सर्व रिक्त पदे भरण्यात आली आहेत.

(३) ३०/१२/२००९ पासून संचालनालयामार्फत खाणीची अचानक तपासणी करण्यासाठी दक्षतापथके निर्माण करण्यात आली आहेत.

(४) लोकसेवा आयोगामार्फत रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

अवैध उत्खनन रोखण्यासाठी परिवहन, वने, पोलिस व राज्य शासनाच्या इतर संबंधित विभाग व अभिकरणे यांची समिती नेमण्याचा प्रस्ताव राज्य शासनाच्या विचाराधीन आहे.

अवैध उत्खनन प्रतिबंध नियम खाण व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियमाच्या १९५७ च्या कलम २३ सी अंतर्गत यापूर्वीच राज्य शासनाने तयार केले आहे.

५.३. खाणी व खनिजे (विकास व विनियमन) अधिनियमातील तरतुदींनुसार, अवैध उत्खनन, वाहतूक आणि खनिजांची साठवणूक रोखण्यासाठी राज्य सरकारने नियम तयार केले आणि त्यासाठी नोंदवह्या आणि अभिलेखे ठेवण्याची गरज आहे. तथापि, असे निदर्शनास आले की, खाणींच्या आणि खाणपट्टयाच्या मापांची नोंद घेण्यासाठी कोणतेही अभिलेखे विहित करण्यात आले नव्हते.

आठ जिल्ह्यांतील अभिलेख्यांची चाचणी तपासणी केली असता असे आढळून आले की, खाणपट्टयाच्या निष्पादन कालावधीच्या आरंभापूर्वी आणि संपल्यानंतरची खाणपट्टया आणि खाणीची मापे अभिलेख्यात नोंदवली नव्हती. अशा मोजमापांच्या अभावी, उत्खनन केलेल्या सर्व खनिजांवर आणि निष्पादीत कालावधीत पट्टेधारकाने प्रदान केलेल्या स्वामित्वधनावर नियंत्रण ठेवणे शक्य झाले नाही.

५.६ ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात विभागाने लेखी माहितीद्वारे स्पष्टीकरण ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा केला आहे.

खाण व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियम १९५७ च्या कलम २३ सी अंतर्गत यापूर्वीच राज्य शासनाने अवैध उत्खनन प्रतिबंध नियम तयार केले आहेत व ते सन २००१ पासून अंमलात आहेत.

खाण व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियम १९५७ व खनिज सवलत नियम १९६० मधील रॉयल्टी आकारणे, खनिकर्म सुरु करणे यासंबंधीच्या तरतूदी पहाता तसेच प्रमुख खनिजाच्या खाणीचे विशिष्ट स्वरुप लक्षात घेता गौण खनिजाच्या खाणीमध्ये आवश्यक असते. त्याप्रकारे खाणकाम सुरु करण्यापूर्वी व खाणपट्टयाचा कालावधी संपल्यानंतर मोजमापे घेणे अपेक्षित नाही.

अ) खनिज सवलत नियम १९६० च्या नियम २२ (४) नुसार खाणपट्टयाचे निश्चित क्षेत्र मंजूरीचा निर्णय राज्य शासनाने घ्यावयाचा आहे.

ब) खनिज सवलत नियम १९६० च्या नियम २२(४) नुसार खाणपट्टा धारकाने खाणकाम सुरु करण्यापूर्वी खाणक्षेत्राचे सर्वेक्षण व सिमांकन भूमि अभिलेख विभागाकडून करुन घ्यावयाचे आहे.

क) खनिज सवलत नियम १९६० च्या नियम २२(४) नुसार खाणपट्टा धारकाने सक्षम प्राधिकाऱ्याकडून / केंद्र शासनाकडून मान्यता प्राप्त खाणकाम योजना सादर करावयाची आहे. यात खाणीचा विकास करणे व खाणपट्टा काळात पुढील प्रत्येकी ५ वर्षात किती खाणकाम केले जाईल याचा तपशील असतो.

ड) खनिजसाठा विखुरलेल्या स्वरुपात असल्यास खाणकाम एकसंध व एकसारखे नसल्याने मोजमापे घेणे योग्य नसतात.

ई) खाण व खनिजे (विकसन व विनियमन) अधिनियम १९५७ च्या कलम ९ अन्वये खाणपट्टा धारकाने खाणीतून हलविलेल्या किंवा स्ववापर केलेल्या खनिजासंदर्भात रॉयल्टी आकारायची आहे.

फ) प्रमुख खनिजाच्या खाणपट्टा धारकांस खाणीजवळ वजन काटा उपलब्ध करुन देणे आवश्यक असते जेणे करुन हलविलेल्या खनिजाचे परिमाण निश्चित करता येईल.

वरील बाबी लक्षात घेऊन राज्य शासनाने तयार केलेल्या नियमात खनिजाच्या वाहतूकीवर भर देण्यात आला आहे व खनिजाचा वापर, साठा आणि वाहतूक करणाऱ्यास खनिज हाताळणी परवाना घेणे बंधनकारक आहे.

गौण खनिजे हा विषय महसूल व वन विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील आहे.

५.७ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या महसुली जमा अहवालामधील परिच्छेद क्र. **६.२.१५ "स्वामित्वधनाची वसुली न करणे"** या संदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय व्यक्त केले.

महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन नियमानुसार, पट्टेधारक, खाणपट्टयाने दिलेल्या क्षेत्रातून काढण्यात आलेल्या अथवा उपयोगात आणलेल्या कोणत्याही गौण खनिजांवर शासनाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या दराने स्वामित्वधन प्रदान करण्यास पात्र आहे.

५.८ ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात विभागाने लेखी माहितीद्वारे स्पष्टीकरण ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा केला आहे.

या परिच्छेदामध्ये सर्वसाधारण स्वरुपाचे निष्कर्ष व्यक्त करण्यात आले असून त्यातील प्रलंबित प्रकरणांचा आढावा स्वतंत्रपणे त्याखालील परिच्छेदामध्ये घेण्यात आला आहे. त्यामुळे या परिच्छेदावर शासनाचे अभिप्राय देण्याची आवश्यकता नाही, अशी धारणा आहे. तरी हा खुलासा मान्य करण्याची विनंती आहे.

५.९ चार जिल्ह्यांतील ११६ पट्टेदारांनी सादर केलेल्या सहामाही विवरणपत्रांच्या छाननीवरुन असे आढळून आले की, विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे डिसेंबर २००० ते मार्च २००५ च्या काळात उत्खनन केलेल्या गौण खनिजांवर रु. ४.६९ कोटी स्वामित्वधन प्रदान करण्यास पट्टेदार पात्र होते. जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांनी विवरणपत्रांची छाननी करण्यात आणि मागणी करण्यात कसूर केली याचा परिणाम रु ४.६९ कोटीची वसुली न होण्यात झाला.

५.१० ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात विभागाने लेखी माहितीद्वारे स्पष्टीकरण ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा केला आहे.

भंडारा जिल्ह्यातील ११ खनिपट्टेधारकांकडून रक्कम रु.१,३२,०००/- वसूल करण्यात आली आहे.

चंद्रपूर जिल्ह्यात निरीक्षणाच्या वेळी ३२ प्रकरणात रुपये ६,५०,५००/- स्वामित्वधन वसूलीस पात्र असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले त्यापैकी रुपये ५,८८,५४४/- वसूल झालेले आहेत. उर्वरित रकमेच्या वसूलीची कार्यवाही सुरु आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील ३६ खनिपट्टाधारकाकडून विवरणपत्र भरुन घेतली आहेत. रुपये १,२२,२५७/- स्वामित्वधन वसूलीस पात्र असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले त्यापैकी रुपये ९३,५०१/- वसूल झालेले आहेत. ७ खनिपट्टाधारकाकडून उर्वरित रकमेच्या वसूलीची कार्यवाही सुरु आहे.

पुणे जिल्ह्यातील ३७ खनिपट्टाधारकाकडून विवरण पत्र भरुन घेतली आहेत. रुपये ४,६०,००,०००/- स्वामित्वधन वसूलीस पात्र असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले संपूर्ण रक्कम रुपये ४,६०,००,०००/- वसूल झालेले आहेत.

५.११ जिल्हा खनिकर्म अधिकारी, रत्नागिरी यांच्या अभिलेख्यांच्या चाचणी तपासणीत असे आढळून आले की, कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, चिपळूण यांनी विभागांतर्गत १५ कामे केली आणि २००१-०२ ते २००४-०५ मध्ये रु. ६.८३ कोटी स्वामित्वधनाचा अंतर्भाव असलेले २१.८९ लाख

ब्रास गौण खनिज वापरात आणले, परंतु निधीत तरतूद नसल्याने स्वामित्वधनाची अनामत रक्कम भरली नाही. तथापि, पाटबंधारे विभागाकडे जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्याने कोणत्याही प्रकारची मागणी केली

नाही, हे निदर्शनास आणून दिल्यानंतर, जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांनी सप्टेंबर २००५ ते मार्च २००६ मध्ये कसूरदारांना मागणीपत्रक पाठविण्याचे मान्य केले.

५.१२ ज्ञापन :

उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात विभागाने लेखी माहितीद्वारे स्पष्टीकरण ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा केला आहे.

सन २००५-०६ या वर्षीच्या महालेखापाल मुंबई यांजकडील मुळ लेखा परिक्षण परिच्देद क्र. २६ मधील १५ कामांची रक्कम रु. ७,५०,१८,८८७/- एवढी अपेक्षित करण्यात आली होती. तथापि कार्यकारी अभियंता ल.पा.चिपळूण यांनी दिनांक ०४/१०/२००७ अन्वये १२ शासकीय कामांच्या आकडेमोडीनुसार सुधारीत रक्कम रु.६,३८,५१,७६४/- येत असलेबाबत तसेच निधी प्राप्त होताच सदर निधी महसूल खात्याकडे वर्ग करणेत येत असलेबाबत कळविलेले आहे.

कार्यकारी अभियंता ल.पा.चिपळूण यांनी दि.२८.६.२०१० रोजी रक्कम रु.२४,१७,७५१/- व दि. २९.६.२०१० रोजी रक्कम रु.३६,७८,०५१/- भरणा केली आहे.

उर्वरित रकमेच्या वसूलीची कार्यवाही सुरु आहे.

साक्ष :

५.१३ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-२००६ च्या महसुली जमा अहवालातील परिच्छेद क्र.६.२.९ **"संनियंत्रण आणि अंतर्गत नियंत्रणाचा अभाव"** या संदर्भात अधिक माहिती घेण्याच्या दृष्टीने समितीने दिनांक दिनांक १८ ऑगस्ट, २०१० व दिनांक २८ सप्टेंबर, २०१० रोजी महसूल विभागाच्या व उद्योग विभागाच्या विभागीय सचिवांची व विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी प्रतिनिधींनी व सचिवांनी समितीस अशी माहिती दिली की, शासनाच्या मे २००० मधील निर्देशानुसार संचालक, भूविज्ञान व खनिकर्म यांनी एका उपसंचालक कार्यालयास व एक जिल्हा

खनिकर्म अधिकारी कार्यालयास महिन्यातून एकदा भेट देणे आवश्यक आहे. सन २०००-२००१ ते २००४-२००५ या कालावधीत ६० उपसंचालक कार्यालयाची तपासणी करणे आवश्यक असताना फक्त आठ उपसंचालक कार्यालयांची तपासणी केली. ६० जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांच्या कार्यालयांची

तपासणी करणे आवश्यक असताना कोणत्याही जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांच्या कार्यालयाची तपासणी केली नाही.

५.१४ उपसंचालकांनी त्यांच्या अखत्यारितील जिल्हा खनिकर्म अधिकारी कार्यालयांची दरमहा तपासणी करणे आवश्यक आहे. सन २०००-२००१ ते २००४-२००५ मधील काळात ६ पैकी ५ उपसंचालकांनी केलेल्या तपासण्यांची स्थिती पुढीलप्रमाणे आहे.

उपसंचालक	जिल्हा खनिकर्म अधिकारी संख्या	दरमहा १५ प्रमाणे ५ वर्षाच्या	करावयाच्या तपासण्या	केलेल्या तपासण्या	घटीची टक्केवारी
औरंगाबाद	८	६०	४८०	निरंक	१००
चंद्रपूर	२	६०	१२०	उ.नाही	--
जळगांव	५	६७	३००	१२	९६
कोल्हापूर	१०	६०	६००	निरंक	१००
नागपूर	९	६०	५४०	उ.नाही	--

५.१५ वरील तक्त्यावरुन असे निदर्शनास आले की, उपसंचालकांनी औरंगाबाद विभागाच्या ४८० तपासण्या करणे आवश्यक असताना एकही तपासणी केली नाही. तसेच कोल्हापूर विभागाच्या ६०० तपासण्या करणे आवश्यक होते. परंतु एकही तपासणी केली नाही. त्याचप्रमाणे चंद्रपूर व नागपूर विभागाने महालेखाकारांना तपशील सादर केला नाही. जळगांव विभागाने ३०० तपासण्या करणे आवश्यक असताना केवळ १२ तपासण्या केल्या आहेत. यावरुन खनिकर्म विभागातील मुख्यालयातच

उदासिनता असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे याबाबत तातडीने योग्य ती कार्यवाही होणे आवश्यक आहे असे समितीचे मत आहे.

५.१६ जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांनी दरमहा १० खाणीच्या नियमित तपासण्या व १० आकस्मिक भेटी देणे आवश्यक आहे. प्रमुख खनिजांच्या संदर्भात व्यवहार पहाणाऱ्या पाच जिल्हा खनिकर्म अधिकारी कार्यालयांच्या ५ वर्षाच्या कालावधीतील (२०००-२००१ ते २००४-२००५) तपासण्या :-

उपसंचालक	करावयाच्या तपासण्या	केलेल्या तपासण्या	घटीची टक्केवारी
भंडारा	१२००	११९	९०
चंद्रपूर	१२००	१९६	८४
नागपूर	१२००	उ.नाही	--
रत्नागिरी	१२००	निरंक	१००
यवतमाळ	१२००	उ.नाही	--

५.१७ वरील तक्ता पहाता असे निदर्शनास आले आहे की, भंडारा व चंद्रपूर जिल्ह्यात तपासण्या फारच कमी झाल्या असून रत्नागिरी जिल्ह्यात तपासण्याच केल्या नाहीत. नागपूर व यवतमाळ जिल्ह्यांनी महालेखाकारांना उत्तरच सादर केले नाही. यावरुन समितीने असा निष्कर्ष काढला की, खनिकर्म विभाग खाणी संदर्भात गंभीर नसल्याने कोणतीही कठोर पावले उचलली नाही.

५.१८ खनिकर्म संचालनालयाच्या अधिकाऱ्यांनी तपासणी केलेल्या खाणीबाबत सचिवांनी खुलासा केला की, खाणीच्या तपासणी अधिक प्रभावी करण्यासाठी डिसेंबर, २००९ मध्ये दक्षता पथके स्थापन करुन माहे जानेवारी २०१० ते जून २०१० अखेर पुढील प्रमाणे तपासण्या करण्यात आल्या आहेत.

१)	संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर कार्यालयाने १० खाणींची तपासणी केली व २८ हाताळणी परवाने दिले आहे.
२)	उपसंचालक, नागपूर कार्यालयाने १३ खाणींची तपासणी केली असून ३८ हाताळणी परवाने दिले आहे.
३)	वरिष्ठ उपसंचालक, चंद्रपूर कार्यालयाने ०४ खाणींची तपासणी केली आहे.
४)	वरिष्ठ उपसंचालक, औरंगाबाद कार्यालयाने फक्त ११ हाताळणी परवाने दिले आहे.

५)	वरिष्ठ उपसंचालक, कोल्हापूर कार्यालयाने ०२ खाणींची तपासणी केली आहे व केवळ १ हाताळणी परवाना दिला आहे.

अवैध उत्खनन रोखण्यासाठी परिवहन, वने, पोलिस व राज्य शासनाच्या इतर संबंधीत विभाग व अभिकरणे यांची समिती नेमण्याच्या प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे ? असे समितीने विचारले असता, विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, दिनांक २७.०७.२०१० रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली असून सदर शासन निर्णयात पुढील बाबी आहे.

५.१९ खनिजांचे अवैध उत्खननसंबंधी बाबींचा आढावा घेणे, उपाययोजना आखणे व अवैध उत्खनन प्रकरणी कार्यवाही करण्यासाठी सर्व संबंधित विभागांचे सहकार्य तत्परतेने मिळण्याच्या दृष्टीने तसेच समन्वय साधण्याच्या दृष्टीने राज्य स्तरीय व जिल्हा स्तरीय समित्या गठीत करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. राज्यस्तरीय समिती मध्ये पुढील प्रमाणे नियुक्ती करण्यात येते.

१)	मुख्य सचिव	अध्यक्ष
२)	प्रधान सचिव (खनिकर्म)	सदस्य
३)	सचिव (पर्यावरण)	सदस्य
४)	पोलीस महासंचालक, मुंबई	सदस्य
५)	परिवहन आयुक्त मुंबई	सदस्य
६)	प्रधान मुख्य वन संरक्षक महाराष्ट्र राज्य	सदस्य
७)	इंडियन ब्युरो ऑफ माईन्स नागपूर/गोवा यांचे प्रतिनिधी	सदस्य
८)	संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय महाराष्ट्र	सदस्य सचिव / निमंत्रक

<u>५.२० राज्य स्तरीय समितीच्या कार्यकक्षा पुढीलप्रमाणे आहेत :-</u>

१) संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय महाराष्ट्र यांनी गठीत केलेल्या राज्यस्तरीय / प्रादेशिक आणि जिल्हास्तरावरील दक्षता पथकांनी तसेच उपसंचालक भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय व वन अधिकाऱ्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात अवैध खाणकाम रोखण्यासाठी केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणे.

२) इंडियन ब्युरो ऑफ माईन्स तसेच अन्य प्राधिकरणाद्वारे निदर्शनास आलेल्या अवैध खाणकाम प्रकरणाबाबतचा आढावा घेणे, संनियंत्रण करणे व उपायायोजना आखणे.

३) संबंधित विभागाकडून अपेक्षित कार्यवाहीबाबत समन्वय व सुसूत्रता आणणे.

४) अवैध खाणकामाशी संबंधित राज्य / केंद्र शासनाने संदर्भित केलेल्या प्रकरणी कार्यवाहीचा आढावा घेणे.

५) केंद्र/राज्य शासनास सादर करावयाच्या शिफारशी आणि केलेल्या कार्यवाहीच्या माहितीस मान्यता देणे, या बाबींचा समावेश असेल व राज्यस्तरीय समितीची बैठक प्रत्येक चौमाहीत किमान एक वेळा घेण्यात येईल.

जिल्हास्तरीय समिती मध्ये पुढील प्रमाणे नियुक्ती करण्यात येते :-

१)	जिल्हाधिकारी	अध्यक्ष
२)	जिल्हा पोलीस अधीक्षक किंवा त्यांचे प्रतिनिधी	सदस्य
३)	संबंधित उपजिल्हाधिकारी	सदस्य
४)	जिल्हा परिवहन अधिकारी	सदस्य
५)	जिल्हा वन अधिकारी	सदस्य
६)	जिल्हा खनिकर्म अधिकारी	सदस्य सचिव

जिल्हास्तरीय समितीच्या कार्यकक्षा पुढीलप्रमाणे आहे :-

१) आपल्या कार्यक्षेत्रातील निदर्शनास आलेल्या अवैध खाणकाम प्रकरणी समन्वयाने कार्यवाही करणे.

२) अवैध खाणकाम रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे.

३) अवैध उत्खनन व वाहतूक याला आळा घालण्यासाठी अचानक तपासणी करणे.

४) अवैध खाणकाम प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहीती राज्यस्तरीय समितीस सादर करणे.

५) कार्यवाही करण्यात अडचणी आल्यास त्या राज्यस्तरीय समितीच्या निदर्शनास आणणे या बाबींचा समावेश असेल व जिल्हा स्तरीय समितीची बैठक दोन महिन्यातून किमान एकदा घेण्यात यावी.

अवैध उत्खनन वाहतूक व खनिजांची साठवणूक रोखण्यासाठी राज्य शासनाने नियम तयार केले आहेत, परंतु यासाठी नोंदवह्या व अभिलेखे ठेवण्याची गरज आहे किंवा नाही काय, अशी समितीने विचारणा केली असता, याबाबत विभागाने असा खुलासा केला की, प्रमुख खनिजांचे विनियमन केंद्र शासनाने विहित केलेल्या खनिज सवलत नियम १९६०, खनिज संवर्धन व विकास नियम १९८८ व राज्य शासनाने केलेले अवैध वाहतूक व साठवण नियम २००१ अन्वये केले जाते. या नियमानुसार विहीत केलेल्या नोंदवह्या व अभिलेख खाण मालक तसेच जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी ठेवणे बंधनकारक आहे. या विहीत केलेल्या नोंद वह्या व वार्षिक विवरणपत्रांचा नमुना दाखल तपशील असा आहे की, खनिज सवलत नियम १९६० नुसार जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी (१) पूर्वेक्षण अनुज्ञप्ती अर्ज नोंदवही. (२) पूर्वेक्षण अनुज्ञप्ती अर्ज नोंदवह्या. (३) पूर्व पहाणी अर्ज तसेच पूर्व पहाणी परवाना नोंदवही. (४) खनिपट्टा अर्ज व खाणपट्टा मंजूर नोंदवही अशा प्रकारे नोंदवह्या ठेवायच्या असतात.

खनिज संवर्धन व विकास नियम १९८८ नुसार खाण मालकांनी (१) कामगार उपस्थिती, (२) उत्पादन व वाहतूक नोंदवही, (३) स्फोटके वापर नोंदवही, (४) यंत्र सामुग्री नोंदवही अशा प्रकारे वार्षिक विवरणपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

अवैध उत्खनन व वाहतूक प्रतिबंध नियम २००१ नुसार (१) परवाना अर्ज तसेच मंजूरी वा नुतनीकरण नोंदवही, (२) साठा नोंदवही, (३) वाहतूक नोंदवही अशा नोंदवह्या विहीत केलेल्या आहेत.

खनिज हाताळणी परवाना देताना पट्टेधारकांवर नियंत्रण रहावे यादृष्टीने काय बंधने घालण्यात येतात ? असे समितीने विचारले असता, याबाबत विभागाने असे नमूद केले की, खनिज हाताळणी परवाना देण्यासंदर्भात अवैध उत्खनन व वाहतूक प्रतिबंध नियम २००१ या नियमातील नियम ७ नुसार परवानाधारकास (१) परवानाधारकाने प्राप्त केलेले, प्रक्रिया केलेल्या व वाहतूक केलेल्या खनिजाचा दैनंदिन हिशोब ठेवणे, (२) स्ववापरासाठी उपयोगात आणलेल्या खनिजाचा परिमाणाचा हिशोब ठेवणे, (३) गोदामातून अथवा कारखान्यातून खनिज वाहतूक करण्यापूर्वी संबंधित उपसंचालकांची परवानगी घेणे, (४) वाहतूकीसाठी विहीत पास घेणे, (५) संचालनालयाच्या प्राधिकृत अधिकाऱ्यास कोणत्याही वेळी साठा/गोदाम/वाहने तपासण्याची मुभा असेल, (६) नियमांच्या शर्ती व अटींचे उलंघन केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येते. पहिल्या वेळेस गुन्हा केल्यास रु. १०,०००/- दंड तसेच वारंवार गुन्हा केल्यास रु.२५,०००/- दंड व १ वर्षाची कारावयाची सजा अथवा दोन्ही शिक्षेची तरतूद आहे. या अटी बंधनकारक आहे.

५.२१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-२००६ च्या महसुली जमा अहवालातील परिच्छेद क्र.६.२.१५ **" स्वामित्वधनाची वसुली न करणे"** या संदर्भात अधिक माहिती घेण्याच्या दृष्टीने समितीने दिनांक ३० जून, २०१० रोजी गणपतीपुळे, जि.रत्नागिरी येथे विभागीय अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेतली. सदर बैठकीत विभागीय अधिकाऱ्यांनी समितीला माहिती देताना असे सांगितले की, रत्नागिरी जिल्ह्यात काळ्या दगडांच्या केवळ ११ खाणी आहेत. जांभा दगड घरे बांधण्यासाठी उपयोगी पडतो. यासंदर्भातील परवानगी देण्याचे अधिकार १०० ब्रासपर्यंत तहसीलदार, १००० ब्रासपर्यंत उपविभागीय अधिकारी आणि १०००० ब्रासपर्यंत जिल्हाधिकारी यांना आहेत. एखाद्या विशिष्ट बाबींमध्ये २५००० ब्रासपर्यंतची परवानगी जिल्हाधिकारी देऊ शकतात. खाणीची परवानगी दिल्यानंतर मोजमाप घेणे व नियंत्रण ठेवण्याचे काम सर्कल कार्यालयाकडून केले जाते. उत्खननासाठी जी मुदत दिली असेल ती संपल्यानंतर परवानगीच्या नुतनीकरणासाठी जेव्हा प्रकरण सादर करण्यात येते त्यावेळी पुन्हा मोजमापे घेण्यात येतात. या जिल्ह्यात १ खनिकर्म अधिकारी व १ इन्स्पेक्टर अशी पदे आहेत. खनिकर्म विभागास अधिकारी, कर्मचारी वर्ग अतिशय अुपरा आहे.

५.२२ त्यावर समितीने अशी विचारणा केली की, सदर अधिकारी कोणत्या विभागाचे आहेत ? त्यावर विभागीय अधिकाऱ्यांनी असे उत्तर दिले की, भूवैज्ञानिक आणि जिल्हा खनिकर्म अधिकारी हे

उद्योग विभागाचे असतात. इतर सर्व कर्मचारी महसूल व वन विभागामार्फत देण्यात येतात. वाहनांची योग्य व्यवस्था नसल्यामुळे अडचणी येतात. वाहने उपलब्ध करुन दिली तर ही कामे अधिक प्रभावीपणे होऊ शकतील

५.२३ स्वामीत्वधनाची रक्कम कशी ठरविण्यात येते ? असे समितीने विचारले असता, विभागीय अधिकाऱ्यांने उत्तर दिले की, शासनाच्या दि.१२/९/२०००, दि. १४/१०/२००४ व दि. १३/८/२००९ रोजीच्या परिपत्रकानुसार स्वामीत्वधन निश्चित करण्यात येते.

५.२४ त्यावर पुन्हा समितीने स्वामित्वाचे दर निश्चित करण्याची कार्यपध्दती काय आहे. अशी विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी असा खुलासा केला की, रत्नागिरी जिल्ह्यात गौण, जांभा, चिरा, प्रमुख खनिज यांचे २००३ मध्ये स्वामित्वधनाचे दर महसूल व वन विभाग यांजकडील अधिसुचना क्रमांक गौखनि १०/२००१/प्र.क्र.२४/ख दिनांक १५/०१/२००३ रोजी असे आहेत की, (१) बांधकाम साहित्य म्हणून वापरण्यात येणारा चुना तयार करण्यासाठी भट्टीमध्ये वापरण्यात येणारी चुनखडी व शिंपल्यापासून केलेला चुना : ५०/- रुपये, (२) उत्खननाद्वारे किंवा गोळा करुन काढलेले सर्व दगड मग त्यांच्या आकार केवढाही आणि दगडाची भुकटी : ५०/- रुपये, (३) उत्खननाद्वारे काढलेला किंवा गोळा केलेले गोटे, बारीक खडी, मुरुम, कंकर: प्रतिब्रास ५०/- रुपये, (४) वाळु : प्रतिब्रास ५०/- रुपये, (५) अंतर्गत बंधारे, रस्ते, लोहमार्ग, व इमारती यांचे बांधकाम करताना भरणा करण्यासाठी/भुपृष्ठ समपातळीत करण्यासाठी वापरण्यात येणारी साधी माती : प्रतिब्रास ५०/- रुपये, (६) बांधकाम साहित्य म्हणून वापरण्यात येते त्यावेळी पाटीचा दगड किंवा नरम दगड : प्रतिब्रास ५०/- रुपये, (७) विटा तयार करण्याच्या व इतर प्रयोजनासाठी वापरण्यात येणारी साधी माती, गाळ व सर्व प्रकारची चिकणमाती इत्यादी प्रतिब्रास २०/- रुपये प्रमाणे दर आकारण्यात येतो.

५.२५ जांभा चिरा या गौण खनिजाचे दर महसूल व वन विभाग यांजकडील अधिसुचना क्रमांक गौखनि १०/२००३/प्र.क्र.४३/ख दिनांक १६/०१/२००४ अन्वये जांभा चिरा स्वामित्वधनाचा दर रुपये ३५/- असा निश्चित करणेत आलेला आहे.

५.२६ गौण खनिजाचे दर महसूल व वन विभाग यांजकडील अधिसुचना क्रमांक गौखनि १०/०२६०/प्र.क्र.५७/ख दिनांक १५/१२/२००६ रोजी खालीलप्रमाणे होते.

(१) बांधकाम साहित्य म्हणून वापरण्यात येणारा चुना तयार करण्यासाठी भट्टीमध्ये वापरण्यात येणारी चुनखडी व शिंपल्यापासून केलेला चुना : १००/- रुपये, (२) उत्खननाद्वारे किंवा गोळा करुन काढलेले सर्व दगड मग त्यांच्या आकार केवढाही आणि दगडाची भुकटी : १००/- रुपये, (३)

उत्खननाद्वारे काढलेला किंवा गोळा केलेले गोटे, बारीक खडी, मुरुम, कंकर : प्रतिब्रास १००/- रुपये, (४) वाळु : प्रतिब्रास १००/- रुपये, (५) अंतर्गत बंधारे, रस्ते, लोहमार्ग, व इमारती यांचे बांधकाम करताना भरणा करण्यासाठी/भुपृष्ठ समपातळीत करण्यासाठी वापरण्यात येणारी साधी माती : प्रतिब्रास १००/- रुपये, (६) बांधकाम साहित्य म्हणून वापरण्यात येते त्यावेळी पाटीचा दगड किंवा नरम दगड : प्रतिब्रास १००/- रुपये, (७) विटा तयार करण्याच्या व इतर प्रयोजनासाठी वापरण्यात येणारी साधी माती, गाळ व सर्व प्रकारची चिकणमाती इत्यादी प्रतिब्रास ४०/- रुपये प्रमाणे दर आकारण्यात येतो.

५.२७ जांभा चिरा या गौण खनिजाचे दर महसूल व वन विभाग यांजकडील अधिसुचना क्रमांक गौखनि १०/०२०७/प्र.क्र.३७/ख दिनांक ०४/०८/२००८ रोजी जांभा चिरा स्वामित्वधनाचा दर रुपये ५०/- असा निश्चित करणेत आलेला आहे.

५.२८ गौण खनिजाचे दर महसूल व वन विभाग यांजकडील अधिसुचना क्रमांक गौखनि १०/१००९/प्र.क्र.३०९/ख (३) दिनांक ११/०२/२०१० रोजी खालीलप्रमाणे आहेत :-

(१) बांधकाम साहित्य म्हणून वापरण्यात येणारा चुना तयार करण्यासाठी भट्टीमध्ये वापरण्यात येणारी चुनखडी व शिंपल्यापासून केलेला चुना : २००/- रुपये, (२) उत्खननाद्वारे किंवा गोळा करुन काढलेले सर्व दगड मग त्यांच्या आकार केवढाही आणि दगडाची भुकटी : २००/- रुपये, (३) उत्खननाद्वारे काढलेला किंवा गोळा केलेले गोटे, बारीक खडी, मुरुम, कंकर : प्रतिब्रास २००/- रुपये, (४) वाळु : प्रतिब्रास २००/- रुपये, (५) अंतर्गत बंधारे, रस्ते, लोहमार्ग, व इमारती यांचे बांधकाम करताना भरणा करण्यासाठी/भुपृष्ठ समपातळीत करण्यासाठी वापरण्यात येणारी साधी माती : प्रतिब्रास २००/- रुपये, (६) बांधकाम साहित्य म्हणून वापरण्यात येते त्यावेळी पाटीचा दगड किंवा नरम दगड : प्रतिब्रास २००/- रुपये, (७) विटा तयार करण्याच्या व इतर प्रयोजनासाठी वापरण्यात येणारी साधी माती, गाळ व सर्व प्रकारची चिकणमाती इत्यादी प्रतिब्रास ८०/- रुपये प्रमाणे दर आहे. असे सचिवांनी समितीला सांगितले.

५.२९ याच संदर्भात या जिल्ह्याचे मागील ३ वर्षाचे अपेक्षित उत्पन्न किती आणि मिळालेले उत्पन्न किती ? अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधींनी असा खुलासा केला की, मागील वर्षी ३६.९८ कोटी रुपये एवढे उत्पन्न अपेक्षित धरण्यात आले होते. त्यापैकी २४.४० कोटी रुपये उत्पन्न मिळाले आहे व याची टक्केवारी ६५.९८ एवढी येते. मागील वर्षी न्यायालयाच्या आदेशान्वये उत्खनन १५ ऑक्टोबरपर्यंत बंद होते. न्यायालयाची परवानगी मिळाल्यानंतर फेब्रुवारीमध्ये ६ महिन्यांच्या कालावधीसाठी परवानगी देण्यात आली आहे. परिणामी उत्पन्न घटले आहे.

५.३० समितीने अशी विचारणा केली की, जिल्ह्यातील खाणींच्या संदर्भातील नोंदी नाही तर मग यासंदर्भातील उद्दिष्टे तुम्ही कशी ठरविली ? यावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, तालुकास्तरावर उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत परवाने दिले जातात. त्याप्रमाणे सगळया तालुक्यांचे इष्टांक निश्चित केलेले असतात.

५.३१ समितीने अशी विचारणा केली की, खनिज तपासणीसाठी भरारी पथके स्थापन करण्यात आली आहे का ? असल्यास, संपूर्ण जिल्ह्यात किती भरारी पथके आहेत व त्यांची कार्यपध्दती कशी आहे ? यावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, रत्नागिरी जिल्ह्यात प्रमुख आणि गौण खनिज असे दोन प्रकार आहेत. प्रमुख खनिजांमध्ये कोळसा, चुनखडी, बॉक्साईट, मॅगनीज, कच्चे लोखंड आणि गौण खनिजांमध्ये वाळू, दगड, मुरुम, साधी माती यांचा समावेश आहे. प्रमुख खनिजांसाठी सन २००९-२०१० या वर्षासाठी २०० लाख रुपयांचे उद्दीष्ट देण्यात आले आहे. त्यावर्षी २१९.२७ लाख रुपयांचे उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले आहे.

५.३२ भूविज्ञान व खनिकर्म संचालनालयामार्फत खनिज समन्वय आणि प्रशिक्षण यांचे काम करण्यात येते. खाणपट्टा मंजुरी, नुतनीकरण, खाणपट्टा रद्द करणे यासंदर्भात संचालनालय शासनाला सल्ला देण्याचे काम करते. तथापि, खाणपट्टा मंजूर करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांच्याकडे आहेत.

५.३३ समितीने त्यावर अशी विचारणा केली की, संचालनालयाचे अधिकारी सर्व खाणींना भेटी देऊन तपासणी करतात काय ? याबाबत विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, दिनांक ३०-१२-२००९ रोजीच्या पत्रान्वये महालेखापरीक्षक यांच्या लेखापरीच्छेदाबाबत शासनाने संचालनालयाला निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार राज्य स्तरावर भरारी पथके निर्माण करण्यात आली आहेत.

५.३४ राज्यात भरारी पथके निर्माण करण्यासाठी महालेखापरीक्षकांच्या सूचनांची संचालनालयाने वाट का बघितली ? समन्वयाचे काम संचालनालयाचे आहे. खाणी मधून खनिज काढावे किंवा नाही, काढावयाचे असेल तर किती काढण्यात यावे, काढण्यात आले असेल तर ते योग्य पध्दतीने व निश्चित केलेल्या मोजमापानुसार काढले आहे किंवा नाही, खनिज काढल्यामुळे पर्यावरणाची हानी होणार आहे का, या सर्व गोष्टींचा विचार करुन परवाने देण्याबाबतचा निर्णय घेत असतांना संचालयनालयाच्या सल्ल्याला फार मोठे महत्व आहे. त्यामुळे यापूर्वीच संचालनालयाने भरारी पथके स्थापन करण्याची आवश्यकता होती, असे आपल्याला वाटते का ? अशी विचारणा केली असता सचिवांनी खुलासा केला की, भरारी पथके स्थापन करण्याची कार्यवाही शासनाने स्वत:हून केलेली आहे. संचालक भुविज्ञान खनिकर्म संचालनालय महाराष्ट्र शासन नागपूर यांजकडील आदेश क्रमांक एलटीसी/९११/२००९/३९७९

दिनांक ३०/१२/२००९ अन्वये अवैध उत्खनन, वाहतुक व साठवणुक यावर प्रभावीपणे प्रतिबंध करण्यासाठी जिल्हास्तरावर भरारी पथक स्थापन करणेचे आदेश प्राप्त झालेला आहे. त्याअनुषंगाने उपसंचालक भुविज्ञान व खनिकर्म संचालनालय कोल्हापूर यांचकडील आदेश क्रमांक खप्र/७९/भाग-२/५४ दिनांक १४/०१/२०१० अन्वये उपसंचालक कार्यालयामार्फत भरारी पथकाची स्थापना करणेत आलेली आहे. व जिल्हाधिकारी कार्यालयाकडील आदेश क्रमांक खनिकर्म-२/दक्षता पथक/२०१० दिनांक २१/०१/२०१० अन्वये भरारी पथकाची स्थापना करणेत आलेली असून भरारी पथकामार्फत वेळोवेळी आकस्मिक तपासणी करण्यात येतात. त्याचप्रमाणे क्षेत्रिय महसुल अधिकारी/कर्मचारी उदा.उपविभागिय अधिकारी, तहसिलदार, मंडळ अधिकारी, तलाठी, यांना गौण खनिज अवैध उत्खननावर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

५.३५ सन २००९-२०१० या वर्षामध्ये भरारी पथकातील उक्त कर्मचारी यांनी दिनांक १२/०१/२०१० रोजी मौजे निरुळ ता.रत्नागिरी येथील स.नं./हि.नं.१३१/२४,१३३/५,१२१/३२,१२१/११,१३२/२,१२१/३५, या जमीनीतील ६ जांभा चिरा खाणीला भेटी दिल्या त्या परवानाधारकाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

(१) श्री.महादेव रामचंद्र आखाडे, रा.पावस ता.जि.रत्नागिरी

(२) श्री.दिपक गणपत लांजेकर, रा.पावस ता.जि. रत्नागिरी

(३) श्री.नारायण केरु जांभारकर, रा.पुर्णगड ता.जि.रत्नागिरी

(४) इमामसाब नबीसाब कोलार, रा.पावस ता.जि.रत्नागिरी

(५) फजल करीम सावकार, रा.पावस ता.जि.रत्नागिरी

(६) आत्माराम घारु पावसकर, रा.पुर्णगड ता.जि.रत्नागिरी

वर नमुद केलेल्या परवानाधारकाना उपविभागीय अधिकारी रत्नागिरी व तहसिलदार रत्नागिरी यांनी खाणकाम परवाना मंजूर केल्याचे निदर्शनास आले आहे. पहाणी अंती उक्त खाणीतुन मंजूर परिमाणापेक्षा जादा उत्खनन न झाल्याचे निदर्शनास आल्याने प्रकरणी संबंधीतांवर कारवाई करणेत आलेली नाही. तथापि खाणमालकांना खाणी भोवती दगडी कंपाऊंड करणेचा सुचना देणेत आलेल्या आहेत. दनांक १६/०१/२०१० रोजी मौजे ओरी माचिवलेवाडी धनावडीवाडी परीसरात स.नं./हि.नं.९/४६,२६५,२६०/२, गट नं. २६१/३ तसेच मौजे गट नं २०६९ गट नं.१९४० गट नं.१४४० अशा एकूण ८ जांभा चिरा खाणीला भेटी दिल्या त्या परवानाधारकाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१) श्री.योगेश गणपत झोरे, रा.कारवांचीवाडी ता.जि.रत्नागिरी

२) सौ.जयश्री प्रकाश जाधव

३) श्री.पांडुरंग गोपाळ किंजळे, रा.ओरी ता.जि.रत्नागिरी

४) श्री.अशोक गणपत गोवळकर

५) श्री.केशव राम रेवाळे

६) श्री.लक्ष्मण तानाजी रेवाळे

७) श्री.अतुल अनिल गोवळकर

८) श्री.रोहित अरविंद कोळवणकर

वर नमूद केलेल्या परवानाधारकांना उपविभागीय अधिकारी रत्नागिरी व तहसिलदार रत्नागिरी यांनी खाणकाम परवाना मंजूर केल्याचे निदर्शनास आले आहे. पहाणी अंती उक्त खाणीतुन मंजूर परिमाणापेक्षा जादा उत्खनन न झाल्याचे निदर्शनास आल्याने प्रकरणी संबंधीतावर कारवाई करणेत आलेली नाही. तथापि, खाणमालकांना खाणी भोवती दगडी कंपाऊंड करणेचा सुचना देणेत आलेल्या आहेत.

५.३६ दिनांक २०/०१/२०१० रोजी मौजे कोढे ता.चिपळुण येथे श्री.हनुमंत श्रीरंग चव्हाण व खेड तालुक्यातील मौजे साखरोली येथील श्री.जलाल महमंद ईसाक पोत्रिक ह्या काळादगड खाणपट्टयाची तपासणी केली असता सदरहू खाणपट्टाला जिल्हाधिकारी रत्नागिरी यांनी १० वर्ष मुदतीचा खाणपट्टा मंजूर करणेत आलेला आहे. त्यानुसार अवैध उत्खनन आढळून आलेले नाही. तथापि, खाणपट्टा धारकांना खाणीभोवती दगडी कंपाऊंड घालणेचे सुचना देणेत आलेल्या आहेत.

५.३७ दिनांक २४/०१/२०१० रोजी कोकण रेल्वे हद्दीतील मौजे उक्षी येथे अचानक तपासणी केली असता श्री.परशु पवार हे अनधिकृत काळा डबर उत्खनन करत असल्याचे आढळून आले आहे. श्री.पवार यांनी २१ ब्रास काळाडबर कोकण रेल्वे बोगद्यातून अवैध उचल करुन वाहतुक केल्याबद्दल त्यांना या कार्यालयाकडील दिनांक ०२/०२/२०१० आदेशाने रक्कम रु. १९३२०/- दंड आकारणेत येवून सदरहू दंडाची रक्कम दिनांक ०२/०२/२०१० रोजी सरकार जमा करणेत आलेली आहे.

५.३८ दिनांक ११/०३/२०१० रोजी जिल्हा खनिकर्म अधिकारी व खनिकर्म निरीक्षक व तहसिलदार गुहागर यांनी मौजे मोहल्लावाडी म्हसकरवाडी तर्फे साखरी त्रिशुल स.नं./हि.नं./गट नं ५४२ मध्ये मे.टिबलो कंपनी अवैध उत्खनन केल्याचे निदर्शनास आले. त्याबाबत तहसिलदार गुहागर यांचे समवेत दंडनीय कारवाई करणेचे निर्देश देणेत आलेले आहेत. त्यानुसार ४०९९ ब्रास अवैध गौण खनिज उत्खननाबद्दल तहसिलदार गुहागर यांजकडील आदेशाने रक्कम रु.१८२३२००/- दंड भरणेचे आदेश पारीत करणेत आलेले आहे. सदरहू रक्कम दिनांक ०५/०५/२०१० व २०/०७/२०१० रोजी जमा करणेत आलेली आहे.

तसेच दिनांक ०८/०४/२०१० रोजी जिल्हा खनिकर्म अधिकारी व खनिकर्म निरीक्षक यांनी मौजे करबुडे ता.रत्नागिरी येथील स.नं./हि.नं.१३१/९,१३१/२,१३१/१० येथे ३ खाणीची तपासणी केली त्या परवानाधारकाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

(१) श्री.वासुदेव माणका रामगडे

(२) श्री.बाबाजी रत्नु पाचकुडे

(३) सौ.शुभांगी शांताराम झोरे रा.येतोशी ता.जि.रत्नागिरी

वर नमूद केलेल्या परवानाधारकाना उपविभागीय अधिकारी रत्नागिरी व तहसिलदार रत्नागिरी यांनी खाणकाम परवाना मंजूर केल्याचे निदर्शनास आले आहे पहाणी अंती उक्त खाणीतून मंजूर परिमाणापेक्षा जादा उत्खनन न झाल्याचे निदर्शनास आल्याने प्रकरणी संबंधीतावर कारवाई करणेत आलेली नाही. तथापि, खाणमालकांना खाणी भोवती दगडी कंपाऊंड करणेचा सुचना देणेत आलेल्या आहेत.

५.३९ उपरोक्त नमूद भरारी पथका व्यतिरिक्त अवैध रेती वाळू उत्खननावर नियंत्रण ठेवणेकरीता तहसिलदार मंडणगड, चिपळूण, गुहागर, तहसिलदार खेड, यांचे अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे स्वतंत्र भरारी पथक नियुक्त करणेत आलेले आहेत.

(१) तहसिलदार

(२) बंदर निरीक्षक

(३) पोलीस उप निरीक्षक

(४) मंडळ अधिकारी

(५) संबंधित तलाठी

(६) खाडीलगत ग्रामपंचायत सरपंच

(७) खाडीलगत ग्रामपंचायत गांव तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष

तालुका स्तरावर गौण खनिज उत्खननास परवानगी दिली जाते. परवानगी देत असतांना वेगवेगळया विभागांकडून ना-हरकत प्रमाणपत्र संबंधितांना घ्यावे लागते. २००० ब्रास मुरुम काढण्याची परवानगी दिल्यानंतर त्या संपूर्ण काळात संबंधितांकडून परवानगी दिलेल्या ब्रासपेक्षा जास्त ब्रास मुरुम काढला जातो. जिल्हाधिकारी कार्यालयाचे कोणतेही निरिक्षण नसते. त्यामुळे शासनाचा महसूल बुडतो. मुळात उत्पन्न कमी मिळेल असे विभागाकडून गृहित धरण्यात येते व यासाठी यंत्रणा जबाबदार असते. या सर्व बाबीची यंत्रणांनी पाहणे आवश्यक आहेत. किती वाळू काढण्यास परवानगी दिली आहे आणि

किती वाळूचा उपसा होतो याचा विचार करावयास पाहिजे. यामध्ये मोठी तफावत असल्याचे आढळून येते. वाळूपासून शासनाला जर तीन हजार कोटी रुपये उत्पन्न मिळत असेल तर ते चार हजार पाचशे कोटीपर्यंत का जाऊ नये. शासनाला जास्त उत्पन्न मिळावे असा समितीचा हेतू आहे. परंतु दुर्दैवाने जिल्हा पातळीवर याकडे दुर्लक्ष केले जाते व उत्पन्न कमी दाखविले जाते. आपण सांगितले आहे की, १०९ टक्के उत्पन्न होते. हेच उत्पन्न २०० टक्के व्हावे असा आपला प्रयत्न असावयास पाहिजे. असे समितीने सचिवांच्या निदर्शनास आणून दिले. कारण खनिज हे राज्य शासनाला महसूल मिळवून देण्याचे हे एक मोठे साधन आहे. यासाठी तालुका पातळीवरील यंत्रणा सक्षम करावयास पाहिजेत. गाव व तालुका पातळीवरुन राज्य शासनाचे उत्पन्न वाढविणे आवश्यक आहे. ज्या जिल्ह्यात वाळू, दगड, चिरे खाणी आहेत त्या जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी याबाबत माहिती घेणे आवश्यक आहे असे समितीने मत व्यक्त करुन रत्नागिरी जिल्ह्यात ज्या खाणी आहेत त्यावर कशा प्रकारे नियंत्रण ठेवण्यात येत आहे अशी विचारणा केली असता त्यावर विभागीय प्रतिनिधींनी असा खुलासा केला की, शासनाचे उत्पन्न वाढवावयास पाहिजे. यासाठी तालुका स्तरावर यंत्रणा आहेत. शासकीय यंत्रणेने सक्षमपणे काम केले तर शासनाचे नक्कीच उत्पन्न वाढेल. प्रत्येक जिल्ह्यात यासाठी भरारी पथक नेमण्यात आले आहेत. या पथकामध्ये जिल्ह्यातील उप विभागीय अधिकारी व तहसीलदार हे प्रमुख आहेत. त्याचप्रमाणे या पथकामध्ये रॉयल्टी निरिक्षक व अव्वल करकून आहेत. जिल्हाधिकारी स्तरावर हे भरारी पथक नियुक्त करण्यात आले असून प्रत्येक जिल्ह्यासाठी एक भरारी पथक नियुक्त करण्यात आले आहे. सर्वच भरारी पथकांकडे गाडया देण्यात आल्या आहेत.

५.४० समितीने पुन्हा अशी विचारणा केली की, भरारी पथकाकडून ज्या धाडी घालण्यात येतात त्यावेळी जे नियमबाह्य काम करतांना आढळतात त्यांच्याकडून दंड वसूल करण्यात येतो काय ? त्याचप्रमाणे एका ट्रकमधून किती ब्रास वाळू वाहून नेण्यात येते. त्यावर विभागीय प्रतिनिधींनी असा खुलासा केला की, नियमाबाह्य काम करणाऱ्यांकडून दंड आकारण्यात येतो. एका ट्रकमधून चार ब्रास वाळू वाहून नेली जाते.

५.४१ कोकणात विशेषत: रत्नागिरी जिल्ह्यात वाळू, चिरे, दगड, सिलीका वाळू, बॉक्साईट यासारखे खनिज मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे यांच्यावर नियंत्रण ठेवण्याचे काम भरारी पथक करीत नाही. चिरे दगडाची स्वामित्वधन जास्त आहे. ती परवडत नाही अशी परिस्थिती आहे. यासंदर्भात चार विभाग निर्माण करण्यात आले आहेत. खनिजाच्या स्वामित्वधनाचे उत्पन्न कोकणात जास्त प्रमाणात मिळते. परंतु कोकणातील सर्व उत्पन्न नागपूर या मुख्य कार्यालयात जमा करण्यात येते. त्यातून फक्त

१० टक्के रक्कम संबंधित विभागातील मुलभूत सोई सुविधा करण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येते. ही रक्कम अपूर्ण असल्यामुळे या टक्केवारीत वाढ करण्याची आवश्यकता आहे. त्यावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, जी स्वामित्वधन जमा होते त्याच्या १० टक्के रक्कम खर्च करण्याचे बंधन आहे. त्याप्रमाणे १० टक्के रक्कम खर्च करण्यात येते.

५.४२ स्वामित्वधनाचा संपूर्ण निधी नागपूर येथे जमा होता. तेथून त्याचे वाटप होते. १० टक्के निधी देण्याचा नियम संपूर्ण राज्यासाठी आहे त्यामुळे त्याच जिल्ह्यासाठी जी मागणी आहे. त्याचा समितीमध्ये योग्य तो विचार करण्यात यावा. एकंदरीत उत्पन्न गृहित धरुन या रकमेचे वाटप करण्यात येते. याबाबत विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, जिल्हा स्तरावर भरारी पथके आहेत. त्याचप्रमाणे प्रत्येक कार्यालयात दक्षता पथक निर्माण करण्यात आले आहेत. त्या पथकात वरिष्ठ भूवैज्ञानिक कार्यप्रमुख असतात. प्रकल्प प्रमुख म्हणून उप भूवैज्ञानिक काम पाहत आहेत. या पथकात कनिष्ठ भूवैज्ञानिक सदस्य म्हणून आहेत. खनिकर्म निरीक्षक, वरिष्ठ लिपिक व सहाय्यक आहेत. अशाप्रकारे एकूण चार विभागीय कार्यालयात चार दक्षता पथके निर्माण करण्यात आलेली आहे. औरंगाबाद, नागपूर, चंद्रपूर आणि कोल्हापूर असे चार विभाग आहेत. राज्य स्तरावरील पथकात संचालक, उप संचालक, वरिष्ठ भूवैज्ञानिक, कनिष्ठ निरिक्षक, वरिष्ठ लिपिक किंवा सहाय्यक असतात. दिनांक ३०-१२-२००९ रोजी सहाय्यकाचे पद निर्माण करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे. वन विभागाचा समावेश व्हावा असा प्रस्ताव सादर केलेला आहे. दिनांक ३०-१२-२००९ नंतर शासनाकडे तीन वेळा अहवाल दिलेला आहे.

५.४३ आतापर्यंत राज्यात १४ वेळा निरिक्षण करण्यात आले. त्यामध्ये तीन मायनिंग व ९ डिलर परमीट, दोन वाहने पकडण्यात आली आहेत. काही ठिकाणी प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यात आलेले आहेत. रत्नागिरी जिल्ह्यात दोन प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यात आलेले आहेत.

खाणपट्टयाच्या संदर्भात खेड तालुक्यात सुरु असलेल्या कामाबाबत समितीने अशी माहिती दिली की, खेड येथील एका खाणपट्टा मालकाला तहसिलदार यांनी ८ लक्ष रुपयांचा दंड लावला असल्याचे समितीच्या निदर्शनास आले असून या संदर्भात चौकशी करून या प्रकरणी संबंधीतांविरुध्द कारवाई करण्यात आली.

५.४४ महसूल विभागाने गौण खनिजाच्या उत्खननामध्ये असलेल्या अनियमितता शोधून काढण्यासाठी, अचानक तपासणी करण्यासाठी भरारी पथकाची स्थापना केली आहे का ?

५.४५ खाणपट्टयांच्या संदर्भात अनेक अनियमितता घडत असतात मात्र स्थानिक अधिकाऱ्यांना हाताशी धरुन सर्व अनियमितता दडपल्या जातात. अनेक वेळा खाणपट्टयांवर काम करणाऱ्या कंत्राटदारांच्या माणसाला पकडले जाते व नंतर सोडून देण्यात येते. समितीने असे सुचित केले की, खाणपट्टा मालकाविरुध्द प्रथम खबरी अहवाल दाखल केला पाहिजे. त्याचप्रमाणे त्यांना काळ्या यादीत टाकले पाहिजे. अशाप्रकारची कारवाई विभागाने केली आहे काय अशी विचारणा केली असता ? त्यावर विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, दोन दिवसांपूर्वी परवानाधारकांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आयुक्त कार्यालयाकडून लिलावाची प्रक्रिया पूर्ण होते. त्यामुळे संबंधित परवानाधारकाला काळ्या यादीत टाकण्याची शिफारस जिल्हा कार्यालयाने आयुक्त कार्यालयाला केली आहे.

५.४६ समितीसमोर साक्ष देण्यासाठी निवासी उपजिल्हाधिकारी उपस्थित आहेत. त्यांनी भरारी पथकांच्या अहवालाची व त्यांनी प्रथम खबरी अहवाल दाखल केल्याची माहिती उपलब्ध करुन द्यावी व याबाबत उपजिल्हाधिकारी यांनी आढावा घेतला आहे का ? तसेच या भेटीमध्ये किती अनियमितता भरारी पथकाच्या निदर्शनास आल्या आहेत ? अशी समितीने विचारणा केली असता खुलासा केला की, गेल्या ६ महिन्यामध्ये भरारी पथकाने २१ ठिकाणी भेटी दिलेल्या आहेत असे नमूद केले आहे याबाबत खुलासा करावा असे संबंधतांना सांगितले असता जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्याने असा खुलासा केला की, गेल्या दहा महिन्यात २१ भेटी दिलेल्या आहेत. त्यासंदर्भातील सविस्तर माहिती अशी आहे की, रत्नागिरी जिल्ह्यातील भरारी पथकामार्फत व महसूल अधिकारी/कर्मचारी यांचे मार्फत अचानक वाळु उत्खनन तपासणी केली असता सन २००९-२०१० या वर्षात रत्नागिरी जिल्ह्यामध्ये अवैध वाळु उत्खनन करणाऱ्या किंवा नियमभंग करणाऱ्या १४१ व्यक्तींवर व एका संस्थे विरुध्द २१ गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत व सन २०१०-२०११ मध्ये एका संस्थे विरुध्द २ गुन्हे दाखल करण्यात आलेली आहेत. असे एकूण २३ गुन्हे रत्नागिरी जिल्ह्यामध्ये दाखल करण्यात आलेले आहेत. त्यांचा तपशिल विवरण पत्र - ५ मध्ये दिलेला आहे.

५.४७ अवैध उत्खनन करणाऱ्या व्यक्तींविरुध्द गुन्हा दाखल केलेल्या कार्यालयाचा प्रकरण निहाय तपशिल सन २००९-२०१०

अ.क्र.	कार्यालयाचे नाव	प्रकरणाची संख्या
१	तहसिलदार मंडणगड	६
२.	तहसिलदार खेड	२
३.	तहसिलदार दापोली	२
४.	तहसिलदार चिपळुण	५
५.	तहसिलदार राजापूर	१
६.	तहसिलदार रत्नागिरी	५

		२१

सन २०१० ते २०११ (माहे जून २०१० अखेर)

अ.क्र.	कार्यालयाचे नाव	प्रकरणाची संख्या
१	तहसिलदार मंडणगड	२
२	एकूण	२

उपरोक्त नमुद गुन्हाचा प्रकरण निहाय विस्तृत तपशिल यासोबत संलग्न करण्यात आलेला आहे. तसेच एका ठिकाणी भेट दिली तेथे तीस हजार रुपये दंड केलेला आहे.

५.४८ सन २००४-२००५ मध्ये कोणते अधिकारी कार्यरत होते. त्यांना या बैठकीला बोलावयास पाहिजे होते. ते अधिकारी जरी या जिल्ह्यातून बदलून गेले असतील तरी त्यांना बोलाविण्याचा अधिकारी समितीला आहे. आता आपण गेल्या पाच वर्षांची माहिती घेत आहोत. खनिकर्म विभागामार्फत रत्नागिरी जिल्ह्याची तालुकानिहाय माहिती देण्यात यावी त्यानुसार तालुका निहाय किती स्वामित्वधन मिळते. किती वसुल झाली किती वसूल व्हावयाची बाकी आहे याची माहिती समितीला देण्यात यावी. श्री.भोगे यांनी १० महिन्यांत २१ ठिकाणी भेटी दिल्या त्याबद्दल समिती त्यांचे अभिनंदन करते. परंतु गेल्या पाच वर्षात खनिकर्म विभागाकडून कोणाला परवानग्या दिल्या, कोणत्या खाणीसाठी परवानगी दिली, त्यांची स्वामित्वधन किती आहे. याबाबत विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, मागील कार्यकालातील जिल्हा खनिकर्म अधिकारी व त्यांची नावे तसेच त्यांचा कार्यकाळ समितीला देण्यात यावा. याबाबत विभागीय प्रतिनिधीनी पुढीलप्रमाणे समितीला माहिती दिली.

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नाव	कार्यकाळ
१.	श्री.एस.एस.बुगटे	०१/०८/२००१ ते ०३/११/२००४
२.	श्री.व्हि.बी.साळवे	०४/११/२००४ ते १३/०७/२००९
३.	श्री.ए.एस.भोगे	१४/०७/२००९ ते आजतागायत

तसेच रत्नागिरी जिल्ह्यामध्ये २००५-२००६ ते २०१०-२०११ माहे जून, २०१० पर्यंत मंजूर केलेल्या परवाने, खाणपट्टे तसेच वाळू लिलावापासून उत्खननाचा तपशिल विवरणपत्र ६ मध्ये देण्यात आलेला आहे.

५.४९ रत्नागिरी जिल्ह्यामध्ये गौण खनिज खनिपट्टाद्वारे झालेल्या उत्खननाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

वर्ष	खनिपट्टाची संख्या	क्षेत्रफळ	उत्खनन	स्वामित्वधन
२००५-२००६	१०	२३-०९-००	१९९५०	९४७५००
२००६-२००७	११	२५-२२-००	३०७१३	१७९३६५०

२००७-२००८	११	२५-२२-००	२३७५०	२४०००००
२००८-२००९	१२	२८-०४-७०	१९०००	१९२०७००
२००९-२०१०	११	२८-०४-७०	१९८३१	२३०८१०
२०१०-२०११	११	२८-२४-७०	६८००	१३७८२५०
		एकूण	१२००४४	८६७०९१०

सन २००५-२००६ पासून वाळू लिलाव यासंदर्भातील लिलाव झालेल्या गटाची संख्या एकुण ब्रास, व प्राप्त झालेला महसुलाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. :-

	नदीपात्र			खाडीपात्र			एकुण		
वर्ष	गट	ब्रास	प्राप्त रक्कम	गट	ब्रास	प्राप्त रक्कम	गट	ब्रास	प्राप्त रक्कम
२००५-२००६	१९	२६६१	४२३३००	२२	१९९५१५	६६८८६२२७८	४१	२०२१७६	६६९२८५५७८
२००६-२००७	२७	३५०२	८९९६८२	१७	२४९०१८	१०७५६३३४०	४४	२५२५२०	१०८४६३०२२
२००७-२००८	४२	५९०८	२०६०९८७	१५	१४५०८६	६८७४५९६०	५७	१५०९९४	७०८०६९४७
२००८-२००९	२७	२२०६	६९३०७६२	६	६०३०	६०२१९५	३३	८२३६	७५३२९५७
२००९-२०१०	३३	३५०३	११८५१११	११	७४२१०	६३६१६९५४	४४	७७७१३	६४८०२०६५
२०१०-२०११	अद्याप वाळू लिलाव झालेले नाही.								

रत्नागिरी/रायगड जिल्ह्यातील बाणकोट खाडी/सावित्री नदी पात्रातील संयुक्त रेती गटातून गट ड-२ कुडगांव ते पेवे चार्टे क्रमांक ९२०/०७ व पेवे ते आंबेत गट २ ई चार्ट क्रमांक ९२१/०७ या रेती गटातून दिलेल्या लिलाव/परवानापध्दतीचा तपशिल :

वर्ष	मंजूर ब्रास	रत्नागिरी जिल्ह्यास प्राप्त स्वामित्वधन	शेरा
२००५-२००६	---	१३,१६,५५,६००/-	लिलावाद्वारे
२००६-२००७	लिलाव झालेला नाही.		
२००७-२००८	---	१३,२७,६७,६००/-	लिलावाद्वारे
२००८-२००९	८३,०००	२,८६,३५,०००/-	परवान्याद्वारे
२००९-२०१०	१८५,०००	८,५५००००००/-	लिलावाद्वारे

५.५० याच अनुषंगाने अधिक माहिती घेण्यासाठी समितीने अशी विचारणा केली की, काही वर्षापूर्वी आंबेत खाडीतील रेती उपसा करण्यासाठी ७६ लाख व १ कोटी रुपये एवढीच बोली लावली जात होती. आता ३६ कोटी रुपयांची बोली लागली आहे. याचा अर्थ, पूर्वी संगनमताने बोली कमी लावली जात होती. आता देखील जी बोली लावली जाते ती अंडरकोट आहे. यापेक्षा जास्त महसूल शासनाला मिळाला पाहिजे आणि तो मिळू शकतो. आंबेत खाडीमध्ये जे उत्खनन करण्यात येते त्यामुळे आंबेत खाडीवरील पुलाला धोका निर्माण झाला आहे. भूवैज्ञानिक यांचेकडून यासंदर्भातील सल्ला शासनाने मागितला असेल, अशी आमची अपेक्षा आहे. त्यांना हा धोका लक्षात आला का ? याबाबतची जाणीव भूवैज्ञानिक यांनी शासनाला करुन दिलेली आहे का ? याबाबत नियमानुसार जिल्हाधिकारी यांना अधिकार आहेत. खनिकर्म अधिकारी त्यासंदर्भातील मार्गदर्शन करतात. भूविज्ञान व खनिकर्म

संचालनालयाकडून या जागेची पहाणी करण्यात आलेली आहे का ? सर्वेक्षण करुन अहवाल देण्यात आला आहे का ? त्यावर विभागीय प्रतिनिधींनी अशी माहिती दिली की, रायगड व रत्नागिरी जिल्ह्याला जोडणारा हा पूल रत्नागिरी जिल्ह्यातील म्हाप्रळ व रायगड जिल्ह्यातील आंबेत दरम्यान असून हा सावित्री नदी/बाणकोट खाडीवर आहे.

५.५१ सावित्री नदी/बाणकोट खाडीमध्ये ड्रेझर्स तथा हातपाटीद्वारे वाळु उत्खनन केले जाते. वाळु रेती उत्खननास लिलावाद्वारे किंवा परवाना पध्दतीने अनुमती दिली जाते. महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड मुंबई यांजकडील नाहरकत दाखला प्राप्त करुन परवाना किंवा लिलावासंबंधी पुढील कार्यवाही करणेत येते.

५.५२ वाळु/रेतीचे लिलाव शासनाच्या महसूल व वन विभागाच्या वाळु/रेती निर्गती धोरणानुसार केली जाते. सदर धोरणाच्या कलम ३ (१३) मध्ये असे नमुद आहे की, कोणत्याही रेल्वेच्या पुलाच्या बाजूने ६०० मीटर (२०००) फुट अंतराच्या आत ड्रेझर्सद्वारे रेतीचे उत्खनन करता येणार नाही. तसेच रस्त्यावरील पुलाची कोणत्याही बाजूने १०० मीटर्स पर्यंत रेती/वाळुचे उत्खनन करता येणार नाही.

५.५३ रायगड/रत्नागिरी जिल्ह्यातील सावित्री नदी/बाणकोट खाडी संयुक्त गट क्रमांक २ मध्ये ड्रेझर्सद्वारे उत्खननास परवानगी दिल्या जाते. सदरचा गट पुलापासून सुमारे ८०० ते ९०० मीटर अंतरावर आहे. त्याचप्रमाणे हातपाटीद्वारे - अ) मौजे म्हप्रळ रायगड/रत्नागिरी जिल्ह्यातील सावित्री नदी/बाणकोट खाडी या संयुक्त रेती गटातील विचारेंवाडी ते दासगांव (११ कि.मी.) व तोराडी ते कुडगांव (४.५ कि.मी.) या दोन रेती गटातून हातपाटीने (डुबीने) रेतीची निर्गती परवाना पध्दतीने करण्याबाबत शासन महसूल व वन विभागाकडील पत्र क्र.गौखनि/२९/०२०९/प्र.क्र.४४/ख, दिनांक १९/०३/२००९ अन्वये आदेश दिलेले आहेत. त्यानुसार रत्नागिरी जिल्ह्याचे हद्दीतील विचारेवाडी ते दासगांव येथील मौजे म्हप्रळ ता.मंडणगड लगत बाणकोट खाडी चार्ट क्र.९२२/२०१० या रेती गटातून हातपाटीद्वारे वाळू उत्खनन करणेसाठी परवानगी दिली जाते. त्यामध्ये वाळु धोरणाच्या उपरोक्त नमूद अटीनुसार पुलाच्या १०० मीटर उत्खनन करता येणार नाही अशी अट घातली जाते. सदर अटीचे काटेकोरपणे पालन होण्याची दक्षता घेण्यात येईल. असे आश्वासन सचिवांनी दिले.

५.५४ कार्यकारी अभियंता सा.बा.विभाग महाड यांनी त्यांचे कडील पत्र क्रमांक मवि/प्रशा/३ (२) ४२०७ दिनांक २५/०६/२०१० अन्वये कळविले की, म्हाप्रळ आंबेत पुल राज्यमार्ग क्रमांक १०० वरील साखळी क्रमांक ०/६०० मध्ये रायगड/रत्नागिरी या दोन जिल्ह्यांना जोडणारा आंबेत पूल आहे. सावित्री नदीतून आंबेत व म्हाप्रळ गावांनजिक मोठ्या प्रमाणात रेती उत्खनन करण्यात येते व सदर रेतीची वाहतुक बार्जसमधून होते पुलाचा पियर क्रमांक ३ व ४ मधील गाळा (आंबेत बाजूकडून) नौकानयन

वाहतुकीसाठी राखीव आहे. पुलाच्या नौकानयन गाळ्यातुन बार्जेसवर लाईट नसलेल्या बार्जेसची वाहतुक पुलाचे सुरक्षिततेच्या दृष्टीने पुलाखालून होणारी रात्रीची बार्जसची वाहतुक बंद करणे आवश्यक आहे.

५.५५ समितीने दिनांक ३० जून, २०१० रोजी रत्नागिरी येथे अभ्यास दौरा केला होता त्याअनुषंगाने महसूल विभाग व उद्योग विभागाच्या सचिवांची दिनांक १८ ऑगस्ट, २०११ रोजी परिच्छेद क्र. ६.२.१५ बाबत साक्ष घेतली साक्षीच्या वेळी सचिवांनी समितीस अशी माहिती दिली की, खाणीसाठी एक क्षेत्र घेतले असताना अनधिकृतपणे ५ ते १० क्षेत्रात माती खणण्यापासून दगडाचे उत्खनन करण्यात येते. त्यामुळे शासनाचे करोडो रूपयांचे नुकसान होत आहे. मुरूम, मातीसाठी पाच ब्रासची परवानगी घेतली असेल तर १० ब्रास माती काढून घेतली जात आहे. भेटीच्या वेळी समितीला असेही आढळून आले की, खनिकर्म अधिकारी कर्मचाऱ्यांसाठी वाहन उपलब्ध करून देण्यात आलेले नाही. ठेकेदार पैसे देऊन व्यवस्था करत असल्याचे निदर्शनास आले. संचालक खनिकर्म यांचे कार्यालय नागपूर येथे आहे. त्यामुळे रत्नागिरी येथील अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी त्यांना वाहन उपलब्ध करून देता येत नाही. त्यामुळे येथील अधिकाऱ्यांसाठी गाडी उपलब्ध करून दिली पाहिजे. मोठ्या प्रमाणावर अनधिकृतपणे उत्खनन होत आहे. हा मुद्दा विधान सभेत देखील उपस्थित केला होता. त्यावेळी मंत्रिमहोदयांनी लक्ष घालतो आहे असे उत्तर दिले होते. एवढेच नव्हे तर स्वामित्वधनाची रक्कम देखील वसूल होत नाही. तेव्हा यावर कशा पद्धतीने नियंत्रण आणणार आहात ? तसेच वाळूचे देखील मोठ्या प्रमाणवर उत्खनन होत आहे. ट्रकमध्ये दुप्पट, तीप्पट वाळू भरली जाते. परंतु, कोणत्याही प्रकारे कायदेशीर कारवाई होताना दिसत नाही. या प्रकरणी देखील शासनाने दंडात्मक कारवाई करणे आवश्यक आहे समितीने प्रतिपादन केले.

५.५६ समितीने सचिवांच्या असेही निदर्शनास आणले की, पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यात तहसीलदारांनी कारवाई केली होती. वाळू माफिया भक्कम होत आहे. त्यांच्या विरूद्ध शासनाने कठोर कारवाई केली पाहिजे. असे समितीने विचारले असता, याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, मोठ्या प्रमाणावर अनधिकृतपणे उत्खनन होते असे मान्य करून पुढे असे सांगितले की, अनधिकृत उत्खननासंबंधी जिल्हास्तरावर कारवाई केली जाते. ठाणे जिल्ह्यामध्ये जव्हार येथे अनधिकृत उत्खनानासंबंधी कारवाई केली होती. बीड जिल्ह्यामध्ये देखील कारवाई केली होती. सक्शन पंप, ट्रक जप्त केले होते. अनधिकृत उत्खननास प्रतिबंध करण्यासाठी यंत्रणा वाढवावी लागेल, याबद्दल दुमत नाही. आज वाहनांची कमतरता आहे, ही वस्तुस्थिती आहे. तरी देखील शासन आपल्या परीने अनधिकृतपणे उत्खनन होऊ नये यासाठी प्रयत्न करीत आहोत.

५.५७ पुणे जिल्ह्यातील शिरूर येथे अनधिकृत उत्खनानासंबंधी समितीला अशी माहिती दिली की, वाळू उत्खनानाविरुध्द कारवाई करण्यासाठी रात्रौ ९.०० वाजता कारवाई करण्यात आली. त्यावेळी ट्रकमधील २५ ते ३० लोकांनी शासकीय कर्मचाऱ्यांना बेदम मारहाण केली. त्यामुळे तलाठी कार्यालयापासून जिल्हाधिकारी कार्यालय बंद होते. गेल्या २ वर्षामध्ये ५ ते ६ वेळा अशा प्रकारच्या घटना पुणे जिल्ह्यात घडल्या आहेत. शिरूर येथे घडलेल्या घटनेमुळे महसूल कर्मचारी संघटना, तलाठी संघटना यांनी बंद पुकारला होता. आता अवैध वाळू उत्खननास प्रतिबंध बसावा म्हणून पर्याय शोधून काढला आहे. पुण्यामध्ये ५ मार्गावरून वाळू वाहतूक होते. या सगळ्या मार्गावर वाळू चेक नाका उभा केला आहे. पोलीस, महसूल व आरटीओ चे कर्मचारी संयुक्तपणे वाळू वाहनांची वाळू चेक नाक्यावर तपासणी करण्याचे काम करतात. बेकायदेशीरपणे वाळूची वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर संबंधित ट्रक विरूद्ध दंडात्मक कारवाई करून महसूल वसूल करण्यात येतो. गेल्या वर्षभरापासून संयुक्तपणे सदर कारवाई करण्यात येत आहे. तसेच नदीपात्रामध्ये दोन पद्धतीने वाळू काढली जाते. लिलाव पद्धतीने वाळू काढली जाते. ग्रामपंचायतीने ठराव केल्यानंतर ग्राम पंचायतीला दर मिळावा अशा प्रकारच्या सूचना आहेत. पुण्यामध्ये ग्रामपंचायतीने १५० ठिकाणी वाळू उत्खनन करण्यासाठी परवानगी दिलेली आहे. ग्रामसभेच्या ठिकाणी वाळू वाहतूकदार जातात आणि सभा होऊ देत नाही. ग्रामसभा झाली तर लोकांना आमिष दाखवितात आणि प्लॉटचा ठराव करू देत नाही. अशा प्रकारचे जाळे असते. शासकीय कर्मचाऱ्यांवर वाळू माफियाकडून हल्ले होत असल्यामुळे आम्ही पाच मार्गावर अशा प्रकारची यंत्रणा उभी केली आहे. महसूल कर्मचारी तेथे २४ तास पहारा देऊ शकत नाही. महसूल विभागाकडे पूर्ण वेळ यंत्रणा नसल्यामुळे पोलीस, प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या मदतीने वाळू तपास नाके उभे केले आहेत. असे तपास नाके मोठ्या शहरांमध्ये निर्माण केले तर शासनाला मोठ्या प्रमाणावर महसूल मिळू शकेल.

५.५८ पुढे असे सांगितले की, ठाणे जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर अनधिकृतपणे रेती उत्खनन केल्याबद्दल ६६०० गाड्या पकडल्या होत्या. त्याद्वारे रूपये साडेचार कोटी दंड वसूल करण्यात आला. ठाणे जिल्ह्यात सक्शन पंपाद्वारे रेती काढली जाते. ठाणे जिल्ह्यात ८० अनधिकृत सक्शन पंप जप्त करण्यात आले. तीन दिवसापूर्वी वसई येथे वाळूच्या १५ सक्शन पंपावर कारवाई केली असून २२ लोकांवर गुन्हे नोंदविले आहेत. ठाणे जिल्ह्यात अनेक ठिकाणाहून रेती काढली जाते. विभागाकडून खनिकर्म अधिकाऱ्यांसाठी गाडी आणि कर्मचारीवर्ग दिलेला आहे. कर्मचारीवृंदाची संख्या जास्त वाढविली तर अनधिकृत उत्खननावर नियंत्रण येईल. ठाणे जिल्ह्यात देखील वाळू तपास नाके तयार केले आहेत.

तसेच अनधिकृतपणे उत्खननास आळा घालण्यासाठी चर खोदण्यात आले आहेत. त्यामुळे ट्रक तेथ पर्यंत पोहचू शकत नाही. वैतरणा येथे देखील कारवाई केली असता कर्मचाऱ्यांवर हल्ला करण्यात आला होता.

५.५९ ज्या गावातून वाळूचा उपसा होतो, त्या ग्रामपंचायतीला आपण प्रोत्साहन निधी दिला पाहिजे असे असमितीने प्रतिपादन केले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, प्रोत्साहन निधी देण्याची तरतूद आहे. १/३ रक्कम संचालक, खनिकर्म यांच्यामार्फत ग्रामपंचायतीला देण्यात येते तसेच संचालक, खनिकर्म रस्ते सुधारणेसाठी देखील जिल्ह्याला पैसे देतात. प्रोत्साहनात्मक रक्कम जिल्ह्याला दिली जाते. ती रक्कम त्या ग्रामपंचायतीला मिळेलच याची शाश्वती नसते. ज्या ग्रामपचांयतीमुळे उत्पन्न मिळते त्याच ग्रामपंचायतीला प्रोत्साहन दिले पाहिजे अशा प्रकारचा प्रस्ताव शासनाने तयार केला आहे. अशा प्रकारचे सुधारित धोरण शासनाला सादर करण्यात आले आहे.

५.६० समितीने अशी विचारणा केली की, खनिकर्म अधिकाऱ्याकडे मनुष्यबळ नाही. वाहनांची सोय नाही. कार्यालय नाही. त्याला जबाबदारी नाही. त्यावर उद्योग सचिवांनी असा खुलासा केला की, खनिकर्म अधिकारी हे जिल्हाधिकारी कार्यालयात असतात. ते खनिजासंबंधीची कामे पाहतात. यासाठी त्यांना जिल्हाधिकारी कार्यालयाचा कर्मचारीवर्ग असतात. या अधिकाऱ्यांना जिल्हाधिकाऱ्याच्या कर्मचारीवर्गाची मदत घ्यावी लागते. ज्या ठिकाणी गाड्यानाहीत तेथे गाड्या देण्याचा प्रस्तावित करण्यात आले आहे. एक वर्षामध्ये बऱ्याच ठिकाणी स्वतंत्रपणे गाड्या पुरवू शकू.

५.६१ वित्त विभागाकडे पदांच्या भरतीबाबत किंवा वाहनांच्या मागणीबाबत नस्ती आली की, ती बासनात बांधून ठेवली जाते. परंतु, त्यामुळे शासनाच्या उत्पन्नावर परिणाम होतो त्यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, कमी कर्मचारी असताना विभागाला मागच्या वर्षी ७४० कोटी रुपये इतके उत्पन्न मिळाले आहे. परंतु, जर विभागाला याच कामासाठी जर पुरेशी वाहने आणि मनुष्यबळ मिळाले असते तर याच्या पेक्षा किती तरी जास्त उत्पन्न शासनाला मिळू शकले असते. यामध्ये आणखी एक अडचण अशी होती की, रेतीच्या लिलावाकरिता आवश्यक ना-हरकत प्रमाणपत्र देण्याचे अधिकार ग्रामपंचायतींना होते व त्यांच्याकडून ते लवकर मिळत नव्हते. ज्या ग्रामपंचायतींकडून असे प्रकार मुद्दामहून केले जातात त्यांच्यावर जबाबदारी निश्चित केली पाहिजे, त्यांच्या विरुध्द कारवाई केली गेली पाहिजे.

५.६२ खनिजा संदर्भात विविध विभागांची एक एकत्रित समिती करण्याचा प्रस्ताव विभागाने शासनास सादर केला आहे काय ? यावर विभागीय प्रतिनिधींनी असे सांगितले की, प्रत्येक जिल्हयामध्ये अशा समित्या अगोदरच गठीत केलेल्या आहेत.

५.६३ याच संदर्भात याबाबत उद्योग सचिवांनी असा खुलासा केला की, हा विषय उद्योग विभागाशी संबंधित आहे. अनधिकृत खनिकर्म व विशेषतः मुख्य खनिकर्म संदर्भात हा मुद्दा आहे. मागच्या एक-दोन वर्षांतील देशभरातील अशा घटना पाहिल्या तर ओरिसा, छत्तीसगढ़, कर्नाटक या राज्यांमध्ये मुख्य खनिकर्माच्या संदर्भात मोठया प्रमाणावर गैरव्यवहार झालेले आहेत. तेवढया प्रमाणात ते महाराष्ट्रात झालेले नाहीत असा राज्य व केंद्र शासनाचाही अंदाज आहे. परंतु, तरीही या प्रकरणांचा तपास करण्यासाठी मागच्याच महिन्यात एका शासननिर्णयानुसार एक उच्चस्तरिय समिती नेमण्यात आलेली आहे. राज्याचे मुख्य सचिव या समितीचे अध्यक्ष आहेत. केंद्र शासनाच्या संबंधित यंत्रणा जसे की, सिमा शुल्क, रेल्वे, न्यायालय या शिवाय त्यांच्या काही संस्था व राज्य शासनातले काही अधिकारी यांचा समावेश या उच्चस्तरिय समितीमध्ये आहे. या शिवाय जिल्हापातळीवर अशाप्रकारे डिसेंबर, २००९ पर्यंत मुख्य खनिकर्म प्रादेशिक स्तरावर आणि आजपर्यंत बरिचशी तपासणी झालेली आहे. परंतु, या कामी अपुऱ्या कर्मचारी वर्गा मुळे अधिक प्रभावीपणे काम करण्यावर मर्यादा येतात.

५.६४ शासनाला खनिजामधून मोठया प्रमाणात उत्पन्न मिळत असल्याने या संदर्भात एक चांगला राज्यस्तरिय प्रस्ताव तयार केला पाहिजे. तसेच रेतीचा उपसा अवैध मार्गाने होतो, परंतु, वैध मार्गाने होत नाही यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना जबाबदार धरुन त्यांच्यावर काही कारवाई केली जाते काय ? त्यांना ठरवून दिलेले उद्दिष्ट त्यांनी १०० टक्के साध्य केले की नाही याची तपासणी केली जाते की नाही ? याबाबत महसूल सचिवांनी खुलासा केला की, जिल्हाधिकाऱ्यांना याकरिता काही उद्दिष्टे ठरवून दिलेली आहेत. काही जिल्ह्यांत ठरवून दिलेली उद्दिष्टे साध्य होतात तर काही जिल्ह्यांत होत नाहीत.

५.६५ गौण खनिजामध्ये दर ठरलेले आहेत. असे असतांनाही त्या गौण खनिजाची वाहतूक करणाऱ्या वाहनचालकाकडे कोरी पावती दिली जाते. जेव्हा अशा वाहनांस भरारी पथक पकडते त्या वेळेला तो वाहनचालक तेव्हाची वेळ व तारीख त्या पावतीवर टाकून त्या भरारी पथका मधील अधिकाऱ्यांना दाखवितो. जोपर्यंत अशा वाहनांस भरारी पथक पकडत नाहीत तोपर्यंत त्या एकाच पावतीवर दिवसभरात त्यांच्या कितीतरी फेऱ्या होत असतात व शासनाची दिशाभूल केली जाते. अशा ठिकाणी महसूल विभागाचा एक कर्मचारी अथवा अधिकारी बसवून कामे करता येत नाहीत का ? यावर महसूल सचिवांनी असा खुलासा केला की, शासनाकडे असलेली यंत्रणा अपुरी असते. धाडी घालावयाची

ठिकाणे ५-६ असतात. अपुऱ्या कर्मचाऱ्यांअभावी एकाच वेळी अशी कारवाई करण्यावर बंधने येतात. याकरिता अचानक धाडीसारखी कडक मोठी कारवाई करुन संबंधितांवर जरब बसविण्याचा प्रयत्न अपुरे पडतात अशी प्रकरणांची संख्या लक्षात घेता एखाद-दुसऱ्या व्यक्तीवर अशी जबाबदारी टाकण्यापेक्षा जर स्थानिक लोकांनी यावर नियंत्रण ठेवले तर जास्त प्रभावी कारवाई करता येणे शक्य होईल असे वाटते. अशाप्रकारचा काही प्रस्ताव करण्याची आवश्यकता आहे.

५.६६ समितीने खनिजा संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना काही अडचणी येतात काय अशी विचारणा केली असता खनिजा संदर्भात विभागाच्या ज्या काही अडचणी आहेत त्याची माहिती पुढीलप्रमाणे आहेत.

१) खाण क्षेत्राच्या तपासण्या तसेच अवैध उत्खनन व वाहतूकीस प्रभावीपणे प्रतिबंध घालण्याच्या दृष्टीने संचालनालयाने निर्लेखित केलेल्या वाहनांच्या बदली १३ वाहने व २३ नवीन वाहनांची आवश्यकता असल्याचे प्रस्ताविले आहे. वाहनांची निकड लक्षात घेऊन वाहन खरेदीसाठी दिनांक ०७.०७.२०१० च्या शासन निर्णयानुसार खनिज विकास निधीतून रु. १ कोटी अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. प्रशासकीय मंजूरी नुसार प्रत्यक्षात वाहने खरेदी करण्यापूर्वी वित्त विभागाची मंजूरी इत्यादी आवश्यक आहे.

(२) खनिज प्रशासनासाठी संचालनालयाच्या सुधारित आकृतीबंधानुसार विविध जिल्हाधिकारी कार्यालयात ९८ पदे मंजूर करण्यात आली आहेत. तथापि, खनिज प्रशासन बळकट करण्यासाठी १२३ नवीन पदे नव्याने निर्माण करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) संचालनालयाच्या आस्थापने वरील पदांचा सुधारित आकृतीबंध निश्चित करताना मंजूर ६५६ पदांच्या तुलनेत ४८० पदे सन २००७ मध्ये मंजूर करण्यात आली.

(४) दिनांक ३१.१२.२०१० अखेर संचालनालयाच्या आस्थापनेवरील ४८० पदांपैकी १२२ पदे रिक्त आहेत. यातील सरळ सेवेने भरावयाच्या ७२ पदांपैकी ४८ पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील आहेत. १८ पदांकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र सादर केले असून उर्वरित पदांसाठीचे मागणीपत्र सादर करण्यात येत आहेत. पदोन्नतीने भरावयाच्या ५० रिक्त पदांपैकी ३३ पदांसाठी विभागीय पदोन्नती समितीची बैठक लवकरच आयोजित करण्यात येत आहे.

(५) क्षेत्रिय कार्यालयाकडे खाण तपासणीसाठी पूर्वी आधुनिक संयंत्र उपलब्ध नव्हते (उदा. टोटल स्टेशन, जी.पी.एस. इत्यादी) संयंत्रासंबंधी देखील दिनांक ०७.०७.२०१० च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मंजूरी देण्यात आली व त्यानुसार संयंत्र प्राप्त ही झाले आहे.

५.६७ खनिज उत्खनन प्रकरणी पर्यावरणाचा ऱ्हास होत नसताना देखील तसे कारण दिले जाते तसेच या कामी ग्रामसेवकांची परवानगी हे देखील कारण दिले जाते.

याबाबत विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, काही वेळेस पर्यावरणाचा ऱ्हास हे कारण दिले जाते. पूर्वी चांगल्या हेतूने ग्रामसेवकांची परवानगी या कामी आवश्यक ठेवण्यात आली होती. परंतु, आता त्याचा तितकासा उपयोग होत नसल्याचे लक्षात आल्यानंतर ती अट काढून टाकण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे. या व्यतिरिक्त हे काम प्रभावीरित्या करण्यासाठी मदत करणाऱ्यांना काही तरी प्रोत्साहनपर रक्कम देण्याची नितांत आवश्यकता आहे.

५.६८ पदांबाबत माहिती देताना प्रधान सचिव, उद्योग यांनी असे सांगितले की, खनिकर्माच्या कामावरील देखरेखीकरिता जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये एक जिल्हा खनिकर्म अधिकारी यांचे पद असते व त्याच्यावर विविध कामांची जबाबदारी असते. या व्यतिरिक्त प्रादेशिक पातळीवर खनिकर्म संचालनालयाचा एक प्रादेशिक अधिकारी असतो, विशेषत: प्रधान खनिकर्म संदर्भात नियंत्रण संचालक तसेच जिल्हा खनिकर्म अधिकारी यांचे असते.

५.६९ हे काम कसे केले जावे हे ठरविण्याकरिता बैठका घेऊन कार्यक्रम तयार करण्यासंदर्भात विभागामार्फत काही प्रयत्न केले जातात काय ? असे समितीने विचारले असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, रेतीच्या लिलावाचा कालावधी व इतर गोष्टी लक्षात घेऊन किती कालावधीमध्ये किती काम करावे हे ठरविले जाते व त्यानुसार ते पार पाडण्याचा प्रयत्न केला जातो.

५.७० दगड, वाळू, रेती, मुरुम यामध्ये जास्त उत्पन्न मिळते त्यामुळे गौण खनिज आता गौण राहिलेले नाही. यावर विभागीय सचिव यांनी असा खुलासा केला की, पूर्वी गौण खनिजापासून साधारणपणे ६५० कोटी रुपये इतके उत्पन्न दरवर्षी मिळत होते. त्यामुळे त्याचे महत्त्व लोकांच्या लक्षात येत नव्हते. परंतु, आज ते एक महत्त्वाचा भाग बनले आहे आणि त्यातही आज अनधिकृत खनिकर्माचा प्रश्न निर्माण झालेला आहे. हे काम प्रभावीपणे राबविण्याकरिता जीपीएसच्या सहाय्याने सॅटेलाईट इमॅजनरी वापरण्याचा विभागाचा प्रयत्न आहे. यांसदर्भात इंडीयन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन (ISRO) यांच्याबरोबर जोडण्याचाही विभागाचा प्रयत्न आहे. यामध्ये मुख्य भाग घेतले असून त्यांचे दर्जा ठरविला जाणार आहेत. या आधुनिक तंत्रज्ञानामुळे सहा-सहा महिन्यांच्या अंतराने तेथे कोणते नवीन बदल घडले याचा मागोवा घेणे शक्य होईल. उद्योग विभाग इतर विभागांच्या सहाय्याने हे उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न करीत आहे. थोडक्यात पूर्वी तालुका इन्स्पेक्टर किंवा तहसीलदार जे काम यंत्राच्या सहाय्याने हाताळत होते तेच काम आता जीपीएस या आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने करण्याचे

प्रस्तावित आहे. त्यामुळे पावसाळा व इतर अडचणींचा त्रास आता तितकासा जाणवणार नाही अशी अपेक्षा आहे. परंतु, अपुरा कर्मचारीवर्ग व अपुरी वाहनांचा प्रश्न मात्र आहेच.

५.७१ जिल्हाधिकाऱ्यांच्या मदतीकरिता पुरेसा कर्मचारीवर्ग, वाहने देणे आवश्यक आहे तसेच या कामी सॅटेलाईट यंत्रणेचा वापर कसा करता येईल याबाबतही विचार सुरु आहे. असेही समितीला सांगण्यात आले.

५.७२ रिक्त पदे भरतीबाबत सन २००७ मध्ये बरीच रिक्त पदे भरली गेली. त्यानंतर आता ६५६ पदांपैकी ४८२ पदे भरली गेली आहेत. या व्यतिरिक्त वर्ग-१ व वर्ग-२ अधिका-यांची काही पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्याची प्रक्रियाही सुरू आहे. विभागाने अधिक पदे भरण्यासाठी, अधिक वाहने मिळण्यासाठी प्रस्ताव दिलेला आहे. ती मिळाली की हे काम अधिक प्रभावी करता येणे शक्य होईल. रिक्त पदांचा तपशिलासंबंधी माहिती विवरणपत्र ७ व ८ मध्ये समाविष्ट करण्यात आहे.

५.७३ त्यानंतर दिनांक २८ सप्टेंबर, २०१० रोजी सदर परिच्छेदा संदर्भात पुन्हा अप्पर मुख्य सचिव, महसूल विभाग व जलसंपदा विभागाचे प्रतिनिधी यांची साक्ष घेण्यात आली सदर साक्षीचे वेळी त्यांनी स्वामित्वधनाच्या वसूलीबाबत समितीस असे सांगितले की, जलसंपदा महामंडळाकडून ६ कोटी ३८ लाख एवढया रकमेच्या वसूली बाबत कार्यवाही चालू आहे. परंतु अजूनही जलसंपदा विभागाकडून महसूल खात्याकडे रक्कम जमा करण्यात आलेली नाही. याबात महसूल विभागाच्या प्रतिनिधींनी असाही खुलासा केला की, २००४-२००५ च्या पूर्वी १२ प्रकल्पांच्या संबंधात ६ कोटी ३८ लाख रुपयांचे येणे होते. त्यापैकी ६० लाख ९६ हजार रुपये भरण्यात आलेले आहेत आणि ५ कोटी ७७ लाख रुपये शिल्लक आहेत. बाकीची रक्कम मार्च-एप्रिल महिन्यानंतर पुढील दोन वर्षामध्ये भरण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

५.७४ याबाबतीत थकबाकी का शिल्लक राहीली ? तसेच कार्यपध्दतीची अंमलबजावणी का करण्यात आली नाही ? असे समितीने विचारले असता, विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, २००४-२००५ पूर्वी जे ठेकेदार होते, ते थेट रक्कम भरत होते. परंतु आता तसे नाही. आता निविदा देयकामधूनच यासंबंधातील रक्कम वसूल करण्याबाबत तरतूद केलेली आहे. मात्र या ठिकाणी ज्या रकमेबाबत मुद्दा उपस्थित करण्यात आलेला आहे, ती त्यापूर्वीच्या काळातील असल्यामुळे आणि ही बाब उशीरा निदर्शनास आल्यामुळे रक्कम भरावयाची राहिलेली आहे.

५.७५ ही बाब विभागातील अधिकाऱ्यांच्या निदर्शनास यावयास हवी होती. कारण विभागामध्ये लेखापाल आहेत, शासनाची कार्यपध्दती माहिती आहे.अशा वेळी संबंधितांना रक्कम जमा करण्याच्या बाबतीत आठवण का करण्यात आली नाही ? यावर सचिवांनी खुलासा केला की, यासंबंधात

जिल्हाधिकारी आणि संबंधित यंत्रणेबरोबर सातत्याने पत्र व्यवहार सुरु आहे. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, जी रक्कम शिल्लक राहिलेली आहे, त्याबाबतीत संबंधितांना पाठविण्यात आलेल्या स्मरणपत्राची प्रत समितीला सादर करण्यात यावी. याबाबत त्या भागातील जिल्हाधिकारी यांची जबाबदारी आहे. जिल्ह्यामध्ये जमा होणाऱ्या महसूला संबंधातील उद्दिष्ट ठरलेले असते. संबंधितांना कामासाठी परवानगी दिलेली असते, त्यामुळे याबाबत त्यांची देखील जबाबदारी आहे. अशा वेळी तेथील जिल्हाधिकारी यांनी संबंधितांना थकबाकीबाबत कळविले पाहिजे. यास विभागीय सचिवांनी सहमती दर्शवून असे नमूद केले की, सन २००२ नंतर साधारणपणे याबाबतीत २००७ पासून संबंधित कार्यकारी यंत्रणेकडे बऱ्याच वेळेला पत्र व्यवहार करण्यात आलेला आहे. २००८, २००९ मध्ये देखील पत्र व्यवहार झालेला आहे. याबाबत जिल्हाधिकारी यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात आलेला आहे आणि या साठी अंदाजपत्रकात तरतूद उपलब्ध करुन देण्याबाबत संबंधित कार्यालयाला कळविण्यात आले आहे असे संबंधितांचे म्हणणे आहे. याबाबत जिल्हा स्तरावर कार्यवाही झालेली आहे. तसेच दिनांक २२ जून २०१० रोजी महामंडळाच्या निदर्शनास आणून देण्यात आले आहे. त्यानंतर आम्ही कार्यवाही केली असून लवकरात लवकर वसूली होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहे.

५.७६ सन २००२ नंतर साधारणपणे सन २००७-२००८ पासून संबंधित जिल्हा स्तरावरील यंत्रणेकडे पत्र व्यवहार करण्यात आलेला आहे आणि दिनांक २२ जून २०१० मध्ये ही बाब महामंडळाच्या निदर्शनास आणून देण्यात आली आहे. ही थकबाकी जवळपास ६ कोटी रुपयांची आहे तसेच कंत्राटदाराकडून थकबाकी वसूल करण्याची जबाबदारी शासनाची नाही काय? असे समितीने विचारले असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, या १२ प्रकल्पांच्या संदर्भातील निविदा २००१-२००२ पूर्वीच्या आहेत. त्याच्या पूर्वी अंदाजपत्रक तयार करुनच पाठविले जात होते. त्यावेळी स्वामित्वधनाचा मुद्दा नव्हता. त्याबाबत २००५ नंतर शासनाने निर्णय घेतल्यावर १७.३३ पैसे या प्रमाणे अंदाजपत्रकामध्ये तरतूद करण्यास सुरुवात केली. त्यानंतर जेवढ्या निविदा काढण्यात आल्या, त्यावेळी कंत्राटदाराने स्वामित्वधन भरावयास पाहिजे आणि जर त्याने तसे केले नाही तर त्याच्या बिलातून ती वसूल करावयाची. परंतु या निविदा २००१ पूर्वीच्या असल्यामुळे स्वामित्वधनाची वसूली करण्याची तरतूद अंदाजपत्रकातच नव्हती.

५.७७ या अनुषंगाने विभागीय सचिवांनी समितीस असे सांगितले की, शासनाने मागील पाच वर्षापासून स्वामित्वधन वसूल करण्याची पध्दत सुरु केली हे म्हणणे चुकीचे असून, हे विभागांतर्गत काम असल्यामुळे ते करणे ही विभागाची जबाबदारी होती. मात्र त्यांनी निविदांमध्ये काय तरतूद केलेली आहे

याच्याशी महसूल विभागाचा काही संबंध नाही. पाच वर्षापूर्वी सुध्दा स्वामित्वधन भरणे आवश्यक होते आणि आताही भरणे आवश्यक आहे. परंतु आता निविदा मध्ये यासंबंधात तरतूद केली जाते आणि कंत्राटदार ती रक्कम थेट जमा करतात.

५.७८ समितीने स्वामित्वधन वसूल करण्याबाबत सन २००५ पूर्वी कोणती पध्दत होती ? अशी विचारणा केली असता, यावर पूर्वीही संबंधितांवर स्वामित्वधन भरण्याची जबाबदारी होती. त्यानुसार त्यांना अंशिक रक्कम देखील अदा केलेली आहे. आतापर्यंत ३६ लाख रुपयांचे अंशिक रक्कम अदा झालेली आहे. स्वामित्वधनाच्या बाबतीत कोणालाही सूट नाही. याबाबत निविदांमध्ये नवीन तरतुदीचा समावेश केलेला आहे आणि त्यानुसार ते कंत्राटदाराकडून थेट स्वामित्वधन घेतात आणि ही त्यांची प्रशासकीय बाब आहे. विभागाने स्वामित्वधन भरावयास पाहिजे आणि त्याप्रमाणे ३६ लाख भरलेले आहेत, अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

५.७९ स्वामित्वधनाच्या बाबतीत जी पध्दत बदलण्यात आली, त्याचा उल्लेख जलसंपदा विभागाच्या प्रतिनिधींनी केला आहे. २००५ मध्ये निविदेमध्ये समाविष्ट करुन, ही स्वामित्वधनाची रक्कम बिलातून वसूल करण्यात येते. त्यापूर्वी वाळू आणि दगड याच्याबाबतीत स्वामित्वधन भरावी लागत होती, मातीच्या संबंधात नव्हती. तसेच यापूर्वी ठेकेदार महसूल विभागाकडून वाळूचे ठेके घेताना स्वामित्वधन भरुन पावत्या दाखवत होते. त्यामुळे वसूलीचा मुद्दा पाटबंधारे विभागाकडे येत नव्हता. जलसंपदा विभागाने १२ कोटी रुपये भरले आहेत. तसेच यावर्षी निधीची तरतूद आहे, त्यातून निम्मी रक्कम भरता येईल. तसेच स्वामित्वधनासाठी पुरवणी मागण्यांच्याद्वारे मागणी करु असे जलसंपदा विभागाच्या प्रतिनिधींनी समितीस आश्वासित केले तथापि, याबाबतची सद्य:स्थिती अद्याप समितीस प्राप्त झाली नाही.

अभिप्राय व शिफारशी-

५.८० समितीसमोर आलेल्या उपरोक्त माहिती वरुन असे दिसून येते की, संचालक, भूविज्ञान व खनिकर्म यांनी एका उपसंचालक कार्यालयास व एक जिल्हा खनिकर्म अधिकारी कार्यालयास महिन्यातून एकदा भेट देणे आवश्यक आहे. सन २०००-२००१ ते २००४-२००५ या कालावधीत ६० उपसंचालक कार्यालयाची तपासणी करणे आवश्यक असताना फक्त आठ उपसंचालक कार्यालयांची तपासणी केली. ६० जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांच्या कार्यालयांची तपासणी करणे आवश्यक असताना कोणत्याही जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांच्या कार्यालयाची तपासणी केली नाही.

५.८१ औरंगाबाद विभागाच्या उपसंचालकांनी ४८० तपासण्या करणे आवश्यक असताना एकही तपासणी केलेली नाही. तसेच कोल्हापूर विभागाच्या ६०० तपासण्या करणे आवश्यक होते. परंतु एकही तपासणी केली नाही. त्याचप्रमाणे चंद्रपूर व नागपूर विभागाने महालेखाकारांना तपशील सादर केला नाही. जळगांव विभागाने ३०० तपासण्य करणे आवश्यक असताना केवळ १२ तपासण्या केल्या आहेत. यावरुन खनिकर्म विभागातील मुख्यालयातच उदासिनता असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे याबाबत तातडीने योग्य ती कार्यवाही होणे आवश्यक आहे असे समितीचे मत आहे.

५.८२ जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यांनी दरमहा १० खाणीच्या नियमित तपासण्या व १० आकस्मिक भेटी देणे आवश्यक आहे. भंडारा व चंद्रपूर जिल्ह्यात तपासण्या फारच कमी झाल्या असून रत्नागिरी जिल्ह्यात तपासण्याच केल्या नाहीत. नागपूर व यवतमाळ जिल्ह्यांनी महालेखाकारांना उत्तरच सादर केले नाही. यावरुन समितीने असा निष्कर्ष काढला की, खनिकर्म विभाग खाणी संदर्भात गंभीर नसल्याने कोणतीही कठोर पावले उचलली नाही. खाणीच्या तपासणी अधिक प्रभावी करण्यासाठी डिसेंबर, २००९ मध्ये दक्षता पथके स्थापन करण्यात आली आहे. खाणी तपासणीसाठी नेमलेल्या दक्षता पथकाने अचानक भेट देवून पाहणी करणे आवश्यक आहे. परंतु खनिकर्म विभागास पुरेसा कर्मचारी वर्ग नसल्यामुळे त्यांनी अचानक भेटी देणे शक्य झाले नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. **त्यामुळे खनिकर्म विभागास पुरेसा व स्वतंत्र कर्मचारी वर्ग पुरविण्यात यावा व खनिजाची अवैध वाहतुक रोखण्यासाठी व त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी दक्षता पथकास आवश्यक तेवढी वाहने ताडतीने पुरविण्याची कार्यवाही करावी. तसेच दक्षता पथकात स्वतंत्र अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी व या पथकावर केवळ संचालक, भुविज्ञान व खनिकर्म संचालनालय यांचे नियंत्रण असावे व संचालकांना प्रत्येक महिन्यात अहवाल सादर करण्यात यावा व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

५.८३ अवैध उत्खनन रोखण्यासाठी परिवहन, वने, पोलिस व राज्य शासनाच्या इतर संबंधीत विभाग व अभिकरणे यांची समिती दिनांक २७/०७/२०१० रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आली आहे. खनिजांचे अवैध उत्खननासंबंधी बाबींचा आढावा घेणे, उपाययोजना आखणे व अवैध उत्खनन प्रकरणी कार्यवाही करण्यासाठी सर्व संबंधित विभागांचे सहकार्य तत्परतेने मिळण्याच्या दृष्टीने तसेच समन्वय साधण्याच्या दृष्टीने राज्य स्तरीय व जिल्हा स्तरीय समित्या गठीत करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. **या शासन निर्णयाची विभागाने तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी व राज्य**

स्तरीय व जिल्हा स्तरीय समित्यांनी केलेल्या कामाची व संबंधितावर केलेल्या कारवाईची ३ महिन्याच्या कालावधीत माहिती समितीस देण्यात यावी अशी शिफारस समिती करीत आहे.

५.८४ अवैध उत्खनन वाहतूक व खनिजांची साठवणूक रोखण्यासाठी राज्य शासनाने नियम तयार केले आहेत, परंतु यासाठी नोंदवह्या व अभिलेखे ठेवण्याची गरज आहे. परंतु विभागाकडून या तरतूदीचे काटेकोरपणे पालन केले जात नसल्याने अवैध उत्खनन वाहतूक व खनिजांची साठवणूक रोखली जात नाही. विभागाकडून खनिजासंदर्भात प्रभावी नियंत्रण ठेण्यात येत असून प्रमुख खनिजांचे विनियमन केंद्र शासनाने विहित केलेल्या खनिज सवलत नियम १९६०, खनिज संवर्धन व विकास नियम १९८८ व राज्य शासनाने केलेले अवैध वाहतूक व साठवण नियम २००१ अन्वये केले जाते. या नियमानुसार विहीत केलेल्या नोंदवह्या व अभिलेख खाण मालक तसेच जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी ठेवणे बंधनकारक आहे. **परंतु विभागाकडून या तरतूदीचे काटेकोरपणे पालन केले जात नसल्याने अवैध उत्खनन वाहतूक व खनिजांची साठवणूक रोखली जात नाही. त्यामुळे खनिजाचे होत असलेले अवैध उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती ३ महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

५.८५ तालुका स्तरावर गौण खनिज उत्खननास परवानगी दिली जाते. गौण खनिजामध्ये वाळू, दगड, मुरुम, साधी माती यांच्या समावेश आहे. परवानगी देत असतांना वेगवेगळ्या विभागांकडून ना-हरकत प्रमाणपत्र संबंधितांना घ्यावे लागते. २००० ब्रास मुरुम काढण्याची परवानगी दिल्यानंतर त्या संपूर्ण काळात संबंधितांकडून ५००० ब्रास मुरुम काढला जातो. जिल्हाधिकारी कार्यालयाचे कोणतेही नियंत्रण नसते अथवा या गोष्टीकडे दुर्लक्ष करण्यात येते. त्यामुळे शासनाचा महसूल बुडतो. मुळात उत्पन्न कमी मिळेल असे विभागाकडून गृहित धरण्यात येते व यासाठी यंत्रणा जबाबदार असते. या सर्व बाबी यंत्रणांनी पाहणे आवश्यक आहेत. आपल्या नियंत्रणाखालील भागातून साधारणत: किती वाळू मिळू शकेल याचा अंदाज घेणे आवश्यक आहे. किती वाळू काढण्यास परवानगी दिली आहे आणि किती वाळूचा उपसा होतो याचा विचार करावयास पाहिजे. यामध्ये मोठी तफावत असल्याचे आढळून येते. वाळूपासून शासनाला जर वर्षास तीन हजार कोटी रुपये उत्पन्न मिळत असेल तर ते चार हजार पाचशे कोटीपर्यंत का जाऊ नये. शासनाला जास्त उत्पन्न मिळावे असा समितीचा हेतू आहे. परंतु दुर्देवाने जिल्हा पातळीवर याकडे दुर्लक्ष केले जाते व उत्पन्न कमी दाखविले जाते. १०९ टक्के उत्पन्न होते. हेच उत्पन्न २०० टक्के व्हावे असा विभागाचा प्रयत्न असावयास पाहिजे. खनिज हे राज्य शासनाला महसूल

मिळवून देण्याचे हे एक मोठे साधन आहे. यासाठी तालुका पातळीवरील यंत्रणा सक्षम करावयास पाहिजेत. गाव व तालुका पातळीवरुन राज्य शासनाचे उत्पन्न वाढविणे आवश्यक आहे. ज्या जिल्ह्यात वाळू, दगड, चिरे खाणी अहेत त्या जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी याबाबत माहिती घेणे आवश्यक आहे असे समितीने मत व्यक्त केले तसेच शासकीय यंत्रणेने सक्षमपणे काम केले तर शासनाचे नक्कीच उत्पन्न वाढेल. प्रत्येक जिल्ह्यात यासाठी भरारी पथक नेमण्यात आली आहेत. या पथकामध्ये जिल्ह्यातील उप विभागीय अधिकारी व तहसिलदार हे प्रमुख आहेत. त्याचप्रमाणे या पथकामध्ये स्वामित्वधन निरिक्षक व वरिष्ठ लिपिक आहेत. **जिल्हाधिकारी स्तरावर हे भरारी पथक नियुक्त करण्यात आले असताना शासनाच्या महसूलात अपेक्षित वाढ होत नाही. त्यामुळे गौण खनिजाच्या उत्खननाचे शासनास जास्तीत जास्त महसूल मिळण्यासाठी योग्य ती उपाययोजना करावी व त्याबाबतची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

५.८६ समितीने तहसिलदार खेड यांच्या संबंधात केलेल्या विधानात सत्यता दिसून येत आहे. खाण परवानाधारक यांनी ४०५ ब्रास ज्यादा काळ्या दगडाचे उत्खनन केलेले आहे व त्यासाठी तहसिलदार खेड यांनी रुपये ८१०००/- हजार स्वामित्वधनाची रक्कम आकारली असून त्यावर रुपये १३,३६,५००/- दंड लावला आहे परंतु तो वाजवी नाही. अशा प्रकरणांमध्ये अधिकाऱ्यांकडून काही रक्कमेची मागणी करुन तडजोड करण्यात येते. **त्यामुळे याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या तहसिलदाराची प्रथम चौकशी करून चौकशीअंती ते दोषी आढळून आल्यास शासन नियमान्वये जास्तीत जास्त शिक्षेची कारवाई संबंधितांविरुध्द करावी जेणेकरून भविष्यात अशा प्रकारे गैरव्यवहार करण्यास इतर अधिकारी धजावणार नाही व सबब याप्रकरणी केलेल्या कारवाईची माहिती समितीला ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. त्याचप्रमाणे जादा उत्खनन प्रकरणी खाणपरवानाधारकांना नियमांच्या कक्षेत राहून वाजवी दंड आकारण्यात यावा तसेच दंड आकारण्यांचे अधिकार वरिष्ठ स्तरावर निश्चित करण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.**

५.८७ खाणपट्टयांच्या संदर्भात अनेक अनियमितता घडत असतात मात्र स्थानिक अधिकाऱ्यांना हाताशी धरुन सर्व अनियमितता दडपल्या जातात. अनेक वेळा खाणपट्टयांवर काम करणाऱ्या कंत्राटदारांच्या कामगारांना पकडले जाते व नंतर सोडून देण्यात येते ही बाब गंभीर आहे. त्यामुळे खाणपट्टा मालकाविरुध्द प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यात यावेत. त्याचप्रमाणे त्यांना काळ्या यादीत टाकण्यात यावे त्यासाठी **लिलावाची कार्यपध्दती उत्पादन शुल्क आयुक्त कार्यालयाकडून पूर्ण करण्यात**

येत असल्यामुळे संबंधित परवानाधारकाला काळ्या यादीत टाकण्याची शिफारस जिल्हा कार्यालयाने आयुक्त कार्यालयाकडे करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर यांना वेळोवेळी देण्यात यावी, या संबंधीत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

५.८८ काही वर्षापूर्वी आंबेत खाडीतील रेती उपसा करण्यासाठी ७६ लाख, १ कोटी रुपये एवढीच बोली लावली जात होती. आता ३६ कोटी रुपयांची बोली लागली आहे. याचा अर्थ, पूर्वी कंत्राटदार व शासनाचे स्थानिक अधिकारी यांच्या संगनमताने बोली कमी लावली जात होती. आता देखील जी बोली लावली जाते ती अपेक्षापेक्षा कमी आहे. यापेक्षा जास्त महसूल शासनाला मिळाला पाहिजे आणि तो मिळू शकतो. आंबेत खाडीमध्ये जे उत्खनन करण्यात येते त्यामुळे आंबेत खाडीवरील पुलाला धोका निर्माण झाला आहे. रायगड व रत्नागिरी जिल्ह्याला जोडणारा हा पूल रत्नागिरी जिल्ह्यातील म्हाप्रळ व रायगड जिल्ह्यातील आंबेत दरम्यान असून हा सावित्री नदी/बाणकोट खाडीवर आहे. सावित्री नदी/बाणकोट खाडीमध्ये ड्रेझर्स तथा हातपाटीद्वारे वाळु उत्खनन केले जाते. वाळु रेती उत्खननास लिलावाद्वारे किंवा परवाना पद्धतीने अनुमती दिली जाते. महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड मुंबई यांचेकडील नाहरकत दाखला प्राप्त करुन परवाना किंवा लिलावासंबंधी पुढील कार्यवाही करणेत येते. वाळु/रेती निर्गती धोरणानुसार कोणत्याही रेल्वेच्या पुलाच्या बाजूने ६०० मीटर (२०००) फुट अंतराच्या आत ड्रेझर्सद्वारे रेतीचे उत्खनन करता येणार नाही. तसेच नदीवरून जाणाऱ्या रस्त्यावरील पुलाच्या कोणत्याही बाजूने १०० मीटर्स पर्यंत रेती/वाळुचे उत्खनन करता येत नाही. सदर अटीचे काटेकारेपणे पालन केले जात नाही. म्हाप्रळ आंबेत पुल राज्यमार्ग क्रमांक १०० वरील साखळी क्रमांक ०/६०० मध्ये रायगड/रत्नागिरी या दोन जिल्ह्यांना जोडणारा आंबेत पूल आहे. सावित्री नदीतून आंबेत व म्हाप्रळ गावांनजिक मोठ्या प्रमाणात रेती उत्खनन करण्यात येते व सदर रेतीची वाहतुक बार्जर्समधून होते पुलाचा खांब क्रमांक ३ व ४ मधील गाळा (आंबेत बाजूकडून) नौकानयन वाहतुकीसाठी राखीव आहे. **पुलाच्या नौकानयन गाळ्यातुन बार्जेसवर लाईट नसलेल्या बार्जेसची रात्रीची वाहतुक पुलाखालून होणे हे पुलाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने धोकादायक आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळी पुलाच्या खालून होणारी बार्जसची वाहतुक बंद करणे आवश्यक आहे.**

५.८९ आंबेत प्रमाणेच राज्यातील बहुतांश नदीच्या किनाऱ्याजवळ होणारे वाळूचे उत्खनन हे मोठ्या प्रमाणात होत असते त्यामुळे या नद्याच्या पुलाच्या होणारी वाहतूकही धोक्यात आलेली आहे

यासाठी नदी वरील पुलाच्या खांबाजवळील वाळूचे उत्खनन न करण्याबाबत जे नियम सध्या अस्तित्वात आहे. त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी व यात जे कंत्राटदार दोषी आढळतील त्यांचेवर कडक कारवाई करावी अशी समिती शिफारस करीत आहे. त्याशिवाय रात्रीच्या वेळी पुलाच्या खालून बार्जर्स नेता येणार नाहीत अशा स्वरूपाच्या अटी भविष्यात काढल्या जाणाऱ्या लिलावाच्या जाहिरनाम्यात टाकण्यासंबंधी विभागीय आयुक्त कार्यालयास कळविणेत यावे व यासंदर्भात सविस्तर परिपत्राकन्वये सर्व संबंधितांना सूचना द्याव्यात अशी समितीची शिफारस आहे.

५.९० राज्यात अनेक ठिकाणी वाळूचे मोठ्या प्रमाणावर उत्खनन होत आहे. ट्रकमध्ये दुप्पट, तीप्पट वाळू भरली जाते. परंतु त्यासंदर्भात संबंधितांविरुध्द कोणत्याही प्रकारे कायदेशीर कारवाई होताना दिसत नाही. या प्रकरणी शासनाने देखील दंडात्मक कारवाई वाळू माफियाविरुध्द करायला पाहिजे. पुणे जिल्ह्यातील शिरुर तालुक्यात तहसिलदारांनी कारवाई केली होती. त्यावेळी त्यांना बेदम मारहाण करण्यात आली. यावरुन असे दिसून येते की, वाळू माफिया निर्माण होण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. अनधिकृतपणे तसेच ठरवून दिलेल्या निकषानुसार जे कंत्राटदार वागत नाहीत. त्यांच्या विरुद्ध शासनाने कठोर कारवाई केली पाहिजे. अनधिकृत उत्खननास प्रतिबंध करण्यासाठी शासकीय यंत्रणा वाढवावी लागेल, वाहनांची कमतरता आहे, तरी देखील शासन आपल्या परीने अनधिकृतपणे उत्खनन होऊ नये यासाठी प्रयत्न करीत आहेत. आता अवैध वाळू उत्खननास प्रतिबंध बसावा म्हणून पर्याय शोधून काढला पाहिजे. पुण्यामध्ये ५ मार्गावरुन वाळू वाहतूक होते. या सगळ्या मार्गावर वाळू चेक नाका उभा केला आहे. पोलीस, महसूल व आरटीओ या सर्व विभागाचे कर्मचारी संयुक्तपणे वाळू वाहनांची वाळू चेक नाक्यावर तपासणी करण्याचे काम करतात. याबाबत दंडात्मक कारवाई करुन महसूल वसूल करण्यात येतो. **अवैध वाळूची वाहतूक रोखण्यासाठी अनेक गंभीर प्रश्नांना कर्मचाऱ्यांना तोंड द्यावे लागते. बऱ्याच वेळा पुरेशा कर्मचाऱ्या अभावी व शस्त्राअभावी प्राणास मुकावे लागते किंवा अपंगत्वसुद्धा येवू शकते त्यामुळे अवैध वाळू उत्खनन व वाहतूकीस प्रतिबंध करण्याकरिता सशस्त्र पथक नेमण्यात यावे व अवैध वाळू उत्खननास प्रतिबंध बसावा म्हणून आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

५.९१ कोकणात वाळू, चिरे, दगड, सिलीका वाळू, बॉक्साईट यासारखे खनिज मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे खनिजाच्या स्वामित्मधनाचे उत्पन्न कोकणात जास्त प्रमाणात मिळते. परंतु खनिकर्म विभागाचे मुख्य कार्यालय नागपूर येथे असल्याने सदर उत्पन्न नागपूर या मुख्य कार्यालयात जमा

करण्यात येते. **त्यातून फक्त १० टक्के रक्कम संबंधित विभागातील मुलभूत सोई सुविधा करण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात येते. ही रक्कम त्या ज्या विभागातील मूलभूत व प्राथमिक सुविधा निर्माण करण्यात अगदीच तुटपुंजी असून त्या विभागात सोयी सुविधा पुरविता येत नाहीत. त्यामुळे या टक्केवारीत वाढ करण्यात यावी तसेच त्यासाठी नियमातही बदल करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

५.९२ **ज्या गावातून वाळूचा उपसा होतो, त्या ग्रामपंचायतीला प्रोत्साहन निधी देण्याची तरतूद आहे. १/३ रक्कम संचालक, खनिकर्म यांच्यामार्फत ग्रामपंचायतीला देण्यात येते तसेच संचालक, खनिकर्म रस्ते सुधारणेसाठी देखील जिल्ह्याला पैसे देतात. प्रोत्साहनात्मक रक्कम जिल्ह्याला दिली जाते. ती रक्कम त्या ग्रामपंचायतीला मिळेलच याची शाश्वती नसते. ज्या ग्रामपंचायतीमुळे खनिजाच्या उत्खननामुळे स्वामित्वधनाचे उत्पन्न मिळते त्याच ग्रामपंचायतीला विशेष व ज्यादा अनुदान देण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.**

५.९३ रेतीच्या लिलावाकरिता आवश्यक ना-हरकत प्रमाणपत्र देण्याचे अधिकार ग्रामपंचायतींना होते व त्यांच्याकडून ते लवकर मिळत नव्हते. ज्या ग्रामपंचायतींकडून असे प्रकार मुद्दामहून केले जातात त्यांच्यावर जबाबदारी निश्चित केली पाहिजे, त्यांच्या विरुद्ध कारवाई केली् पाहिजे. **ग्रामपंचायतींकडून ना-हरकत प्रमाणपत्र देण्यास होणारा जो विलंब आहे त्या संदर्भात संबंधित ग्रामपंचायतीवर त्याची जबाबदारी टाकण्याबाबत सध्या जे निकष आहे त्यामध्ये बदल करण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.**

५.९४ खनिज उत्खनन प्रकरणी पर्यावरणाचा ऱ्हास होत नसताना देखील काही ठिकाणी पर्यावरणाचा ऱ्हास होतो असे कारण दिले जाते तसेच या कामी ग्रामसेवकांची परवानगी हे देखील कारण दिले जाते. ग्रामसेवकांची परवानगीची जी अट आहे ती काढून टाकण्यात यावी. तसेच पर्यावरणाच्या परवानगी बाबत जे निकष आहे त्यामध्ये आवश्यक ते बदल करण्याच्या दृष्टीने पर्यावरण विभागाकडे पाठ पुरावा करण्यात यावा. या व्यतिरिक्त हे काम प्रभावीरित्या करण्यासाठी मदत करणाऱ्यांना प्रोत्साहनपर रक्कम देण्याची कार्यपद्धती सुरु करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

५.९५ खनिकर्म विभागातील पदांबाबत माहिती देताना खनिजांच्या कामावरील देखरेखीकरिता जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये एक जिल्हा खनिकर्म अधिकारी यांचे पद असते व त्याच्यावर विविध कामांची जबाबदारी असते. या व्यतिरिक्त प्रादेशिक पातळीवर खनिकर्म संचालनालयाचा एक प्रादेशिक अधिकारी असतो, विशेषत: प्रधान खनिजासंदर्भात नियंत्रण संचालक तसेच जिल्हा खनिकर्म अधिकारी

यांचे असते. खनिकर्म अधिकाऱ्याकडे मनुष्यबळ नाही. वाहनांची सोय नाही. त्यांना कार्यालय देखील नाही. तसेच त्यांचेवर निश्चित स्वरूपाची जबाबदारी निश्चित केलेली नाही. जिल्हा खनिकर्म अधिकारी हे जिल्हाधिकारी कार्यालयात असतात. ते खनिजासंबंधीची कामे पाहतात. यासाठी त्यांना जिल्हाधिकारी कार्यालयाचा कर्मचारी वर्ग मदतीस म्हणून काम करीत असले तरी या अधिकाऱ्यांना जिल्हाधिकाऱ्याच्या कर्मचाऱ्यांची पुरेशी मदत मिळत नाही. **कारण या कर्मचाऱ्यांना स्वत:चे काम सांभाळून जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यास मदत करावयाची असते. त्यामुळे खनिकर्म अधिकारी/पुरेशा कर्मचांऱ्या अभावी काम करु शकत नाही त्यामुळे जिल्हा खनिकर्म अधिकाऱ्यास स्वतंत्र कर्मचारी वर्ग व वाहने पुरविण्यात यावीत असे समितीचे स्पष्ट मत आहे. या निमित्ताने राज्यात प्रत्येक जिल्ह्यात असलेल्या जिल्हा खणीकर्म अधिकाऱ्याच्या मदतीसाठी स्वतंत्र कर्मचारी वर्ग व वाहन व्यवस्था करण्याचे दृष्टीने एक सर्वकष आढावा घेवून त्यांना स्वतंत्रपणे कर्मचारी व वाहन व्यवस्था उपलब्ध करून देण्यासठी कशाप्रकारे उपाययोजना करता येईल याबाबतचा आढवा घ्यावा अशी समितीची शिफारस आहे.**

५.९६ अनधिकृत खनिज व विशेषत: प्रधान खनिज संदर्भात राज्यात गैरव्यवहाराच्या अनेक घटना घडल्या आहेत. त्यापेक्षाही ओरिसा, छत्तीसगढ, कर्नाटक या राज्यांमध्ये प्रधान खनिजाच्या संदर्भात मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झालेले आहेत. तेवढ्या प्रमाणात ते महाराष्ट्रात झालेले नाहीत असा राज्य व केंद्र शासनाचाही अंदाज आहे. तरीही या प्रकरणांचा तपास करण्यासाठी शासननिर्णयानुसार एक उच्चस्तरीय समिती नेमण्यात आलेली आहे. राज्याचे मुख्य सचिव या समितीचे अध्यक्ष आहेत. डिसेंबर, २००९ पर्यंत प्रधान खनिज प्रादेशिक स्तरावर आणि आजपर्यंत बरिचशी तपासणी झालेली आहे. परंतु, या कामी अपुऱ्या कर्मचाऱ्याअभावी अधिक प्रभावीपणे काम करण्यावर मर्यादा येतात. **त्यामुळे प्रधान खनिजामध्ये झालेल्या गैरव्यवहार संदर्भात शासनाने नियुक्त केलेल्या समितीने शासनास लवकरात लवकर अहवाल सादर करावा व सदर अहवालात शासनास सुचविलेल्या उपाययोजना समितीस देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

५.९७ राज्यात जिल्हाधिकाऱ्यांना खनिजा संदर्भात उद्दिष्ट ठरवून दिलेली आहेत. काही जिल्ह्यांत ठरवून दिलेली उद्दिष्ट्ये साध्य होतात तर काही जिल्ह्यांत होत नाहीत. गौण खनिजामध्ये दर ठरलेले आहेत. गौण खनिजाची वाहतूक करणाऱ्या वाहनचालकाकडे कोरी पावती दिली जाते. अशा वाहनांस पथकाने पकडल्यानंतर तो वाहनचालक तेव्हाची वेळ व तारीख त्या पावतीवर टाकून त्या पथकामधील अधिकाऱ्यांना दाखवितो. जोपर्यंत अशा वाहनांस पथक पकडत नाहीत तोपर्यंत त्या एकाच पावतीवर

दिवसभरात त्याच्या कितीतरी फेऱ्या होत असतात व शासनाची दिशाभूल केली जाते. शासनाकडे अपुरी यंत्रणा असते व धाड टाकावयाची ठिकाणे ५-६ असतात. अपुऱ्या कर्मचाऱ्यांअभावी एकाच वेळी अशी कारवाई करण्यावर बंधने येतात. अचानक धाडी टाकून धडक मोठी कारवाई करुन संबंधितांवर जरब बसविण्याचे प्रयत्न अपुरे पडतात त्यामुळे यामध्ये स्थानिक लोकांचा सहभाग आवश्यक आहे. **गौण खनिजाच्या संदर्भात कारवाई करताना स्थानिक लोकांचा वापर कसा करुन घेता येईल यादृष्टीने शासनाने आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

५.९८ गौण खनिजापासून साधारणपणे ६५० कोटी रुपये इतके उत्पन्न दरवर्षी मिळत होते. त्यामुळे त्यांचे महत्त्व लोकांच्या लक्षात येत नव्हते. परंतु, आज ते एक महत्त्वाचा भाग बनले आहे आणि त्यातही आज अनधिकृत खनिज उत्खननाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. हे काम प्रभावीपणे राबविण्याकरिता जीपीएसच्या सहाय्याने सॅटेलाईट इमॅजनरी वापरण्याचा विभागाचा प्रयत्न आहे. या संदर्भात इंडीयन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन यांच्याबरोबर सहकार्य करण्याचाही विभागाचा प्रयत्न आहे. यामध्ये मुख्य भाग घेतले असून ते ठरविले जाणार आहेत. या आधुनिक तंत्रज्ञानामुळे सहा-सहा महिन्यांच्या अंतराने तेथे कोणते नवीन बदल घडले याचा मागोवा घेणे शक्य होईल. उद्योग विभाग इतर विभागांच्या सहाय्याने हे उद्दिष्ट्य साध्य करण्याचा प्रयत्न करीत आहे. थोडक्यात पूर्वीच्या काळी तालुका निरीक्षक किंवा **तहसिलदार जे काम हात मशिनीच्या सहाय्याने करत असत तेच काम आता जीपीएस या आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने करण्याचे प्रस्तावित आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर खनिजाच्या अनधिकृत उत्खननाचे समुळ उच्चाटन करण्याकरीता प्रभावीपणे करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

५.९९ सन २००४-२००५ च्या पूर्वी १२ प्रकल्पांच्या संबंधात ६ कोटी ३८ लाख रुपयांचे येणे होते. त्यापैकी ६० लाख ९६ हजार रुपये भरण्यात आलेले आहेत आणि ५ कोटी ७७ लाख रुपये शिल्लक आहेत. ही बाब उशिरा निदर्शनास आल्यामुळे रक्कम भरावयाची राहिलेली आहे. कार्यवाही सुरु केली असून लवकरात लवकर रिकव्हरी होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहे. या १२ प्रकल्पांच्या संदर्भात निविदा सन २००१-२००२ पूर्वीच्या आहेत. त्याच्या पूर्वी अंदाजपत्रक तयार करुनच पाठविले जात होते. त्यावेळी स्वामित्वधनाचा मुद्दा नव्हता. त्याबाबत २००५ नंतर शासनाने निर्णय घेतल्यावर १७.३३ पैसे याप्रमाणे अंदाजपत्रकामध्ये तरतूद करण्यास सुरुवात केली. त्यानंतर जेवढी टेंडर काढण्यात आली, त्यावेळी ठेकेदाराने स्वामित्वधनाची रक्कम भरावयास पाहिजे आणि जर त्याने तसे केले नाही तर

त्याच्या बिलातून ती वसुल करावयाची. परंतु या निविदा सन २००१ पूर्वीच्या असल्यामुळे स्वामित्वधनाची वसुली करण्याची तरतूद अंदाजपत्रकातच नव्हती. शासनाने मागील पाच वर्षापासून स्वामित्वधनाची वसूली करण्याची पद्धत सुरु केली हे म्हणणे चुकीचे असून, हे विभागांतर्गत काम असल्यामुळे ते करणे ही विभागाची जबाबदारी होती. पाच वर्षापूर्वी सुद्धा स्वामित्वधनाची रक्कम भरणे आवश्यक होते आणि आताही भरणे आवश्यक आहे. पूर्वीही संबंधितांवर स्वामित्वधनाची रक्कम भरण्याची जबाबदारी होती. त्यानुसार त्यांनी आतापर्यंत ३६ लाख रुपयांची भरणा देखील केला आहे. स्वामित्वधनाची रक्कम कोणालाही माफ केली जात नाही. **त्यामुळे जलसंपदा विभागाने स्वामित्वधनाची रक्कम महसूल विभागास लवकरात लवकर अदा करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

जलसंपदा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग,

पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, उद्योग विभाग,

ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण)विभाग

हमी शुल्क प्रदान न करणे व पथकर वसूलीच्या कार्यपध्दतीत बदल करणे.

६.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या महसुली जमा अहवालामधील परिच्छेद क्र. ६.३ **"हमी शुल्क प्रदान न करणे"** या संदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय व्यक्त केले :-

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २९३ अन्वये राज्य शासनाला प्रदान केलेल्या अधिकारानुसार कर्जे देणाऱ्या विविध संस्था/रोखेधारक यांना कर्जाची रक्कम/गुंतवणूका आणि त्या वरील व्याजाचे प्रदान यासाठी कर्ज मिळविण्यासाठी राज्याच्या एकत्रित निधीच्या तारणावर राज्य शासन हमी देते व अशी हमी राज्याकरिता घटनासापेक्ष दायित्व ठरते.

शासन निर्णय दिनांक १८ नोव्हेंबर, १९८८ आणि १५ एप्रिल, १९९७ अन्वये हमी शुल्काचे दर प्रतिवर्षी ०.५० ते २ टक्के इतके होते. दिनांक ३१ मार्च आणि ३० सप्टेंबर अखेरीस अदत्त रक्कमेवरील हमीशुल्क दरवर्षी १ एप्रिल आणि १ ऑक्टोबर रोजी ऋणको महामंडळांनी/संस्थांनी शासकीय खात्यात जमा करावयाचे असते. हमीशुल्क प्रदान करण्यास विलंब केल्यास पहिल्या तीन महिन्यांकरिता १६ टक्के दराने आणि त्यानंतर २४ टक्के दराने दंडनीय व्याज देय आहे.

शासकीय हमीवर आधारीत रोखे आणि कर्जाच्या द्वारे निधी उभारण्याच्या पाच प्रशासकीय खात्यातील आठ घटकांच्या अभिलेख्यांचे विस्तृत पृथःकरण केल्यावर असे आढळून आले की, पुढे दर्शविल्याप्रमाणे एप्रिल, २००३ ते एप्रिल, २००६ या काळात हमीशुल्क आणि दंडनीय व्याज मिळून एकूण रु. २२२.२१ कोटीचे प्रदान केले नव्हते.

अ. क्र.	विभागाचे नांव घटकाचे नांव	हमीची रक्कम	हमीचा दिनांक	रक्कम (कोटी रुपयांत)		
			प्रदानाचा नियत दिनांक	हमी शुल्क	दंडनीय व्याज	एकूण
१.	**जलसंपदा विभाग**					
(१)	महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे (रोखे मालिका क्र.२००३/अ)	४१२.३३	१ फेब्रुवारी, २००३ एप्रिल, २००३ ते एप्रिल, २००६	२७.५०	८.३८	३५.८८
(२)	गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद (रोखे मालिका क्र. ६)	३६.०६	१४ फेब्रुवारी, २००३ एप्रिल, २००३ ते एप्रिल, २००६	२.३७	०.७०	३.०७
(३)	विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर (रोखे मालिका क्र. ८)	१७.२९	७ फेब्रुवारी, २००३ एप्रिल, २००३ ते एप्रिल, २००६	१.१३	०.३३	१.४६
(४)	कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे (रोखे मालिका क्र. ६)	८५.४८	१ फेब्रुवारी, २००३ एप्रिल, २००३ ते एप्रिल, २००६	५.६९	१.७०	७.३९
	एकूण	**५५१.१६**		**३६.६९**	**११.११**	**४७.८०**
२.	**सार्वजनिक बांधकामे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई**					
अ)	रोखे मालिका क्र.१९ ते २२	**४०६.९८**	**३० डिसेंबर २००३ ऑक्टोबर, २००३ ते एप्रिल, २००६**	**२०.०१**	**३.७८**	**२३.७९**
	मालिका क्र. २३	**३८०.००**	**१५ जानेवारी २००५ ऑक्टोबर, २००३ ते एप्रिल, २००६**	**९.५५**	**०.७५**	**१०.३०**
ब)	**बँकांकडून कर्ज (१४ कर्ज)**	**१,११५.६७**	**१७ नोव्हेंबर, २००५ ऑक्टोबर, २००३ ते एप्रिल, २००६**	**५०.९३**	**१०.१७**	**६१.१०**
	एकूण	**१,९०२.६५**		**८०.४९**	**१४.७०**	**९५.१९**
३	**पाणीपुरवठा आणि स्वच्छता महाराष्ट्र जीवन प्राधीकरण, नवी मुंबई**					
अ)	खुल्या बाजारातील उधारी	९४.६०	७ डिसेंबर, १९९३ आणि १४ मार्च, १९९७ ऑक्टोबर, २००१ ते एप्रिल, २००६	३.२९	१.९६	५.२५
ब)	भारतीय जीवन विमा निगमकडून कर्जे	४८६.५६	२७ ऑगस्ट, २००२ ऑक्टोबर, २००३ ते एप्रिल, २००६	२१.३१	११.८३	३३.१४
	एकूण	**५८१.१६**		**२४.६०**	**१३.७९**	**३८.३९**
४	**उद्योग,ऊर्जा आणि कामगार (उद्योग) महाराष्ट्र राज्य वित्तिय महामंडळ, मुंबई**					
	खुल्या बाजारातील उधारी	३८५.५७	२५ मार्च, १९९७ ते ९ जानेवारी, २००४	२०.४३	६.६३	२७.०६

			एप्रिल, २००३ ते एप्रिल, २००६			
५	**ग्रामीण विकास आणि जलसंधारण** **महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद**					
	रोख मालिका क्र. १ व २	१००.०३	२२ नोव्हेंबर, २००० एप्रिल, २००१ ते एप्रिल, २००६	९.११	४.३८	१३.४९
	मालिका क्र. ३	३.०१	३ सप्टेंबर, २००२ एप्रिल, २००१ ते एप्रिल, २००६	०.२१	०.०७	०.२८
	एकूण	**१०३.०४**		**९.३२**	**४.४५**	**१३.७७**
	एकूण बेरीज	**३,५२३.५८**		**१७१.५३**	**५०.६८**	**२२२.२१**

ही बाब शासनाला जून, २००६ मध्ये कळविण्यात आली परंतु त्यांचे उत्तर प्राप्त झाले नाही.

६.२ ज्ञापन :

महालेखापरीक्षकांनी उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात जलसंपदा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, उद्योग विभाग आणि ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात पुढीलप्रमाणे नमूद करण्यात आले आहे.

(१) जलसंपदा विभाग-

६.३ महामंडळाच्या निर्मितीनंतर महामंडळास पाणीपट्टीद्वारे मिळणारे आर्थिक उत्पन्न, शासनाकडून मिळणारे अंशदान आणि महामंडळांनी खुल्या बाजारातून कर्ज रोख्याद्वारे करावयाची निधी उभारणी हे तीन अर्थार्जनाचे पर्याय महामंडळास उपलब्ध होते. आता अंशदान व पाटबंधारे वित्तीय कंपनी मार्फत मिळणारा निधी वगळता उत्पन्नाचा कोणताही स्त्रोत महामंडळास उपलब्ध नसल्याने शासन हमी भरणा झाला नाही.

तथापि शासन हमी (व्याजासह) माफीचा प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे सादर करण्याचे तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांनी निदेश दिलेले आहेत. त्यानुसार हमी शुल्क माफीचा प्रस्ताव अद्याप शासनाच्या विचाराधीन आहे. सदर प्रस्तावावर निर्णय झाल्यानंतर त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

(२) सार्वजनिक बांधकाम विभाग-

६.४ शासन हमीच्या आधारे महामंडळाने उभारलेल्या सर्व कर्ज अथवा कर्जरोखे प्रकरणात हमी देण्याच्या तारखेपासून देय हमी शुल्काऐवजी तेवढ्या हमी शुल्काच्या रक्कमेचे सम भाग भांडवलात रुपांतर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्यामुळे महाराष्ट्र

राज्य रस्ते विकास महामंडळाने हमी शुल्क भरले नाही. तसेच शासनाच्या विचाराधीन असलेल्या प्रस्तावानुसार हमी शुल्क वसूल करण्यात आले नाही व त्यावर दंडनीय व्याजही आकारण्यात आले नाही. विचाराधीन प्रस्तावानुसार दिनांक ३ मार्च, २०१० रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. (शासन निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे)

(३) पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग-

६.५ स्थानिक स्वराज्य संस्थांकडील कर्ज व हमीशुल्काची परतफेड महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास वेळचेवेळी प्राप्त न झाल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण शासनास देय असलेली देणी नियत तारखेस भरु शकले नाही. शासनास एप्रिल, २००६ पर्यंत खालीलप्रमाणे हमीशुल्काची रक्कम भरणा करावयाची होती.

(रु.कोटीत)

कर्जाचा तपशील	शासन हमी (मुद्दल)	दंडनीय व्याज	एकूण
खु.बा. कर्ज	३.२९	१.९६	५.२५
भारतीय जीवन विमा निगमकडून कर्ज	२१.३१	११.८३	३३.१४
एकूण	**२४.६०**	**१३.७९**	**३८.३९**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने स्थानिक स्वराज्य संस्थांकडून शासन हमीची वसुली करण्यासाठी विविध उपाययोजना केल्या, परंतु त्यास योग्य तो प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वतीने शासनाला शासन हमीची परतफेड करता आलेली नाही.

(४) उद्योग विभाग

६.६ शासनास हमी शुल्क प्रदान न केल्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत :-

महामंडळास सन १९९६-९७ या वित्तीय वर्षापासून तोटा होण्यास सुरुवात झाली, तरीसुध्दा महामंडळ सुरळीतपणे त्याच्या मुद्दलाच्या वसुलीतून हमी शुल्काची रक्कम सन २००२-०३ पर्यंत प्रदान करत होते.

महामंडळाने नवीन कर्ज पुरवठा सन २००५-०६ पासून बंद केल्याने अनुत्पादक कर्जात वाढ झाली व चांगल्या कर्जदारांनी कमी झालेल्या व्याज दराचा फायदा घेण्यासाठी महामंडळाकडील कर्ज खाते मुदत पूर्व बंद करुन इतर वित्तीय संस्थेकडे स्थलांतर केले. या कारणाने महामंडळाचे उत्पन्न कमी होत गेले व महामंडळ सप्टेंबर, २००३ पासून शासनास हमी शुल्क परत करण्यात कसूरदार ठरले. त्यानंतर सन २००३ ते २०१० या कालावधीत हमी शुल्काची रक्कम माफ करणेबाबत शासनाच्या वित्त विभागास पत्र व्यवहार केला. परंतु वित्त विभाग सदर प्रस्तावाशी सहमत नाही.

महामंडळाची गेल्या ४ वर्षाची कर्ज वसुली ही एसएलआर बंधपत्राचे पूर्ण दायित्व फेडण्यास पुरेशी नव्हती. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने वित्तीय वर्ष सन २००७-०८ मध्ये रुपये ३१.३२ कोटी, सन २००८-०९ मध्ये रुपये ३२.६८ कोटी आणि सन २०१०-११ मध्ये रुपये २७.६४ कोटी असे अर्थसंकल्पीय तरतुदीतून अर्थसहाय्य केले आहे.

महामंडळाने दिनांक ३१.०८.२०१० पर्यंत शासनास हमी शुल्काची रक्कम रुपये ३१.४४ कोटी तसेच महालेखाकारांच्या लेखा परिक्षकांनी परिगणना केलेल्या दंडात्मक व्याजाचा भरणा केलेला नाही. हमी शुल्काची रक्कम ही संविधीक दायित्व (Statutory Liability) असल्यामुळे सदर दायित्वाची पूर्तता महामंडळ प्रशासकीय खर्च वगळून उरणाऱ्या कर्ज वसुली रक्कमेमधून करेल. पर्यायाने शासनाला महामंडळास होणाऱ्या कमी कर्ज वसुलीमुळे पूर्तता न करु शकणाऱ्या बंधपत्राच्या दायित्वाची तसेच अदत्त हमी शुल्क रक्कमे एवढी अर्थसंकल्पीय तरतूद करावी लागेल.

महामंडळास जून २००९ पासून मुख्य न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार त्याच्या वसुलीपैकी ३०% रक्कम सिडबीसाठी ठेवावी लागत आहे. अशाप्रकारे महामंडळ उर्वरित ७०% कर्जवसुली मधून प्रशासकीय खर्च व इतर संविधिक दायित्वापोटीचा खर्च भागविल्यावर उरणाऱ्या रकमेचा विनियोग करीत आहे. म्हणून महामंडळाने हमी शुल्क अदा करण्यासाठी नव्याने ३१.४४ कोटी रुपयाची पुरवणी मागणीद्वारे अतिरिक्त अर्थसंकल्पीय तरतूद करण्यासाठी सुधारीत प्रस्ताव शासनास सादर केला आहे.

(५) ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण) विभाग

६.७ महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाने कर्जरोखे मालिका १,२ व ३ च्या माध्यमातून रुपये १०३.०४ कोटीचा निधी उभारला आहे, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

मालिका	**मालिकेचा कालावधी**	**उभारलेला निधी (रु.कोटीत)**
एक	१६.०२.२००१ ते ०४.०३.२००१	४२.६६
दोन	१६.१२.२००१ ते १२.०६.२००२	५७.३७
तीन	१४.०२.२००३ ते २७.०५.२००३	३.०१
एकूण		**१०३.०४**

शासनाने विहीत केलेल्या दराप्रमाणे (२%) वरील मालिकांच्या बाबतीत महामंडळाने दिनांक ३०.०९.२००३ पर्यंत रुपये २,२८,३१,०००/- इतक्या हमी शुल्काचा शासनाकडे भरणा केला असून त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

मालिका क्र.	**हमी शुल्काचा कालावधी**	**भरलेली रक्कम (रु.)**	**भरणा केल्याचा दिनांक**
एक	१.११.०१ ते ३१.०३.०२	४०,२९,०००/-	०८.०४.२००२
एक	१.४.०२ ते ३०.९.०२	४८,५०,०००/-	०९.१०.२००२
एक	१.१०.०२ ते ३१.३.०३	४८,५०,०००/-	०७.०४.२००३
एक	१.४.०३ ते ३०.०९.०३	४८,५०,०००/-	०३.१०.२००३
दोन	१.६.०३ ते ३०.०९.०३	४२,५२,०००/-	०३.१०.२००३
एकूण		**२,२८,३१,०००/-**	

दिनांक ३१.०३.२००६ अखेरपर्यंत रुपये १३.७७ कोटी इतकी रक्कम हमी शुल्क (दंडनीय व्याजासह) शासनाकडे भरावयाची बाकी आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

(रुपये कोटीत)

मालिका क्र.	**हमी शुल्क**	**दंडनीय व्याज**	**एकूण**
एक	३.०१	०.९५	३.९६
दोन	६.१०	३.४३	९.५३

तीन	०.२१	०.०७	०.२८
एकूण-	**९.३२**	**४.४५**	**१३.७७**

महामंडळाकडे उत्पादनाचे कोणतेच साधन उपलब्ध नाही. महामंडळाने कर्ज रोख्याद्वारे उभारलेल्या रुपये १०३.०४ कोटीतूनच हमी शुल्काची रक्कम रुपये २,२८,३१,०००/- शासनाकडे देय दिनांकास भरली आहे. तद्नंतर महामंडळाकडे निधी उपलब्ध नसल्यामुळे हमी शुल्काची रक्कम शासनाकडे भरता आली नाही.

साक्ष :

६.८ विभागाने पुरविलेल्या उपरोक्त लेखी माहितीच्या आधारे अधिक माहितीसा जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक ८ सप्टेंबर, २०१०, दिनांक २० सप्टेंबर, २०१० व दिनांक ५ जानेवारी, २०११ रोजी उद्योग विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, जलसंधारण विभाग, जलसंपदा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली.

जलसंपदा विभाग :

६.९ मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या साक्षीचेवेळे समितीने जलसंधारण विभागाच्या सचिवांना परिच्छेद क्रमांक ६.३ "हमी शुल्क प्रदान न करणे" यासंदर्भात समितीला थोडक्यात माहिती द्यावी. असे विभागीय सचिवांना सांगितले असता, जलसंपदा विभागाकडे सन २००४ पासून वेगवेगळया महामंडळा अंतर्गत ३,४३२ कोटी रुपये शासन हमी शुल्क प्रलंबित होते. ही रक्कम महामंडळाची स्थापना झाल्यापासून होती. ही सर्व महामंडळांची रक्कम आहे. महामंडळाकडे भांडवलाशिवाय उत्पन्नाचे दुसरे साधन नाही. पाणीपट्टी शासन वसूल करते. इतरही महामंडळांकडे शासन हमीची रक्कम थकीत असू शकते. ही रक्कम माफ न करता ती अर्थसंकल्पीत करुन पुस्तकी समायोजनेद्वारे समायोजित करावी, असा प्रस्ताव शासनास सादर केला होता. त्यानुसार मार्च, २००९ मध्ये समायोजन करण्यात आलेले आहे. सन २००९-१० ची प्रलंबित रक्कम ५९.३५ कोटी रुपये आहे आणि सन २०१०-११ ची प्रलंबित रक्कम ४५.४१ कोटी रुपये आहे.

६.१० महामंडळाला उत्पन्नाचे दुसरे साधन नाही. पाणीपट्टी शासन वसूल करते तसेच प्रकल्प पूर्ण करण्यासाठी पैसे नव्हते म्हणून खुल्या बाजारातून कर्जरोख्यांच्या माध्यमातून पैसे उभे करण्यात येतात असे सांगितले. यासंदर्भात वित्त सचिवांनी सांगितले की, सन १९९५-९६ मध्ये जलसंपदा विभागाने कर्जरोखे काढून निधी उभारलेला आहे. महामंडळाने कर्जरोखे काढले त्याला शासनाची हमी होती.

६.११ पैसे उभे करण्यासाठी महामंडळांची स्थापना झालेली आहे असे असले तरी महामंडळाला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही काय ? कारण प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर तो शासनाकडे हस्तांतरीत केला जातो व पाणीपट्टी शासन वसूल करते. याबाबत समितीने विचारणा केली असता, विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, महामंडळाला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही व महामंडळाच्या अधिकाऱ्यांचे/कर्मचाऱ्यांचे पगार शासनच करते अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली असे सांगितले असता जर महामंडळाकडे उत्पन्नाचे साधन नसेल तर महामंडळ कशासाठी ठेवायचे ? असे मत समितीने व्यक्त केले.

६.१२ मागील ५ ते १० वर्षामध्ये विदर्भ विकास महामंडळ किंवा कृष्णा खोरे विकास महामंडळ यांनी किती जमिनी विकलेल्या आहेत किंवा भाड्याने दिलेल्या आहेत ? याबाबत माहिती देताना कार्यकारी संचालक, तापी खोरे विकास महामंडळ यांनी असे सांगितले की, तापी खोरे विकास महामंडळाकडे जमिनी आहेत. परंतु महामंडळाने त्या जमिनी भाडयाने दिलेल्या नाहीत.

६.१३ कृष्णा खोरे विकास महामंडळाने किती जमिनी विकलेल्या आहेत किंवा भाडयाने दिलेल्या आहेत ? विदर्भ विकास महामंडळाने किती जमिनी विकलेल्या आहेत किंवा भाडयाने दिलेल्या आहेत ? त्यातून जे पैसे येतात ते कोठे जातात ? महामंडळ तोटयात आहे की फायद्यात आहे ? असे समितीने विभागास विचारले असता, महामंडळ तोटयात आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

६.१४ ज्या कामासाठी महामंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे ती कामे/प्रकल्प शंभर टक्के पूर्ण झालेली आहेत काय ? तसेच महामंडळाला केंद्र शासनाकडून, वेग वधित सिंचन लाभ कार्यक्रम अंतर्गत व अर्थसंकल्पामधून किती निधी मिळतो ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, अद्याप काही कामे सुरु आहेत. अर्थसंकल्पामधून ७,७०० कोटी रुपये आणि केंद्र शासनाकडून २,८०० कोटी रुपयांच्या आसपास निधी मिळतो. फंड निर्माण करणे हा उद्देश होता. प्रत्येक गोष्ट महामंडळ स्तरावर होती ती नदी खोरे विभाग निहाय स्तरावर नेलेली आहे. जवळपास एक हजार प्रकल्प सुरु आहेत. त्याचे मॉनेटरिंग मुंबई येथून न होता त्या स्तरावर होत आहे.

६.१५ महामंडळ स्थापन झाल्यापासून महामंडळाकडे जी मालमत्ता होती ती महामंडळाने वेगवेगळया कारणासाठी वेगवेगळया लोकांना दिलेली आहेत. म्हणजे महामंडळाने प्रकल्पासाठी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास, विश्रामगृह चालविण्यासाठी जागा भाडेतत्त्वावर किंवा बांधा व वापरा या तत्वावर दिलेली आहे. याबाबतची सर्व महामंडळांची यादी समितीला एक महिन्यात सादर

करावी असे निदेश समितीने विभागास दिले. महामंडळ जागा विकत देते की भाड्याने देते ? यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, महामंडळ जागा विकत नाही. महामंडळ जागा भाड्याने देते.

६.१६ हमी शुल्काचे पैसे कसे परत करणार आहात ? दरवर्षी किती पैसे द्यावे लागतात, एवढी थकबाकी कशी काय झाली ? अशी समितीने विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, अर्थसंकल्पात तरतूद करुन पैसे परत केले जातील. सन २००९-१० चे ५९.३५ कोटी रुपये आहे आणि सन २०१०-११ चे ४५.४१ कोटी रुपये द्यावयाचे राहिलेले आहेत. म्हणजेच दरवर्षी जवळपास ६० कोटी रुपये द्यावे लागतात. मागील दोन वर्षाचे पैसे द्यावयाचे राहिलेले आहेत. वित्त विभागाकडे नस्ती पाठविलेली आहे यावर जी रक्कम द्यावयाची राहिलेली आहे त्या रक्कमेवर व्याज आकारले जाते. त्यामुळे ती रक्कम वाढत जाते असे समितीने मत व्यक्त केले.

६.१७ सचिवांनी समितीला असेही सांगितले की, यासंदर्भात वित्त विभागाकडे जुलै महिन्यात जलसंपदा विभागाकडून प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. तो प्रस्ताव वित्त विभागाकडून त्रुटी काढून परत आल्यानंतर त्रुटींची पूर्तता करुन सदर प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविण्यात आलेला आहे. अर्थसंकल्पात तरतूद वित्त विभागाने केली मात्र तसेच समितीच्या सुचनांप्रमाणे कार्यवाही विभागाकडून केली जाईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिले.

सार्वजनिक बांधकाम विभाग

६.१८ परिच्छेद क्रमांक ६.३ "हमी शुल्क प्रदान न करणे" यासंदर्भात महालेखाकारांना काही माहिती द्यावयाची आहे काय अशी विचारणा समितीने महालेखकार यांना केली असता, महालेखाकारांनी सांगितले की, "this paragraph pertains to non payment of guarantee fees. The State Government has given a guarantee for MSRDC to various institutions/bond holders to assure them the repayment of principal amount of loans. The guarantee fee was to be credited to Government Account by the MSRDC. However, as the guarantee fee was not paid by the MSRDC, the total amount of guarantee fee outstanding has been accumulated upto Rs. ८० crores. This is a huge amount. We have just received a reply from MSRDC saying that the guarantee fee amount is converted into equity. I think this is not a solution. MSRDC is a chronically loss making Corporation. I think this is just like a write-off."

६.१९ यासंदर्भात सचिवांनी असे सांगितले की, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ कर्ज घेते त्यावेळी त्यास राज्य शासन हमी देत असते. त्यासाठी म.रा.र.वि.म. राज्य शासनाला २ टक्के हमी फी द्यावी अशी तरतूद आहे. एकूण हमीची रक्कम १९०२ कोटी रु. होते आणि हमी शुल्काची रक्कम ८०.४९ कोटी रुपये होते. या हमी शुल्का ऐवजी तेवढ्याच किंमतीचे समभाग शासनाचा सहभाग म्हणून घेण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. त्यामुळे ४५४/- कोटीचे समभाग शासनाच्या नावावर झाले. त्याचे समायोजन झाले आहे.

६.२० त्यावर महालेखाकारांनी माहिती देताना सांगितले की, The MSRDC should have been asked to pay the guarantee fee of about Rs. ८० crores. Rupees ८० crores is not a small amount. Conversion of guarantee fee into equity is just like a write-off. This is not a financially sound decision. MSRDC is a loss making Corporation. By standing behind the Corporation, the Government is encouraging them to adopt such practice यावर प्रत्येक वेळी हे महामंडळ तोट्यातच राहील असे नाही. ज्यावेळी या महामंडळास फायदा होईल त्यावेळी शासनाला देखील फायदा होईल असे विभागीय संचालक म.रा.र.वि.म. यांनी सांगितले. याबाबतीत महालेखाकारांनी समितीला टिप्पणी द्यावी व अशा प्रकारे आतबट्टयाचा व्यवहार करु नये अशी समिती शासनास शिफारस करील असे समितीने सुचिविले.

६.२१ आतापर्यन्त महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मार्फत किती खर्चाची कामे झालेली आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, वित्तीय सल्लागार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी सांगितले की, आता पर्यन्त महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ ८३१० कोटीची कामे केलेली आहेत. कर्ज काढून पैसे उभे केलेले आहेत. ४३०० कोटीच्या कर्जाची परतफेड करायची आहे. पथकर नाक्यावरुन येणा-या पैशातून ४१४४ कोटीची परत फेड केलेली आहे.

६.२२ याच संदर्भात समिती अधिक माहिती घेण्यासाठी अशी विचारणा केली की, राज्यात किती ठिकाणी पथकर घेण्यात येतो ? तसेच पथकरापासून दरमहा किती उत्पन्न मिळते ? याबाबत माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, राज्यात ८९ ठिकाणी पथकर घेण्यात येतो. सन २००९-२०१० मध्ये ४३६ कोटी रु. इतके उत्पन्न प्राप्त झाले होते.

६.२३ महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळवर ४ हजार कोटीचे कर्ज आहे. जेवढे उत्पन्न महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळला मिळते तेवढयाच रकमेचा व्याजाचा हप्ता त्यांना द्यावा लागतो. अशी परिस्थिती असेल तर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ कर्जाची परतफेड कशी करील या समितीच्या सूचक प्रश्नाला उत्तरे देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, पथकरापासून मिळणारे

उत्पन्न वाढत राहाणार आहे. परंतु पथकरनाके हे ठराविक वर्षाच्या मुदतीने ठेकेदाराला देण्यात येतात. पथकरामध्ये वाढ झाली तर त्याचा फायदा महामंडळाला न होता तो ठेकेदारालाच होईल असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, परिगणने प्रमाणे १५ वर्षात ४००० कोटी कर्ज फेडू शकतो.

६.२४ समितीला महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या एकूण कारभाराविषयीची एक टिप्पणी आणि अहवालाची प्रत द्यावी असे आदेश समितीने विभागास साक्षीचे वेळी दिले होते. त्यानुसार विभागाकडून पुढीलप्रमाणे लेखी माहिती समितीस प्राप्त झाली आहे.

६.२५ महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची स्थापना १९९६ मध्ये, प्रामुख्याने खाजगी क्षेत्राच्या सहभागाने रस्ते विकासाचा कार्यक्रम राबविण्यासाठी करण्यात आली. महामंडळाने हाती घेतलेले बहुतांशी प्रकल्प "बांधा, वापरा व हस्तांतर" करा या तत्त्वावर आधारित आहेत. महामंडळ प्रामुख्याने रस्ते प्रकल्प, उड्डाणपुल प्रकल्प, पथकर वसुली अधिकार इ.कामे पाहते.

६.२६ सुरुवातीच्या काळात मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग प्रकल्प, मुंबई व परिसरातील उड्डाणपूल, रेल्वे उड्डाणपूल प्रकल्प महामंडळाकडे अंमलबजावणीकरीता सोपविण्यात आले होते. सदर प्रकल्पांची व्यवहार्यता पथकर वसूली, सवलतीच्या काळातील इतर उत्पन्न तसेच महाराष्ट्र शासन व इतर शासन संस्थांकडून मिळणारे अनुदान यावर आधारीत होती. या स्त्रोतांमार्फत मिळणारे उत्पन्न तसेच महाराष्ट्र शासन व इतर शासन संस्थांकडून मिळणारे अनुदान विचारात घेऊन सदर प्रकल्पांना महाराष्ट्र शासनाने मान्यता दिली. सुरुवातीच्या काळातील वरील तीन प्रकल्पाची अंमलबजावणी केल्यानंतर महाराष्ट्र शासनाने विविध प्रकल्प महामंडळाकडे सोपविले. वर नमुद केल्याप्रमाणे रु.८,७११ कोटी इतक्या अंदाजित खर्चाची प्रकल्पांची कामे महामंडळाकडे सोपविण्यात आली असुन त्यावर दि.३१ डिसेंबर, २०१० अखेर प्रत्यक्ष झालेला खर्च रु.८,०६० कोटी इतका आहे. दि.३१ डिसेंबर, २०१० अखेर प्रकल्पांची अंदाजित किंमत व प्रत्यक्ष झालेला खर्च यांचे विवरण पत्र सोबत जोडले आहे. **(विवरण पत्र - ९).** प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यासाठी वेळोवेळी कर्जे उभारण्यात आली. एकुण रु.८,५२१ कोटी कर्ज व कर्जरोखे उभारण्यात आले आहेत. प्रकल्पासाठी लागणारा खर्च हा वेळोवेळी उभारलेल्या कर्जामार्फत करण्यात आला असून उभारलेल्या कर्जाचे विवरणपत्र सोबत जोडत आहे. **(विवरण पत्र - १०)** शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार योजनेची मंजूरी व त्यास शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानाची तरतूद लक्षात घेवून महामंडळाने प्रकल्पांची अंमलबजावणी केली आहे. प्रकल्पासाठी मान्य केलेले अनुदान शासनाकडून वेळेवर न मिळाल्याने महामंडळाने अतिरिक्त कर्जाची उभारणी केली आहे. महाराष्ट्र शासन

व इतर शासन संस्थांकडून वेगवेगळ्या प्रकल्पांकरीता डिसेंबर, २०१० अखेर महामंडळास एकूण रु.३,२४६.१० कोटी इतकी रक्कम अनुदानापोटी थकीत आहे. यामध्ये महाराष्ट्र शासनाकडून येणे असलेले रु.२,५०४.०९ कोटीचा समावेश आहे. महाराष्ट्र शासन व इतर शासन संस्थांकडून वेगवेगळ्या प्रकल्पांकरीता डिसेंबर २०१० अखेर थकीत रक्कमेवरील व्याजापोटी रु.२,९५३/- कोटी शासनाकडून प्रलंबित आहे. महाराष्ट्र शासन व इतर संस्थांकडून येणे असलेले अनुदानाचा तपशील **विवरण पत्र क्र.- ११** मध्ये सोबत जोडत आहे तसेच कर्जाचा (कर्जफेडीसह) आणि अतिरिक्त व्याजाचा तपशील **विवरण पत्र - १२** मध्ये जोडत आहे.

६.२७ महामंडळाने विविध उपलब्ध स्त्रोतांमार्फत कर्ज व कर्जरोखे उभारुन सदर प्रकल्पांची अंमलबजावणी केलेली आहे. कर्जे व कर्जरोखे यांची त्यांच्या अटी व शर्तीनुसार महामंडळ नियमितपणे परतफेड करीत आहे. महामंडळाने डिसेंबर २०१० पर्यंत एकूण रु.४,५८४ कोटीची परतफेड केलेली असून रु.३,९३७ कोटी थकीत आहेत.

६.२८ महामंडळाने हाती घेतलेल्या प्रकल्पांचा सवलतीचा काळ (Concession Period) हा बहुतांशी ३० वर्षापर्यंतचा आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने हाती घेतलेल्या प्रकल्पांच्या सवलतीचा काळ हा दीर्घ आहे. प्रकल्पापासून मिळणारे उत्पन्न हे प्रकल्पाच्या सुरुवातीच्या काळात कमी असते. वाहतुकीमध्ये आणि पथकरामध्ये वेळोवेळी होणाऱ्या वाढीमुळे दरवर्षी साधारणत: ७ टक्के व ते १० टक्के इतकी वाढ पथकर उत्पन्नात होते. म्हणजेच रोकड प्रवाह हा प्रकल्पाच्या शेवटच्या काळात जास्त असतो आणि शेवटी, कर्जाची परतफेड झाल्यामुळे, व्याज भार कमी होत जातो. त्यामुळे प्रकल्पापासून मिळणारा नफा हा प्रकल्पाच्या शेवटच्या काळात जास्त मिळतो. सवलतीच्या कालखंडात प्रकल्पा पासून मिळणाऱ्या उत्पन्नाद्वारे महामंडळ कर्जाची परतफेड करत असते. परंतु प्रकल्पाच्या सुरुवातीच्या काळात तोटा हा सुरुवातीच्या काळातला (Gestation Period) असून अपेक्षित आहे. नंतरच्या काळात हा तोटा भरुन येणे अपेक्षित आहे.

६.२९ महामंडळाचे प्रकल्प सवलतीच्या काळामध्ये सुसाध्य आहेत. तथापी सवलतीचा काळ हा बहुतांशी ३० वर्षापर्यंतचा असल्याने प्रकल्पापासून मिळणारे उत्पन्न हे प्रकल्पाच्या सुरुवातीच्या काळात कमी असते. कर्ज परतफेडीचा कालावधी हा १० ते १५ वर्षापर्यंतचा असल्यामुळे सुरुवातीच्या काळात कर्जपरतफेडीची रक्कम ही मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा जास्त असते. त्यामुळे सुरुवातीच्या काळात रोकड तोटा दिसतो. निधीची आवश्यकता व तोटा भरुन काढण्यासाठी सुरक्षितीकरण (Securitization) करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने मान्यता दिली आहे. (पत्र सोबत जोडत आहे.)

६.३० एखाद्या प्रकल्प कार्यान्वित झाला की, व्याजाचा खर्च हा चालू कामकाजातून करावा लागतो. परंतु गर्भित काळात (Gestation Period) पथकरामुळे मिळणारे उत्पन्न व्याजाचा पूर्ण खर्च भरुन काढण्यासाठी पुरेसे नसते. शासन व इतर संस्थांकडून बाकी असलेले हे येणे वेळच्यावेळी मिळाले असते तर व्याजाचा बोजा या रकमेने कमी झाला असता. कारण हा सहभाग न मिळाल्यामुळे महामंडळास जास्त दराने बाजारातून कर्ज घ्यावे लागले व त्यामुळे व्याजाचा भरणा जास्त झाला.

६.३१ म्हणजेच महामंडळाचा सन २००९-२०१० सालापर्यंत निदर्शनास येणारा रु.२,८८१/- कोटी इतका आवर्तीत तोटा हा मूलतः या जादा व्याजाच्या भरण्यामुळे आलेला आहे. महामंडळाचा आवर्तीत रोकड तोटा (Cash Loss) हा ३१ मार्च, २०१० अखेर रु.१,१२७ कोटी इतका आहे. तसेच सन २००९-२०१० मध्ये रु.१४.१८ कोटीचा रोकड नफा आहे. सदरचे अनुदान अर्थसंकल्पातील निधी उपलब्धतेनुसार टप्प्याटप्प्याने महामंडळास देण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न चालू आहेत व त्यासाठी महामंडळ शासनाकडे नियमितपणे पाठपुरावा करीत आहे. महाराष्ट्र शासन व इतर शासन संस्थांकडून वेगवेगळ्या प्रकल्पांकरीत डिसेंबर २०१० अखेर महामंडळास एकूण रु.३,२४६ कोटी इतकी रक्कम अनुदानापोटी थकीत असुन थकीत रकमेवरील व्याजापोटी रु.२,९५३ कोटी शासनाकडून प्रलंबित आहे. महामंडळ कर्जे व कर्जरोखे यांची त्यांच्या अटी व शर्तीनुसार नियमितपणे परतफेड करीत आहे. तसेच पथकर उत्पन्नाचे सुरक्षितीकरणकरुन (Scecuritization) अग्रिम उत्पन्नाद्वारे कर्जाची परतफेड करीत आहे. या द्वारे प्राप्त झालेली पूर्ण रक्कम नफा व तोटा खात्यामध्ये नसून ते अग्रीम म्हणून घेतलेली असल्यामुळे तोटा दिसतो परंतु म.रा.र.वि.महामंडळाकडे रोकड प्रवाह सुरळीत आहे व कर्जफेडीमध्ये काही कसूर होत नाही. महामंडळाकडे असलेल्या उत्पन्नाची साधने वाढत असुन प्रकल्पाची एकूण सद्यःमुल्य स्थिती (NPV) सकारात्मक असल्याचे दिसत आहे.

महामंडळाने अवलंबिलेल्या वरील धोरणांस केअर (CARE) या पतसंस्थेने (Rating Agency) मान्यता दिलेली आहे. वित्तीय वर्ष सन २००९-२०१० च्या अंदाजित रोकड प्रवाहानुसार केअर (CARE) या संस्थेतर्फे महामंडळास BBB (+) (SO) हा दर्जा प्रदान करण्यात आलेला आहे. अगोदरचा दर्जा BBB (-) (SO) हा दर्जा प्रदान करण्यात आलेला आहे. अगोदरचा दर्जा BBB (-) (SO) होता.

महामंडळाच्या पुढील १५ वर्षाच्या उद्योगाचे मुल्यांकन तसेच अंदाजित रोकड प्रवाह सोबत जोडत आहे.

पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग :

६.३२ परिच्छेद ६.३ "हमी शुल्क प्रदान न करणे" यासंदर्भात माहिती देताना पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या प्रधान सचिवांनी असे सांगितले की, या परिच्छेदामध्ये हमी शुल्काबाबत नोंद आहे. कर्जदार आयुर्विमा महामंडळ व खुल्या बाजारातील कर्ज घेतो. याठिकाणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने स्थानिक संस्थांच्या वतीने कर्ज उभारले असून त्यासाठी महानगरपालिका आणि नगरपालिका यांना यातील दर १०० रुपयामागे २ रुपये इतके हमी शुल्क देय असते. हे पैसे दरवर्षी १ एप्रिल व १ ऑक्टोबर रोजी देणे आवश्यक आहे. त्यानंतर जर हे पैसे दिले तर त्यावर पहिल्या तीन महिन्यांमध्ये १६ टक्के दराने व्याज व त्यानंतर २४ टक्के दराने दंडनीय व्याज आकारले जाते असा हा नियम आहे. सन २००१ पर्यंत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ही हमी शुल्काची रक्कम नगरपालिका व महानगरपालिका यांच्या वतीने शासनास वेळेवर भरत होती. परंतु त्यानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ही रक्कम सन २०१० पर्यंत विहित वेळेत भरु शकलेली नाही. ती रक्कम आता ८४ कोटी रुपयांच्या वर गेलेली आहे. ८४ कोटी रुपयांपैकी ४० कोटी रुपये हे हमी शुल्काची मुळ रक्कम आहे, तर ४४ कोटी रुपये दंडनीय व्याज आहे. यामध्ये एकूण १० महानगरपालिका आहेत. धुळे, कोल्हापूर, अमरावती, अकोला, नागपूर, उल्हासनगर, मालेगांव, अहमदनगर, औरंगाबाद व वसई - विरार ही त्यांची नावे आहेत.

६.३३ यासंदर्भातील वसुलीकरिता विभागाने कोणत्या प्रकारचा पाठपुरावा केला होता, अशी विचारणा समितीने केली असता, सन २००८ ते सन २०१०मध्ये विभागाने नगरविकास विभागाला पत्र लिहिले होते. या स्थानिक संस्थांना जे पैसे शासनाकडून देय आहे, त्यामधून हमी शुल्काची रक्कम वळती करुन घ्यावी. यासंदर्भात वळते केलेले पैसे खर्च झालेले आहेत. व या रकमेवरील व्याजाची परतफेड पुस्तकी समायोजनाद्वारे करावी, असा प्रस्ताव आता विभागामार्फत तयार करण्यात आलेला आहे. या समायोजनाची नोंद महसूल वसूली प्रमाणपत्र (Revenue Recovery Certificate) मध्ये करण्यात यावी, असाही निर्णय घेण्यात आला होता. महसूल वसूली प्रमाणपत्र (Revenue Recovery Certificate) मध्ये समायोजीत करण्यात आलेल्या रक्कमा आणि व्याजाच्या संदर्भात १५ महानगरपालिका आणि १०८ नगरपालिका संबंधित आहेत, खुल्या बाजारातील कर्जावरील हमी शुल्काची थकबाकी असलेल्या ८ महानगरपालिका आणि ५४ नगरपालिका आहेत. या व्यतिरिक्त १० नगरपालिका पुढीलप्रमाणे आहेत. लातूर, जालना, वर्धा, बुलढाणा, अंबेजोगाई, येवला, बीड, गडचिरोली, कामठी, तुमसर या महानगरपालिका/नगरपालिकांकडे एकूण थकबाकीच्या ६७ टक्के एवढी थकबाकी आहे. नगरविकास विभाग यांना पत्र लिहिले याच्या व्यतिरिक्त विभाग त्यांच्याकडून जे अनुदान या स्थानिक संस्थांना देय आहे, त्यामधून ही हमी शुल्काच्या वसुलीची रक्कम वळती करुन घेण्याबाबत महसूल

वसूली प्रमाणपत्र (Revenue Recovery Certificate) मध्ये त्याचा उल्लेख देखील करणे क्रमप्राप्त आहे. त्यानंतर असा निर्णय धेण्यात आला की, हमी शुल्काची रक्कम भरल्याशिवाय स्थानिक संस्थांना देय असलेल्या अनुदानाचा पैसा मुक्त करता येणार नाही. याची अंमलबजावणी विभाग या नात्याने आम्ही करीत असतो. यामुळे गेल्या चार ते पाच वर्षांमध्ये १३ ते १५ कोटी रुपयांची वसुली झालेली आहे.

६.३४ नगरविकास विभागाचे प्रतिनिधी, विभागीय आयुक्त, यांना बोलावून कारवाई विषयक अहवाल बनवून शासनाचा पैसा वसूल करण्यासाठी समिती विभागास मदत करु शकते असे समितीने विभागास सुचित केले त्यानुसार दिनांक ५ जानेवारी, २०११ च्या साक्षीच्या बैठकीच्या वेळी पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या सचिवांनी असे सांगितले की, दिनांक ८ सप्टेंबर, २०१० रोजीच्या समितीच्या साक्षीच्या बैठकीच्या वेळी ज्या ज्या महानगरपालिका व नगर परिषदांकडे जास्तीतजास्त थकबाकी आहे, आणि ज्यांनी शासनाकडे हमी मागितलेली आहे, त्यासंबंधातील माहिती समितीला सादर करण्यात यावी असे सांगण्यात आले होते. त्यानुसार १० महानगरपालिका आणि १० नगरपरिषदा यांच्याकडे ६७ टक्के एवढी थकबाकी होती. त्यानुसार धुळे, कोल्हापूर, अमरावती, अकोला, नागपूर, उल्हासनगर, मालेगाव, अहमदनगर, औरंगाबाद व नांदेड यांच्याकडे दिनांक ३१-०३-२०१० पर्यंत एकूण ३८.४२ कोटी रुपयांची थकबाकी होती. तसेच लातूर, जालना, बुलढाणा, वर्धा, अंबेजोगाई, चंद्रपूर, येवला, कामठी, बीड, गडचिरोली यांच्याकडे दिनांक ३१-०३-२०१० पर्यंत २९.२६ कोटी रुपयांची थकबाकी होती. सन २०१०-२०११ मध्ये एकंदर अडीच कोटी रुपये वसुल करण्यात आलेले आहेत, तसेच मागच्या वेळेस या विषयाच्या अनुषंगाने साक्ष झाली होती. त्यानंतर संबंधितांबरोबर पत्रव्यवहार करुन पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच महानगरपालिका व नगरपरिषदा यांच्याबरोबर देखील बैठक घेण्यात येत असून नागपूर महानगरपालिकेकडे २,५५,४१,९२१ कोटी रुपयांची थकबाकी असून, त्यापैकी १०१.४६ लाख भरण्यात आले आहेत. तसेच उल्हासनगर महानगरपालिकेकडे ९३,२७,२२८ लाख रुपयांची थकबाकी असून, त्यांनी ते पूर्ण भरलेले आहे आणि वसई-विरार नगरपरिषद लवकरच धनादेश देणार आहेत. तसेच लोकलेखा समितीने या विषयाच्या अनुषंगाने समितीची बैठक आयोजित केल्यावर त्याला प्रतिसाद म्हणून काही वसुली झालेली आहे असेही विभागीय सचिवांनी समितीला सांगितले.

६.३५ पुणे, कोल्हापूर व अमरावती महानगरपालिका यांच्याकडून किती थकबाकी आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, दिनांक ३१-१२-२०१० पर्यंत कोल्हापूर महानगरपालिकेकडील आयुर्विमा महामंडळ व खुल्या बाजारातील कर्जाच्या संदर्भातील थकबाकी ८.३४ कोटी इतकी आहे. पुणे महानगरपालिकेची थकबाकी नाही तसेच अमरावती

महानगरपालिकेकडील आयुर्विमा महामंडळाच्या कर्जाच्या संदर्भातील थकबाकी ४.८५ कोटी रुपये आहे. त्या व्यतिरिक्त खुल्या बाजारातील कर्जाची थकबाकी नाही.

६.३६ सर्वांपेक्षा धुळे महानगरपालिकेची थकबाकी अधिक आहे? व त्यांनी किती वर्षापासून थकबाकीची रक्कम भरलेली नाही? याबाबत खुलासा करताना उपायुक्त धुळे महानगरपालिका यांनी सांगितले की, दिनांक ३१ मार्च, २०१० पर्यंत १४.२८ कोटी रुपये थकित होते व दिनांक ३१ डिसेंबर, २०१० अखेर १५.६५ कोटी रुपये इतकी थकबाकी आहे.

६.३७ नागपूर महानगरपालिकेने १.०१४६ कोटी रुपये भरले आहेत असे सचिवांनी सांगितले असता, त्यांची थकबाकी २.५ कोटी रुपये इतकी आहे काय असे समितीने विचारले असता त्यावर रुपये १.९१ कोटी थकित होते, त्यापैकी १.०१ कोटी रुपये भरले आहेत. वसुलीसाठी नेहमीप्रमाणे महसूल वसूली प्रमाणपत्राचा आधार घेतला जातो असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

६.३८ थकबाकी वसुलीसाठी स्थानिक संस्थांना स्मरणपत्र दिले जाते, पाठपुरावा केला जातो. विभागाचे अधिकारी प्रत्यक्षपणे भेट देतात. एवढे करुनही ही रक्कम वसूल करणे का शक्य होत नाही? अशी समितीने विचारणा केली असता, पाणीपुरवठा विभागाला जे अधिकार आहेत त्या अधिकाराचा वापर करुन वसुली करता येईल असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले. त्यावर विभागाला जे अधिकार आहेत त्याचा अधिक प्रमाणात वापर करण्याची आवश्यकता आहे काय ? तसेच विभागास प्रदान केलेल्या अधिकारांबाबत समाधानी आहात काय अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी होकारार्थी उत्तर दिले. त्याबाबत जर विभागास दिलेल्या अधिकारांबाबत समाधानी असेल तर विभागाकडून रक्कम वेळेत वसूल का करण्यात आली नाही. जर पाणीपुरवठा विभागाला अधिक अधिकार देवूनही विभाग वसूली करत दिलेल्या अधिकाराबाबत विभाग जर समाधानी असेल तर विभागाला वसुली वेळेत का होत नाही असे विचारले असता, विभागीय सचिवांकडून काहीच त्याबाबतचे उत्तर मात्र सचिवांनी दिले नाही.

६.३९ नगरविकास विभागामार्फत जी अनुदाने वितरित केली जातात त्यामधून ही थकबाकीची रक्कम कपात करणे आवश्यक असून विभागांकडून एकमेकांना कागदोपत्री रकमा देण्या घेण्याचे प्रकार होत असतात. महानगरपालिका, नगरपालिकांना राज्य सरकारकडे वेगवेगळया मार्गाने पैसे भरावयाचे असतात. नगरविकास विभागाकडून महानगरपालिका, नगरपालिकांना विकास कामांसाठी निधी दिला जातो. त्या निधीमधून रक्कम वळती करावयाची झाल्यास अंतर्गत समायोजनेच्या संदर्भात काय पध्दत आहे? अशी विचारणा केली असता सचिवांनी खुलासा केला की, नगरपालिकांकडे रक्कम वसूल करण्याबाबत तगादा लावला तर त्यांचे म्हणणे असे असते की, आम्हाला शासनाकडून अमुक इतका

निधी येणे आहे. ती रक्कम प्राप्त झाल्याशिवाय आम्ही भरणा करु शकत नाही. वित्त विभागाकडून या संदर्भात कशाप्रकारे नियंत्रण ठेवता येईल? त्यांनी थकबाकी भरल्याशिवाय त्यांना शासनाकडून निधी द्यायचा नाही. अन्यथा अंदाजपत्रकाला काही अर्थ राहणार नाही. या संदर्भात वित्त विभागाने स्पष्टीकरण द्यावे. असे समितीने विचारले असता वित्त सचिवांनी सांगितले की, निधीमधून रक्कम कपात केली तर विकास कामांवर परिणाम होऊ शकतो. यासाठी त्यांनी कर उत्पन्न वाढविले पाहिजेत.

६.४० दंड आकार लावला तर थकबाकी कमी होईल अशी कल्पना होती. परंतु हाही उद्देश सफल झालेला नाही? यासंदर्भात खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, व्याजाची व दंडाची आकारणी शासनाकडून केली जाते. एलआयसी, ओएमबी मधून कर्ज उभारले आहे. त्यास शासनाने हमी दिलेली असून त्यासाठीच्या थकीत हमी शुल्कावर दंडाची तरतूद केली गेली आहे.

६.४१ नगरविकास विभागाच्या सचिवांना या प्रश्नामध्ये काही मार्ग काढणे शक्य दिसत नाही का? अशी विचारणा नगरविकास विभागास केली असता, नगरविकास विभागाच्या प्रतिनिधींनी सांगितले की, कर्जावरील हमीशुल्काची व त्यावरील दंडनीय व्याजाच्या रकमेची विविध नगरपालिका व महानगरपालिका यांच्याकडे थकबाकी आहे याची शासनाला जाणीव आहे. विविध महानगरपालिका आणि नगरपालिकांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण किंवा युटीआयकडून वा खुल्या बाजारातून उभारलेल्या कर्जाच्या अनुषंगाने कर्ज परतफेड करण्याबाबत आतापर्यंत विविध स्थानिक स्वराज्य संस्थांना जी योजनेतर अनुदाने दिली जातात त्यामधून रक्कम वळती करण्याची कार्यवाही करीत होतो. वास्तविक प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थांनी घेतलेल्या कर्जाच्या अनुषंगाने, दरवर्षी किती रक्कम मुद्दल व व्याजापोटी भरावी लागेल याबाबत त्यांच्या अर्थसंकल्पात तरतूद केली पाहिजे. परंतु अशी कार्यवाही केली जात नाही.

६.४२ ज्यांच्याकडून अशी कार्यवाही होत नाही त्यांच्याबाबत नगरविकास विभागाचे कशाप्रकारचे नियंत्रण आहे? अशी विचारणा केली असता याबाबत विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सध्या कायद्यामध्ये कर्ज निवारण निधी (सिंकींग फंड) ची तरतूद आहे. प्रत्येक नगरपालिकेला, महानगरपालिकेला कर्ज निवारण निधीची तरतूद ठेवावी लागेल किंवा कर्ज निवारण निधी निर्माण करावा लागेल. त्या निधीला एक किंवा त्यापेक्षा अधिक महसुली उत्पन्नाचा विवक्षित भाग संलग्न करावा. उदा.मालमत्ता कर, जकात कर आणि या माध्यमातून प्रत्येक नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने घेतलेल्या कर्जफेडीच्या चालू हप्त्यापोटीची रक्कम विचारात घेऊन किमान तेवढी रक्कम कर्ज निवारण निधीमध्ये जमा करण्याची व्यवस्था करावी लागेल, असे निर्देश सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना विभागाकडून देण्यात आले आहे.

६.४३ महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १०१ (५)(अ) मध्ये अशी तरतूद आहे की, "या अधिनियमान्वये किंवा त्यावेळेस अंमलात असलेल्या तरतुदी कोणत्याही कायद्यान्वये नगरपालिकेवर देण्याचे दायित्व असेल अशा मुद्दलाच्या व व्याजाच्या सर्व रकमा व त्यांचे सर्व हप्ते देय होतील तेव्हा देणे, या बाबीची तरतूद असल्याशिवाय अर्थसंकल्पास मान्यता देता कामा नये." कर्ज निवारण निधी निर्माण करण्याची अधिनियमात तरतूद असली तरी ज्या नगरपालिका, नगरपंचायती एलआयसी, खुल्या बाजारातून उभारलेल्या कर्जाच्या परतफेडीसाठी त्यांच्या अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद करणार नाहीत अशा नगरपालिका, नगरपरिषदांच्या बाबतीत जिल्हाधिकारी यांना संबंधित नगरपालिका, नगरपंचायतीचा अर्थसंकल्प पुनर्विलोकित करुन परतफेडीच्या रक्कमेचा कर्ज निवारण निधीमध्ये सक्तीने समावेश करणे व सुधारित अर्थसंकल्प मंजुरीचे अधिकार देण्याचे प्रस्तावित आहे तसेच, महानगरपालिकांच्या बाबतीत शासन स्तरावरुन संबंधित महानगरपालिकेचा अर्थसंकल्प पुनर्विलोकित करुन परतफेडीच्या रक्कमेचा कर्ज निवारण निधीमध्ये सक्तीने समावेश करणे व सुधारित अर्थसंकल्प मंजुरीचे शासनास अधिकार देण्याचे प्रस्तावित आहे. याबाबत आवश्यक त्या दुरुस्त्या विविध अधिनियमात करण्याचे प्रस्तावित आहे. अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली.

६.४४ महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम, १९६५ च्या कलम १०१ (५)(अ) मधील तरतुदीचे पालन न केल्यामुळे संबंधित नगरपालिकेचे मुख्याधिकारी किंवा महानगरपालिकेचे आयुक्त किंवा वित्त अधिकारी यांना विभागाने एखादे लेखी पत्र पाठविले आहे का? अर्थसंकल्प तयार केल्यानंतर तो स्थायी समितीपुढे जातो. तेथील लोकप्रतिनिधींच्या ही बाब लक्षात आणून दिली जाते का? नगरविकास विभागाकडून बंधन घातले जात नाही, त्यामुळे थकबाकीची रक्कम वर्षानुवर्षे वाढत जात आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांनी घेतलेल्या कर्जाच्या अनुषंगाने, दरवर्षी किती रक्कम मुद्दल व व्याजापोटी भरावी लागेल याबाबत त्यांच्या अर्थसंकल्पात तरतूद केली पाहिजे अशी कायद्यात तरतूद आहे. परंतु दरवर्षी अर्थसंकल्प तयार होत असताना कर्ज निवारण निधीमध्ये तरतूद केली जात नाही. ही तरतूद केल्याशिवाय अंदाजपत्रकावर सही करणार नाही असे नगरपालिकेचे मुख्याधिकारी ठणकावून का सांगत नाहीत? इ. बाबी समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिल्या असता सचिवांनी असे सांगितले की, त्यासंदर्भात अर्थसंकल्पामध्ये परतफेडीच्या संदर्भात तरतूद करणे आवश्यक आहे. पूर्वी अशी तरतूद केली जात होती. अलिकडच्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थांची आर्थिक परिस्थिती सुदृढ नसल्यामुळे ही कायदेशीर तरतूद बाजूला ठेवून विकास कामांसाठी तरतूद केली जाते. शासनामार्फत स्थानिक स्वराज्य संस्थांना याबाबत निर्देश देता येतील. अर्थसंकल्प तयार

करीत असताना स्थानिक स्वराज्य संस्थांनी कर्जाच्या परतफेडीच्या अनुषंगाने तरतूद केली पाहिजे असे बंधन घालता येऊ शकते. असेही विभागीय सचिवांनी समितीला सांगितले.

६.४५ कोल्हापूर महानगरपालिकेच्या थकबाकी संदर्भात आयुक्त कोल्हापूर यांनी पुढीलप्रमाणे माहिती दिली. अर्थसंकल्पात परतफेडीच्या अनुषंगाने तरतूद केली पाहिजे अशी कायद्यात तरतूद आहे. परंतु अर्थसंकल्प तयार करीत असताना त्यामध्ये जमेचा भाग वेगळा आणि खर्चाचा भाग वेगळा असतो. अर्थसंकल्प तयार करताना उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने करवाढ सुचविली जाते. पाणीपट्टीची थकबाकी द्यावयाची असल्यामुळे नाईलाजाने पाणीपट्टीमध्ये वाढ सुचविली जाते. टीसीएल पावडर, वीज पुरवठ्याची दरवाढ, कर्मचाऱ्यांच्या वेतनात झालेली वाढ आदी गोष्टी विचारात घ्याव्या लागतात. कोल्हापूर महानगरपालिकेचे उदाहरण द्यायचे झाले तर सन २००७ पर्यंत कर्जाची परतफेड केली आहे. सन २००५ मध्ये पाणीपट्टी वाढविण्याचा प्रस्ताव सादर केला होता. तो प्रस्ताव महासभेने नामंजूर केला. सन २००६ मध्ये पुन्हा प्रस्ताव सादर केला असता तो महासभेने नामंजूर केला. सन २००७ मध्ये पुन्हा पाणीपट्टी वाढविण्याचा प्रस्ताव सादर केला असता महासभेने असे सुचविले की, सन २००६-०७ प्रमाणे आकारणी करावी. सन २००८ मध्ये प्रस्ताव सादर केला असता प्रशासनाने सुचविलेल्या दरवाढीऐवजी किरकोळ दरवाढ करण्यास मंजुरी दिली. २००९ मध्ये पाणीपट्टी ना नफा ना तोटा तत्वावर आकारण्यात यावी असा शासनाने निर्णय घेतला. पाणीपुरवठ्यासाठी येणारा खर्च, टीसीएल पावडरचे वाढलेले दर, वीज पुरवठ्याचे वाढलेले दर, शासन हमीशुल्क, कर्जावरील व्याज विचारात घेऊन किती पाणी वापरले जाते याचा ताळमेळ घालून पाणीपट्टी आकारावी असे शासनाने सुचविले. त्यानुसार महासभेपुढे प्रस्ताव सादर केला तरी तो मंजूर केला जात नाही. करवाढ किंवा पाणीपट्टी वाढविली तर पुन्हा सत्ता मिळेल की नाही अशी सत्ताधाऱ्यांच्या मनात साशंकता असते, ही वस्तुस्थिती आहे. शासनाने मालमत्ता कर भांडवली मूल्यावर आकारण्याचा निर्णय घेतला. आम्ही महासभेला ही बाब समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, परंतु प्रस्ताव मंजूर केला जात नाही, त्यामुळे खर्च आणि उत्पन्न याचा ताळमेळ बसत नाही, ही वस्तुस्थिती आहे. कोल्हापूर महानगरपालिकेची थकबाकीची रक्कम ३ कोटी रुपये इतकी आहे. त्यावर दंडनीय व्याजाची रक्कम ४.८० कोटी रुपये आहे. कर्ज घेतले त्यावेळचा व्याजाचा दर १८ ते २४ टक्के असावा. परंतु आज मुद्दलापेक्षा व्याजाची रक्कम अधिक झालेली आहे. बाजारामध्ये आज कमी व्याजदरात कर्ज उपलब्धीची सोय आहे. व्याज माफ केल्यास मुद्दलाची रक्कम भरावी असा पर्याय दिला तर कोल्हापूर महानगरपालिका ही थकबाकीची रक्कम भरण्यास पुढाकार घेईल.

६.४६ नगरविकास विभागामार्फत नगरपालिका आणि महानगरपालिकांना वेगवेगळया विकास कामांसाठी अनुदाने दिली जातात. परंतु कर्ज परतफेडीची रक्कम वसूल करण्यासाठी शासनाने काही भूमिका निश्चित केली आहे का? प्रशासनातर्फे करवाढ किंवा पाणीपट्टी दरवाढीचा प्रस्ताव महासभेपुढे सादर केला जातो, परंतु तो मंजूर केला जात नाही. केवळ पाणीपट्टी वाढविल्याने हा प्रश्न सुटू शकतो का? स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या मालकीच्या जमिनी विकून उत्पन्न वाढविता येईल काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांना यासंदर्भात माहिती देता आली नाही.

६.४७ महानगरपालिका आणि नगरपालिकेला यांना कोण कोणत्या कामासाठी पैसे देण्यात येतात त्याचबरोबर हे पैसे त्यांच्याकडून वसूल करण्यासाठी कोणते प्रयत्न केले जातात ? तसेच महानगरपालिका आणि नगरपालिकांना विविध विकास कामासाठी अनुदान देण्यात येते, त्याचप्रमाणे केन्द्र सरकारकडून, राज्य सरकारकडून अनुदान देण्यात येते. तेराव्या वित्त आयोगाचे अनुदान, रस्ता अनुदान, मुद्रांक शुल्क अनुदान इत्यादीच्या बाबतीत सांगावयाचे म्हणजे ज्या स्थानिक स्वराज्य संस्था कसुरदार आहेत त्यांना द्यावयाच्या अनुदानातून ही रक्कम वळती करुन घेण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे ज्यावेळी हे अनुदान वितरीत करण्याची नस्ती येते त्यावेळी ही रक्कम वळती करुन घेण्याचीच शासनाची भूमिका असते त्याप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांकडे जी काही थकबाकी आहे ती वळती करण्याची कार्यवाही केली जाते. १३ व्या वित्त आयोगाचे जे पैसे त्यांना दिले जाणार आहेत त्यातून ही थकबाकीची रक्कम वळती केली जाणार आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, यासंदर्भात २९ तारखेला शासन निर्णय काढण्यात आला आहे. अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

६.४८ १२ व्या वित्त आयोगाच्या मिळणा-या रकमेतून जवळजवळ ४६ कोटी रुपये आणि १३ व्या वित्त आयोगाच्या मिळणाऱ्या रकमेतून जवळजवळ २६ कोटी २० लाख रुपये वळते करुन घेतले आहेत. यासंदर्भात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे जी काही थकबाकीची रक्कम राहिली आहे ती शासनास मिळणार आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाने होकारार्थी उत्तर दिले.

६.४९ हमी शुल्काच्या बाबतीत १६ व २४ टक्के एवढा दर राज्य शासनाने ठरविलेला आहे. २० वर्षापूर्वी हा दर ठरविण्यात आला होता व त्यावेळी हा दर रास्त होता परंतु आता हा दर ११ ते १५ टक्के करुन पुर्नगणना केले तर त्यांच्यावरील बोजा कमी होईल असे विभागीय सचिवांनी सुचविले असता, २४ टक्क्यावरुन हा दर १५ टक्के केला तर पुन्हा हा दर आणखी कमी करण्यात यावा अशी मागणी केली जाईल असे समितीने विभागास सांगितले.

६.५० ज्या संस्था वेळेवर पैसे देतात आणि ज्या संस्था वेळेवर पैसे देत नाहीत त्या दोघांनाही आपण सारखीच प्रोत्साहन देतो याबाबतीत विचार करावा लागेल असे विभागीय सचिवांनी सांगितले असता, विभागाने आपल्या सूचना समितीस द्यावा व त्यानुसार समिती शासनास शिफारस करील असे समितीने विभागास साक्षीच्या वेळी सूचित केले होते. त्यानुसार पाणीपुरवठा विभागाकडून पुढीलप्रमाणे सूचना प्राप्त झाल्या आहेत.

१) वित्त विभाग शा.नि.क्र.शासन हमी १०९९/प्र.क्र.६८/शासन हमी, दि.०५/११/१९९९ मधील परिच्छेद क्र.३(६) नुसार नियत दिनांकास अनुज्ञेय हमी शुल्क भरण्यास कसूर करणाऱ्या संस्थांना अदत्त हमी शुल्कावर पहिल्या तीन महिन्यांसाठी १६ प्रतिशत व त्यापुढील कालावधीसाठी २४ प्रतिशत दराने दंडनीय व्याज आकारले जाते. सद्या बाजारातील कर्जावरील व्याजदर विचारात घेतल्यास ही व्याजाची आकारणी महानगरपालिका/नगरपालिका यांना जास्त वाटते. त्यामुळे शासनाने दंडनीय व्याजाचा दर कमी करावा व त्याची परिगणना संपूर्ण वर्षासाठी एकाच दराने करण्याबाबत विचार करावा.

२) शासनाच्या प्रचलित कार्यपद्धतीप्रमाणे महानगरपालिका/नगरपालिकांकडून वसूल होणारी शासन हमीशुल्काची थकित रक्कम ही प्रथम दंडणीय व्याजापोटी समायोजित करण्यात येते. त्यामुळे प्रत्यक्ष हमी शुल्काची रक्कम तशीच राहते व त्यावरील दंडनीय व्याजाची रक्कम वाढतच जाते. यास्तव महानगरपालिका/नगपालकांकडून वसूल होणारी हमी शुल्काची थकित रक्कम ही ४०% हमी शुल्क व ६०% दंडणीय व्याजापोटी समायोजित करावी अथवा याबाबत शासनाने प्रमाण (ratio) ठरवून द्यावे. त्यामुळे हमी शुल्काची रक्कम कमी झाल्याने त्यावरील दंडनीय व्याजाची आकारणी देखिल कमी होवून महानगरपालिका/नगरपालिका यांना प्रोत्साहन मिळून थकबाकीची जास्त वसूली होईल.

३) एक रकमी चुकता करणे योजने अंतर्गत थकित हमी शुल्कावरील दंडनीय व्याजामध्ये सवलत देण्यात यावी. त्यासाठी महानगरपालिका/नगरपालिकाकडून पुढील हमी शुल्क नियमित भरण्याबाबत हमीपत्र घेण्यात यावे.

४) शासन हमी शुल्काचा नियमित भरणा करणाऱ्या महानगरपालिका/नगरपालिका यांना प्रोत्साहनासाठी हमी शुल्कात/हमी शुल्क दरात सुट देण्यात यावी.

उद्योग विभाग :-

६.५१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या दि.३१ मार्च, २००६ रोजी संपलेल्या वर्षाच्या महसुली जमा अहवालासंदर्भात परिच्छेद क्र.६.३ च्या अनुषंगाने "हमी शुल्क प्रदान न करणे" या परिच्छेदाच्या अनुषंगाने उद्योग विभागाच्या सचिवांनी साक्षीचे वेळी समितीला अशी माहिती दिली की, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाकडून ज्यावेळी कर्जरोखे उभे केले जातात, त्यावेळी शासनाकडून हमी दिली जाते. दिनांक २५ मार्च, १९९७ ते दिनांक ०९ सप्टेंबर, २००४ हा हमीचा कालावधी असून, या कालावधीतील हमी शुल्क महामंडळाने दिले नाही. या कालावधीतील दंडनीय व्याजासह हमी शुल्क २७.०६ कोटी रुपये आहे. हे शुल्क न देण्यामागचे कारण असे आहे की, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळास सन १९९६-९७ पासून तोटा होण्यास सुरुवात झाली. परंतु तरी सुध्दा महामंडळाने मुद्दलाच्या वसुलीतून हमी शुल्काची रक्कम २००३ सालापर्यंत अदा केली होती. सन २००५-०६ पासून महामंडळाने नवीन कर्ज पुरवठा करणे बंद केल्यामुळे अनुत्पादक कर्जात वाढ झाली. महामंडळाकडून नवीन कर्ज न देण्याची कारणे वेगळी आहेत. ज्या छोट्या व मध्यम उद्योजकांना महामंडळाकडून कर्ज देण्यात आले होते, त्यांचे उद्योगधंदे मागासलेल्या भागात होते. महामंडळाचे मार्जिन कमर्शियल बँकेच्या तुलनेत २ टक्के होते. कमर्शियल बँकेचे मार्जिन ६-७ टक्के असते. महामंडळाने ६ ते २१ टक्क्यांपर्यंत लेंडींग करुन पैसा दिला होता. महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाकडून शासनाला २००३ पासून विनंती करण्यात येत आहे की, महामंडळाकडून शासनाला देय असलेले हमी शुल्क माफ करावे. मात्र शासन अद्यापपर्यंत या बाबीशी सहमत झालेले नाही.

६.५२ शासनाची महामंडळाकडे किती थकबाकी आहे, अशी समितीने विचारणा केली असता, सुरुवातीपासूनची दंडनीय व्याजासह २७.०६ कोटी रुपये, एवढी हमी शुल्कापोटी थकबाकी आहे व उच्च न्यायालयाने असा आदेश दिला आहे की, महामंडळ जी वसुली करीत असेल त्याच्या ३० टक्के रक्कम महामंडळाने सिडबीला दिली पाहिजे. महामंडळाकडून सिडबीला २४५ कोटी रुपये देणे बाकी आहे. मागील तीन-चार वर्षांमध्ये शासनाने एस.एल.आर.कर्जरोख्यांची पूर्तता करण्यासाठी महामंडळाकरिता अर्थसंकल्पीय तरतूद केली होती. त्यानुसार सन २००७-०८ मध्ये ३१.३२ कोटी रुपये, सन २००८-०९ मध्ये ३२.६८ कोटी रुपये, सन २०१०-२०११ मध्ये २७.६४ कोटी रुपये अर्थसंकल्पाच्या माध्यमातून दिले अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीला दिली.

६.५३ विभागाने पुरविलेल्या या माहितीच्या संदर्भात वित्त विभागाच्या सचिवांचे मत जाणून घेण्याचा समितीने प्रयत्न केला असता, वित्त सचिवांनी असा खुलासा केला की, वित्तीय महामंडळाकडून शासनाची हमी घेऊन, वित्तीय संस्थांद्वारे निधी उभारला जातो. महामंडळाने, झालेल्या नफ्यातून वित्तीय

संस्थांद्वारे उभारलेल्या निधीची परतफेड करावी आणि उर्वरित नफ्याच्या रकमेतून शासनाच्या हमी शुल्काची परतफेड करावी असे अभिप्रेत आहे. परंतु वित्तीय महामंडळाला नफाच झालेला नसल्यामुळे, त्यांच्याकडून परतफेड होऊ शकत नाही असे महामंडळाचे म्हणणे आहे. वित्तीय महामंडळाने शासन हमीची रक्कम माफ करण्याबाबत वित्त विभागाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. परंतु आजच्या स्थितीत वित्तीय महामंडळाला शासन हमीची रक्कम माफ करण्याबाबत विभागाचे कुठल्याही प्रकारचे धोरण नाही.

६.५४ वास्तविक पाहता हे काम शासन स्तरावरीलच आहे. महामंडळाचे म्हणणे आहे की, महामंडळ फायद्यात नाही, त्यामुळे महामंडळ शासन हमीची रक्कम परत देऊ शकत नाही. महामंडळाचे नुकसान म्हणजे, एक प्रकारे शासनाचेच नुकसान आहे. वित्तीय महामंडळ हा शासनाचाच उपक्रम असल्यामुळे व सदरहू महामंडळ तोट्यात असल्यामुळे, शासन हमीची रक्कम माफ करण्याबाबत वित्तीय महामंडळाने शासनाकडे विनंती केली आहे. शासनाने वित्तीय महामंडळाला शासन हमीची रक्कम माफ केली तर हा प्रश्न सुटेल असे मत समितीने व्यक्त केले.

६.५५ एस.एल.आर.कर्जरोख्यांची परतफेड वित्त विभाग करतो, परंतु वित्तीय महामंडळ करीत नाही असे वित्त विभागाच्या सचिवांनी सांगितले असता, शासनाच्या हमीची रक्कम विभागाकडून माफ केली जात नसेल तर, विभागाने एस.एल.आर.कर्जरोख्यांसाठी जी पद्धत अवलंबिली आहे, तसेच शासन हमीच्या रक्कमेसाठी सुध्दा करावयास पाहिजे असे उद्योग विभागाच्या सचिवांनी सांगितले. त्या संदर्भात सचिव, जलसंपदा विभाग यांनी समितीला माहिती देताना असे सांगितले की, जलसंपदा विभागाकडे सुध्दा असाच प्रश्न बऱ्याच दिवसांपासून प्रलंबित होता. दि. २८ जानेवारी, २००९ रोजीच्या शासन निर्णयानुसार ३,४३२ कोटी रुपयांचे हमी शुल्क आणि दंडनीय व्याज माफ होऊ शकले नाही. परंतु तद्नंतर सदरहू रक्कम अर्थसंकल्पीत करुन, त्या रक्कमेचे समायोजन करण्यात आले. मार्च-२००९ पर्यंतची जी रक्कम प्रलंबित होती, ती आता निरंक दिसत आहे.

६.५६ जलसंपदा विभागाप्रमाणेच उद्योग विभागाकडे प्रलंबित असलेल्या शासन हमीच्या रकमेचे सुध्दा समायोजन व्हावे, अशी विनंती सचिव, उद्योग विभाग यांनी समितीस केली असता, अशा प्रकारे प्रत्येक महामंडळाच्या शासन हमीची रक्कम अर्थसंकल्पीय तरतुदीद्वारे समायोजित करण्याची पध्दत पडली तर शासनाच्या हमीला अर्थच राहणार नाही असे मत समितीने व्यक्त केले. त्यावर जलसंपदा विभागाचे सचिव जे सांगत आहेत ती वस्तुस्थिती आहे अशी माहिती वित्त सचिवांनी समितीला दिली.

६.५७ हमी शुल्क व दंडनीय व्याज ही रक्कम अर्थसंकल्पीत करुन, त्या रक्कमेचे समायोजन करण्यात आले ही जर वस्तुस्थिती असेल तर, जलसंपदा विभागासाठी एक न्याय आणि वित्तीय

महामंडळासाठी दुसरा न्याय का ? वित्तीय महामंडळाच्या शासन हमीची रक्कम जलसंपदा विभागाकडे असलेल्या रकमेप्रमाणे समायोजित का केली जात नाही ? जलसंपदा विभागाच्या सचिवांनी त्यांच्याकडे प्रलंबित असलेल्या रकमेचे कशाप्रकारे समायोजन करण्यात आले हे सांगितले. त्यामुळे जलसंपदा विभागाचा दाखला देऊन, वित्तीय महामंडळाने शासन हमीची रक्कम माफ करण्याबाबत किंवा पुस्तकी समायोजन करण्याबाबतचा प्रस्ताव समितीकडे सुध्दा सादर करावा. समितीकडून त्याबाबत पाठपुरावा करण्यात येईल असे निदेश समितीने विभागास दिले. त्यानुषंगाने उद्योग विभागाने महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाचे कर्ज वितरणासाठी एस.एल.आर. कर्जरोख्यांद्वारे उभारलेल्या भांडवलास शासनाने हमी दिलेली होती त्यावरील हमी शुल्क माफ करण्याचा प्रस्ताव दिनांक २१ जानेवारी, २०११ रोजीच्या टिप्पणीद्वारे वित्त विभागास सादर केला व सदर प्रस्तावाची प्रत समितीच्या अवलोकनासाठी उद्योग विभागाने समिती कक्षाला उपलब्ध करुन दिली आहे.

६.५८ एस.एल.आर. च्या संदर्भात सुरुवातीपासूनच वेगवेगळे उभे केले आहेत, परंतु खुल्या बाजारात कर्जरोखे उभारताना शासनाची हमी लागते असे सचिवांनी सांगितले असता, वित्तीय महामंडळाने बाजारामध्ये शासनाच्या हमीवर कर्जरोखे बाजारात आणले होते. परंतु या कर्जरोख्यांची मूळ रक्कम सुध्दा वित्तीय महामंडळाकडून परत केली जात नाही, असा खुलासा वित्त विभागाच्या सचिवांनी साक्षीचे वेळी केला.

६.५९ कर्जरोख्यांच्या मूळ रकमेच्या माध्यमातून शासनाला किती रक्कम देणे बाकी आहे ? अशी समितीने विचारणा केली असता, आजपर्यंत महामंडळाकडून शासनाला मूळ रकमेचे ८५ कोटी रुपये देणे आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. यासंदर्भात वित्तीय महामंडळाकडून जे कर्जरोखे काढले गेले, त्या कर्जरोख्यांच्या रक्कमेच्या परतफेडीकरिता सुध्दा शासनाला पैशाची तरतूद करावी लागते, हे योग्य नाही असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता, यासंदर्भात सन २००३ ते २०१० पर्यंतच्या कालावधीतील आकडे पाहिले तर वित्तीय महामंडळाकडून शासनाला ५९२ कोटी रुपये द्यावयाचे होते. महामंडळाच्या ६०० कोटी रुपयांच्या वसुलीतून ५०२ कोटी रुपये दिलेले आहेत. सन २००५ पासून महामंडळाकडून नवीन कर्ज पुरवठा करणे बंद झाले आहे, त्यामुळे अनुत्पादक कर्जात वाढ झाली. शिवाय जुनी कर्जे बहुतांश बुडीत झाली आहेत असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

६.६० वित्तीय महामंडळाने त्यांना होत असलेल्या तोट्यापायी शासनाला हमीची जी रक्कम द्यावयाची आहे ती रक्कम माफ करण्याचे धोरण समितीने सहानुभूतीपूर्वक स्वीकारले होते. परंतु वित्त विभागाच्या सचिवांनी सांगितले की, महामंडळाने बाजारात जे कर्जरोखे काढले होते, त्या कर्जरोख्यांची

परतफेड सुध्दा महामंडळाकडून केली जात नाही, ही गंभीर बाब आहे. याच कर्जरोख्यांसाठी महामंडळाने खाजगी बँकांकडून हमी घेतली असती आणि वेळेवर हमीची रक्कम भरली नसती तर त्यांच्याकडून महामंडळावर जप्ती आली असती असे मत समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता, महामंडळाने २००५ पर्यंतच कर्ज पुरवठा केला होता. तद्नंतर महामंडळाने नवीन कर्ज पुरवठा करणे बंद केले असल्याचे सांगण्यात आले व त्यामुळेच अनुत्पादक कर्जात वाढ झाली अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीला दिली.

६.६१ महामंडळ त्यांनी काढलेल्या कर्जरोख्यांच्या परतफेडीसाठी ८३ कोटी रुपये सुध्दा देऊ शकत नाही. राज्यातील अनेक महामंडळे दिवाळखोरीत असल्यामुळे ती बंद करावीत. आज अनेक महामंडळांच्या बाबतीत महालेखाकारांच्या लेखापरिच्छेदांमध्ये आक्षेप घेतले जातात. तसेच अनेक महामंडळांमध्ये पुस्तकी समायोजन केले जात आहे. वित्तीय महामंडळ कर्जरोख्यांच्या मुद्दलाची रक्कम सुध्दा अदा करु शकत नाही अशी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. यासंदर्भात संबंधितांवर जबाबदारी निश्चित केली पाहिजे असे समितीला वाटते. शिवाय बाँडसना शासनाची हमी असल्यामुळे, महामंडळाने या संदर्भात काहीही प्रयत्न केले नाहीत तरी चालेल असा महामंडळाचा समज झाल्याचे दिसते असे समितीने मत व्यक्त केले व ही बाब गंभीर स्वरुपाची असल्यामुळे समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली. यासंदर्भात महामंडळाचे थकबाकीदार १० हजारांपेक्षा अधिक आहेत. लघु उद्योजकांकडून यासंदर्भात वसूली झाली नसल्यामुळेच हे सर्व झाले असा खुलासा विभागीय सचिवांनी साक्षीचे वेळी केला.

६.६२ वित्तीय महामंडळाकडून वन टाईम सेटलमेंटवर मोठ्या प्रमाणात भर दिला जातो. वन टाईम सेटलमेंटमध्ये व्याज माफ करुन, मुद्दल रकमेच्या बाबतीत सुध्दा तडजोड केली जाते. यासंदर्भात वन टाईम सेटलमेंट करताना महामंडळाने व्याजाची रक्कम माफ केली काय, अशी विचारणा समितीने केली असता, वित्तीय महामंडळामध्ये थकीत रक्कम १२०० कोटी रुपयांच्या आसपास आहे, त्यात १५० कोटी रुपये मुद्दल रक्कम असून, उर्वरित रक्कमही व्याजाची आहे. व वन टाईम सेटलमेंट फॉर्म्युलाप्रमाणे हा निर्णय घेण्यात येतो.

६.६३ महामंडळाकडून ओ.टी.एस. च्या नावाखाली व्याज माफ केले जाते व सध्या महामंडळामध्ये वार्षिक वसुलीची सद्यःस्थिती काय आहे, अशी समितीने विचारणा केली असता, कर्ज देताना कर्ज हमी म्हणून मालमत्ता तारण घेतली जाते. जर कर्जाची रक्कम भरली गेली नाही तर, जामिन म्हणून घेतलेल्या मालमत्तेचे लिलाव केले जातात. सन २००७-२००८ मध्ये एकूण वसूली ४०

कोटी रुपये झाली होती. त्यातील मुळ रक्कमेच्या १५ टक्के एवढीच वसुली झालेली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीला सांगितले. वसुलीचे प्रमाण कमी असल्याने समितीने त्याबाबत नाराजी व्यक्त केली. त्यासंदर्भात माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी असा खुलासा केला की, जी मालमत्ता ताब्यात घेतलेली आहे, त्यांचा लिलाव पाच ते दहा वेळा केला तरीही त्यांची फारशी किंमत येत नसल्यामुळे वसुली चांगल्या प्रकारे होत नाही. यामध्ये संचालक मंडळाने ओ.टी.एस.ची योजना तयार केलेली आहे. त्यामध्येही काही फॉर्म्यूले तयार केलेले आहेत. कायद्याप्रमाणे वसुली न झालेल्या मालमत्तेचा लिलाव केल्यानंतरही त्यांची किंमत फारशी येत नसल्याकारणाने वसुली होऊ शकत नाही.

६.६४ वसुलीसाठी ज्या मालमत्ता ताब्यात घेतलेल्या आहेत, त्या मालमत्तेचे कागदपत्र, दस्तऐवज तरी विभागाकडे आहेत काय, अशी विचारणा समितीने केली असता, त्या सर्व मालमत्तेचे दस्तऐवज विभागाच्या ताब्यात असतात असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

६.६५ ज्यावेळेस विभागाने मालमत्ता ताब्यात घेतली, त्यावेळी त्यांची किंमत कमी असेल आणि त्यानंतर त्यांच्या किंमती वाढलेल्या असतील, त्याच्या लिलाव आणि वसुलीमध्ये शासनाला फायदा झालाच असेल. औद्योगिक वसाहतीमध्ये ज्या जागा उपलब्ध आहेत, त्या जागा अतिशय चांगल्या भावामध्ये विकल्या जात आहेत. या जागेच्या माध्यमातून निदान मुळ रकमेची वसुली तरी ४५ ते ५० टक्क्यांपर्यंत होणे आवश्यक आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, त्यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, यासंदर्भात जर एक उदाहरण द्यावयाचे झाले तर ते असे देता येईल की, पातूर, जि.उस्मानाबाद येथील काही नॉन परफॉर्मिंग ॲसेट्स आणि मालमत्तेचे मुल्यांकन असे केलेले आहे की, सर्व मालमत्तेचे भाव बाजारभावाप्रमाणे वाढत आहेत, परंतु पातूर येथील मालमत्तेचे भाव वाढत नाहीत. परंतु चांगल्या प्रॉमिनंट शहरातील चांगल्या भागातील मालमत्तेचे लिलाव तरी चांगले होऊन वसुली चांगली होणे अपेक्षित आहे असे समितीने विभागास सांगितले असता, सन २००३-०४ पर्यंत अतिशय चांगली वसुली होत होती. त्यानंतर वसुलीची टक्केवारी घसरत गेली असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

६.६६ विभागाकडून वसुली होत नसल्याच्या प्रकरणांच्या संदर्भात कोणता अधिकारी जबाबदार होता, त्यांच्यावर जरी ते निवृत्त झालेले असले तरी जबाबदारी निश्चित करुन प्रत्येक प्रकरणाला न्याय देणे आवश्यक आहे, असे निदेश समितीने विभागास दिले.

६.६७ यामध्ये जादा कर्ज घेणारे कोण आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, यामध्ये सर्वात मोठमोठे कर्जदार ठाणे येथील आहेत अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीला दिली. जे मोठे कर्जदार असतील, त्यांना जर समितीने आणि विभागाने लक्ष्य केले तर वसुली चांगली होण्यास मदत

होईल. सि.कॉमवरही एम.एस.एफ.सी.चे अधिकारी प्रतिनिधीत्व करीत असतात असे समितीने विभागास सांगितले. परंतु असे जर केले तर जे मोठे कर्जदार आहेत, ते डी.आर.टी.मध्ये जातात. उच्च न्यायालयात याचिका दाखल करतात. अशा प्रकारे कायद्याच्या शस्त्राचा वापर करुन कोर्टाच्या माध्यमातून वसुलीवर स्थगिती आणतात अशी माहिती विभागाने साक्षीचे वेळी दिली.

६.६८ वर्षनिहाय बाजारभावाप्रमाणे मालमत्तेचे भाव व सध्याचे भाव तसेच, लिलाव केल्यानंतर मुळ रक्कम, व्याज आणि दंडनीय व्याज यांची किती प्रमाणात वसुली होऊन शासनाचा पैसा परत मिळू शकतो, याची छाननी करणे आता समितीकरिताही आवश्यक झालेले आहे. शासनाचा पैसा म्हणजे बुडविण्यासाठी असतो असे नव्हे. शासनाचा पैसा कर्जरोखे उभारणी करतांना ज्याप्रमाणे वापरण्यात येतो. त्या कर्जरोख्यांची किंमत आल्यानंतर हमी शुल्काची रक्कम शासनाला दिल्यानंतरच इतर निधी खर्च करण्याची परवानगी कोणत्याही महामंडळाला नाही. त्यावेळी कोणकोणते शासकीय कर्मचारी मालमत्ता सँक्शनेट करण्याकरिता जबाबदार होते, त्यांची यादी समितीला सादर करावी, ते सेवानिवृत्त झालेले असले तरीही सर्वोच्च न्यायालयाच्या निवाड्याप्रमाणे त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करता येऊ शकते. तसेच, वर्षनिहाय मालमत्ताधारक व थकबाकीदारांची यादी समितीला सादर करावी. त्यांच्याकडून वसुली करण्याकरिता अलिकडे कोणत्या प्रकारची कारवाई करण्यात आलेली आहे, याची माहिती समितीला देण्यात यावी तसेच, त्यांच्याकडून करण्यात आलेल्या वसुलीची सद्य:स्थिती काय आहे, यासंदर्भातील माहिती समितीला देण्यात यावी असे निदेश समितीने विभागाला साक्षीचे वेळी दिले.

ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण) विभाग :

६.६९ परिच्छेद क्र. ६.३ "हमी शुल्क प्रदान न करणे" या परिच्छेदामध्ये हमी शुल्काची मूळ रक्कम रू.९,३२,००,००० एवढी होती. त्यावरील दंडनीय व्याजाची रक्कम ४.४५ कोटी रुपये आहे. जलसंधारण महामंडळ स्थापन झाल्यानंतर सन २००३ पर्यंत एकूण २.२८ कोटी रुपये हमी शुल्क म्हणून दरवर्षी विहित वेळेमध्ये भरण्यात आले होते. त्यानंतर महामंडळाला उत्पन्नाचे साधन नसल्यामुळे हमी शुल्काची रक्कम शासनकडे महामंडळाकडून भरणा करण्यात आलेली नाही. अशी माहिती जलसंधारण विभागाचे प्रधान सचिव यांनी समितीस दिली.

६.७० महामंडळाला उत्पन्नाचे साधन नाही, असे विभागास म्हणता येणार नाही. ज्यावेळी बाजार भावाप्रमाणे कर्जरोखे बाजारात आणले जातात. त्यानंतर त्याचे पैसे मिळाल्यानंतर त्यातील हमी शुल्काची रक्कम शासनाकडे भरणा केल्याशिवाय उर्वरित रक्कम खर्च करण्याची परवानगी महामंडळाला नसते. या महामंडळाकडे जसे कर्जरोखे बाजारात आणण्याचे नियोजन होते तसेच शासनाच्या हमी शुल्काची

भरणा करण्याकरिता नियोजन नव्हते का ? अशी विचारणा समितीने केली असता, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ औरंगाबाद यांनी समितीस सांगितले की, सन २००३ कर्जरोख्याद्वारे जमा केलेला निधी जलसंधारण विभागाने कामावर खर्ची पडला

६.७१ जलसंधारण महामंडळाची कामे कोणकोणती आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, छोटे मोठे तलाव बांधणे, सिमेंट कॉंक्रीट किंवा मातीचा पक्का बंधारा घालून देणे. अशा निरनिराळया मार्गांनी पाण्याचे संधारण करण्याचे काम जलसंधारण महामंडळाचे आहे अशी माहिती समितीस दिली.

६.७२ ही सर्व कामे करीत असतांना या कामाकरिता जो पैसा कर्ज रोख्यांच्या स्वरुपामध्ये शासनाकडून मार्केटमध्ये बाजारभाव करुन मिळविलेला आहे. तो शासनाकडे परत करण्याकरिता या कामांमधूनच महामंडळाने मार्ग शोधणे क्रमप्राप्त होते. कर्जरोखे म्हणजे शासनाकडून मिळालेले अनुदान नव्हे. बँकांकडून कर्ज घेतले असते, तर ते त्या बँकाना विहित कालावधीमध्ये व्याजासह परत करावेच लागले असते ना ? मग हे कर्जरोखे शासनाचे पैसे असल्यामुळे ते बुडित खात्यामध्ये गेले तरी चालतात का ? हे कर्ज रोखे परतावा करण्याकरिता महामंडळाचा काहीतरी मास्टरप्लान असेल ना ? अर्थसंकल्पात तरतूद करतांना ज्या महामंडळांनी हमी शुल्काच्या रकमेचा भरणा केलेला नाही. त्यांना ती रक्कम अर्थसंकल्पीय तरतूद कर्ज रोख्यांची किंमत व व्याज कापून देण्यात यावी. असे केल्याशिवाय शासनाचा पैसा वसूल होणार नाही. कर्जरोखे घेतल्यानंतर त्याची किंमत मिळाल्यानंतर त्या पैशांचा महामंडळ कामांमध्ये विनियोग करते. त्यानंतर विहित वेळेच्या नंतर लोकांकडून घेतलेल्या कर्जरोख्यांची किंमत त्यांना परत देण्याची काहीतरी चक्र असेल की नाही ? यासंदर्भात माहिती देताना विभागाने सांगितले की, शासनास मिळणारे अनुदान इतके अल्प होते की, त्यामध्ये महामंडळ त्यांची कामेसुध्दा पूर्ण करु शकत नव्हते. त्यामुळे शासनाच्या हमीच्या शुल्काची रक्कम भरणा करण्याकरिता महामंडळाकडे सन २००३ नंतर निधी नव्हता.

६.७३ यावर कर्जरोखे आणि त्यांच्यावरील वाढते व्याज व दंडनीय व्याज कमी करण्याकरिता शासनाकडे अनेक प्रस्ताव येत आहेत. परंतु मूळ हमी शुल्काची रक्कम भरण्याबाबत महामंडळांनी काहीतरी ठोस निर्णय घेऊन त्यावर कार्यवाही करणे अतिशय आवश्यक आहे असे मत वित्त सचिवांनी व्यक्त केले असता, सन २००३ पर्यंतची २ टक्के हमी शुल्काची रक्कम रोखीने भरलेली आहे असे सांगितले. "दिनांक ३१.०३.२००६ अखेरपर्यंत रुपये १३.७७ कोटी इतकी रक्कम हमी शुल्क दंडनीय व्याजासह शासनाकडे भरावयाची बाकी आहे" असे वित्त विभागाने नमूद केलेले आहे असे समितीने वित्त

विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता, सन २००३ ते २००६ या कालावधीतील हमी शुल्काची २ टक्के रक्कम भरावयाची राहिलेली आहे असा खुलासा वित्त सचिवांनी केला.

६.७४ महामंडळाने कर्जरोखे उभारलेले आहेत. ते पैसे कसे परत करण्यात येणार आहेत ? महामंडळाने बाजारामधून १०३ कोटी रुपये उभे केले आणि त्यातून २ टक्के हमी शुल्काची रक्कम भरलेली आहे यासंदर्भात वित्त सचिवांनी असे सांगितले की, हमी शुल्काचा दर प्रत्येक वर्षी २ टक्के आहे. सन २००३ ते २००६ या कालावधीतील हमी शुल्काची २ टक्के रक्कम भरावयाची राहिलेली आहे.

६.७५ सन २००३ ते २००६ पर्यंतची हमी शुल्काची रक्कम भरलेले नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले असता, हमी शुल्काची रक्कम का भरली नाही ? हमी शुल्क भरणे बंधनकारक आहे. असे असतांनाही त्यानुसार आपण कार्यवाही केलेली तेव्हा याबाबत आपण समितीला यासंदर्भात सविस्तर टिप्पणी द्यावी असे निदेश विभागास समितीने दिले असता, विभागाकडून यांसदर्भातील माहिती खालीलप्रमाणे प्राप्त झाली आहे. "महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाला महामंडळाची कामे पार पाडण्यासाठी लागणाऱ्या निधीच्या प्रयोजनार्थ खुल्या बाजारातून कर्ज रोख्याद्वारे निधी उभारण्यासाठी खालीलप्रमाणे शासनाकडून मंजूरी प्रदान करण्यात आली होती.

मालिका क्र.	शासन निर्णय व दिनांक	उभारावयाची रक्कम (रुपये कोटीत)
एक	ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्र.संकिर्ण-१०००/ प्र.क्र.२४५/जल-७, दि.२२.११.२०००	२००/-
दोन	ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्र.संकिर्ण-१०००/ प्र.क्र.२४५/जल-७, दि. २८.११.२००१	१००/-
तीन	ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्र.संकिर्ण-१००२/ प्र.क्र.६३२/जल-७, दि.०३.०९.२००२	१००/-

या कर्जरोख्याद्वारे उभारल्या जाणाऱ्या रकमेच्या मुद्यलाची विहीत दिनांकास परतफेड करणे व मुद्दल परत होईपर्यंत त्या रकमेवरील व्याज प्रदान करण्याबाबत शासनाने हमी दिलेली आहे. या बाबतचा त्रिसदस्यीय करार (कर्जरोखेधारकांचे ट्रस्टी महामंडळ व महाराष्ट्र शासन यांच्यामध्ये) वेळोवेळी झालेला आहे.

<u>वरील तीन मालिकांद्वारे महामंडळास खालीलप्रमाणे रक्कम प्राप्त झाली.</u>

मालिका क्रमांक	मालिकेचा कालावधी व अलॉटमेंटचा दिनांक	पर्याय	गुंतवणूक कालावधी (अलॉटमेंटच्या दिनांकापासून)	व्याजाचा दर	उभारलेली रक्कम (रुपये कोटीत)
एक		अ	७ वर्ष	१३%	९.२८

	१६.०२.२००१ ते ०४.०३.२००१ (२६.०४.२००१)	ब	१० वर्ष	१३.२५%	१०.०६
		क	१२ वर्ष	१३.५०%	२३.३२
	एकूण (अ)				४२.६६
दोन	१६.०२.२००१ ते १४.०३.२००१ (२६.०४.२००१)	अ	७ वर्ष	११%	३५.६८
		ब	१० वर्ष	११.२५%	५.६९
		क	१२ वर्ष	११.५०%	१६.००
	एकूण (ब)				५७.३७
तीन	१४.०२.२००३ ते ०७.०५.२००३ (१५.०७.२००३)	अ	७ वर्ष	११%	२.७८
		ब	१० वर्ष	११.२५%	०.०७
		क	१२ वर्ष	११.५०%	०.१६
	एकूण (क)				३.०१
	एकूण (अ+ब+क)				१०३.०४

वर्ष २००१-०२ ते ३०.०९.२००३ या कालावधीचे रुपये २,२८,३१,०००/- इतके हमी शुल्क महामंडळाने विहित दिनांकास भरले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

मालिका क्रमांक	**हमी शुल्क भरण्याचा देय दिनांक**	**हमी शुल्क भरल्याचा दिनांक**	**भरलेल्या हमी शुल्काची रक्कम**
एक	०१.०४.२००२	०८.०४.२००२	४०,२९,०००/-
एक	०१.१०.२००२	०९.१०.२००२	४८,५०,०००/-
एक	०१.०४.२००३	०७.०४.२००३	४८,५०,०००/-
एक	०१.१०.२००३	०३.१०.२००३	४८,५०,०००/-
दोन	०१.१०.२००३	०३.१०.२००३	४२,५२,०००/-
एकूण -			**२,२८,३१,०००/-**

६.७६ महामंडळाला उत्पन्न नसल्याने, कर्जरोख्याद्वारे उभारलेल्या रकमेतूनच सदरील हमी शुल्काची रक्कम महामंडळाने भरली आहे. त्यानंतरच्या कालावधीत (०१.१०.२००३ च्या नंतर) कर्जरोख्याद्वारे उभारलेली उर्वरित रक्कम कामावर तसेच कर्जरोखेधारकांना व्याज प्रदान करण्यासाठी (रुपये ३४.१३ कोटी) (शासनाकडून निधी उपलब्ध न झाल्याने) खर्च झाली. वर्ष २००५-०६ पर्यंत महामंडळाला शासनाकडून अल्प प्रमाणात निधी प्राप्त झाला व शासनाच्या आदेशानुसार, प्राप्त झालेला निधी, बहुतांशी विशिष्ट कामावरच खर्च करावयाचा होता. त्यामुळे दिनांक ०१.१०.२००३ पासूनचे हमी

शुल्क महामंडळ भरु शकले नाही. ती दिनांक ३१.०३.२०१० पर्यंत रुपये २७.९७ कोटी इतकी संचित झाली आहे. (हमी शुल्क रुपये १५.३७ कोटी व दंडनीय व्याज रुपये १२.६० कोटी असे एकूण २७.९७ कोटी) महाराष्ट्र जलसंधारण महामंडळामार्फत प्रामुख्याने ० ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेच्या लघु पाटबंधारेच्या योजना राबविल्या जातात. या योजनांच्या कामासाठी निधी अपुरा पडत असल्याने शासन हमीची रक्कम भरता आली नाही".

६.७७ ज्यावेळी कर्जरोखे उभारले त्यावेळी विभागाने योजना केली असेल. Whether any plan was made? Is it a penal interest or guarantee? Was there any plan prepared by the Corporation as to how to repay the amount? What was the repayment schedule? यासंदर्भात विभागाने सांगितले की, ७ वर्षे, १० वर्षे आणि १२ वर्षे असे पर्याय होते. ६३ कोटी ५६ लाख रुपये मुळ रक्कम आहे. विभागाने १०३ कोटी रुपये चूकते केलेले आहेत. महामंडळाचे स्वत:चे उत्पन्नाचे साधन नाही. म्हणून विभागाने शासनाकडून रक्कम मागितलेली आहे. शासनाने पहिल्या ५ वर्षात २ हजार कोटी रुपये द्यावेत, अशी अपेक्षा होती. शासनाने मागील वर्षी ४५ कोटी रुपये आणि यावर्षी ४५ कोटी रुपये दिलेले आहेत.

६.७८ महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाला केंद्र शासनाकडून निधी मिळतो काय ? तसेच जलसंधारण विभागामार्फत ज्या योजना तयार केल्या जातात त्याच योजना ग्राम विकास विभागामार्फत तयार केल्या जातात काय ? यावर जलसंधारण महामंडळाला केंद्र शासनाकडून निधी मिळत नाही व जलसंधारण विभागामार्फत ज्या योजना तयार केल्या जातात त्याच योजना ग्राम विकास विभागामार्फत तयार केल्या जात नाही. असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

६.७९ जलसंधारण विभाग ज्या योजना तयार करते त्याच योजना कृषी विभाग किंवा ग्राम विकास विभागामार्फत सुध्दा केल्या जातात काय ? त्या योजनांसाठी अर्थसंकल्पातून निधी मिळतो. यासंदर्भातील माहिती समितीस सांगावी जेणेकरुन समिती नियमानुसार यातून काही मार्ग काढू शकेल. त्यासंदर्भात विभागाने खालील प्रमाणे खुलासा केला, २५० हेक्टर सिंचन क्षेत्र (प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष) असलेल्या पाटबंधारे योजना महाराष्ट्र जलसंधारण महामंडळामार्फत राबविल्या जातात. त्यात खालीलप्रकारची कामे हाती घेण्यात येतात.

(१) लघु पाटबंधारे तलाव (२) साठवण तलाव (३) पाझर तलाव (४) गांव तलाव (५) कोल्हापूर पध्दतीचे बंधारे (६) सिमेंट काँक्रीट बंधारे (७) जलबांध (८) पाझर कालवा (९) क्षारपड चर योजना (१०) वळण योजना

वरील कामांसाठी महामंडळास शासनाकडून निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.

अभिप्राय व शिफारशी :

६.८० भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी नमूद केलेल्या महसूली जमा अहवालातील **परिच्छेद क्र. ६.३ "हमी शुल्क प्रदान न करणे"** या परिच्छेदाच्या संदर्भात महालेखापालांनी दिलेले अभिप्राय व जलसंपदा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्रामविकास व जलसंधारणा विभाग यांनी दिलेल्या लेखी व तोंडी माहितीच्या आधारे समितीने पुढीलप्रमाणे अभिप्राय व शिफारशी केलेल्या आहेत.

१) जलसंपदा विभाग :

६.८१ जलसंपदा विभागास शासन हमी (व्याजासह) माफीचा प्रस्ताव मंत्रीमंडळापुढे सादर करण्याचे निदेश तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांनी दिलेले आहेत. त्यानुसार हमी शुल्क माफीचा प्रस्ताव अद्याप शासनाच्या विचाराधीन आहे.

६.८२ राज्याच्या हिश्याचा पाणीवाटप करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने विविध महामंडळाची स्थापना केली. त्यानुसार राज्याच्या वाट्याला आलेल्या पाण्याचा वाटप करण्यासाठी या महामंडळानी विविध मोठ्या, मध्यम व लघु पाटबंधारे प्रकल्पांची कामे हाती घेतली आहेत. महामंडळातील कर्जरोखे काढून वेळोवेळी निधी उभारण्यात आला आहे. परंतु अद्यापर्यंत सर्व प्रकल्पांची कामे पूर्ण झालेली नाहीत. महामंडळांनी कर्जरोखे काढतांना शासनाने हमी दिलेली आहे. या हमी शुल्कापोटी दरवर्षी रू.६०कोटी एवढी रक्कम द्यावी लागते. गत दोन वर्षापासूनची थकबाकी बाकी असून या रक्कमेवर व्याज आकारले जात असल्याने रक्कम वाढतच जाते. **यावर समितीने चिंता व्यक्त करून हमी शुल्काची रक्कम विहित कालवधीत व वेळच्यावेळी देण्याकरीता ठोस आराखडा व ठोक योजना आखण्यात यावी व त्यादृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

६.८३ महामंडळे स्थापन झाल्यापासून महामंडळाची मालमत्ता प्रकल्पांसाठी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ इ. साठी भाडेतत्वावर किंवा बांधा व वापरा या तत्वावर दिल्याची समितीला माहिती देण्यात आली. **या उद्दिष्टान्वये महामंडळास कोणत्या संस्थेतून प्रतिवर्षी किती उत्पन्न प्राप्त झाले. यादृष्टीने सर्व महामंडळासंबंधीत माहिती समितीस एक महिन्यात सादर करण्यास सांगितले होते पंरतु सदर माहिती समितीस प्राप्त न झाल्याने समिती नाराजी व्यक्त करुन ही माहिती समितीस तात्काळ देण्याची कार्यवाही करावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

६.८४ शासनाच्या हमी शुल्काचे पैसे परत करण्या संबंधात जलसंपदा विभागाने केलेली तरतूद व त्यासंबंधात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.

२) सार्वजनिक बांधकाम विभाग :-

६.८५ महाराष्ट्र राज्य रस्ते विकास मंडळाने राज्य शासनाला २ टक्के हमी फी द्यावी अशी तरतूद आहे. एकूण हमीची रक्कम १९०२ कोटी रु. होते आणि हमी शुल्काची रक्कम ८०.४९ कोटी रुपये होते. या हमी शुल्का ऐवजी तेवढ्याच किंमतीचे समभाग शासनाचा सहभाग म्हणून घेण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. त्यामुळे रूपये ४५४/- कोटीचे समभाग शासनाच्या नावावर झाले. त्याचे समायोजन झाले असे असले तरी एम.एस.आर.डी.सी. सद्य:स्थितीत तोट्यात आहे. त्यामुळे सध्या जरी हे महामंडळ तोट्यात असले तरी ते कायमस्वरूपी तोट्यात राहणार नाही. या महामंडळाने शासनास रू.८०.४९ कोटी एवढी रक्कम हमी शुल्का पोटी देय होती. शासनाने या रक्कमेच्या किंमती एवढे समभाग शासनाचा सहभाग म्हणून घेण्याचा निर्णय म्हणजे महामंडळास रू. ८०.४९ कोटी सोडून देणे असाच होतो. शासनाची आर्थिक स्थिती पहाता रू.८०.४९ कोटी एवढी रक्कम नक्कीच कमी रक्कम नाही. यामुळे **शासनाच्या हमी पोटी शासनास देय असलेली रक्कम न दिली तरी चालू शकते अशा प्रकारचा संदेश इतर महामंडळामध्ये जाईल व त्यामुळे या महामंडळांची अर्थिक स्थिती सुधारण्याऐवजी अधिकच बिघडत जाईल. त्यामुळे शासनाने यापुढील काळात याप्रमाणे महामंडळात गुंतवणुक करणे अथवा महामंडळाकडून शासनास देय असलेली रक्कम सोडून देण्याची कार्यवाही करू नये अशी समिती शिफारस करीत आहे.**

६.८६ महाराष्ट्र राज्य रस्ते विकास मंडळामार्फत राज्यात ८,३१० कोटीची कामे केलेली आहेत. कर्ज काढून पैसे उभे केलेले आहेत. ४,३०० कोटीच्या कर्जाची परतफेड करावयाची आहे. पथकरातून येणाऱ्या पैशातून ४,१४४ कोटीची परतफेड केलेली आहे. जेवढे उत्पन्न महाराष्ट्र राज्य रस्ते विकास मंडळाला मिळते तेवढ्याच रकमेचा व्याजाचा हप्ता त्यांना द्यावा लागतो, त्यामुळे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास मंडळाला कर्जाची परतफेड करणे अवघड आहे. पथकरापासून मिळणारे उत्पन्न वाढत राहणारे आहे. परंतु पथकर नाके हे ठराविक वर्षाच्या मुदतीत ठेकेदाराला देण्यात येतात. दिवसेंदिवस रस्त्यावर येणाऱ्या वाहनांची संख्या वाढतच असल्यामुळे पथकरातून देखील उत्पन्न वाढणार आहे. पंरतु पथकर नाके हे ठराविक वर्षाच्या मुदतीकरता ठेकेदाराला देण्यात येतात. त्यामुळे पथकराद्वारे मिळणाऱ्या

निधीचा जास्तित जास्त निधीचा फायदा या ठेकेदारांनाच होत असतो. **त्यामुळे पथकर गोळा करतांना ठेकेदारांची नियुक्ती करतांना प्रत्येक भागातील वाहतूकवर्दळीची आकडेवारी व भविष्यात होणारी वाढ यांचा अंदाज घेऊन निविदा पध्दत अतिशय पारदर्शक करून एका ठराविक मुदतीकरीता ठेकेदाराची नियुक्ती करण्याची कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे. तसेच कोणत्याही ठेकेदारास महामंडळाने परस्पर मुदत वाढ न देता मुदतीनंतर निविदा प्रक्रियेचा अवलंब करावा जेणेकरून शासनास जास्त रक्कमेची निविदा प्राप्त होऊन महसूलात वाढ होईल तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल.**

६.८७ महामंडळाने हाती घेतलेले बहुतांशी प्रकल्प "बांधा, वापरा व हस्तांतर" करा या तत्त्वावर आधारित आहेत. महामंडळ प्रामुख्याने रस्ते प्रकल्प, उड्डाणपुल प्रकल्प, पथकर वसुली अधिकार इ.कामे पाहते. रु.८,७११ कोटी इतक्या अंदाजित खर्चाची प्रकल्पांची कामे महामंडळाकडे सोपविण्यात आली असून त्यावर दि.३१ डिसेंबर, २०१० अखेर प्रत्यक्ष झालेला खर्च रु.८,०६० कोटी इतका आहे. प्रकल्पासाठी मान्य केलेले अनुदान शासनाकडून वेळेवर न मिळाल्याने महामंडळाने अतिरिक्त कर्जाची उभारणी केली आहे. महाराष्ट्र शासन व इतर शासन संस्थांकडून वेगवेगळ्या प्रकल्पांकरीता डिसेंबर, २०१० अखेर महामंडळास एकूण रु.३,२४६.१० कोटी इतकी रक्कम अनुदानापोटी थकीत आहे. महाराष्ट्र शासन व इतर शासन संस्थांकडून वेगवेगळ्या प्रकल्पांकरीता डिसेंबर २०१० अखेर थकीत रक्कमेवरील व्याजापोटी रु.२,९५३/- कोटी शासनाकडून प्रलंबित आहे.

६.८८ महामंडळाने विविध उपलब्ध स्त्रोत्रामार्फत कर्ज व कर्जरोखे उभारुन सदर प्रकल्पांची अंमलबजावणी केलेली आहे. कर्जे व कर्जरोखे यांची त्यांच्या अटी व शर्तीनुसार महामंडळ नियमितपणे परतफेड करीत आहे. महामंडळाने डिसेंबर २०१० पर्यंत एकुण रु.४,५८४ कोटीची परतफेड केलेली असून रु.३,९३७/- कोटी थकीत आहेत.

६.८९ महामंडळाचे प्रकल्प सवलतीच्या काळामध्ये सुसाध्य आहेत. तथापी सवलतीचा काळ हा बहुतांशी ३० वर्षापर्यंतचा असल्याने प्रकल्पापासून मिळणारे उत्पन्न हे प्रकल्पाच्या सुरुवातीच्या काळात कमी असते. कर्ज परतफेडीचा कालावधी हा १० ते १५ वर्षापर्यंतचा असल्यामुळे सुरुवातीच्या काळात कर्जपरतफेडीची रक्कम ही मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा जास्त असते. त्यामुळे सुरुवातीच्या काळात रोकड तोटा दिसतो. निधीची आवश्यकता व तोटा भरुन काढण्यासाठी सुरक्षितीकरण (Securitization) करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने मान्यता दिली आहे.

६.९० शासन व इतर संस्थांकडून बाकी असलेले हे येणे वेळच्यावेळी मिळाले असते तर व्याजाचा बोजा या रकमेने कमी झाला असता. कारण हा सहभाग न मिळाल्यामुळे महामंडळास जास्त दराने बाजारातून कर्ज घ्यावे लागले व त्यामुळे व्याजाचा भरणा जास्त झाला.

६.९१ म्हणजेच महामंडळाचा सन २००९-२०१० सालापर्यंत निदर्शनास येणारा रु.२,८८१/- कोटी इतका आवर्तीत तोटा हा मूलत: या जादा व्याजाच्या भरण्यामुळे आलेला आहे.

६.९२ पथकर उत्पन्नाचे सुरक्षितीकरणकरुन (Scecuritization) अग्रिम उत्पन्नाद्वारे कर्जाची परतफेड करीत आहे. या द्वारे प्राप्त झालेली पूर्ण रक्कम नफा व तोटा खात्यामध्ये नसुन ते अग्रीम म्हणून घेतलेली असल्यामुळे तोटा दिसतो परंतु म.रा.र.वि.महामंडळाकडे रोकड प्रवाह सुरळीत आहे व कर्जफेडीमध्ये काही कसूर होत नाही. महामंडळाकडे असलेल्या उत्पन्नाची साधने वाढत असुन प्रकल्पाची एकूण सद्य:मुल्य स्थिती (NPV) सकारात्मक असल्याचे दिसत आहे.

६.९३ महामंडळाने अवलंबिलेल्या वरील धोरणांस केअर (CARE) या पतसंस्थेने (Rating Agency) मान्यता दिलेली आहे. महामंडळास BBB (+) (SO) हा दर्जा प्रदान करण्यात आलेला आहे. केअर संस्थेने महामंडळाचा पत दर्जा सुधारल्याचे प्रमाणपत्र दिले असले तरी महामंडळाकडून प्रलंबित असलेले देणे विचारात घेता. महामंडळाची आर्थिक स्थिती फारशी चांगली असल्याचे दिसून येत नाही. **त्यामुळे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने आर्थिक स्थिती सुधारण्याच्या दृष्टीने आवश्यक ती ठोस उपाययोजना करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

३) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग :-

६.९४ सन २००१ पर्यंत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हमी शुल्काची रक्कम नगरपालिका व महानगरपालिका यांच्या वतीने शासनास वेळेवर भरण्यात येत होती. परंतु त्यानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हमी शुल्काची रक्कम सन २०१० पर्यंत विहित वेळेत भरू शकलेली नाही. आता ८४ कोटी रूपयांच्या वर थकित रक्कम आहे. ८४ कोटी रुपयांपैकी ४० कोटी रूपये हे हमी शुल्काची मुळ रक्कम आहे, तर ४४ कोटी रूपये दंडनीय व्याज आहे. पाणीपुरवठा विभागाने वसुलीकरीता सन २००८ ते सन २०१० मध्ये नगरविकास विभागाला पत्र लिहिले होते.

६.९५ महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने महानगरपालिका व नगरपालिका यांचेकरीता पाणीपुरवठ्याच्या योजना अंमलात आणण्यासाठी आर्युविमा महामंडळ व खुल्या बाजारातून कर्ज उभारले आहे. महानगरपालिका व नगरपालिका यांचा २% इतके हमी शुल्क देय असते. सन २००१ पर्यंत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ही हमी शुल्काची रक्कम या पालिकांच्या वतीने शासनास वेळेवर भरत होती.

परंतु बऱ्याचश्या महानगरपालिका / नगरपालिकांची थकबाकी असल्याने व्याजाची व दंडाची रक्कम वाढत आहे. हमी शुल्काची वसूली करण्याबाबत पाणीपुरवठा विभागास व्यापक अधिकार प्रदान केलेले असूनही या अधिकारांचा योग्य वापर विभाग करीत नसल्याचे समितीस निदर्शनास आल्याने समितीने तीव्र नारजी व्यक्त केली.

६.९६ नगरविकास विभागामार्फत महानगरपालिका व नगरपालिकांना अनुदाने वितरीत करण्यात येतात. तसेच विभागाकडून त्यांना विकास कामासाठी विकास निधी देखील दिला जातो. या निधीमध्ये हमी शुल्काची रक्कम वळती करणे शक्य आहे का यावर समितीने विचार केला. त्यावेळी समितीच्या निदर्शनास आले की, विकास निधी वळता केल्यास विकास कामांवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे **या महानगरपालिका / नगरपालिका मिळणाऱ्या विकास निधीमध्ये रक्कम वळती न करता अनुदानाद्वारे मिळणाऱ्या निधीमधुन रक्कम वळती करण्यात यावी. तसेच या पुढील काळात थकबाकी राहू नये म्हणून विविध कराद्वारे महानगरपालिका/नगरपालिका यांनी त्यांचे उत्पन्न वाढविण्याची कार्यवाही करावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

६.९७ महानगरपालिका व नगरपालिका यांच्या सध्याच्या कायद्यामध्ये कर्ज निवारण निधीची तरतूद आहे. प्रत्येक नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने घेतलेल्या कर्जफेडीच्या चालू हप्त्यापोटीची रक्कम विचारात घेऊन किमान तेवढी रक्कम कर्ज निवारण निधीमध्ये जमा करण्याची व्यवस्था करावी असे निर्देश सर्व स्थानिक स्वराज्य संस्थाना नगरविकास विभागाकडून देण्यात आले आहे.

६.९८ महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १०१ (५) (अ) मध्ये अशी तरतूद आहे की, "या अधिनियमान्वये किंवा त्यावेळेस अंमलात असलेल्या तरतुदी कोणत्याही कायद्यान्वये नगरपालिकेवर देण्याचे दायित्व असेल अशा मुद्दलच्या व व्याजाच्या सर्व रकमा व त्यांचे सर्व हप्ते देय होतील तेव्हा देणे व याबाबीची तरतूद असल्याशिवाय अर्थसंकल्पास मान्यता देता कामा नये." कर्ज निवारण निधी निर्माण करण्याची अधिनियमात तरतूद असलीतरी ज्या नगरपालिका, नगरपंचायती, भारतीय आयुर्विमा महामंडळ व खुल्या बाजारातून उभारलेल्या कर्जाच्या परतफेडीसाठी त्यांच्या अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद करणार नाहीत अशा नगरपालिका, नगरपरिषदा यांच्या बाबतीत जिल्हाधिकारी यांना संबंधित नगरपालिका, नगरपंचायतीच्या अर्थसंकल्प पुनर्विलोकीत करुन परतफेडीच्या रक्कमेचा कर्ज निवारण निधीमध्ये सक्तीने समावेश करणे व सुधारीत अर्थसंकल्प मंजुरीचे अधिकार देण्याचे प्रस्तावित आहे. **तसेच महानगरपालिकाच्या बाबतीत शासन स्तरावरुन संबंधित महानगरपालिकेचा अर्थसंकल्प पुनर्विलोकन करुन परतफेडीच्या रक्कमेचा कर्जनिवारण**

निधीमध्ये सक्तीमध्ये समावेश करणे व सुधारीत अर्थसंकल्प मंजुरीचे शासनास अधिकार देण्याचे प्रस्तावित आहे. याबाबत आवश्यक त्या दुरुस्त्या विविध अधिनियमात करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.

६.९९ महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नागरी अधिनियम, १९६५ च्या कलम ११ (५) (अ) मधील तरतुदीचे पालन न केल्यामुळे संबंधित नगरपालिकेचे मुख्याधिकारी किंवा महानगरपालिकेचे आयुक्त किंवा वित्त अधिकारी यांना नगरविकास विभागाकडून वसूली संदर्भात लेखी पत्रव्यवहार करण्यात येत नाही. स्थानिक स्वराज्य संस्थाना शासनाची थकबाकी भरण्याबाबत नगरविकास विभागाकडून बंधन घातली जात नाहीत. त्यामुळे थकबाकीची रक्कम वर्षानुवर्षे वाढत जात आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांनी घेतलेल्या कर्जाच्या अनुषंगाने दरवर्षी किती रक्कम मुद्दल व व्याजापोटी भरावी लागेल याबाबत त्यांच्या अर्थसंकल्पात तरतूद केली पाहिजे अशी कायद्यात तरतूद आहे. परंतु दरवर्षी अर्थसंकल्पात तरतूद केली जात नाही. पूर्वी अशी तरतूद केली जात होती. काही स्थानिक स्वराज्य संस्थांची आर्थिक परिस्थिती सुदृढ नसल्यामुळे ही कायदेशीर तरतूद बाजूला ठेवून विकास कामांसाठी तरतूद केली जाते. शासनामार्फत स्थानिक स्वराज्य संस्थांना याबाबत निर्देश देता येतील. **स्थानिक स्वराज्य संस्थांची त्यांचा वार्षिक अर्थसंकल्प तयार करीत असताना कर्जाच्या परतफेडीच्या अनुषंगाने तरतूद करण्याचे बंधन घालण्यात यावे व या संबंधी कार्यवाही करण्यासाठी नगरपालिकेचे मुख्याधिकारी व महानगरपालिकेचे आयुक्त किंवा वित्त अधिकारी यांच्यावर कायदेशीर जबाबदारी निश्चित करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

६.१०० वित्त विभाग शा.नि.क्र.शासन हमी १०९९/प्र.क्र.६८/शासन हमी, दि.०५/११/१९९९ मधील परिच्छेद क्र.३(६) नुसार नियत दिनांकास अनुज्ञेय हमी शुल्क भरण्यास कसूर करणाऱ्या संस्थांना अदत्त हमी शुल्कावर पहिल्या तीन महिन्यांसाठी १६ प्रतिशत व त्यापुढील कालावधीसाठी २४ प्रतिशत दराने दंडनीय व्याज आकारले जाते. सद्या बाजारातील कर्जावरील व्याजदर विचारात घेतल्यास ही व्याजाची आकारणी महानगरपालिका/नगरपालिका यांना जास्त वाटते. त्यामुळे शासनाने दंडनीय व्याजाचा दर कमी करावा व त्याची परिगणना संपूर्ण वर्षासाठी एकाच दराने करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.

६.१०१ शासनाच्या प्रचलित कार्यपद्धतीप्रमाणे महानगरपालिका/नगरपालिकांकडून वसूल होणारी शासन हमीशुल्काची थकित रक्कम ही प्रथम दंडणीय व्याजापोटी समायोजित करण्यात येते. त्यामुळे

प्रत्यक्ष हमी शुल्काची रक्कम तशीच राहते व त्यावरील दंडनीय व्याजाची रक्कम वाढतच जाते. यास्तव महानगरपालिका/नगपालकांकडून वसूल होणारी हमी शुल्काची थकित रक्कम ही ४०% हमी शुल्क व ६०% दंडनीय व्याजापोटी समायोजित करावी अथवा याबाबत शासनाने प्रमाण (ratio) ठरवून द्यावे. त्यामुळे हमी शुल्काची रक्कम कमी झाल्याने त्यावरील दंडनीय व्याजाची आकारणी देखिल कमी होवून महानगरपालिका/नगरपालिका यांना प्रोत्साहन मिळून थकबाकीची जास्त वसूली होईल असे समितीचे मत असून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

६.१०२ एक रकमी चुकता योजने अंतर्गत थकित हमी शुल्कावरील दंडनीय व्याजामध्ये सवलत देण्यात यावी. त्यासाठी महानगरपालिका/नगरपालिकाकडून पुढील हमी शुल्क नियमित भरण्याबाबत हमीपत्र घेण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे.

४) उद्योग विभाग :-

६.१०३ सन २००३ ते २०१० या कालावधीत हमी शुल्काची रक्कम माफ करणेबाबत शासनाच्या वित्त विभागास उद्योग विभागाने पत्रव्यवहार केला. परंतु वित्त विभाग सदर प्रस्तावाशी सहमत नाही.

महामंडळाने दिनांक ३१.०८.२०१० पर्यंत शासनास हमी शुल्काची रक्कम रूपये ३१.४४ कोटी तसेच महालेखाकारांच्या लेखा परिक्षकांच्या लेखा परिक्षकांनी परिगणना केलेल्या दंडत्मक व्याजाचा भरणा केलेल नाही. हमी शुल्काची रक्कम ही संविधीक दायित्व (Statutory Liability) असल्यामुळे सदर दायित्वाची पूर्तता महामंडळ प्रशासकीय खर्च वगळून उरणाऱ्या कर्ज वसूली रक्कमेमधून करेल. पर्यायाने शासनाला महामंडळास होणाऱ्या कमी कर्ज वसूलीमुळे पूर्तता न करु शकाणाऱ्या बंधपत्राच्या दायित्वाची तसेच अदत्त हमी शुल्क रक्कमे एवढी अर्थसंकल्पीय तरतूद करावी लागेल. महामंडळाने हमी शुल्क अदा करण्यासाठी नव्याने ३१.४४ कोटी रूपयाची पुरवणी मागणद्वारे अतिरिक्त अर्थसंकल्पीय तरतूद करण्यासाठी सुधारीत प्रस्ताव शासनास सादर केला आहे.

६.१०४ महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाने बाजारात जे कर्जरोखे काढले होते. त्या कर्जरोख्यांची परतफेडसुद्धा महामंडळाकडून केली जात नाही, ही गंभीर बाब आहे. कर्ज रोखण्यासाठी महामंडळाने खाजगी बँकाकडून हमी घेतली असती आणि वेळेवर हमीची रक्कम भरली नसती तर त्यांच्याकडून महामंडळावर जप्ती आली असती. कर्जरोख्यांना शासनाची हमी असल्यामुळे महामंडळाने या संदर्भात काहीही प्रयत्न केले नाही. महामंडळाचे थकबाकीदार १० हजारापेक्षा अधिक आहेत. महामंडळ वसूलीसाठी गंभीर नसल्यामुळे समितीने तीव्र नाराजी व्यक्त केला आहे. **वित्तीय महामंडळ**

कर्जरोख्यांच्या मुद्दलाची रक्कम अदा करु न शकणे या संदर्भात संबंधितावर जबाबदारी निश्चित करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.

६.१०५ वित्तीय महामंडळामध्ये अंदाजीत थकीत रक्कम १२०० कोटी रुपये आहे. त्यात १५० कोटी रुपये मुद्दल आहे. मूळ रक्कमेच्या १५ टक्के एवढीच वसुली झालेली असल्याने समितीने नाराजी व्यक्त केली. महामंडळाच्या ताब्यात औद्योगिक वसाहती मधील अनेक जागा आहे. जागांचे बाजारभाव दिवसेंदिवस वाढत आहे. मालमत्तेचे लिलाव होऊन चांगली वसूली होणे अपेक्षित आहे. शिवाय महामंडळाने उद्योगधंद्यासाठी कर्ज देताना या सर्व गोष्टींचा सर्वंकष विचार करणे आवश्यक होते. परंतु तसे करण्यात आलेले दिसून येत नाही. त्यामुळे विभागाकडून वसूली होत नसल्याच्या प्रकरणाच्या संदर्भात जे अधिकारी जबाबदार आहे, ते निवृत्त झालेले असले तरी त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. कारण त्यामुळेच या प्रत्येक प्रकरणाला न्याय मिळेल. सर्वात मोठे कर्जदार ठाणे येथिल असूनही महामंडळाच्या ताब्यातील मालमत्ता विकण्यासंदर्भात समितीची दिशाभूल करण्यात येत आहे. परंतु विभागाने बाजारभावापेक्षा जागांचा कमी किंमतीला लिलाव होत असल्याचे सांगितले आहे. हे विभागाचे म्हणणे योग्य नाही **त्यामुळे या प्रकरणी जे अधिकारी/कर्मचारी संबंधीत आहे. त्यांची चौकशी करण्यात यावी व चौकशीत दोषी आढळून आलेल्या संबंधीतांवर योग्य ती कारवाई करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

६.१०६ वर्षनिहाय मालमत्ताधारक व थकबाकीदारांची यादी समितीला सादर करावी. त्यांच्याकडून वसुली करण्याकरिता अलिकडे कोणत्या प्रकारची कारवाई करण्यात आलेली आहे, याची माहिती समितीला देण्यात यावी तसेच, त्यांच्याकडून करण्यात आलेल्या वसुलीची सद्य:स्थिती काय आहे, यासंदर्भातील माहिती समितीला देण्यात यावी अशीही शिफारस समिती करीत आहे.

५) ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण) विभाग :-

६.१०७ शासनाने विहीत केलेल्या दाराप्रमाणे (२%) वरील मालिकांच्या बाबतीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने दिनांक ३०.९.२००३ पर्यंत रूपये २,२८,३१,०००/- इतक्या हमी शुल्काचा शासनाकडे भरणा केला आहे. दिनांक ३१.०३.२००६ अखेरपर्यंत रुपये १३.७७ कोटी इतकी रक्कम हमी शुल्क (दंडनीय व्याजासह) शासनाकडे भरावयाची बाकी आहे. महामंडळाने कर्जरोख्याद्वारे उभारलेल्या रूपये १०३.०४ कोटीतूनच हमी शुल्काची रक्कम रुपये २,२८,३१,०००/- शासनाकडे देय दिनांकास भरली आहे. महामंडळाकडे निधी उपलब्ध नसल्यामुळे हमी शुल्काची रक्कम शासनाकडे भरता आली नाही.

६.१०८ महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाने बाजार भावाप्रमाणे कर्जरोखे बाजारात आणले व त्याचे पैसे मिळाल्यानंतर त्यातील हमी शुल्काची रक्कम शासनाकडे भरणा केल्याशिवाय उर्वरित रक्कम खर्च करण्याची परवानगी महामंडळाला नसते. महामंडळाकडे जसे कर्जरोखे बाजारात आणण्याचे नियोजन होते तसेच शासनाच्या हमी शुल्काचा भरणा करण्याचे नियोजन करणे आवश्यक होते. कर्जरोख्याच्या पैशातून जलसंधारण महामंडळाने छोटे, मोठे तलाव बांधणे, सिमेंट कॉंक्रीट किंवा मातीचा पक्का बंधारा घालून देणे, इत्यादी कामे केली. कर्जरोख्याच्या स्वरुपामध्ये शासनाकडून मार्केटमध्ये बाजारभाव करुन मिळविलेला आहे. तो शासनाकडे परत करण्याकरिता या कामामधूनच महामंडळाने मार्ग शोधणे क्रमप्राप्त होते. कर्जरोखे म्हणजे शासनाकडून मिळालेले अनुदान नव्हे. बँकाकडून कर्ज घेतले असते, तर ते त्या बँकाना विहित कालावधीमध्ये व्याजासह परत करावेच लागले असते. कर्जरोखे शासनाचे पैसे असल्यामुळे ते बुडित खात्यामध्ये गेले तरी चालतात हा जो समज आहे तो दूर होणे गरजेचे आहे. कर्जरोख्यांची रक्कम परत करण्यासाठी योजना आखणे गरजेचे होते. तसे न केल्यामुळे कर्जरोखे आणि त्यांच्यावरील वाढते व्याज व दंडनीय व्याज कमी करण्याकरिता शासनाकडे अनेक प्रस्ताव येतात. **परंतु मूळ हमी शुल्काची रक्कम भरण्याबाबत महामंडळांनी काहीतरी ठोस निर्णय घेऊन त्यावर कार्यवाही करणे अतिशय आवश्यक आहे.**

६.१०९ हमी शुल्क भरणे बंधनकारक आहे. कर्जरोख्याद्वारे उभारल्या जाणाऱ्या रकमेच्या मुद्दलाची विहीत दिनांकास परतफेड करणे व मुद्दल परत होईपर्यंत त्या रकमेवरील व्याज प्रदान करण्याबाबत शासनाने हमी दिलेली आहे. महामंडळाला उत्पन्न नसल्याने, कर्जरोख्याद्वारे उभारलेल्या रकमेतूनच दिनांक १.१०.२००३ पर्यंत हमी शुल्काची रक्कम महामंडळाने भरली आहे. त्यानंतरच्या कालावधीत कर्जरोख्याद्वारे उभारलेली उर्वरित रक्कम कामावर तसेच कर्जरोखे धारकांना व्याज प्रधान करण्यासाठी खर्च झालेली आहे. वर्ष २००५-२००६ पर्यंत महामंडळाला शासनाकडून अल्प प्रमाणात निधी प्राप्त झाला व शासनाच्या आदेशानुसार, प्राप्त झालेला निधी, बहुतांशी विशिष्ट कामावरच खर्च करावयाचा होता. त्यामुळे दिनांक १.१०.२००३ पासूनच हमी शुल्क महामंडळ भरु शकले नाही.

६.११० विभागाने दिलेले कारण संयुक्तिक नव्हते. कारण कर्जरोखे म्हणजे शासनाचे अनुदान नव्हते. त्यासाठी परतफेडीची योजना आखणे, तसेच ठोस निर्णय घेऊन कार्यवाही करणे आवश्यक होते. परंतु तसे न करता कर्जरोखे आणि त्यांच्यावरील वाढते व्याज व दंडनीय व्याज कमी करणे. तसेच **अर्थसंकल्पात तरतूद करुन पुस्तकी समायोजन करणे इत्यादीची मागणी वित्त विभागाकडे करणे योग्य नसल्याचे समितीचे मत आहे. त्यामुळे महामंडळाच्या कामाकरीता कर्जरोख्यांच्या स्वरूपामध्ये मिळालेल्या रक्कमेचा परतावा करण्याकरीता महामंडळाने विशेष योजना / आराखडा तयार करावा त्याप्रमाणे कार्यवाही करावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

गृह (परिवहन) विभाग

पोलिस सुरक्षादलासाठी पायाभूत सुविधा देणे.

७.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या महसुली जमा अहवालामधील **परिच्छेद क्र. ६.४ "पोलिसांच्या मूल्याची वसुली न करणे"** या संदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय व्यक्त केले.

मे १९९८ च्या शासन निर्णयाप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेच्या हद्दीतील अतिक्रमणे/अनधिकृत बांधकामे या विरुध्द कार्यवाही करताना संरक्षणाची तरतूद करण्यासाठी आणि त्या जागी कायदा व सुव्यवस्था ठेवण्यासाठी एक स्वतंत्र पोलिस दल निर्माण करण्यात आले. तसेच त्या निर्णयामध्ये असेही करारनिविष्ट केले होते की, या दलाच्या वेतनासाठी झालेला खर्च महानगरपालिकेने सोसावयाचा होता आणि तो पोलिस आयुक्त, औंरगाबाद यांचेकडे प्रत्येक तिमाही करता आगाऊ जमा करावयाचा होता. मार्च २००५ मध्ये पोलिस आयुक्तांच्या अभिलेख्यांच्या छाननीत असे दिसून आले की, महानगरपालिकेकडून अतिक्रमणे/अनधिकृत बांधकामे यांचे विरुध्द कार्यवाही सुकर करण्यासाठी केलेल्या खर्चाची ना पोलिस आयुक्तांनी मागणी केली ना वसूल करण्याची काही कार्यवाही केली. याचा परिणाम एप्रिल २००० ते नोव्हेंबर २००५ या कालावधीकरिता महानगरपालिकेकरता लावलेल्या पोलिस दलावर झालेल्या रु. १.३९ कोटी खर्चाची वसुली न होण्यात झाला.

हे निदर्शनास आणून दिल्यावर, पोलिस आयुक्त यांनी डिसेंबर २००५ मध्ये, वसुलीकरता प्रयत्न केले जात असल्याचे सांगितले.

ही बाब शासनाला मार्च २००६ मध्ये कळविण्यात आली, त्यांचे उत्तर अजूनपर्यंत प्राप्त झाले नाही (डिसेंबर २००६).

७.२ ज्ञापन :

उक्त अभिप्रायासंदर्भात गृह विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात पुढील प्रमाणे खुलासा केला आहे.

१. शासनाचे गृह विभाग, शासन निर्णय क्र. अेपीओ-३२९७/३११२/प्रक्र-६८/पोल-३, दि. १२ मे, १९९८ अन्वये औरंगाबाद येथील अनधिकृत बांधकाम हटवताना स्थानिक कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक असलेले पोलीस संरक्षण पुरविण्याकरीता एका स्वतंत्र पोलीस दलाची निर्मिती करण्यात

आली होती. सदर शासन निर्णयातील परि.५ (ई) अन्वये सदर संरक्षण दलातील पोलीसांचे वेतन/भत्ते व इतर खर्च औरंगाबाद महानगर पालिकाद्वारे पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांचेकडे प्रत्येक तीन महिन्यासाठी आगाऊ भरणा करण्याची अटी घातलेल्या आहे. सदर शासन निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे. (विवरणपत्र क्र. १३)

२. त्या अनुषंगाने पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांनी त्यांचे आदेश क्र.कक्ष-१ पोनि/बदली/९८/९२३८२, दि.२२/०९/९८ व आदेश क्र.कक्ष-१/१२२/बदली/१९९८१२४१०, दि. २३/०९/१९९८ अन्वये खालीलप्रमाणे स्वतंत्र पोलीस दलाची निर्मिती केली आहे. (प्रत संलग्न) :-

१)	पोलीस निरिक्षक	-	१
२)	पोलीस हवालदार	-	४
३)	पो.शि. (एम)	-	१९
४)	पो.शि.(एफ)	-	४
५)	पो.शि.(चालक)	-	१
	एकूण	-	२९

सदर आदेशाची प्रत सोबत जोडली आहे.

३. औरंगाबाद महानगर पालिकेमार्फत उपरोक्त पोलीस दलाचे वेतन/भत्त्यापोटी भरणा करण्यात आलेल्या रक्कमांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

अ) थकीत रक्कम रुपये - १,५४,५०,५३० (माहे ९/९८ ते ११/०५ औरंगाबाद म.न.कडे)

ब) औरंगाबाद महानगरपालिकेने भरणा केलेली रक्कम

अ.क्र.	**धनादेश क्र.**	**दिनांक**	**रक्कम**
१	७९८२०८	७.८.९८	८,१३,१०७
२	११२११३	६.०९.०६	२५,००,०००
३	७७०६९९	२३.३.०७	५०,००,०००
एकूण-			**८३,१३,१०७**

क) माहे ११/२००५ पर्यंतचे थकीत रक्कम रुपये ८३,१३,१०७/- एवढी रक्कम चलन क्र. ३२०, दि. २५.०९.९८, रु. ८,१३,१०७/- क्र.३१८, दि.२५.११.०६, रु.२५,००,०००/- व चलन क्र.५३५, दि.३०.०३.०७, रु.५०,००,०००/- अन्वये शासकीय कोषागारात भरणा करण्यात आलेला आहे.

४. थकीत रक्कमेच्या वसुलीसाठी औरंगाबाद महानगर पालिकेस वेळोवेळी पत्रव्यवहार करुन सतत प्रयत्न करण्यात आलेला आहे.

जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी घेतलेल्या मासिक बैठकीमध्ये औरंगाबाद महानगरपालिकेकडे प्रलंबित असलेल्या रकमेबाबत चर्चा करण्यात आलेली आहे. तसेच जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनीही त्यांचे पत्र क्र.२००५/मशाका/वसुली/कावी, तातडीने भरणा करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. सदर पत्राची प्रत सोबत जोडली आहे. (विवरणपत्र क्र १३)

सदर प्रकरणी उपरोक्त बाब पहाता औरंगाबाद महानगरपालिकेकडून बंदोबस्त शुल्क वसुली सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत असल्याने सदरहू आक्षेप निकाली काढण्यात यावा, ही विनंती.

साक्ष :

७.३ विभागाने पुरविलेल्या उपरोक्त लेखी माहितीच्या आधारे अधिक माहितीसाठी समितीने दिनांक ७ सप्टेंबर, २०१० रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. याबाबत अधिक माहिती घेताना समितीने महालेखाकार यांना सदर परिच्छेदा संदर्भात व्यक्त केलेल्या अभिप्रायाबाबत थोडक्यात माहिती द्यावी असे सांगितले असता, वरीष्ठ महालेखाकार यांनी असे सांगितले की, सन २००५-२००६ या वर्षाच्या महसुली जमा अहवालातील परिच्छेद क्र.६.४ हा "पोलीस खर्चाची वसुली न करणे" या विषयाबाबत असून दि.१२ मे, १९९८ च्या शासन निर्णयानुसार औरंगाबाद महानगरपालिकेला औरंगाबाद येथील अतिक्रमण हटविण्यासाठी गृह विभागाकडून विशेष पोलीस पथक देण्यात आले होते. १९९८ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ५ (ई) नुसार महानगरपालिकेला अतिक्रमण हटविण्यासाठी देण्यात आलेल्या संरक्षण दलातील पोलिसांचे वेतन/भत्ते व इतर खर्च औरंगाबाद महानगरपालिकेद्वारे पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे प्रत्येक तीन महिन्यांसाठी आगाऊ भरणा करुन, पोलीस आयुक्तांनी प्राप्त झालेली आगाऊ रक्कम सरकारच्या खात्यामध्ये जमा करावयाची होती. परंतु शासन निर्णयानुसार सदरहू रक्कम शासनाच्या खात्यामध्ये जमा न झाल्यामुळेच या परिच्छेदाबाबत आक्षेप घेण्यात आलेला आहे. सन २००० ते २००५ या कालावधीत औरंगाबाद महानगरपालिकेकडून पोलीस आयुक्तांनी आगाऊ रक्कम वसूल न केल्यामुळेच हा परिच्छेद आलेला आहे अशी माहिती दिली.

७.४ यासंदर्भात गृह विभागाने औरंगाबाद महानगरपालिकेला अतिक्रमण हटविण्यासाठी जो पोलीस कर्मचारीवृंद दिला होता, त्या कर्मचारीवृंदाच्या खर्चापोटी औरंगाबाद महानगरपालिकेकडून गृह विभागाला १.३९ कोटी रुपये येणे बाकी होते. ज्यावेळी या परिच्छेदाला उत्तर देण्यात आले होते त्यावेळी गृह विभागाकडे बरीचशी रक्कम जमा झाली नव्हती. परंतु सद्यःस्थितीत औरंगाबाद महानगरपालिकेकडून १.२५ कोटी रुपये वसूल करण्यात आलेले आहेत. आता केवळ १४ लाख रुपये येणे बाकी आहेत. साधारणतः सप्टेंबर, २०१० अखेरपर्यंत ही रक्कम सुध्दा जमा होईल. यापुढे नगर

विकास विभाग आणि गृह विभाग यांच्या समन्वयातून ही रक्कम अर्थसंकल्पामध्ये तरतूद करुन कशी मिळेल याबाबत काळजी घेण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

७.५ महालेखाकार यांनी आक्षेप घेतल्यामुळेच गृह विभागाकडून हालचाल करण्यात आली व औरंगाबाद महानगरपालिकेकडून थकीत रक्कम वसूल करण्यास सुरुवात झाली त्यामुळे ज्यांनी ही रक्कम वेळीच वसूल केली नाही त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची तरतूद आहे की नाही ? शिस्त लागण्याच्या दृष्टिकोनातून, ही रक्कम वसूल न करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करणे आवश्यक आहे असे समितीने मत व्यक्त केले.

७.६ ही रक्कम वेतनाची आहे. मुंबई, पुणे या ठिकाणी सुध्दा अशा प्रकारचा कर्मचारीवर्ग पुरविण्याबाबत महानगरपालिकांकडून प्रस्ताव आलेले आहेत. ही कुमक रिमूव्हेबल ॲप्रोचमेंटसाठी आहे. वास्तविक पाहता अर्थसंकल्पामध्ये सुरुवातीलाच गृह विभागाला नगरविकास विभागाकडून निधी मिळावयास पाहिजे, याबाबत नगर विकास विभागाकडून असे करता येईल काय हे पहावे लागेल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

७.७ वास्तविक पाहता महानगरपालिकेचे वार्षिक अंदाजपत्रक अगोदरच तयार करण्यात येते. त्यामध्ये उक्त वर्षातील महानगरपालिकेची देय रक्कम आणि प्राप्त उत्पन्न याबाबतचा उल्लेख असतो. त्यामुळे गृह विभागाने शासन निर्णयानुसार, महानगरपालिकेकडून तीन महिन्यांची आगाऊ रक्कम वसूल करावयास हवी होती. ही रक्कम वसूल करण्यासाठी गृह विभागाने महानगरपालिकेकडे पाठपुरावा केल्याचे दिसत नाही. महालेखाकार यांनी आक्षेप घेतल्यामुळेच महानगरपालिकेने एक रकमी रक्कम भरल्याचे दिसते, किंबहुना गृह विभागाने उक्त रक्कम वसूल केली असे वाटते. याचाच अर्थ असा आहे की, महालेखाकार यांनी आक्षेप घेईपर्यंत गृह विभागाकडून कसल्याच प्रकारची हालचाल करण्यात आली नाही. महानगरपालिके कडे येणे असलेली रक्कम ही रक्कम वसूल करण्यासाठी गृह विभागाने महानगरपालिकेशी पत्रव्यवहार केला होता काय तसेच ही रक्कम वसूल करण्यासाठी बैठका घेतल्या काय ? अशी विचारणा समितीने केली असता, पोलीस आयुक्त यांच्या स्तरावर याबाबतची कार्यवाही होत असते. कायदा व सुव्यवस्थेचा जो कर्मचारीवर्ग असतो तो कोणत्या कामासाठी वापरावा याचे पूर्वनियोजन करता येत नाही. जशी परिस्थिती निर्माण होईल त्यानुसार कर्मचारीवर्ग वापरावा लागतो असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

७.८ अतिक्रमण हटविण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेला कायमस्वरुपी पोलीस कर्मचारीवर्ग देण्यासंदर्भात गृह विभाग आणि महानगरपालिका यांच्यामध्ये समझोता झालेला होता. परंतु त्यापोटी

वसूल करावयाची रक्कम गृह विभागाने वसूल केली नाही असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता, महानगरपालिकेकडून थकीत रक्कम वसूल करण्यासाठी पोलीस आयुक्तांनी महानगरपालिकेसोबत सन १९९९ पासून पत्रव्यवहार केलेला आहे. विभागाकडे असलेल्या माहितीनुसार पोलीस आयुक्तांनी सर्वप्रथम दि.६ जानेवारी, १९९९ रोजी पत्र पाठविले होते. त्यानंतर सातत्याने म्हणजेच सन २००१, २००२, २००५, २००६ मध्ये स्मरणपत्रे सुध्दा पाठविली होती महानगरपालिकेकडून थकित रक्कम वसुल करण्यासाठी पोलीस आयुक्तांनी कोणकोणत्या तारखांना पत्र व्यवहार केला व त्यावेळचे पोलीस आयुक्त कोण होते याबाबतची तपशीलवार माहिती खालीलप्रमाणे आहे.

७.९ पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांचे कार्यालयाकडून पोलीस बंदोबस्ताच्या वसुलीबाबत औरंगाबाद महानगरपालिकेकडे करण्यात आलेल्या पाठपुराव्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे-

अ.क्र.	**पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांच्या अ.शा.पत्राचा दि.**	**कालावधी**
१.	६.०१.१९९९	२२.०६.१९९८ ते २१.१२.१९९८
२.	३०.०८.२००१	१.१०.१९९८ ते ३१.०८.२००१
३.	२७.११.२००१	१.१०.१९९८ ते ३१.१२.२००१
४.	१५.०५.२००२	१.१०.१९९८ ते ३१.०३.२००२
५.	११.११.२००२ (स्मरणपत्र)	१.१०.१९९८ ते ३१.०३.२००२
६.	४.०३.२००३ (स्मरणपत्र)	१.१०.१९९८ ते ३१.०३.२००२
७.	२.०६.२००३	१.१०.१९९८ ते ३१.०३.२००३
८.	२४.०९.२००३ (पत्राची प्रत उपलब्ध नाही.)	१.१०.१९९८ ते ३१.०८.२००३
९.	२८.०२.२००५	१.१०.१९९८ ते ३१.१२.२००४
१०.	५.०९.२००५	१.१०.१९९८ ते ३१.०७.२००५
११.	१३.०१.२००६	१.१०.१९९८ ते ३०.११.२००५

जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे दिनांक ५.१२.२००५ रोजी शासकीय खर्चाच्या वसुलीबाबत झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना पोलीस बंदोबस्ताची रक्कम भरणेबाबत दिनांक १९.१२.२००५ ला पत्र पाठविले आहे. तसेच शासन

स्तरावर पोलीस महासंचालक तसेच सचिव नगर विकास विभाग यांना अपर मुख्यसचिव यांचे अर्धशासकीय पत्रही दिनांक ७.९.२०१० रोजी पाठविण्यात आले आहे.

वरील पाठपुराव्यानंतर औरंगाबाद महानगरपालिकेने भरणा केलेल्या पोलीस बंदोबस्ताच्या खर्चाच्या रकमेचा तपशील-

१. दि. ११.०५.२००६ रु. ३१,१००/-

२. दि. २८.११.२००६ रु. २५,००,०००/-

३. दि. ३०.०३.२००७ रु. ५०,००,०००/-

४. दि. २.०९.२००९ रु. ५०,००,०००/-

५. दि. ११.१०.२०१० रु. १३,६८,९००/-

एकूण रु. १,३९,००,०००/-

पोलीस आयुक्त, औंरगाबाद यांचे दि. ११.१०.२०१० च्या पत्रानुसार रु. १.३९ कोटी इतक्या रकमेची पूर्णपणे वसुली करण्यात आलेली आहे.

पोलीस आयुक्त यांचे नांव	**कार्यकाळ**	**वसुलीबाबत केलेला पत्रव्यवहार**
१.श्री.रामराव वाघ (भा.पो.से.)	दि. ८.३.२००३ ते २७.५.२००५	४.०३.२००३ २.०६.२००३ (अ.शा.पत्र) २४.०९.२००३ २८.०२.२००५ (अ.शा.पत्र)
२. श्री.उध्दव कांबळे (भा.पो.से.)	दि. १.६.२००५ ते २९.१.२००८	५.०९.२००५ (अ.शा.पत्र)
३. श्री.के.एल.बिस्नोई (भा.पो.से.)	दि. १३.२.२००८ ते ३१.८.२००९	१३.०१.२००६

७.१० सन १९९८ च्या शासन निर्णयानुसार पोलीस आयुक्तांनी महानगरपालिकेकडून प्रत्येक तीन महिन्यासाठीची रक्कम आगाऊ वसूल करावयास हवी होती. परंतु वस्तुस्थिती ही आहे की, गृह विभागाने ही रक्कम वेळीच वसूल केलेली नाही असे महालेखाकारांनी समितीच्या निदर्शनास आणून दिले असता, विभागीय सचिवांनी खुलासा केला की, थकीत रकमेचे पहिले प्रदान दि.११ मे, २००६

रोजी झाले. २००६ या वर्षात दोनदा प्रदान करण्यात आलेले आहे. सन २००७ व २००९ मध्ये प्रत्येकी एकदा प्रदान करण्यात आले. आतापर्यंत १.२५ कोटी रुपयांची रक्कम वसूल झालेली आहे. महालेखाकार यांच्या परिच्छेदाच्या आक्षेपापूर्वी सुध्दा या रकमेची वसुली सुरु होती. असाही खुलासा विभागीय सचिवांनी समितीसमोर केला

७.११ सन १९९८ च्या शासन निर्णयानुसार महापालिकेने प्रत्येक तीन महिन्यांसाठी पोलीस आयुक्तांकडे आगाऊ भरणा करावयास हवा होता. अतिक्रमण हटविण्यासाठी गृह विभागाने औरंगाबाद महानगरपालिकेला २९ लोकांचा कर्मचारीवृंद दिलेला आहे. परंतु या कर्मचारीवृंदाच्या वेतन/भत्ते व इतर खर्चापोटीची रक्कम वसूल करण्यासाठी गृह विभागाकडून कसल्याही प्रकारची कार्यवाही केली जात नाही म्हणूनच महालेखाकार यांनी हा लेखापरिच्छेद काढला. महालेखाकार यांनी हा लेखापरिच्छेद काढला नसता तर कदाचित ही वसुली झालीच नसती. असे म्हटल्यास ती अतिशयोक्ती होणार नाही. त्यामुळे ज्या कालावधीत हे सर्व घडलेले आहे त्या कालावधीतील अधिकाऱ्यांना जबाबदार धरुन, त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी तसेच या प्रकरणी सन १९९८ च्या शासन निर्णयाचे पालन झालेले नाही, ही बाब गांभीर्याने घेण्यासारखी आहे. महानगरपालिकेने पोलीस आयुक्तांकडे रक्कम भरली नसेल तर, गृह विभागाने तो कर्मचारीवृंद काढून घ्यावयास पाहिजे होता असे समितीला वाटते.

७.१२ व त्याव्यक्तीच्या सुरक्षिततेबाबत काळजी घेणे आवश्यक असेल लोकप्रतिनिधी किंवा प्रतिष्ठीत नागरिक यांनी संरक्षणाची मागणी केल्यानंतर ठराविक रक्कम घेऊन त्यांना पोलीस संरक्षण दिले जाते. अशा प्रकारचे संरक्षण दिल्यानंतर संबंधितांकडून विभागाला संरक्षणापोटी एकूण किती रुपये येणे बाकी आहे या समितीच्य सूचक प्रश्नाला उत्तर देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, पोलीस संरक्षण पुरविण्यासाठी गृह विभागाची एक समिती आहे. ती समितीच पोलीस संरक्षण पुरविण्याबाबत निर्णय घेते. एखाद्या व्यक्तीला वैयक्तिक संरक्षण हवे असेल तर सर्व बाबी तपासून व निकषानुसार ठराविक रक्कम आकारुन पोलीस संरक्षण दिले जाते. तसेच जर सरकारला वाटत असेल की, अमुक व्यक्ती शासकीय सेवक आहे याच अनुषंगाने समितीने घेण्याच्या दृष्टीने अशी विचारणा केली ज्याप्रमाणे तर, त्या व्यक्तीला सरकार स्वत:हून पोलीस संरक्षण पुरविते. सरकारने पुरविलेल्या संरक्षणापोटी कसल्याही प्रकारची रक्कम आकारली जात नाही, परंतु कोणी वैयक्तिक संरक्षण मागितले असेल तर त्यापोटी विहित रक्कम आकारली जाते. खाजगी व्यक्तींना सुध्दा गृह विभागाकडून मागणी केल्यानुसार संरक्षण पुरविले जाते. ज्यांना वैयक्तिक संरक्षण पुरविले आहे त्यांच्याकडून किती रक्कम येणे बाकी

आहे. याबाबतची माहिती विभागीय सचिवांकडे उपलब्ध नसल्यामुळे सदर माहिती मात्र समितीस मिळू शकली नाही.

७.१३ मध्यंतरी विधानसभेत विशेष पोलीस सुरक्षा दल स्थापन करण्याबाबतचे विधेयक एकमताने संमत झाले होते. त्या अनुषंगाने विभागाने आतापर्यंत काय कार्यवाही केली आहे ? यामध्ये किती पोलीस कर्मचारी नेमणार आहात ? यासाठी सरकारने २५ कोटी रुपयांची अर्थसंकल्पामध्ये तरतूद सुध्दा केली आहे. या सुरक्षा दलाचे इन्फ्रास्ट्रक्चर कसे असेल, किती कर्मचारी उपलब्ध करुन देणार आहात, भरती कधी होणार आहे, या दलामध्ये किती अधिकारी/कर्मचारी असणार आहेत, ही सेवा दुसऱ्यांना देताना किती दर आकारला जाणार आहे तसेच विधेयक संमत होऊन सहा महिन्यांचा कालावधी उलटून गेलेला असला तरी विभागाकडून पुढील काम अपेक्षेप्रमाणे झाले नाही.

७.१४ वास्तविक पाहता विशेष पोलीस सुरक्षा दल उपलब्ध करुन दिल्यानंतर, त्या माध्यमातून रक्कम उपलब्ध होणार आहे. म्हणजेच ज्यांना या सुरक्षा दलाचे संरक्षण दिले जाणार आहे त्यांच्याकडून सरकारला रक्कम मिळणार आहे. असे असताना सुध्दा सहा महिन्यांपूर्वी संमत झालेले विधेयकामध्ये नमूद केलेल्या तरतूदींच्या अनुषंगाने करावयाच्या उपाययोजनेची अंमलबजावणी आजही प्राथमिक स्वरुपात असणे ही बाब योग्य नाही असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले.

७.१५ उक्त अधिनियमातील तरतूदींची विभाग करीत असलेली कारवाई ही अत्यंत संथ गतीने होत आहे. याबाबतची कारणे काय आहेत असे समितीने विभागास विचारले असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, अशा प्रकारचे पोलीस सुरक्षा दल निर्माण करण्यासंदर्भात बोर्डाची १० दिवसांपूर्वीच बैठक झालेली आहे. या पथकामध्ये वरिष्ठ आय.पी.एस. अधिकाऱ्यांमधून ६ अधिकारी प्रतिनियुक्तीवर घ्यावयाचे आहेत. शिवाय होमगार्डमधून कोणता कर्मचारी घ्यावयाचा ही बाब बोर्डापुढे आणावयाची आहे. तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना देखील यामध्ये कंत्राटी पद्धतीवर सामावून घेण्याचे विचाराधीन आहे. श्री.पी.के.जैन, अतिरिक्त महानिरीक्षक हे या पथकाचे उपाध्यक्ष आहेत. तेच हे काम बघणार आहेत यासंदर्भात अधिक माहिती विभागाकडून खालीलप्रमाणे प्राप्त झाली.

७.१६ हे विधेयक सन २००९ मध्ये नागपूर येथील अधिवेशनामध्ये पुर:स्थापित झाले असनू, २०१० च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये संमत झाले आहे."विधानमंडळाच्या अधिनियमान्वये महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. महामंडळाचे भागभांडवल म्हणून सन २००९-२०१० मध्ये रु. २.०० कोटी आणि सन २०१०-२०११ मध्ये रु. ३.०० कोटी इतक्या निधीची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे.

७.१७ महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून श्री.पी.के.जैन यांची दिनांक २८ जुलै, २०१० रोजीच्या आदेशान्वये नियुक्ती करण्यात आली आहे. महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दिनांक ३० ऑगस्ट, २०१० व दिनांक ३ जानेवारी, २०११ रोजी दोन बैठका पार पडल्या आहेत. या बैठकांमध्ये महामंडळासाठी कार्यालयासाठी जागा घेणे, भाड्याची निश्चिती करणे, प्राथमिक खर्चाबाबत निर्णय घेणे, लेखापरिक्षकांची नियुक्ती करणे, महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या कार्यकक्षा निश्चित करणे आदी मुद्दयांबाबत विचारविनिमय करुन निर्णय घेण्यात आले आहेत". या संदर्भात अधिक माहिती देताना सचिवांनी असेही सांगितले की, हे विधेयक २००९ मध्ये नागपूरच्या अधिवेशनात पुर:स्थापित झाले असून, २०१० च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात संमत झालेले आहे. या विशेष पोलीस सुरक्षा दलाची नोंदणी करुन घेतली असून, नियमांचे काम जवळजवळ पूर्ण झाले आहे. सुरक्षिततेच्या प्रयोजनार्थ किती कर्मचारी वर्ग पाहिजे याचा आढावा घेण्याकरिता विभागाने रिझर्व्ह बँक व इतर बँकाकडून प्रस्ताव मागविले आहेत. त्याप्रमाणे तो कर्मचारी वर्ग पुरविण्याकरिता या विषयाबाबत पूर्वी झालेल्या बैठकीत सुरुवातीला नवीन कर्मचारीवर्ग घेण्यापूर्वी माजी कर्मचाऱ्यांची नियुक्ती निश्चित करण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी आवश्यक असलेले कायदेशीर नोंदणी वगैरे बाबींसाठी वेळ लागतो अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

७.१८ विशेष पोलीस पथक निर्माण करण्याबाबतचे विधेयक पास होऊन सहा महिने झाले तरी अद्याप पर्यंत याबाबतचे नियम तयार होत नाहीत हे योग्य नाही. या विधेयकावर अनेक सन्माननीय सदस्य सभागृहात बोलले होते. याबाबतीत शासनाने लोकप्रतिनिधींच्या सूचना विचारात घेतल्या पाहिजेत. त्यावेळी माननीय मंत्र्यांनी "लोकप्रतिनिधीं समवेत आम्ही चर्चा करू" असे सांगितले होते. असे असतानाही शासनाने लोकप्रतिनिधींशी याबाबतीत चर्चा केली नाही. वास्तविक लोकप्रतिनिधीं बरोबर चर्चा व्हायला पाहिजे. अर्थसंकल्पामध्ये या बाबीकरिता २५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. निवृत्त अधिकारी आहेत, लोकप्रतिनिधी सल्ला द्यायला तयार आहेत असे असताना केवळ नियम तयार करायला इतका विलंब का होतो ? विभागाच्या आतापर्यंतच्या भूमिकेवरुन उपरोक्त प्रश्न सोडविण्यासाठी ज्या तातडीने काम करणे आवश्यक आहे त्या प्रमाणात विभागाकडून केले जात नाही. ग्रामीण सुरक्षा दलाच्या स्थापनेबाबत पोलीस मॅन्युअल ॲक्टमध्ये तरतूद आहे. शहरी भागात गणपती उत्सवाच्या वेळी, निवडणुकीच्या वेळी पोलिसांना २४ तास ड्यूटी करावी लागते त्यांच्यावर जबाबदारी असते. परंतु, ग्रामीण भागातील होमगार्डची अवस्था दयनीय आहे म्हणून ते काम करण्यास कोणी आकर्षित होत नाही. या होमगार्डस्चे वेतन वाढवून त्यांच्याकडे अधिक जबाबदारी सोपविण्याची

आवश्यकता आहे. तसेच, ही जबाबदारी पार पाडण्यासाठी त्यांना कार्यालयही देणे आवश्यक असून ज्या भागामध्ये ते कंत्राटी तत्त्वावर काम करतात. त्यांना नियमित सेवेमध्ये कायम करताना त्यांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. असेही समितीने विभागीय सचिवांच्या निदर्शनास आणून दिले.

७.१९ यासंदर्भात समितीच्या भावना लक्षात घेऊन विभागाकडून निश्चितपणे हे काम पूर्ण करण्याकरिता जास्त प्रयत्न केले जातील. तसेच, बोर्डाच्या या पुढील बैठकीत नियम तयार करण्याबाबत निर्णय घेऊन डिसेंबर अखेर पर्यंत हे काम पूर्ण करण्यास प्राधान्य दिले जाईल. तसेच लोकप्रतिनिधीं समवेत बैठक घेण्याच्याबाबतीतील निर्णय घेतला जाईल असे आश्वासन सचिवांनी समितीस दिले.

७.२० विशेष पोलीस पथक याचे नियम तयार करताना कुठली आणि किती पदे भरली पाहिजेत हे ही लक्षात घेतले पाहिजे. पोलीस खात्यामध्ये जवळपास १६०० हवालदार व ५०० पोलीस इन्स्पेक्टरची पदे भरावयाची आहेत, वित्त विभागाने पद भरतीवर जी बंदी घातली आहे त्याबाबतीत समितीला या निमित्ताने वित्त विभागास असे सांगावयाचे आहे की, पोलीस दल हा राज्यातील महत्त्वाचा विभाग आहेत. त्यामुळे या विभागातील पदांच्या भरतीबाबत शासनाने प्राथम्याने अग्रक्रम देऊन विचार करणे आवश्यक आहे तसेच रिक्त पदांच्या भरतीवरील निर्बंध उठवण्याबाबत विभागाने वेळेवर निर्णय घेणे अपेक्षित आहे, याबाबतीत समितीने वित्त सचिवांना विचारले असता, यासंबंधात समितीकडून आलेल्या सूचना तसेच विविध विभागांकडून आलेले प्रस्ताव एकत्र करून विभागाने नस्ती तयार केली आहे व ती अंतिम मान्यतेसाठी शासनाकडे सादर केलेली आहे अशी माहिती वित्त सचिवांनी समितीस दिली. वर्ग ३ व वर्ग ४ च्या पदांच्या भरतीवर बंदी असली तरी जे लोक सेवानिवृत्त होतात त्यांच्या जागेवर नियमानुसार भरती केली गेली पाहिजे. ८-८ वर्षे भरती होत नाही, पोलिसांची पदे भरली जात नाहीत हे काही योग्य नाही. याबाबत विभागाने काय प्रयत्न केले यासंदर्भातील माहिती समितीस देण्यात यावी असे साक्षीच्या वेळी समितीने विभागाला निदेश दिले असतांनाही अद्याप पर्यंत समितीस माहिती प्राप्त झालेली नाहीत. हे समिती या खेदाने नमूद करीत आहे.

अभिप्राय व शिफारशी :

७.२१ महालेखापालांनी उक्त परिच्छेदांबाबत नमूद केलेल्या अभिप्रयाच्या संदर्भात गृह विभागाने पुरविलेली लेखी माहिती व साक्षीचे वेळी सचिवांनी दिलेल्या माहितीवरून असे दिसून येते की, गृह विभागाने औरंगाबाद महानगरपालिकेला अतिक्रमण हटविण्यासाठी विशेष पोलीस पथक उपलब्ध करुन देण्यात आले होते. सन १९९८ च्या शासन निर्णयानुसार महानगरपालिकेला अतिक्रमण हटविण्यासाठी

देण्यात आलेल्या संरक्षण दलातील पोलिसांचे वेतन/भत्ते व इतर खर्च औरंगाबाद महानगरपालिकेद्वारे पोलिस आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे प्रत्येकी तीन महिन्यांसाठी आगाऊ भरणा करुन पोलिस आयुक्तांनी सदर रक्कम शासनाच्या खाती जमा करणे आवश्यक होते. असे असतांनाही महानगरपालिकेकडून गृह विभागाला रु.१.३९ कोटी येणे बाकी असल्यामुळे महालेखापालांनी आक्षेप घेतला आहे. महालेखापाल कार्यालयाने आक्षेप घेतल्यामुळेच केवळ महानगरपालिकेकडून येणे असलेल्या रक्कमेचा गृह विभागाकडून पाठपुरावा करण्यात आला व त्यानंतर औरंगाबाद महानगरपालिकेकडून थकीत रक्कम वसुल करण्याची कार्यवाही करण्यात आली. यावरून महालेखापालानीं जर हा आक्षेप घेतला नसता तर कदाचित अद्यापपर्यंत वसुलीच झाली नसती असे म्हटल्यास ही अतिशयोक्ती होणार नाही. **त्यामुळे महानगरपालिकेला पुरविलेल्या संरक्षण पोलिस दलाच्या वेतन व भत्त्याची रक्कम शासनाने यासंदर्भात काढलेल्या परिपत्रकानुसार वेळीच व आगाऊ स्वरूपात भरणा करून घेण्याचे दृष्टीने सदर संबंधित अधिकाऱ्यांनी रक्कम वेळीच वसुल करण्याची कार्यवाही न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द जबाबदारी निश्चित करून त्या अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई होणे आवश्यक आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे.सबब, त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन त्यांच्यावर योग्य ती कारवाई ३ महिन्यात करुन केलेल्या कारवाईची माहिती समितीस तात्काळ पाठविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

७.२२ औरंगाबाद महानगरपालिकेप्रमाणेच राज्यातील इतर महानगरपालिकांकडून देखील अतिक्रमण हटविण्यासाठी विशेष पोलिस पथकाची मागणी गृह विभागाकडे करण्यात येत असते. **राज्यातील महानगरपालिकांचा प्रशासकीय विभाग म्हणून नगरविकास विभागाने राज्यातील महानगरपालिकेकडून तसे प्रस्ताव नगरविकास विभागास प्राप्त होत असतात ही बाब विचारात घेता नगरविकास विभागाने त्याप्रमाणे आपल्या अंदाजपत्रकात तरतूद करणे आवश्यक असून महानगरपालिकेकडून मागणी येईल त्याप्रमाणे गृह विभागास निधी आगाऊ स्वरूपात उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यपद्धती अवलंबिणे नितांत गरजेचे आहे. असे समितीचे स्पष्ट मत आहे. सबब यासंदर्भात नगरविकास विभागाने आपल्या अंदाजपत्रकात महानगरपालिकेकडून सुरक्षा दल स्थापित करण्याबाबत येणाऱ्या प्रस्तावांची संख्या विचारात घेऊन त्यासाठी पुरेशी तरतूद करावी अशी समितीची शिफारस आहे यासंदर्भात शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबत सविस्तर माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

७.२३ ग्रामीण सुरक्षा दलाच्या स्थापनेबाबत पोलीस मॅन्युअला ॲक्टमध्ये तरतूद आहे. शहरी भागात गणपती उत्सवाच्या वेळी, तसेच निवडणुकीच्या वेळी पोलिसांना २४ तास काम करावे लागते. त्याचप्रमाणे होमगार्डना देखील त्यांच्या बरोबर काम करावे लागते. **मात्र शासनाकडून होमगार्डना फारशा सोयी सवलती दिल्या जात नसल्यामुळे होमगार्डमध्ये काम करण्यास ग्रामीण तसेच शहरी भागातील फारसे कोणी उत्सुक नसतात. हि वस्तुस्थिती विचारात घेता संप मोर्चा आंदोलन अथवा नैसर्गिक किंवा अचानक उद्‌भवलेल्या परिस्थिला सामोरे जाण्यासाठी होमगार्डच्या सोयी-सुविधा वाढवून**

त्यांच्याकडे अधिक जबाबदारी सोपविण्याची आवश्यकता आहे असे समितीला वाटते. तसेच ही जबाबदारी पार पाडण्यासाठी त्यांना स्वतंत्र कार्यालयही देण्यात यावे. होमगार्डस दलातील कर्मचाऱ्यांकडून बजावली जाणारी सेवा तसेच त्या दलामधील त्यांना असलेला कामाचा अनुभव विचारात घेता ज्यावेळी काही विशिष्ट परिस्थिती हाताळण्यासाठी ज्या भागामध्ये निमसुरक्षा दल म्हणून कंत्राटी तत्वावर जे कर्मचारी काम करतात त्यांना भविष्यात निर्माण होणाऱ्या शासकीय पदांवरील भरतीचे वेळी नोकरीची संधी देण्यात यावी व सेवेमध्ये कायम करताना त्यांचा नावाचा प्राधान्याने विचार करावा अशी समितीची शिफारस आहे.

७.२४ शासनाने अलिकडेच विशेष पोलीस सुरक्षा दल स्थापन करण्याबाबतचे विधेयक विधानमंडळामध्ये एकमताने संमत केले आहे. यासाठी सरकारने २५ कोटी रूपयांची अर्थसंकल्पामध्ये तरतूद सुद्धा केली आहे. असे असतांना ही या विशेष पोलीस सुरक्षा दलासाठी पायाभूत सुविधा कशा असतील, किती अधिकारी / कर्मचारी त्यामध्ये असतील ही सेवा ज्याव्यक्तींनी खाजगी सुरक्षा व्यवस्था देण्याबाबत केलेल्या विंनती नुसार त्यांना तशी सुरक्षा व्यवस्था देण्यासाठी किती रक्कमेची आकारणी केली जाणार आहे याबाबतचा निर्णय विधेयक संमत होऊन सहा महिन्यांचा कालावधी उलटून गेला असतानाही विभागाकडून यासंदर्भात अद्यापपावेतो पुढील कार्यवाही अपेक्षेप्रमाणे केलेली नाही. इतकेच नव्हेचतर याबाबतचे नियम अद्यापपर्यंत तयार होत नाहीत, हे योग्य नाही. विशेष पोलीस पथक याचे नियम तयार करताना कुठली आणि किती पदे भरली पाहिजेत हेही लक्षात घेतले पाहिजे. पोलीस खात्यामध्ये जवळपास १६०० हवालदार व ५०० पोलीस निरीक्षकांची पदे भरावयाची आहेत. वित्त विभागाने शासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांच्या पद भरतीवर जी बंदी घातली आहे, त्याबाबत समितीचे असे मत आहे की, पोलीस दल हा राज्यातील कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा विभाग आहे. त्यामुळे या विभागातील आवश्यक असलेल्या पदांच्या भरतीबाबत तातडीने विचार होणे आवश्यक आहे तसेच या विभागातील रिक्त पदांच्या भरतीबाबत विभागाने वेळेवर निर्णय घेणे अपेक्षित असुन नियमानुसार भरती केली गेली पाहिजे. ८-८ वर्षे भरती होत नाही, पोलिसांची पदे भरली जात नाहीत ही बाब कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने गंभीर आहे. **सबब, वित्त विभागाने गृह विभागातील पोलिसांची पदे भरण्याच्या दृष्टीने अपवाद म्हणून पदे भरण्यासाठी असलेल्या अटी गृह विभागाच्या बाबतीत शिथिल कराव्यात अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे. त्यामुळे गृह विभाग जे विशेष पोलीस सुरक्षा पथक निर्माण करणार आहे त्यांचे नियम तातडीने तयार करून आवश्यक ती पदे लवकरात लवकर भरण्याचे दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी व पोलीस खात्यामध्ये सर्वसाधारणपणे १६०० हवालदार व ५०० पोलीस निरीक्षकांची पदे भरावयाची आहेत, ती रिक्त पदे भरण्याची कार्यवाही गृह विभागाने सत्वर करावी. पोलीस खात्यात वर्षानुवर्षे भरती होत नाही, परिणामी अपुऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण पडतो.**

या विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना पदोन्नतीच्या संधी देखील कमी असल्यामुळे पोलीसामध्ये नैराश्य निर्माण होण्याची शक्यता नाकरता येत नाही. सबब, यापुढे सेवा निवृत्ती नंतर पोलिसांच्या रिक्त होणाऱ्या जागा तातडीने भरण्याचे दृष्टीने गृह विभागाने आवश्यक ती कार्यवाही त्वरीत करावी अशी समितीची शिफारस आहे.

परिशिष्ट - अ

विवरणपत्र - १

-:न्यायाधिकरणाकडील प्रलंबित अपिलाबाबत :-

मान, विक्रीकर न्यायाधिकरण ही अपिलाच्या बाबतीतील निर्णय देण्यासाठी महत्वाची संस्था समजण्यात येते. राज्य सरकारने विक्रीकर न्यायाधिकरणाची स्थापना केल्यानंतर सुमारे ६ वर्षापूर्वी पर्यंत ३ बेंचेस निर्माण केले होते. न्यायालयीन प्रकरणांचा निपटारा लवकर व्हावा या उद्देशाने तद्नंतर ३ बेंचेस निर्माण केले होते. न्यायालयीन प्रकरणांचा निपटारा लवकर व्हावा या उद्देशाने तद्नंतर ३ बेंचेस चे ६ बेंचेस (खंडपीठ) निर्माण केलेले आहेत. न्यायालयाच्या रचनेत एक judicial Member (सेवेत असलेले तसेच निवृत्त) दिवाणी न्यायाधीश अथवा जिल्हा स्तरावरील निवृत्त न्यायाधीश यांची नेमणूक करण्यात येते. एक सदस्य (Member) विभागातील इतर विक्रीकर आयुक्त या दर्जाचा असतो. एका बेंच साठी एक न्यायालयीन न्यायाधीश व एक विभागीय न्यायाधीश मिळून प्रकरणांचा निपटारा करतात. काही परिस्थितीत न्यायालयीन सदस्य एकटेच प्रकरणाचा निपटारा करु शकतात. ६ खंडपीठे पूर्णपणे कार्यान्वित झालेली नाहीत कारण न्यायिक/विभागीय सदस्यांची रिक्त पदे वेळोवेळी भरली गेली नाहीत. सध्या ३ न्यायिक व १ विभागीय सदस्य कार्यरत आहेत.

न्यायाधिकरणात बाजू मांडण्यासकरीता विक्रीकर खात्याची बाजू ही विक्रीकर खात्यातील विधी शाखा या मधील अधिकारी करतात व व्यापाऱ्याकडून त्यांचे वकील (Advocate) व्यापाऱ्यांचे म्हणणे मांडतात.

न्यायाधिकरणात प्रथम अपिल किंवा द्वितीय अपिल दाखल करण्यात येते. प्रथम अपिल सर्व साधारणातः आयुक्तांच्या विवादातील प्रश्नाबद्दल किंवा विक्रीकर सह आयुक्त यांनी केलेल्या सुधारीत कार्यवाहीवरील अपिल न्याधिकरणासमोर सादर करण्यात येते. द्वितीय अपिल हे सर्वसाधारणपणे प्रथम अपिलात पारीत केलेल्या आदेशाबद्दल होते. तसेच संकीर्ण अर्ज (Misc.Applin.) दुरुस्ती अर्ज (Rectification Appln.) पुर्न स्थापना अर्ज इत्यादी अर्जावर सुध्दा अपिलाचे निर्णय होतात. निवाडा देताना मतांची भिन्नता असेल तर Larger Bench त्याचा निवाडा करतात. न्यायाधिकरणासमोर बाजू मांडताना दोन्ही पक्षाचे प्रतिनिधी (Representative) आपली बाजू हिरीरीने मांडतात. कारण विक्रीकर विभागासाठी हे शेवटचे न्यायाधिकरण ठरुन जात असल्यामुळे दोन्ही बाजूंचा उहापोह न्यायाधिकरणासमोर होतो. बाजू मांडीत असताना न्यायालयीन निर्णयाचे संदर्भ घेतले जातात व त्याचे सादरीकरण पण न्यायाधिकरणाकडे होते. न्यायाधिकरण ही सत्यता पाहणारी शेवटची संस्था असल्यामुळे न्यायाधिकरणाला पहिल्यांदा सुध्दा (For First time) सत्यता (Fact) पडताळता येते. दोन्ही पक्षाचे म्हणणे ऐकून घेतल्या नंतर प्रकरण निकालासाठी (Judgment) बंद करण्यात येते.

त्यानंतर न्यायाधिकरण हे विशिष्ट तारखेला विशिष्ट प्रकरणी संबंधित आपले Judgment देतात. याची तारीख ठरविताना व ती त्या दिवशी Judgment पारीत झाले असे समजण्यात येते. निकालावर (Judgment) निकालाची तारीख लिहिलेली असतेच.

न्यायाधिकरणाचा निर्णय व्यापाऱ्याला अमान्य असल्यास किंवा विक्रीकर आयुक्तांना अमान्य असल्यास न्यायाधिकरणासमोर संदर्भ (Reference) अर्ज दाखल करण्याची तरतूद आहे. या संदर्भ अर्जावर दोन्ही पक्षाचे म्हणणे पुन्हा ऐकून घेवून कायदेशीर बाबी (Substantial Question of Law) निर्माण होत असेल तर न्यायाधिकरण त्या प्रकरणाचा प्रश्न तयार करुन मान.उच्च न्यायालयात विचारार्थ पाठवतात.

न्यायाधिकरणाचे बेंचेस वाढल्यामुळे न्याय प्रक्रियेत सुलभता व जलदता निर्माण झालेली आहे.

न्यायाधिकरणाकडे माहे मार्च २०१० अखेर ३८८३ प्रकरणात रु. २५९७ कोटी इतकी रक्कम स्थगित आहे. अपिलात विशिष्ट प्रमाणात भाग भरणा (part payment) संबंधी कायद्यात जर दुरुस्ती झाली तर शासनास त्या प्रमाणात महसूल मिळेल.

सही/-

विक्रीकर सहआयुक्त (मुख्यालय) ३,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विवरणपत्र - २

महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधीरण,
७१४, ७ वा मजला, विक्रीकर भवन,
माझगांव, मुंबई- ४०० ०१०.

प्रति,
विक्रीकर सहायुक्त (मुख्यालय-३)
महाराष्ट्र राज्य, मुंबई.
क्रमांक : मविन्या/आस्था-२०१०-११/पदे/ब-८३३ मुंबई दि. ३०/०८/२०१०.

विषय : अध्यक्ष व सदस्य यांची मंजूर, भरलेली व रिक्त पदे.

उपरोक्त विषयानुसार दि. ३०.०८.२०१० रोजीची या कार्यालयातील अध्यक्ष व सदस्य यांची मंजूर, भरलेली व रिक्त पदे याची माहिती सादर करीत आहे.

महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधीकरण, मुंबई

संवर्ग	मंजूर पदे			भरलेली पदे			रिक्त पदे		
	स्थायी	अस्थायी	एकूण	स्थायी	अस्थायी	एकूण	स्थायी	अस्थायी	एकूण
अध्यक्ष (न्यायालयीन)	१	०	१	०	०	१	१	०	१
सदस्य (न्यायालयीन)	२	३	५	२	१	३	०	२	२
सदस्य (विभागीय)	३	३	६	१	१	२	२	२	४
एकूण	६	६	१२	३	२	५	३	४	७

सही/-
प्रबंधक
महाराष्ट्र विक्रीकर न्यायाधिकरण,
मुंबई.

विवरणपत्र - ५

अ. क्र.	वर्ष	व्यक्तींचे नाव	गुन्हा रजिस्टर नंबर व गुन्हा दाखल तारीख	गुन्हाचे कारण	सद्य:स्थिती
	२००५-२००६	निरंक			
	२००७-२००८	निरंक			
	२००७-२००८	निरंक			
	२००८-२००९	निरंक			
	२००९-२०१०				
१.	**तहसिल मंडणगड**	मे कोकण सेन्ड ॲन्ड बार्जस असो. महाड	१) गुन्हा रजिस्टर क्रमांक ११/०९ दिनांक १३/०५/२००९ पोलीस ठाणे मंडणगड	अनधिकृत वाळु उत्खनन व वाहतुक	न्यायालयात प्रलंबित असून सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
२.	**तहसिल मंडणगड**	श्री.सुलतान अहमद मुकादम रा.मंडणगड	गुन्हा रजिस्टर क्रमांक १५/०९ दिनांक ६/०६/२०१०	अनधिकृत वाळु उत्खनन व वाहतुक	न्यायालयात प्रलंबित असून सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
३.	**तहसिल मंडणगड**	श्री.मुबीन हसन परकार व पराग विलास करमरकर रा.मंडणगड	२) गुन्हा रजिस्टर क्रमांक ०६/०९ दिनांक २६/०८/२००९ पोलीस ठाणे मंडणगड	अनधिकृत वाळु उत्खनन व वाहतुक	न्यायालयात प्रलंबित असून सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
४.	**तहसिल मंडणगड**	श्री.रोहित दशरथ सावंत वगैरे १२	गुन्हा रजिस्टर नंबर २३/०९ दिनांक ०५/०९/२००९	अनधिकृत वाळु उत्खनन व वाहतुक	न्यायालयात प्रलंबित असून सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
५.	**तहसिल मंडणगड**	श्री.शोभेद्र सुधार गांधी	गुन्हा रजिस्टर नंबर ०७/०९ दिनांक २१/०९/२००९	अनधिकृत वाळु उत्खनन व वाहतुक	न्यायालयात प्रलंबित असून सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
६.	**तहसिल रत्नागिरी**	श्री.संतोष शंकर सुर्वे रा.भंडारपुळे	गुन्हा रजिस्टर नं. ३६/०९ दिनांक ०६/११/२०११	अनधिकृत वाळु उत्खनन व वाहतुक	न्यायालयात प्रलंबित असून सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
७.	**तहसिल राजापुर**	श्री.दशरथ गोपीनाथ कोठारकर वगैरे ७	गुन्हा रजिस्टर नं. २६/०९, २७/०९ दिनांक ०२/१२/२००९	अनधिकृत वाळु उत्खनन व वाहतुक	न्यायालयात प्रलंबित असून सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
८.	**तहसिलदार चिपळुण**	श्री.विलास सिताराम कोलगे रा.कुटरे ता.चिपळुण	गुन्हा रजिस्टर नं. ४२/२००१ दिनांक ०२/१२/२००९	अनधिकृत वाळु उत्खनन व वाहतुक	न्यायालयात प्रलंबित असून सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

९.	**तहसिलदार चिपळुण**	श्री.संजीव तानाजी राजेशिर्के रा.कुटरे ता.चिपळुण	गुन्हा रजिस्टर नं. ४३ दिनांक ०४/१२/२००९	अनधिकृत वाळु उत्खनन व वाहतुक	न्यायालयात प्रलंबित असून सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
१०.	**तहसिलदार चिपळुण**	श्री,देवेश कृष्णा सुर्वे रा.कुटरे ता.चिपळुण	गुन्हा रजिस्टर नं. ४४ दिनांक ०३/१२/२०१०	अनधिकृत वाळु उत्खनन व वाहतुक	न्यायालयात प्रलंबित असून सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
११.	**तहसिल रत्नागिरी**	श्री.शरद दत्ताराम वारेकर वगैरे ८	गुन्हा रजिस्टर नं. १२३/०९ दिनांक १२/१२/२००९	अनधिकृत वाळु उत्खनन व वाहतुक	न्यायालयात प्रलंबित असून सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
१२.	**तहसिल खेड**	१) श्री.अण्णा मोतीराम चव्हाण रा.खेड २) अकबर दाऊद दुदुके रा.खेड	गुन्हा रजिस्टर नं. ७३/२००९ दिनांक १४/१२/२००९	अनधिकृत वाळु उत्खनन व वाहतुक	न्यायालयात प्रलंबित असून सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
१३.	**तहसिल दापोली**	श्री.मिलींद अरुण शिगवण वगैरे ९	गुन्हा रजिस्टर नं. १०६/२००९ दिनांक १४/१२/२००९	अनधिकृत वाळु उत्खनन व वाहतुक	न्यायालयात प्रलंबित असून सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
१४.	**तहसिल चिपळुण**	श्री.रामकृष्ण सिताराम रा.गोवळकोट ता.खेड वगैरे ७८	गुन्हा रजिस्टर नं. ४०८/२००९ दिनांक ०३/०१/२०१०	अनधिकृत वाळु उत्खनन व वाहतुक	न्यायालयात प्रलंबित असून सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
१५.	**तहसिल खेड**	श्री.दिपक गोविंद कुंभार रा.भरली तरखाना ता.पाटण जि.सातारा	गुन्हा रजिस्टर नं. १०/२०१० दिनांक १२/०१/२०१०	अनधिकृत वाळु उत्खनन व वाहतुक	न्यायालयात प्रलंबित असून सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
१६.	**तहसिल चिपळुण**	श्री.सुनिल सदाशिव चव्हाण रा.येगाव	गुन्हा रजिस्टर नं. २/२०१० दिनांक १५/०१/२०१०	अनधिकृत वाळु उत्खनन व वाहतुक	न्यायालयात प्रलंबित असून सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
१७.	**तहसिल रत्नागिरी**	श्री.राजकुमार बनसुप्रसाद कनजीया वगैरे ६	गुन्हा रजिस्टर नं. ७/२०१० दिनांक १५/०२/२०१०	अनधिकृत वाळु उत्खनन व वाहतुक	न्यायालयात प्रलंबित असून सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
१८.	**तहसिल रत्नागिरी**	श्री.रुपेश रमाकांत पाटकर वगैरे ७	गुन्हा रजिस्टर नं. २२/२०१० दिनांक ०६/०३/२०१०	अनधिकृत वाळु उत्खनन व वाहतुक	न्यायालयात प्रलंबित असून सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

१९.	**तहसिल रत्नागिरी**	श्री.प्रकाश यशवंत लांगडे रा.भंडारवाडी ता.जि.रत्नागिरी	गुन्हा रजिस्टर नं. १२/२०१० दिनांक ०६/०३/२०१०	अनधिकृत वाळु उत्खनन व वाहतुक	न्यायालयात प्रलंबित असून सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
२०.	**तहसिल मंडणगड**	श्री.रिजवान ईस्माईल खोत व २ रा.मंडणगड	गुन्हा रजिस्टर नं. ५/२०१० दिनांक २५/०२/२०१०	अनधिकृत वाळु उत्खनन व वाहतुक	न्यायालयात प्रलंबित असून सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
२१.	**तहसिल दापोली**	श्री.विकास वसंत मोरे वगैरे २	गुन्हा रजिस्टर नं. २७/२०१० दिनांक २७/०२/२०१०	अनधिकृत वाळु उत्खनन व वाहतुक	न्यायालयात प्रलंबित असून सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
	२०१०-२०११ (माहे जून २०१० अखेर)				
१.	**तहसिल मंडणगड**	मे.नंदराज हेव्हलपर्स प्रा.लि.मुंबई	गुन्हा रजिस्टर नं. ६/२०१० दिनांक २१/०६/२०१०	अनधिकृत वाळु उत्खनन व वाहतुक	न्यायालयात प्रलंबित असून सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
२.	**तहसिल मंडणगड**	मे.नंदराज डेव्हलपर्स प्रा.लि.मुंबई	गुन्हा रजिस्टर नं. ७/२०१० दिनांक २५/०६/२०११	अनधिकृत वाळु उत्खनन व वाहतुक	न्यायालयात प्रलंबित असून सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

विवरणपत्र - ६

रत्नागिरी जिल्ह्यामध्ये गौण खनिजाचे खाली नमूद केल्याप्रमाणे परवाने मंजूर करणेत आलेले आहेत.

सन	२००५-२००६			२००६-२००७			२००७-२००८			२००८-२००९			२००९-२०१०			२०१०-२०११		
खनिज प्रकार	मंजूर परवान्याची संख्या	मंजूर ब्रास	प्राप्त स्वामित्वधन	मंजूर परवान्याची संख्या	मंजूर ब्रास	प्राप्त स्वामित्वधन	मंजूर परवान्याची संख्या	मंजूर ब्रास	प्राप्त स्वामित्वधन	मंजूर परवान्याची संख्या	मंजूर ब्रास	प्राप्त स्वामित्वधन	मंजूर परवान्याची संख्या	मंजूर ब्रास	प्राप्त स्वामित्वधन	मंजूर परवान्याची संख्या	मंजूर ब्रास	प्राप्त स्वामित्वधन
काळा दगड	२६२	४७७१८	२६२५९००	२८५	५६८२५	४०७३५००	२९१	८७०५५	४१३६०५००	३०१	९१००८	१४१५८००	२४०	१३००३२	१५८७३३००	४३	३२१७०	५८०४०००
जांभा चिरा	६६६	१४८७४३	५२००७५५	९१८	२५०४९४	८८६१७९०	९५१	३४०६८७	९२४५६८०	९९९	३३६९७७	१६५१८७२५	८१२	२५३९६२	१४३१५५००	१७२	३७८२०	३४८३०५०
माती	५५	२१४००	१०३८८०००	५८	१४९८३	११८५२५३	८६	३०६९०	६१५९६४३	९५	१०४८२८	११२३२१५०	१५९१	११९९०५	७०५१०००	१७	७०९०	१३९४०००
इतर	६	१०००	२६२००	४३	४२५०	१९८५००	४३	३९५०	१८५०००	५७	६४००	२३२६००	३६	३६००	१४६८००	११	१४९०	१९२५५४
विटभट्टी	९	१७००	३४०००	१	२००	२००००	०	०	०									
वाळु	२	३००००	१५००००	४९	३६६५०	२३३५०००	३७	४२६००	५४४३०००	२३	९५०००	२६४३४०००	४१	१४०६००	३१७२६७५०	४	५१००	१०२००००
मुरुम	०	०	०	०	०	०	१	५००	५००००	०	०	०	०	०	०	०	०	०
शिंपले	०	०	०	०	०	०	०	०	०	१	३००	३००००	२	८००	१०००००	२	४००	८००००
गाळ	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	२	७००	७००००	०	०	०
एकूण	१०००	२५०५६१	१८४२४८५५	१३५४	३६३४०२	१६६७४०४३	१४०९	५०५४८२	६२४४३८२३	१४७६	६३४५१३	५५८६३२७५	२७२४	६४९५९९	६९२८३३५०	२४९	८४०७०	११९७३६०४

तहसिलदार, उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय यांचे मार्फत मंजूर केलेल्या परवान्याची प्रकरणी निहाय माहिती सोबत संलग्न करणेत येत आहे.

विवरणपत्र - ७

मंत्रालयीन विभागाचे नांव :- उद्योग, ऊर्जा व कामगार (संचालक, भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, नागपूर)

दि. ३०/०६/२०१० रोजी सर्व संवर्गातील भरण्यात आलेली पदे व रिक्त पदे यांची एकत्रित माहिती

गट	दि. ३१.०८.२००८ रोजीची मंजूर पदसंख्या			दि. ३१.०३.२०१० रोजी रिक्त असलेली पदे.			दि. ३०.०६.२०१० या कलावधीत रिक्त झालेली पदे			एकूण रिक्त पदे (रकाना ३ + रकाना ४)			दि.०१.०४.२०१० ते दि. ३०.०६.२०१० पर्यंत भरलेली पदे			दि. ३०.०६.२०१० रोजी रिक्त पदे (रकाना ५ + रकाना ६)		
१	२			३			४			५			६			७		
	सरळ सेवा	पदोन्नती	एकूण	सरळ सेवा	पदोन्नती	एकूण	सरळ सेवा	पदोन्नती	एकूण	सरळ सेवा	पदोन्नती	एकूण	सरळ सेवा	पदोन्नती	एकूण	सरळ सेवा	पदोन्नती	एकूण
अ	२४	३९	६३	१४	२१	३५	०	०	०	१४	२१	३५	०	०	०	१४	२२	३६
ब	५८	१२	७०	३३	७	४०	०	२	२	३३	९	४२	०	०	०	३३	९	४२
क	१३०	१४८	२७८	५	१५	२०	११	१	१२	१६	१६	३२	०	१	१	१६	१५	३१
ड	६६	३	६९	५	०	५	१	०	१	६	०	६	०	०	०	६	०	६
एकूण	२७८	२०२	४८०	५७	४३	१००	१२	३	१५	६९	४६	११५	०	१	१	६९	४६	११५

सही/-

अवर सचिव (उद्योग)

का.अ. (प्रशा-३) - सही/-

विवरणपत्र - ८

गट "अ" व "ब" मधील सरळसेवेची रिक्त पदे भरण्यासंदर्भात करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचा संवर्गनिहाय तपशील

गट	पदनाम (संवर्गाचे नाव)	रिक्त पदांची संख्या (सरळसेवा)	किती पदांसाठी आयोगाकडे मागणीपत्र पाठविले आहे	किती पदांच्या शिफारशी आयोगाकडून प्राप्त झाल्या परंतू नियुक्ती द्यावयाची आहे	आयोगाकडे मागणीपत्र न पाठविलेल्या रिक्त पदांची संख्या	मागणीपत्र न पाठविण्याची कारणे
१	२	३ (४+५+६)	४	५	६	७
अ. १	सहसंचालक	२	२	निरंक	निरंक	
२	उपसंचालक	१	१	निरंक	निरंक	
३	वरिष्ठ भूवैज्ञानिक	७	७	निरंक	निरंक	
४	भूवैज्ञानिक	३	२	निरंक	१	२ पदांसाठी दिनांक ३०.०४.२०१० रोजी आयोगाने जाहिरात प्रसिध्द केली आहे.
४	मुख्य आवेधन अभियंता	१	निरंक	निरंक	१	नवनिर्मीत पद असून सेवा प्रवेश नियम तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.
गट "अ" एकूण		१४	१२	०	२	
ब						
१	रसायन शास्त्रज्ञ		३	निरंक	निरंक	दि. ११.२००७ रोजी आयोगास सादर केलेल्या मागणीपत्राच्या अनुषंगाने लोकसेवा आयोगाद्वारे दि. ११.१२.२००९ व ३१.१२.२००९ रोजी अनुक्रमे १ व २ पदांसाठी जाहिरात देण्यात आली आहे.

२	**कनिष्ठ भूवैज्ञानिक**	२५	निरंक	निरंक	२५	१० पदांसाठीचे मागणीपत्र दि. २०.०२.२००८ रोजी आयोगास पाठविण्यात आले होते. सदर मागणीपत्र आयोगाने दिञ १९.१२.२००९ रोजी परत पाठविल्याने अद्यावत रिक्त पदे लक्षात घेऊन १९ पदांसाठी सुधारित प्रस्ताव सा.प्र.वि.कडे दि. ११.०३.२०१० रोजी पाठविण्यात आला होता. सामान्य प्रशासन विभागाने विचारणा केलेल्या माहितीसह प्रस्ताव पुन्हा सादर करण्यात येत आहे
३	**सहाय्यक प्रशासन अधिकारी**	१	१	निरंक	निरंक	
४	**सहाय्यक आवेधन अभियंता**	२	२	निरंक	निरंक	२ पदासाठी दि. ३०.०४.२०१० रोजी आयोगाने जाहिरात प्रसिध्द केली आहे.
५	**सर्व्हे ॲण्ड मॅप अधिकारी**	२	निरंक	निरंक	२	नवनिर्मीत पद असून सेवा प्रवेश नियम तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.
गट "ब" एकूण	**०**	**३३**	**६**	**०**	**२७**	
गट "अ" व "ब" एकूण	**०**	**४७**	**१८**	**०**	**२९**	

विवरण पत्र -

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने आतापर्यंत उभारलेल्या सर्व कर्ज अथवा कर्जरोखे प्रकरणात हमी देण्याच्या तारखेपासून, निर्णयाच्या दिनांकापर्यंत 2 टक्के दराने हमीशुल्क आकारण्यास व या हमीशुल्काऐवजी समभाग शासनाचा सहभाग (Government equity) म्हणून रुपांतरीत करण्यास पूर्वलक्षी प्रभावाने मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग,
शासन निर्णय क्र. खाक्षेस-२००२/१८२ एल.बी./रस्ते-८,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक २३ मार्च, २०१०.

प्रस्तावना :- महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची कार्यक्षमता वाढविण्याच्या दृष्टीने व हाती घेतलेले प्रकल्प राबवितांना महामंडळास निधी उभारण्याकरीता कर्ज व कर्जरोखे काढण्यासाठी देण्यात येणाऱ्या शासन हमी रकमेवर हमीशुल्क आकारण्याचा व सदर हमीशुल्क घेण्याऐवजी तेवढ्या किंमतीचे समभाग शासनाचा सहभाग म्हणून शासनाच्या नावे पूर्वलक्षीप्रभावाने रुपांतरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याबाबत आता शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय : महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने आतापर्यंत उभारलेल्या सर्व कर्ज अथवा कर्ज रोखे प्रकरणात हमी देण्याच्या तारखेपासून निर्णयाच्या दिनांकापर्यंत २ टक्के (दोन टक्के) प्रतिवर्ष या दराने हमी शुल्क आकारण्यास व या हमी शुल्काऐवजी तेवढ्याच किंमतीचे समभाग शासनाचा सहभाग (Government equity) म्हणून शासनाच्या नावे रुपांतरीत करण्यास एकवेळची बाब म्हणून (One time) पूर्वलक्षी प्रभावाने करण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

२. उपरोक्त शासन मंजूरीच्या अनुषंगाने, सचिव व वित्तीय सल्लागार, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मर्या), मुंबई यांनी दिनांक २४.२.२०१० पर्यंत शासनास देय असलेल्या हमी शुल्काची परिगणना करुन, सदर रकमेचे समभाग शासनाचा सहभाग म्हणून शासनाच्या नावे करावेत. तसेच

दिनांक २५.२.२०१० नंतर देय हमी शुल्काचा भरणा दरवर्षी १ एप्रिल आणि १ ऑक्टोबर रोजी करण्यात यावा.

३. पुस्तकी समायोजनाने हमीशुल्क अदा करावयाची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागातील कक्ष अधिकारी (रोख शाखा) यांचेमार्फत करण्यात यावी. सदर प्रयोजनार्थ नियंत्रक अधिकारी म्हणून सध्याचे नियंत्रक अधिकारी (रोख शाखा) हे असतील.

४. हमीशुल्काची रक्कम समभागात रुपांतर करण्यासाठी ती महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास देणे व नंतर ती महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने शासनास समभागाचे रुपाने परत करणे या कार्यपध्दती ऐवजी सदर शासन हमी शुल्काची रक्कम पुस्तकी समायोजनाने "००७५-संकीर्ण, सर्वसाधारण सेवा-१०८ हमी शुल्क (००७५००५८)" या लेखाशीर्षाखाली वळती करुन घेण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

५. सदर समायोजन मागणी क्रमांक-एच-७, मुख्य लेखाशीर्ष ५०५४ रस्ते व पूल यावरील भांडवली खर्च, ८० सर्वसाधारण १९० सार्वजनिक क्षेत्र व इतर उपक्रमांना अर्थ सहाय्य, (००) (०२) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित यातील महाराष्ट्र शासनाच्या हमी शुल्काचे समभाग भांडवलात रुपांतर (५०५४ वाय ०२२) योजनांतर्गत या लेखाशीर्षाखाली मंजूर झालेल्या अनुदानातून करण्यात आला.

६. हा शासन निर्णय वित्त विभागाचे अनौपचारिक संदर्भ क्र. २०१०/१७/ऋण व हमी, दि.१८ मार्च, २०१० ला अनुसार व प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णयाची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आली असून त्याचा संगणक सांकेतांक क्र.२०१००३२३१९००३३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सही/-
(सं.श्री.सोलंकी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

विवरणपत्र - १३

औरंगाबाद महानगर पालिकेच्या अनधिकृत बांधकामाविरुध्द काम करणाऱ्या पथकाच्या संरक्षणासाठी पोलीस पथक निर्माण करणेबाबत

महाराष्ट्र शासन
गृह विभाग

शासन निर्णय क्रमांक : अेपोअे-३२९७/३११२/प्र.क्र.६८/पोल-३,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक : १२ मे, १९९८

वाचा :- महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक पोमध/२६/४९-गार्ड/औरंगाबाद मनपा/९७, दि. १२ डिसेंबर, १९९७.

शासन निर्णय :- १. शासनाने निर्धारित केलेल्या धोरणानुसार महानगरपालिका हद्दीतील, शासकीय तसेच, महानगरपालिकेच्या जमिनीवर केलेले अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम हटविण्याचे काम महानगरपालिकेचे कर्मचारी करीत असतात. असे काम करताना अतिक्रमणदारांकडून त्यांना विरोध होऊ शकतो व काही वेळा त्यांच्यावर हल्ले देखिल होतात. अशा वेळी महानगरपालिकेच्या या पथकांना प्रभावीपणे काम करता येत नाही. अतिक्रमण/अनधिकृत बांधकामाविरुध्दची कारवाई महानगरपालिकांना प्रभावीपणे करणे शक्य व्हावे म्हणून त्यांच्या कर्मचाऱ्यांना या कामकाजाच्या वेळी पोलीस संरक्षण देण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.

२. औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीत अतिक्रमण/अनधिकृत बांधकामाविरुध्द कारवाई करणाऱ्या महानगरपालिकेच्या पथकाला पोलीस संरक्षण देण्यासाठी व कारवाईच्या ठिकाणी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी स्वतंत्र पोलीस पथक निर्माण करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. हा प्रस्ताव स्विकारुन खाली नमूद केलेली पदे पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांच्या आस्थापनेवर निर्माण करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

अ.क्र.	पदनाम	पदसंख्या	वेतनश्रेणी
१.	पोलीस निरीक्षक	१ (एक)	रु.२२००-७५-२८५०-द.रो.१००-३५००/-
२.	पोलीस हवालदार	४ (चार)	रु.१३२०-३०-१५६०-द.रो.४०-३०००/-
३.	पोलीस शिपाई	१९(एकोणीस)	रु.९५०-२०-११५०-द.रो.२५-१४००/-
४.	पोलीस शिपाई (चालक)	१ (एक)	रु.९५०-२०-११५०-द.रो.२५-१४००/-
५.	महिला पो.शिपाई	४ (चार)	रु.९५०-२०-११५०-द.रो.२५-१४००/-
	एकूण पदे	२९ (एकोणतीस)	

१. वरील पदांना नेहमीचे वेतन व भत्ते देय असून त्यांची मुदत .... कार्यभार स्विकारल्यापासून दि. २८ फेब्रुवारी, १९९९ पर्यंत राहील.

४. वरील पदनिर्मितीच्या अनुषंगाने खाली नमूद केलेली साधन सामुग्री खरेदी करण्याचा शासन या आदेशाद्वारे मंजूरी देत आहे :-

अ.क्र.	वस्तुचे नाव	मंजूर संख्या	खर्च
१.	महिंद्र जिप	१	रु. ३,०८,३९५/-
२.	बिनतारी संदेश वाहन	१	५२,०००/-
३.	दुरध्वनी	१	१५,०००/-
४.	अधिकाऱ्यांसाठी टेबल	१	१५,०००/-
५.	लिपिकासाठी टेबल	१	३,०००/-
६.	अधिकाऱ्यांसाठी खुर्ची	१	७,०००/-
७.	लिपिकांसाठी खुर्च्या (प्रत्येकी रु.१०००/- प्रमाणे)	२०	२०,०००/-
८.	लाकडी रॅक	१	२,०००/-
९.	लाकडी स्टुल	१	२००/-
१०.	लोखंडी कपाट	१	४,०००/-

वरील साधनसामुग्री पैकी वाहन, बिनतारी संदेश संच व इतर साधनसामुग्री खरेदी करण्यासाठी अनुक्रमे पोलीस उपमहानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य, पुणे व पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. वर नमूद केलेल्या पदनिर्मितीसाठी खालील अटींचे पालन संबंधितांनी करावे :-

अ) या पदांवर पूर्ण नियंत्रण औरंगाबाद महानगरपालिका आयुक्त यांचे राहील.

ब) या पदांवर काम करणारे कर्मचारी हे फक्त औरंगाबाद महानगरपालिकेच्या अतिक्रमण/अनधिकृत बांधकामे याविरुध्द काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कामाच्यावेळी त्यांना संरक्षण देण्याचे काम महानगरपालिका आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली करतील.

क) या पदांवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय बाबींचे अधिकार हे सर्वस्वी पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांचे राहतील.

ड) ही पदे औरंगाबाद महानगरपालिकेला आयुक्तांच्या पूर्व संमतीशिवाय पोलीस आयुक्त, औरंगाबाद हे इतरत्र कोठेही वापरु शकणार नाहीत.

इ) या पोलीस पथकासाठी येणारा संपूर्ण खर्च औरंगाबाद महानगरपालिका सोसणार असून, औरंगाबाद महानगरपालिकेने पुढील प्रत्येक ३ महिन्यांसाठी येणारा खर्च हा पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे आगाऊ जमा करावा.

ई) पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांनी वरील "इ" संदर्भात औरंगाबाद महानगरपालिकेला आवश्यक ती माहिती पुरवून पुढील प्रत्येक ३ महिन्यांसाठी येणाऱ्या खर्चाची आगाऊ रक्कम औरंगाबाद

महानगरपालिकेकडून वसूल करुन तिचा भरणा "००५५-पोलीस" या मुख्य लेखाशिर्षाखाली शासकीय जिल्हा कोषागारास करावा.

६. वरील पदांसाठी येणाऱ्या एकूण रु. १७,४२,९८२/- (आवर्ती खर्च रु.१३,१६,३८८/- + अनावर्ती खर्च रु. ४,२६,५९४/-) इतक्या खर्चास शासन मंजूरी देत असून हा खर्च, "२०५५-पोलीस-१०९-जिल्हा पोलीस-१०९(एक)(१)-जिल्हा पोलीस दल" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन १९९८-९९ या आर्थिक वर्षासाठी, नवीन बाब भाग-१ अ.क्र.८ द्वारा मंजूर करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमताने व त्यांच्या अनोपचारीक संदर्भ क्रमांक घोआर-१६/९८/व्यय-७, दिनांक ६.१.१९९८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

स्वाक्षरीत/-
(अ.के.कर्णिक)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग.

प्रति,

महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पोलीस मुख्यालय, मुंबई-३९.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य, पुणे.
पोलीस उप महानिरीक्षक, औरंगाबाद परिक्षेत्र, औरंगाबाद.
पोलीस उप महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
पोलीस आयुक्त, औरंगाबाद.
सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद (पत्राने),
प्रधान महालेखाकार (लेखा परिक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद/पुणे.
वित्त विभाग, व्यय-७, मंत्रालय, मुंबई - ३२.
गृह विभाग, बोयुडी-१/पोल-३ (निवडनस्तीसाठी), मंत्रालय, मुंबई - ३२.

विवरणपत्र - १४

<u>अत्यंत महत्वाचे कालमर्यादा</u>

जा.क्र.२००५/मशाका/वसुली/कावि
जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद
दिनांक :- १९/१२/२००५

प्रति,

२. मा.आयुक्त,
महानगर पालिका औरंगाबाद
३. प्रशासक,
नवीन सिडको औरंगाबाद

विषय :- शासकीय येणे वसुली बाबत.

उपरोक्त विषयी आपणांस कळविण्यात येते की, मा.पोलीस आयुक्त औरंगाबाद यांची अनधिकृत बांधकाम विरुध्द काम करणाऱ्या पथकाच्या संरक्षणासाठी नेमण्यात आलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्याची रक्कम आपणाकडे थकीत असल्याचे मा.अप्पर जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली शासकिय येणे वसुलीच्या बैठकीत दिनांक ५.१२.२००५ रोजी मा.पोलीस आयुक्त औरंगाबाद यांच्या प्रतिनिधी यांनी सांगितले. बैठकीतील सुचनेप्रमाणे आपण तात्काळ थकीत रक्कम भरणा करावी ही विनंती.

स्वाक्षरीत/-
अपर जिल्हाधिकारी औरंगाबाद करिता

प्रत :-
मा.पोलीस आयुक्त औरंगाबाद यांना माहिती व कार्यवाहीस्तव.

स्वाक्षरीत/-
अपर जिल्हाधिकारी औरंगाबाद करिता

परिशिष्ट - ब

मंगळवार, दिनांक २९ जून, २०१०
लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २९ जून, २०१० रोजी शासकीय विश्रामगृह, ओरस, जि.सिंधुदुर्ग येथे साय.५.३० वाजता सुरु होऊन साय.५.५० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

२) डॉ.नामदेव उसेंडी, वि.स.स.
३) श्री.नवाब मलिक, वि.स.स.
४) श्री.विलास लांडे, वि.स.स.
५) श्री.संजय सावकारे, वि.स.स.
६) श्री.सुर्यकांत दळवी, वि.स.स.
७) श्री.बाळा नांदगावकर, वि.स.स.
८) श्री.भाई जगताप - वि.प.स.
९) श्री. विनोद तावडे - वि.प.स.
१०) डॉ. दिपक सावंत - वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
श्री.सोमनाथ न. सानप, कक्ष अधिकारी.

साक्षीदार :

१) श्री.विक्रमकुमार, जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग.
२) श्री.के.एस.हिराणी, अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र. ३.६ संदर्भात साक्ष घेतली अपूर्ण राहिली.

बुधवार, दिनांक ३० जून, २०१०
लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक ३० जून, २०१० रोजी शासकीय विश्रामगृह, गणपतीपुळे, जि.रत्नागिरी येथे दुपारी १.०० वाजता सुरु होऊन दुपारी २.२५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

२) डॉ.नामदेव उसेंडी, वि.स.स.
३) श्री.नवाब मलिक, वि.स.स.
४) श्री.विलास लांडे, वि.स.स.
५) श्री.संजय सावकारे, वि.स.स.
६) श्री.सुर्यकांत दळवी, वि.स.स.
७) श्री.बाळा नांदगावकर, वि.स.स.
८) श्री.भाई जगताप - वि.प.स.
९) श्री. विनोद तावडे - वि.प.स.
१०) डॉ. दिपक सावंत - वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
श्री.सोमनाथ न. सानप, कक्ष अधिकारी

साक्षीदार :

१) श्री.ए.पी.कुंभार, उपसंचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, कोल्हापूर.
२) श्री.डी.एम.रामटेके, वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर.
३) डॉ.आर.एन. साळुंके, प्रभारी जिल्हाधिकारी, रत्नागिरी.
४) श्री.एम.पी.देशमुख, निवासी उप जिल्हाधिकारी, रत्नागिरी.
५) श्री.ए.एस.भोगे, जिल्हा खनिकर्म अधिकारी, रत्नागिरी.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र. ६.२.१५ संदर्भात साक्ष घेतली व अपूर्ण राहिली.

बुधवार, दिनांक ११ ऑगस्ट, २०१०

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक ११ ऑगस्ट, २०१० रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी १.४५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

२) श्री.निलेश देशमुख-पारवेकर - वि.स.स.
३) डॉ.नामदेव उसेंडी - वि.स.स.
४) श्री.अमित देशमुख - वि.स.स.
५) श्री.रामप्रसाद कदम-बोर्डीकर - वि.स.स.
६) श्रीमती मिनाक्षी पाटील - वि.स.स
७) श्री.नवाब मलिक - वि.स.स.
८) श्री.संजय सावकारे - वि.स.स.
९) श्री.नानाभाऊ पटोले - वि.स.स.
१०) श्री.सुर्यकांत दळवी - वि.स.स.
११) श्री.आर.एम.वाणी - वि.स.स.
१२) श्री. विनोद तावडे - वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

१) श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
२) श्री. रामनाथ रा. काठे, अवर सचिव (समिती)

निमंत्रित :

महालेखापाल यांचे कार्यालय :

२) श्रीमती अनिता पट्टनायक, प्रधान महालेखाकार, मुंबई
३) श्री.ए.के. बेहेरा, उपमहालेखाकार, मुंबई.

साक्षीदार :

विभागीय अधिकारी

१) श्री.विद्याधर कानडे, प्रधान सचिव, वित्त विभाग
२) श्री.संजय भाटिया, विक्रीकर आयुक्त

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र. २.२.३ व २.३ संदर्भात प्रधान सचिव, वित्त विभाग यांची साक्ष घेतली व पूर्ण झाली.

बुधवार, दिनांक १८ ऑगस्ट, २०१०

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक १८ ऑगस्ट, २०१० रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी ११.४५ वाजता सुरु होऊन दुपारी २.२० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

२) श्री.अमित देशमुख - वि.स.स.
३) श्री.ए.टी.पवार - वि.स.स.
४) श्री.नवाब मलिक - वि.स.स.
५) श्री.संजय सावकारे - वि.स.स.
६) श्री.नानाभाऊ पटोले - वि.स.स.
७) श्री.सुर्यकांत दळवी - वि.स.स.
८) श्री.आर.एम.वाणी - वि.स.स.
९) श्री.बाळा नांदगावकर - वि.स.स.
१०) डॉ. दिपक सावंत - वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव
२) श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
३) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव
४) श्री.रामनाथ रा. काठे, अवर सचिव (समिती)

निमंत्रित :

महालेखापाल यांचे कार्यालय :

१) श्री.बी.मजुमदार, महालेखाकार, नागपूर.
२) श्री.ए.के. बेहेरा, उपमहालेखाकार, मुंबई.

वित्त विभाग :

डॉ. प्रदिप व्यास, सचिव (ले. व को.)

साक्षीदार :

महसूल व वन (महसूल) विभाग

श्री.एम.रमेशकुमार, अपर मुख्य सचिव, महसूल विभाग

उद्योग विभाग

श्री.ए.एम. खान, प्रधान सचिव, उद्योग विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र. ६.२.९ व ६.२.१५ संदर्भात अपर मुख्य सचिव, महसूल विभाग व प्रधान सचिव, उद्योग विभाग यांची साक्ष घेतली व अपूर्ण राहीली.

मंगळवार, दिनांक ३१ ऑगस्ट, २०१०

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ३१ ऑगस्ट, २०१० रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी १.३५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

२) डॉ.नामदेव उसेंडी - वि.स.स.
३) श्रीमती मिनाक्षी पाटील - वि.स.स
४) श्री.ए.टी.पवार - वि.स.स.
५) श्री.विलास लांडे - वि.स.स.
६) श्री.संजय सावकारे - वि.स.स.
७) श्री.नानाभाऊ पटोले - वि.स.स.
८) श्री.सुर्यकांत दळवी - वि.स.स.
९) श्री.बाळा नांदगावकर - वि.स.स.
१०) डॉ. दिपक सावंत - वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
२) श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
३) श्री. ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव
४) श्री. रामनाथ रा. काठे, अवर सचिव (समिती)

निमंत्रित :

महालेखापाल यांचे कार्यालय :

१) श्रीमती अनिता पट्टनायक, प्रधान महालेखाकार, मुंबई
२) श्री.बी.मजुमदार, महालेखाकार, नागपूर.

वित्त विभाग :

डॉ.प्रदिप व्यास, सचिव (ले. व को.)

साक्षीदार :

गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभाग :-

(१) श्री.सी.एस.संगीतराव, सचिव.
(२) श्री.आय.एस.चहल, आयुक्त.

गृहनिर्माण विभाग

श्री.सिताराम कुंटे, सचिव.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र. ३.६ संदर्भात सचिव, गृह (राज्य उत्पादन शुल्क) विभाग व परिच्छेद क्र. ४.२.१२ संदर्भात सचिव, गृहनिर्माण विभाग यांची साक्ष घेतली व पूर्ण झाली.

मंगळवार, दिनांक ७ सप्टेंबर, २०१०

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ७ सप्टेंबर, २०१० रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी १.५५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

२) श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
३) श्रीमती मिनाक्षी पाटील, वि.स.स.
४) श्री.विलास लांडे, वि.स.स.
५) श्री.सूर्यकांत दळवी, वि.स.स.
६) श्री.आर.एम.वाणी, वि.स.स.
७) श्री.बाळा नांदगावकर, वि.स.स.
८) डॉ.दीपक सावंत, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव
२) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव
३) श्री.रामनाथ रा. काठे, अवर सचिव (समिती)

निमंत्रित :

महालेखापाल यांचे कार्यालय :

३) श्री.के.सी. कुरुविला, उप महालेखाकार, मुंबई
४) कुमारी शीला जोग, उप महालेखाकार, नागपूर

वित्त विभाग :

डॉ.प्रदिप व्यास, सचिव (ले. व को.)

साक्षीदार :

गृह (परिवहन) विभाग :-

(१) श्रीमती चंद्रा अय्यंगार, अपर मुख्य सचिव.
(२) श्री.प्रविण दिक्षीत, प्रधान सचिव.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र. ६.४ संदर्भात अपर मुख्य सचिव व प्रधान सचिव गृह (परिवहन) विभाग यांची साक्ष घेतली व पूर्ण झाली.

बुधवार, दिनांक ८ सप्टेंबर, २०१०
लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक ८ सप्टेंबर, २०१० रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी १.१० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

२) श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
३) श्री.विलास लांडे, वि.स.स.
४) श्री.आर.एम.वाणी, वि.स.स.
५) श्री.बाळा नांदगावकर, वि.स.स.
६) डॉ.दीपक सावंत, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव
२) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव
३) श्री.रामनाथ रा. काठे, अवर सचिव (समिती)

निमंत्रित :

महालेखापाल यांचे कार्यालय :

५) श्री.के.सी. कुरुविला, उप महालेखाकार, मुंबई
६) श्रीमती शीला जोग, उप महालेखाकार, नागपूर

वित्त विभाग :

डॉ.प्रदिप व्यास, सचिव (ले. व को.)

साक्षीदार :

जलसंपदा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, उद्योग विभाग आणि ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण) विभाग :-

(१) श्रीमती मालिनी शंकर, प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग.
(२) श्री.संजय सेठी, सचिव, लघु व मध्यम उद्योग विभाग.
(३) श्री.एम.एस.मुंढे, सचिव, जलसंपदा (ला.क्षे.वि.) विभाग.
(४) श्री.व्ही.गिरीराज, सचिव, जलसंधारण विभाग.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र. ६.३ संदर्भात सचिव, जलसंपदा विभाग, सचिव, उद्योग विभाग, सचिव, ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण) विभाग यांची साक्ष घेतली व पूर्ण झाली. तसेच प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांची साक्ष अपूर्ण राहीली.

मंगळवार, दिनांक २८ सप्टेंबर, २०१०

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २८ सप्टेंबर, २०१० रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी १.३० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

२) श्रीमती मिनाक्षी पाटील, वि.स.स
३) श्री.नवाब मलिक, वि.स.स.
४) श्री.विलास लांडे, वि.स.स.
५) श्री.संजय सावकारे, वि.स.स.
६) श्री.गिरीष महाजन, वि.स.स.
७) श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स.
८) श्री.सुर्यकांत दळवी, वि.स.स.
९) श्री.आर.एम.वाणी, वि.स.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

१) श्री.म.मु.काज, उप सचिव
२) श्री.रामनाथ रा. काठे, अवर सचिव (समिती)

निमंत्रित :

महालेखापाल यांचे कार्यालय :

(१) श्रीमती अनिता पट्टनायक, प्रधान महालेखापाल, मुंबई
(२) श्री.बी.मजुमदार, महालेखाकार, नागपूर

वित्त विभाग :

डॉ. प्रदिप व्यास, सचिव, वित्त विभाग (ले. व को.)

साक्षीदार :

महसूल व वन (महसूल) विभाग :

श्री.एम.रमेशकुमार, अपर मुख्य सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र. ६.२.१५ संदर्भात अप्पर मुख्य सचिव, महसूल व वन (महसूल) विभाग यांची साक्ष घेतली व पूर्ण झाली.

बुधवार, दिनांक २९ सप्टेंबर, २०१०

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक २९ सप्टेंबर, २०१० रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी १.०० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

२) श्री.विलास लांडे, वि.स.स.
३) श्री.संजय सावकारे, वि.स.स.
४) श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स.
५) श्री.आर.एम.वाणी, वि.स.स.
६) श्री.भाई जगताप, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
श्री.रामनाथ रा. काठे, अवर सचिव (समिती)

निमंत्रित :

महालेखापाल यांचे कार्यालय :

(३) श्रीमती अनिता पट्टनायक, प्रधान महालेखापाल, मुंबई
(४) श्री.बी.मजुमदार, महालेखाकार, नागपूर

वित्त विभाग :

श्री. राजेश अग्रवाल, सचिव, वित्त विभाग (ले. व को.)

साक्षीदार :

सार्वजनिक बांधकाम विभाग :

श्री.धनजंय धवड, सचिव सार्वजनिक बांधकाम (रस्ते).

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र. ६.३ संदर्भात सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांची साक्ष घेतली व पूर्ण झाली.

बुधवार, दिनांक ५ जानेवारी, २०११
लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक ५ जानेवारी, २०११ रोजी विधान भवन, मुंबई येथे सकाळी ११.३० वाजता सुरु होऊन दुपारी १.०५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

१) श्री.गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

२) डॉ.नामदेव उसेंडी, वि.स.स.
३) श्री.ए.टी.पवार, वि.स.स.
४) श्री.नवाब मलिक, वि.स.स.
५) श्री.विलास लांडे, वि.स.स.
६) श्री.संजय सावकारे, वि.स.स.
७) प्रा.राम शिंदे, वि.स.स.
८) श्री.बाळा नांदगावकर, वि.स.स.
९) डॉ.दीपक सावंत, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव
२) श्री.भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
३) श्री.रामनाथ रा. काठे, अवर सचिव (समिती)

निमंत्रित :

महालेखापाल यांचे कार्यालय :

श्री.बी.मुजूमदार - महालेखाकार, नागपूर

वित्त विभाग :

श्री.राजेश अग्रवाल - सचिव (ले.व को.)

साक्षीदार :

महसूल व वन (महसूल) विभाग.

श्री.जे.एस. सहारिया, प्रधान सचिव, महसूल व वन (महसूल) विभाग.

पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग.

श्रीमती मालिनी शंकर, सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २००५-२००६ या वर्षाच्या महसूली जमा अहवालातील परिच्छेद क्र. ३.२.१ संदर्भात प्रधान सचिव, महसूल व वन (महसूल) विभाग व परिच्छेद क्र. ६.३ संदर्भात प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांची साक्ष घेतली व पूर्ण झाली.